(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. गुरुनाथ कुलकर्णी)

सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसणे

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात कोणीही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाही. त्यामुळे आपण सभागृहाचे कामकाज पाच मिनिटांकरिता तहकूब करावे.

तालिका सभापती : ठीक आहे. सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक मी पाच मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 10.00 ते 10.05 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. गुरुनाथ कुलकर्णी

अशासकीय कामकाज - विधेयके

पृ. शी. : मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेय□

L.C. BILL NO. II OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MOTOR VEHICLES ACT, 1988, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, स□2006 चे वि.प.वि. □मां□ 2 मोटार वाहन अधिनियम, 1988 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांड□यासाठी मी सभा□हाची अ□मती मा□तो.

प्रश□मतास टा□□संमत झाला.

तालिका सभापती : अ□मती दे□यात आली आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अ□मती□स□2006चे वि.प.वि. □मां□ 2 मांडतो.

तालिका सभापती : विधेय□ मांड□यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : रस्त्यावर राहणा-या मुलांना सोयी व सुविधा पुरविणे आणि महाराष्ट्र शासनाने त्यांची जबाबदारी स्वीकारणे विधेयक

L.C. BILL NO.III OF 2006.

(A BILL TO PROVIDE FOR CERTAIN FACILITIES AND AMENITIES TO AND ACCEPTANCE OF RESPONSIBILITY BY GOVERNMENT OF THE CHILDREN LIVING ON THE STREETS OF CITIES IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, स□□2006 चे वि.प.वि. □मां□ 3 महाराष्ट्र राज्यातील शहरांमधील रस्त्यांवर राहणा-या मुलांना विवक्षित सोयी व सुविधा पुरविण्याची आणि त्या मुलांची जबाबदारी शासनाने स्वीकारण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक मांड□यासाठी मी सभा□हाची अ□मती मा□तो.

प्रश□मतास टा□□संमत झाला.

तालिका सभापती : अ□मती दे□यात आली आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अ□मती□स□2006 चे वि.प.वि. □मां□ 3 मांडतो.

तालिका सभापती : विधेय□ मांड□यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. IV OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE HINDU MARRIAGE ACT, 1955, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, स□2006 चे वि.प.वि. □मां□ 4 हिंदू विवाह अधिनियम, 1955 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांड□यासाठी मी सभा□हाची अ□मती मा□तो.

प्रश□मतास टा□□संमत झाला.

तालिका सभापती : अ□मती दे□यात आली आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अ□मती□स□2006 चे वि.प.वि. □मां□ 4 मांडतो.

तालिका सभापती : विधेय□ मांड□यात आले आहे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लोक आयुक्त आणिउप लोक आयुक्त (सुधारणा)विधेयक

L.C. BILL NO. V OF 2006.

(A BILL FRUTHER TO AMEND THE MAHARASHTRA LOKAYUKTA AND UPA LOKAYUKTAS ACT, 1971.)

श्री. संजय दत्त (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 5 - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम,1971 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, विदर्भातील जनतेच्या सोईसाठी आणि त्यांना आपल्या तक्रारी मांडण्यासाठी मुंबईला ये-जा करण्याचा त्रास होऊ नये म्हणून महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर येथे लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय व्हावे यासाठी मी हे विधेयक मांडले आहे. नागपूर येथे लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांची नेमणूक करावी या उद्दिष्टासाठी हे विधेयक मी मांडू इच्छितो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीनेसन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 5 मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: घरेलू कामगार (कल्याण व सेवाशर्ती) विधेयक.

L.C. BILL NO.VI OF 2006.

(A BILL TO PROVIDE FOR GRANTING CERTAIN FACILITIES, AMENITIES AND TO COVER ALL DISPUTES RELATING TO DOMESTIC WORKERS AND TO RECOGNISE THEM AS BEING WITHIN THE FOLD OF WORKING CLASS AND TO IMPROVE THEIR WORKING CONDITIONS AND TO GIVE THEM ACCESS TO COURTS IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. संजय दत्त (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 6- घरेलू कामगारांना काही सवलती आणि सोयी पुरविणे आणि त्यांच्याशी संबंधित सर्व विवादांचा समावेश करणे आणि कामगार वर्ग म्हणून त्यांना मान्यता देणे आणि त्यांच्या कामाच्या स्थितीमध्ये सुधारणा करणे आणि महाराष्ट्र राज्याच्या न्यायालयांमध्ये त्यांना दाद मागता येईल अशी व्यवस्था करणे यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 6 मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

....3

पृ.शी.: अन्न भेसळ प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

L.C. BILL NO.VII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE PREVENTION OF FOOD ADULTERATION ACT, 1954, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 7 - अन्न भेसळ प्रतिबंध अधिनियम,1954 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, याठिकाणी हे विधेयक अशासाठी आणले आहे की सरकारच्या वतीने एक विधेयक आलेले आहे. त्या विधेयकामध्ये अतिशय तुटपुंजा शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. मुंबई शहरामध्ये विशेषत: परप्रांतीय लोक दुधामध्ये भेसळ करीत आहेत. लोकांच्या दैनंदिन जीवनाशी आणि लहान मुलांच्या जीवाशी हा खेळ आहे. या विधेयकामध्ये जी शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे त्यामध्ये "सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही परंतु तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल " या मजकुराऐवजी " दहा वर्ष अथवा आजन्म कारावासाची सक्त मजुरी आणि एक लाख रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडाची अथवा दोन्ही शिक्षेस पात्र होईल आणि अशा भेसळीमुळे जर एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर अपराधी व्यक्ती मृत्यूदंडास पात्र होईल " अशी सुधारणा मी सुचविली आहे. विशेषत: मुंबईतील परप्रांतीय मंडळी दुधामध्ये भेसळ करतात. भेसळीचे प्रमाण वाढलेले आहे कारण यामधील गुन्हेगारांना अटक केली तरी लगेचच ते तुरुंगाच्या बाहेर येतात आणि त्यांना शिक्षेची कोणत्यही प्रकारची भीती न राहिल्यामुळे शिक्षेमध्ये बदल करण्याचे मी सुचविले आहे. सभापती महोदय, दुधामध्ये भेसळ करणाऱ्या व्यक्तीविरुध्द गुन्हा सिध्द झाल्यानंतर त्याला शिक्षा झाली असे माझ्या ऐकिवात नाही. म्हणून या विधेयकाद्वारे शिक्षा करण्याची तरतूद मी सुचविली आहे. माझी शासनाला विनंती आहे की मी मांडलेले विधेयकावर योग्य तो विचार करण्यात यावा.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 7 मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अन्न भेसळ प्रतिबंध (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. VIII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE PREVENTION OF FOOD ADULTERATION ACT, 1954 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

पृ.शी.: मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. IX OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI PROVINCIAL MUNICIPAL CORPORATION ACT, 1940.)

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO.XII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, 1888)

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि.क्र.12-मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि.क्र.12 मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विशेष फौजदारी न्यायालय विधेयक.

L.C. BILL NO. XIII OF 2006.

(A BILL TO ESTABLISH SPECIAL CRIMINAL COURT FOR TRYING OFFENCE OF RAPE IN THE STATE OF MAHARASHTRA)

श्री मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि.क्र.13-महाराष्ट्र राज्यात बलात्काराच्या अपराधाची संपरीक्षा करण्याकरिता विशेष फौजदारी न्यायालये स्थापन करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, हे विधेयक यासाठी मी आग्रहाने मांडत आहे की, आपणा सर्वांनाच माहिती आहे की, मुंबई शहरात आणि महाराष्ट्रामध्ये बलात्काराच्या घटना दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत, त्यांना विदारक रुप आलेले आहे. पूर्वी असे प्रकार तुरळक स्वरुपात घडत होते पण आता तर चार वर्षाची मुलगी असो, पाळण्यातील मुलगी असो अथवा 70 वर्षाची महिला असो तिच्यावर अमानुषपणे अत्याचार केले जातात. इतकेच काय पण गेल्या दोन वर्षात वडिलांनी मुलीवर अमानुषपणे जे कृत्य केले त्याचे जगातील कुठल्याही धर्मात, जातीत अथवा संस्कृतीमध्ये या कृत्याचे समर्थन होणार नाही, स्वप्नात अथवा नशापाणी घेतलेले असतांना सुध्दा कुठलीही व्यक्ती असे कृत्य करण्याबाबत विचार करु शकणार नाही. अशा प्रकारे आता समाजामध्ये अमानुषता वाढलेली दिसून येते. अशी कृत्ये करणाऱ्या अपराध्यांवर कारवाई करण्यासाठी कठोर कायदा करुन त्याची अंमलबजावणी केली नाही तर हे प्रकार असेच वाढत जातील. त्याचे कारण मनुष्यत्वाकडून देवत्वाकडे जाण्याऐवजी पशुत्वाकडे जाण्याचे वातावरण आज निर्माण होत चालले आहे. वेगवेगळया प्रसार माध्यमाद्वारे भडक चित्र निर्माण केले जाते. अशा प्रकारे टी.व्ही.सारख्या प्रसार माध्यमांतून चांगलेपणाचे संस्कार करण्याऐवजी स्त्री ही एक भोगाची वस्तू आहे अशा प्रकारचे चित्र रंगविले जात असून ही प्रवृत्ती समाजात दिवसेंदिवस बळावत चालली आहे. अशा प्रकारची भयानक कृत्ये एक दिवसाआड आपल्याला ऐकायला व पहायला मिळत आहेत. अशा वृत्तीचे नराधम मग फुटपाथवार झोपलेली 5-6 वर्षाच्या मुलीवर सुध्दा अत्याचार करायला मागे पुढे

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

पाहत नाहीत. सुनील मोरे या व्यक्तीने जो प्रकार केला होता त्या घटनेच्या अनुषंगाने परवाच कोर्टाने निकाल दिला व त्याला शिक्षा केली. या घटनेमध्ये वर्तमानपत्रे तसेच इतर प्रसार माध्यमांच्या द्वारे एक प्रकारचा मानसिक आणि सामाजिक दबाव आल्यामुळे आणि शासनाने कठोर धोरण स्वीकारल्यामुळे या खटल्याचा निकाल एक वर्षाच्या आत लागला. परिस्थितीजन्य पूराव्याच्या आधारावर त्याला शिक्षा झाली, सकृतदर्शनी बलात्कार झाल्याची वस्तुस्थिती असतांना आणि फोरेन्शिक लेबोरेटरीचा रिपोर्ट प्रतिकूल असतांना सुध्दा परिस्थितीजन्य पुराव्याच्या आधारावर कोर्टाने त्याला ही शिक्षा सुनावली आहे. प्रसार माध्यमे व इतर सामाजिक संस्थांचा अशा प्रकारे दबाव नसता आणि न्यायदेवता आंधळी आहे याचा फायदा होऊन कदाचित हा सुनील मोरे निर्दोष सुटला असता. जर समाजात भविष्यात असेच होत राहिले आणि त्या व्यक्तीला न्याय मिळाला नाही तर बलात्कार करणारी व्यक्ती निर्दोष सुटून समाजात मान वर करुन जगेल आणि दुसरीकडे मात्र एखादी अविवाहित आणि बलात्कारित मुलगी असेल, जिच्यावर असा अत्याचार झाला आहे त्या बलात्कारित मुलीला आयुष्यभर समाजात मानहानी सहन करावी लागेल, तिचा विवाह होणार नाही.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

आपल्या भारतीय समजामध्ये अशी पध्दत आहे की, लग्न करण्यापूर्वी मुलीची आजूबाजूला चौकशी करण्यात येते. तद्नंतर मग त्या मुलीचा विवाह होतो. पण समजा अमूक एक मुलगी बलात्कारीत आहे असे सांगितले तर कारण नसताना तिला उद्ध्वस्त जीवन जगावे लागते. श्री.सुनील मोरे प्रकरणाचा निकाल एक वर्षात लागला. पण कोठेवाडीचा निकाल यायला पाच वर्षे लागली. म्हणूनच मी या विधेयकाद्वारे विशेष अशा प्रकारचे न्यायालय स्थापन करण्यात यावे असे सुचविले आहे. मी या विधेयकात अशी तरतूद सुचविली आहे की, "शासनास, बलात्काराचा अपराध अंतर्भूत असलेल्या प्रकरणांची शीघ्र न्यायचौकशी करण्याची तरतूद करण्याच्या प्रयोजनार्थ, शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे केवळ बलात्काराचा अपराध अंतर्भूत असलेल्या प्रकरणांची न्यायचौकशी करण्याकरिता, प्रत्येक जिल्हयामध्ये किमान एक विशेष न्यायालय स्थापन करता येईल. बलात्काराचा अपराध अंतर्भूत असलेल्या प्रकरणांची न्यायचौकशी केवळ महिला न्यायाधीशाकडून करण्यात येईल. मुंबई उच्च न्यायालयाच्य मुख्य न्यायमूर्तीच्या सहमतीने राज्य शासनाने नियुक्त करावयाची एक महिला न्यायाधीश विशेष न्यायालयाची न्यायाधीश असेल." हे विधेयक येथे मांडले असले तरी ते विचारार्थ घेण्याकरिता माननीय राज्यपाल व माननीय राष्ट्रपती महोदयांची कन्सेंट घ्यावी लागेल म्हणून मी माझे विचार रेकॉर्डवर आणत आहे. तसेच अशा प्रकरणांची सुनावणी इनकॅमेरा व्हावी. याचे कारण त्या महिलेवर मिडियाची नजर असते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एका चांगला हेतून हे विधेयक आणले आहे. अशासकीय विधेयकाच्या कामकाजासाठी 45 मिनिटाचा वेळ निश्चित ठरवून दिलेला असतो. सन्माननीय सदस्यांनी येथे आता असे विचार मांडलेत की, सदर विधेयक विचारार्थ घेण्यासाठी माननीय राज्यपाल व माननीय राष्ट्रपती महोदयांची कन्सेंट घ्यावी लागेल. तेव्हा यासंबंधीची माहिती मी आपल्याकडून जाणून घेऊ इच्छितो. माझ्या माहितीप्रमाणे अशासकीय विधेयक सभागृहाच्या पटलावर पुर:स्थापनार्थ मांडल्यानंतर ते विचारार्थ घेणे आवश्यक असते. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी ज्यावेळी सदर विधेयक विचारार्थ घेण्यात येईल त्यावेळी आपले विचार मांडावेत. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.गुरूनाथ कुलकर्णी) : सदर विधेयक हे महाराष्ट्र विशेष फौजदारी न्यायालयाबाबत आहे. त्यामुळे या विधेयकाच्या संदर्भात माननीय राज्यपाल व माननीय राष्ट्रपतींची कन्सेंट घ्यावी लागेल. आता सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना फक्त विधेयक मांडता येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या विधेयकाच्या संबंधी मी सचिवांकडून माहिती घेतली आहे. त्यांनी हे विधेयक विचारार्थ घेण्यासाठी माननीय राज्यपाल व माननीय राष्ट्रपतींची कन्सेंट घ्यावी लागेल असे सांगितल्यामुळे मी माझे विचार व्यक्त करीत आहे.

तालिका सभापती : आता आपण कोणताही संशय व्यक्त करू नका. आपण विधेयक मांडल्यानंतर जेव्हा ते पुढे चर्चेला येईल तेव्हा ते विचारार्थ घेऊ या.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी या विधेयकाच्या माध्यमातून दोन गोष्टींचा आग्रह धरलेला आहे. जो कोणी 14 वर्षाखालील स्त्रिच्या संबंधात बलात्काराचा अपराध करील तो मृत्युदंडाच्या शिक्षेस पात्र राहील. ज्या मुलीचे खेळाचे वय असते अशा वयातच तिच्यावर अत्याचार केला जातो. हा अमानुषपणा आहे.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यानंतर 60 दिवसांच्या आत आरोप पत्र निश्चित करावे असा या विधेयकामध्ये उल्लेख करण्यात आला आहे. एखाद्याने बलात्कार करुन, जर बलात्कारीत महिलेचा खून केला असेल तर त्याला मृत्युदंडाची शिक्षा देण्यात यावी आणि जर अशा प्रकारची शिक्षा देण्यात आली नसेल, तर ती शिक्षा का देण्यात येऊ नये याचे न्यायधिशांनी कारण द्यावे. एकंदरीत समाजाच्या स्वास्थ्यासाठी आणि चांगल्या हेतूने हे अशासकीय विधेयक मी मांडलेले आहे. मला हे विधेयक मांडण्याची परवानगी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक-13 मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (सुधारणा) विधेयक.

L.C.BILL No.VIII OF 2005

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' PENSION ACT, 1976.)

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक-8, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन अधिनियम, 1976 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, हे विधेयक विधानमंडळाचे जे सदस्य आहेत त्या सदस्यांच्या निवृत्ती वेतनाशी संबंधीत आहे. प्रथम मी एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, मूळ निवृत्ती वेतन जे सदस्यांना मिळते ते वाढत-वाढत जाऊन, आज 6 हजार रुपयांपर्यंत पोहोचलेले आहे. परंतु त्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा वाद मी या विधेयकात उपस्थित केलेला नाही. जे मूळ निवृत्ती वेतन आहे ते देण्याबाबत विधानमंडळ सदस्यांचा मूळ कार्यकाल किती असावा ? याबाबत हे विधेयक आहे. मूळ निवृत्ती वेतन मिळण्यासंबंधीचा कालखंड संपूर्ण देशभर 5 वर्ष धरलेला आहे. पंरतु त्यातून काही अडचणी उद्भवल्या. सदस्यांचा काही दोष नसताना डिसोल्युशन करणे, टर्म संपणे अशा निरनिराळया अडचणी देशभर समोर आल्या. वास्तविक पाहता या संदर्भात पार्लमेंटने कायदा केला आणि नंतर आपल्या राज्यानेही कायदा केला. परंतु नंतर त्यामध्ये दुरुस्ती करुन सुधारणा केली की, सदस्याचा जो काही कार्यकाळ असेल मग तो पाच वर्षाचा असेल किंवा त्यापेक्षा कमी असेल, सदस्याने शपथ घेतली की, तो मूळ निवृत्ती वेतन मिळण्यास पात्र होईल. संपूर्ण देशभरात हा नियम लागू झाला. परंतु अशा प्रकारचा बदल करीत असताना, महाराष्ट्रात मोठी चतुराई इ ाली. मुळात अशी तरतूद होती की, विधानमंडळाचे जे सदस्य आहेत, त्यांनी 5 वर्षे पूर्ण केली असतील तर त्यांना निवृत्ती वेतन दिले जाईल. परंतु आता या पाच वर्षाच्या शब्द रचनेत बदल केला गेला. महोदय, 1976 चा जो कायदा आहे, त्या कायद्याच्या कलम 3(1) जसाच्या तसा मी आपल्याला वाचून दाखवितो.

नंतर श्री.व्ही.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख..

"राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य म्हणून निवडून आलेल्या अथवा नामनिर्देशित झालेल्या व्यक्तीने, ज्यांनी "सदस्य" म्हणून शपथ धेतली आहे अथवा घेतल्यास, अशा व्यक्तीस, दरमहा रुपये 6,000/- निवृत्तीवेतन देण्यात येईल." अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद कायद्यामध्ये करीत असतांना खालच्या परंतुकामध्ये जी प्रोव्हीजन आहे त्यामध्ये आक्रमक बदल करण्यात आले आहेत. सन 1999 मध्ये त्यामध्ये बदल करण्यात आलेले आहेत ते बदल पुढील प्रमाणे आहे, "Provided that where any person has served as aforesaid for a period exceeding five years, there shall be paid to him an additional pension of two hundred rupees per month for every year in excess of five." विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या सदस्यांने 5 वर्षापेक्षा जास्त सेवा केली असेल त्यास 5 वर्षापेक्षा जास्त केलेल्या सेवेसाठी 100-200 रुपये जे काही असतील ते मिळतील, माझ्या विधेयकाचा तो उद्देश नाही. ही तरतूद सन 1999 मध्ये बदलवून टाकण्यात आलेली आहे. 1999 मध्ये जी तरतूद करण्यात आली ती एक गंमतीदार अशी तरतूद आहे. 1976 चा कायदा झाल्यापासून 1999 पर्यंत यामध्ये कोणताही बदल झालेला नाही, परंतु, 1999 मध्ये अकारण असा बदल करण्यात आलेला आहे. " परंतु, असे की, ज्यावेळी एखाद्या व्यक्तीने पाच अथवा सहा वर्षाची जी असेल ती मुदत त्यापेक्षा जास्त मुदतीसाठी सेवा केली असेल, त्या सदस्याला, त्याच्या पूर्ण मुदतीपेक्षा जास्त मुदतीच्या प्रत्येक वर्षासाठी दरमहा पाचशे रुपये याप्रमाणे ज्यादा निवृत्तीवेतन दिले जाईल." परंतु मूळ कायद्यामध्ये आणि त्याच्या परंतुकामध्ये सन 1999 मध्ये हा बदल करण्यात आलेला आहे. 5 वर्षाची सेवा ही विधानसभेच्या सदस्यांची धरली जाईल, व विधानपरिषदेच्या सदस्याची सेवा ही 6 वर्षाची धरली जाईल. जेव्हा हे विधेयक घाईगडबडीमध्ये पास होतात तेव्हा हा घोळ झालेला असतो. म्हणून मला येथे असे सांगितले पाहिजे की हे बरोबर नाही, आता परिस्थिती काय आहे. यासंदर्भात मी लोकसभा व राज्यसभा यामध्ये काही बदल झालेला आहे काय हे मी पाहिले, यासंदर्भात राज्यसभेमध्ये काय व्यवस्था आहे, त्यासंदर्भातील माहिती मी घेतली आहे. तर यामध्ये कोणताही बदल झालेला नाही. संसद सदस्य, त्यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतन अधिनियम,1954 च्या कलम 8 (अ) मध्ये संसद संदस्य, त्यांचे वेतन, भत्ते,

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ SBT/ MHM/ प्रथम श्री. बोर्डे.... 10:30

प्रा. बी.टी.देशमुख....

निवृत्तीवेतन (सुधारणा) अधिनियम, 2003 द्वारे पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे "Provided that where any person has served as a member of the Provisional Parliament or either House of Parliament for a period exceeding five years, there shall be paid to him an additional pension of six hundred rupees per mensem for every year in excess of five." ही आजची जिवंत तरतूद आहे. राज्यसभा व लोकसभेचे सदस्य यांच्यामध्ये समानता आहे. ही समानता 5 वर्षाची आहे. जेथे जेथे विधानसभा व विधान परिषद आहे तेथे सुध्दा हीच परिस्थिती आहे. मात्र महाराष्ट्रामध्ये हा कायदा अस्तित्वात आला नाही, सन 1999 पर्यंत ही समानता होती. मूळ कायद्यामध्ये 5 वर्षे व 6 वर्षे असे नव्हते, ॲडीशनल 15 वर्षाची सेवा झाली असेत तर त्या सदस्याला त्याप्रमाणे निवृत्तीवेतन मिळते. विधान परिषद सदस्यांना वेगळी वागणूक देणे ही गोष्ट योग्य नाही. सन 1976 पासून म्हणजे सुमारे 20 ते 25 वर्षापासून जी परिस्थिती होती, त्यामध्ये 1999 ला बदल करण्यात आले. ती परिस्थिती बदलावी यासंदर्भात काहीही लॉजिक नाही. There is a whim of manipulator. मंत्रालयातील अधिकाऱ्यांमध्ये एक अहंभाव असतो.

यानंतर श्री. सांगळे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी. देशमुख ...

वरचे केले आता खालचे करुन टाकतो यामध्ये आपले प्रेस्टीज आहे. सभापती महोदय, गेल्या वर्षी दि.6/4/2005 रोजी मी हे विधेयक एक ते दीड मिनिटांमध्ये इंट्रोड्युस केले होते. त्यावेळी याबाबतचे मुद्दे मी सभागृहामध्ये मांडले होते. या ठिकाणी आम्ही इतरांचे प्रश्न मांडत असतो. परंतु निवृत्तीवेतनाच्या संदर्भात विधानसभेच्या एखाद्या सदस्याची सदस्य म्हणून 10 वर्षे सेवा पूर्ण झाली व तशीच विधानपरिषद सदस्यांची सेवा पूर्ण झाली तर त्यांना भेदभावपूर्ण वागणूक दिली जाते, याला कोणतेही पाठबळ नाही. या संदर्भात या विधेयकाच्या निमित्ताने मी लहानशी दुरुस्ती सूचवली आहे की, सन 1999 पूर्वी विधानमंडळ सदस्यांच्या निवृत्तीवेतनाची जी व्यवस्था होती, तीच व्यवस्था पुन:स्थापित केली जावी. हे विधेयक इंट्रड्युस करण्याच्या वेळी मला बोलण्याची संधी मिळाली होती त्यावेळी मी सांगितले होते की, " सन 1976 पासून ते 1999 पर्यंत विधानसभा सदस्य आणि विधानपरिषद सदस्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव करण्यात आला नव्हता. परंतु आता विधानसभा सदस्य आणि विधानपरिषद सदस्य यांच्यामध्ये भेदभाव करण्यात आला आहे." त्यावेळी माननीय पीठासीन अधिका-यांनी चेअरवरुन सांगितले होते की, अशाप्रकारचा भेदभाव होता कामा नये. मी या ठिकाणी माननीय पीठासीन अधिका-यांचे शब्द जसेच्या तसे वाचून दाखवतो, " असे होता कामा नये " असे त्यांनी म्हटले होते. या शब्दरचनेकडे शासनाकडून लक्ष देण्यात आले असते तर कदाचित हे विधेयक मांडावे लागले नसते. सभापती महोदय, हा भेदभावाचा प्रश्न आहे. म्हणून सन 1976 ते 1999 पर्यंत असलेली सदस्यांची निवृत्तीवेतनाची पध्दत रिस्टोअर करावी अशी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो व या सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे अशीही मी विनंती करतो.

(प्रश्न प्रस्तुत झाला)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख यांनी या सदनामध्ये महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन विधेयक, 2006 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक आणलेले आहे. या विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. या विधेयकाचा पेन्शन वाढवून मिळावी असा उद्देश नसून दोन्ही सभागृहातील सदस्यांमध्ये जो भेदभाव निर्माण झालेला आहे, तो दूर करावा असा या विधेयकाचा उद्देश आहे. हा भेदभाव पूर्वी नव्हता. यामुळे विधानपरिषदेच्या सदस्यांचा अवमान झाला आहे अशी माझी भावना आहे. या ठिकाणी मी दोन गोष्टींचा उल्लेख करणार आहे. वरचे सभागृह किती मुख्य असू शकते याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांना मी टी.व्ही.समोर बोलताना पाहिले आहे. मिडियाने त्यांना विचारले की, रॅम्पच्या संदर्भात जो प्रकार झाला त्याबद्दल शासनाने एवढे गांभीर्याने घेण्याची काय आवश्यकता होती. याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी जे शब्द वापरले ते अतिशय मोलाचे आहेत. त्यांनी असे सांगितले की, हा विषय विधानमंडळाच्या ज्येष्ठ सभागृहामध्ये आला होता आणि विशेषत: हा विषय सभागृहाच्या महिला सदस्यांनी मांडला असल्यामुळे शासनाने याबाबत गांभीर्याने दखल घेतली आहे. अशाप्रकारे माननीय मुख्यमंत्र्यांनी या सभागृहाबद्दल भावना व्यक्त केलेल्या आहेत. तसेच कांदा उत्पादकांचा विषय या सभागृहामध्ये मांडण्याची आमची पध्दत आणि खालच्या सभागृहामध्ये मांडण्याची पध्दत वेगळी आहे. आम्ही गळयात माळ न घालता कांदा उत्पादक शेतक-यांना न्याय देण्यासाठी आवाज उठवण्याचा प्रयत्न केला याचा आम्हाला अभिमान वाटतो, आनंद वाटतो. या संदर्भात सभागृहाच्या पीठासीन अधिका-यांनी दिलेल्या निदेशाचे शासन पालन करीत नाही म्हणून काल पुन्हा तिस-यांदा माननीय पीठासीन अधिका-यांनी याबाबत शासनाला निदेश दिले.

यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

ज्येष्ठांच्या सभागृहातील सभापतींनी याबाबतीत तातडीने दखल घेण्याच्या दाखविलेल्या तत्परतेची नोंद दुर्दैवाने न घेता खालच्या सभागृहातील माननीय अध्यक्षांनी याची दखल घेतली आणि त्याबाबत सरकारला आदेश दिला असे मिडियाकडून सांगण्यात आले पण आपण सभापती म्हणून तीन दिवसापूर्वीच हे आदेश दिलेले होते. तेव्हा हा फरक आहेच. सभापती महोदय, 1999 मध्ये असलेले आमचे अधिकार अबाधित ठेवले गेले पाहिजेत कारण सर्वच बाबतीत खालच्या आणि या वरच्या सभागृहाच्या सदस्यांमध्ये यापूर्वी कधीही कोणत्याही प्रकारे भेदभाव केलेला नव्हता. मग नसलेला भेदभाव निर्माण करण्याची काय आवश्यकता होती ? तेव्हा नेहमीच्या प्रथेपेमाणे शासन या बाबतीत आता म्हणेल की, आम्ही याबाबत विचार करतो, आता सदस्यांनी हे विधेयक मागे घ्यावे. पण हे शासन आज विचार करण्याच्या क्षमतेमध्ये राहिलेले नाही असेच जणू सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी हे विधेयक एक वर्षापूर्वी या सभागृहात मांडताना माननीय सभापतींनी या संबंधात ज्या भावना व्यक्त केल्या त्या येथे शब्दातून सांगितल्या आणि त्यामुळेच त्यांची दखल अद्याप पर्यंत शासनाकडून न घेतल्याचेच जाणवते. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख हेही एक ज्येष्ठ सदस्यच आहेत. त्यांनी हे विधेयक या सभागृहात आणताना एक वर्षापूर्वी ज्या भावना येथे व्यक्त केल्या होत्या त्या लक्षात घेऊन शासनाने खरे तर आता हे विधेयक येथे मांडण्याची पाळीच त्यांच्यावर आणावयास नको होती. किंबहुना त्यापूर्वीच सरकारकडून याबाबत कार्यवाही झाली असती तर सन्माननीय सदस्यांकडून हे विधेयक येथे मांडण्याऐवजी सरकारच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्याची पाळी त्यांच्यावर आली असती तर सगळ्यांनाच आनंद वाटला असता. परंतु तसे न होता आता हे विधेयक मांडून दोन्ही सभागृहाच्या सदस्यांमध्ये भेदभाव करू नका अशी भूमिका आग्रहाने येथे मांडावी लागते आहे. हे योग्य नाही. तेव्हा हे विधेयक येथे आम्ही पास करतो आणि खालच्या सदनामध्ये या संबंधीचे विधेयक आणून हा निर्माण झालेला भेदभाव नाहीसा करतो असे आपण सांगावे आणि भविष्यामध्ये देखील केवळ याच बाबतीत नाही तर सर्वच बाबतीत वरच्या आणि खालच्या सभागृहाच्या सदस्यांमध्ये चुकूनदेखील भेदभाव केला जाणार नाही याची ग्वाही सरकारने द्यावी अशी मी विनंती करतो आणि या विधेयकाला पुन्हा एकदा पाठिंबा देतो व माझे भाषण पूर्ण करतो.

****

..... आय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : माननीय सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी आता हे जे विधेयक येथे आणले आहे ते मी माझ्या मागील टर्ममध्ये मांडले होते. यातील सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा मला असा वाटतो की, संसदेमध्ये जे विधेयक पास केले त्याचे अनुकरण करण्यात शासनाला कोणती अडचण आली ? ही जी डिस्पॅरिटी होती ती नाहीशी करण्यासाठी पॅरिटी आणली असे सांगितले गेले पण ती आणताना व्यवस्थित शब्दांकन न केल्याने हा भेदभाव निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, संसदेमध्ये जे विधेयक आणले त्यामध्ये काय म्हटले आहे ? त्यात असे म्हटलेले आहे की, "Provided that where any person has served as a member of the Provisional Parliament or either House of Parliament for a period exceeding 5 years;.." This is important. हे बरोबर लागू होईल आणि डिस्क्रीमिनेशन आहे ते निघून जाईल. म्हणून हे जे विधेयक आणले आहे त्यात पुढे म्हटलेले आहे की, .."there shall be paid to him an additional pension of six hundred rupees per mensem for every year in excess of five." म्हणजे प्रत्येक पाच वर्षानंतर पुढील प्रत्येक वर्षासाठी अमुक इतकी रक्कम. यामध्ये रक्कम किती ते गौण आहे. ती रक्कम किती आहे, जी शासनाने ठरविली आहे त्याबद्दलही वाद नाही. परंतु ज्या कारणासाठी म्हणून हे विधेयक येथे माननीय सदस्यांनी आणले आहे ते अगदी योग्य असल्याने त्याचे मी मनापासून स्वागत करतो. तेव्हा आता आपल्याला देखील यामध्ये काही सुधारणा करावयाची असल्यास आपल्याला पार्लमेंटनेच पळवाट करून ठेवली आहे तिचा आपण फायदा घ्यावा.आणि त्याचे अनुकरण करावे म्हणजे हा तिढा सुटेल आणि आपण हे विधेयक स्वत: आणून ते पास करून घ्यावे अशी विनंती मी करतो. धन्यवाद.

****

(यानंतर श्री. सरफरे .... जे 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख (संसदीय कार्य व वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 8 महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (सुधारणा) विधेयक या सभागृहामध्ये विचारार्थ मांडले आहे त्याबाबत शासनाची भूमिका अत्यंत सुस्पष्ट आहे. खालच्या सभागृहामध्ये किंवा वरच्या सभागृहामध्ये भेदभाव करणे अशाप्रकारची शासनाची भूमिका यापूर्वी नव्हती आणि यापुढेही राहाणार नाही. आणि वरच्या सभागृहातील माननीय सदस्यांचा अवमान व्हावा किंवा त्यांना कमी लेखण्यात यावे असे शासनाचे कधीही धोरण नाही. त्यामुळे माननीय सदस्यांनी या ठिकाणी मुद्दे उपस्थित केले, त्याबाबत एवढेच सांगतो की, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते, निवृत्ती वेतन आणि सोयी-सुविधा यासंबंधी अधिनियमात जी व्याख्या दिलेली आहे ती मी आपल्याला वाचून दाखवितो. "राज्य विधानमंडळ सदस्यांचा "पदावधी" म्हणजे सदस्य म्हणून त्यांच्या निवृत्तीची किंवा नामनिर्देश यासंबंधीची अधिसूचनेमध्ये दिलेली तारीख असेल त्या तारखेपासून आणि त्यानंतर ते पद रिक्त होण्याची तारीख असेल त्या तारखेपर्यंतची मुदत समजली जाते." खालच्या सभागृहातील माननीय सदस्यांची मुदत 5 वर्षे आणि वरच्या सभागृहातील माननीय सदस्यांची मुदत 6 वर्षे असल्यामुळे यामध्ये डिस्पॅरिटी झाली आहे. माननीय सदस्यांनी यासंबंधी मुद्दा उपस्थित केला की, हिंदुस्थानामध्ये ज्या ज्या राज्यामध्ये विधानपरिषद सभागृह आहे त्याठिकाणी अशाप्रकारची डिस्पॅरिटी नाही. त्याचप्रमाणे राज्यसभा आणि लोकसभेमध्येही डिस्पॅरिटी नाही. हिंदुस्थानामध्ये कुठेही डिस्पॅरिटी नसेल तर आपल्या राज्यामध्येही ती नसावी. आणि आपल्या महाराष्ट्र विधानमंडळामध्ये ती असणे योग्य नाही. यासंबंधी माननीय सदस्यांच्या भावनांचा विचार करण्यासाठी यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे ठेवून त्याला मंत्रिमंडळाची मान्यता घ्यावी लागेल. आणि येणाऱ्या नजिकच्या काळात तातडीने ही डिस्पॅरिटी जी 1999 पूर्वी नव्हती व ती नंतर आली आहे त्याची दखल घेतली जाईल. त्यामुळे माननीय सदस्यांच्या भावना पॉझिटीव्हली मंत्रिमंडळापुढे मान्यतेसाठी ठेवल्या जातील. त्यांच्या भावना मंत्रिमंडळापुढे पॉझिटीव्हली मांडल्या तर तो प्रश्न सुटण्यास मदत होईल, त्यादृष्टीने आपण प्रयत्न करु. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेमध्ये व इतर राज्यांच्या विधानपरिषदेमध्ये असलेली डिस्पॅरिटी दूर होण्यास मदत होणार आहे. तेव्हा माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी आपले विधेयक मागे घ्यावे अशी मी त्यांना विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले आहे की, सदस्यांना किती वेतन मिळावे किंवा अतिरिक्त किती वेतन मिळावे हा प्रश्न नाही. महाराष्ट्रामध्ये एकाक्षणी जी डिस्पॅरिटी आणली गेली, जी उद्ध्वस्त केली गेली ती रिस्टोअर करण्याचा हा विषय आहे. आणि म्हणून मी मघाशी आग्रहपूर्वक म्हटले की, सभागृहाने हे विधेयक मंजूर करुन खालच्या सभागृहामध्ये पाठविल्यानंतर खालच्या सभागृहाने ते नामंजूर केले तर त्यासाठी प्रयत्न केल्याचा मला निश्चित आनंद होईल. आणि खालच्या सभागृहामध्ये हे विधेयक मंजूर झालेतर खालच्या सभागृहामध्ये त्यावर विचार करुन योग्य निर्णय घेतला असे होईल. यामध्ये अपरिहार्यपणे एक मेसेज गेला पाहिजे तो असा की, मधल्या काळामध्ये काही गोष्टी केल्या तर त्या टिकाऊ असू शकत नाहीत असा मेंसेज जाणे आवश्यक आहे. आणि एक गोष्ट सांगितली गेली ती सभागृहाने लक्षात घ्यावी की, त्या दिवशी सात-आठ वाक्यामध्ये माझी कन्साईज भूमिका मी सभागृहामध्ये मांडली होती. कारण विधेयक पुर:स्थापनेच्या वेळी जास्त बोलता येत नाही. माननीय सभापतींनी त्याबाबत आदेश दिले की असे होता कामा नये. तरी सुध्दा याचे वाईट वाटते की, या गोष्टी 1999 पासून 2006 सालापर्यंत म्हणजे जवळ जवळ 7 वर्षाच्या मधल्या काळामध्ये याची नोंद घेतली गेली नाही. शासनाची भूमिका माननीय राज्यमंत्र्यांनी मांडली आहे. त्यामध्ये त्यांनी पॉझिटीव्ह शब्द वापरल्यामुळे त्यासंबंधी विचार करणे मला आवश्यक वाटते. पॉझिटीव्ह या शब्दाचा अर्थ मी असा ठरवितो. त्यामुळे मी दुराग्रहाने एखादी गोष्ट पुढे रेटणारा माणूस नाही. मी यासंबंधी जरुर सभागृहाची परवानगी घेईन. माननीय सभापतींनी याबाबत शासनाला सांगावे आणि शासनाकडून यासंबंधी पॉझिटीव्ह निर्णय घेतला जाईल या दृष्टीने मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणला जाईल. या दोन गोष्टींची अपेक्षा धरुन पुढील अधिवेशनापर्यंत त्यासंबंधीचा निर्णय सभागृहासमोर आणला जावा असे आपण सांगितले तर मी जरुर आनंदाने हे विधेयक मागे घेईन.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी) : सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी वियधेयक मांडलेले आहे. ज्या ज्या राज्यामध्ये विधान सभा आणि विघान परिषद आहे त्याचबरोबर राज्यसभा आणि लोकसभेमध्ये देखील ॲडमिटेडली डिसक्रेपॅन्सी नाही,हे शासनाने मान्य केलेले आहे. प्रश्न असा आहे की, 1999 पासून आतापर्यन्त हे बील आल्यानंतर देखील शासनाने त्याबाबतीत भूमिका घेऊन दुरुस्ती करायला पाहिजे, ती दुरुस्ती केलेली नाही. माझी विनंती राहील की, हे विधेयक मागे घेत असतांना शासनाने देखील या संदर्भात किती वेळ लागेल याबाबतीतील भूमिका स्पष्ट करावी. हा विषय घेऊन मंत्रिमंडळासमोर जाणार असला तरी या संदर्भातील लवकरात लवकर डिसक्रेपॅन्सी काढण्याचा प्रयत्न करु असे शासनाने सांगावे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्देशानुसार लवकरात लवकर म्हणजे पुढच्या अधिवेशनापूर्वी ही डिसक्रेपॅन्सी दूर करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर प्रयत्न होईल.

प्रा.बी.टी.देशमुख : पुढच्या अधिवेशनापूर्वी डिसक्रेपॅन्सी दूर करण्याचे पॉझिटिव्ह आश्वासन दिलेले आहे. सभापती महोदय, आपले या उत्तराने समाधान झाले असेल तर आपण तसे मला आदेश द्यावेत म्हणजे मी विधेयक मागे घेतो.

तालिका सभापती : या संबंधाने शासनाच्या वतीने पुढच्या अधिवेशनापूर्वी या संबंधातील तातडीने निर्णय घेण्यात येईल असे सांगण्यात आलेले आहे. तसा आपण विचार करावा.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपले समाधान झाले म्हणजे सर्वांचे समाधान झाले असे मी समजतो. मला हे विधेयक परत घेण्यासाठी सभागृहाने अनुमती द्यावी.

विधेयक सभागृहाच्या अनुमतीने परत घेण्यात आले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : माथाडी,हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) विधेयक.

L.C. BILL NO. IV OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MATHADI, HAMAL AND OTHER MANUAL WORKERS REGULATION OF EMPLOYMENT AND WELFARE) ACT, 1969.)

श्री.कन्हैयालाल गिडवाणी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 4 - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, 1969 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, या विधेयकामधील उद्देश व कारणे मांडू इच्छितो:-

"महाराष्ट्र राज्यामध्ये साखर कारखान्यात पाच लाखाच्या वर ऊस तोडणी व गाडीवान कामगार गळीत हंगामाच्या दरम्यान वर्षातील पाच ते सात महिने आपली गावे सोडून दूरच्या ठिकाणी आपल्या कुटुंबियासमवेत जातात. या गरीब कामगारांकडून श्रमाने काम करुन घेतले जात असले तरीही त्यांनी केलेल्या श्रमाच्या तुलनेत त्यांना मजुरी दिली जात नाहीय. तसेच त्यांना पिण्याचे पाणी, निवास, शाळा, दवाखाना इत्यादिंबाबत कोणतीच सोय नसते.

म्हणून या कर्मचाऱ्यांची, कामासंबंधीची परिस्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांच्या सेवांना संरक्षण मिळवून देण्यासाठी व सध्याच्या अनुचित परिस्थितीतून त्यांना मुक्त करण्यासाठी या श्रमजीवी कामगारांच्या नोकरीचे नियमन करणे आणि त्यांच्या कल्याणासाठी नोकरीच्या योग्य अशा अटी आणि शर्ती यासाठी तरतूद करणे इष्ट आहे. त्यामुळे साखर कारखान्यामध्ये काम करणाऱ्या ऊस तोडणी व गाडीवान यासारख्या असंरक्षित कामगारांना महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियमय, 1969 याच्या कक्षेमध्ये आणण्यासाठी त्या अधिनियमात सुधारणा करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे." म्हणून मी हे विधेयक मांडलेले आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी जे अशासकीय विधेयक या सभागृहामध्ये मांडलेले आहे आणि त्यामध्ये त्यांनी जी भूमिका मांडलेली आहे त्या भूमिकेशी मी भावनिकदृष्ट्या सहमत आहे. जे कामगार ऊस तोडण्यासाठी जातात ते असंघटित कामगार असतात. या वर्षी सांगली जिल्ह्यामध्ये जातात तर दुसऱ्या वर्षी कोल्हापूर जिल्ह्यामध्ये जातात. तिसऱ्या वर्षी सातारा जिल्ह्यामध्ये जातात. शेतीचा एकूण भाग विस्तृत असतो. त्या ठिकाणी ऊस तोडताना सावली नसते. जेव्हा ते ऊस तोडण्यासाठी जातात तेव्हा आपल्या मुलाबाळांना सोबत घेऊन जातात. जेव्हा सधन शेतकऱ्यांकडे ऊस तोडण्यासाठी जातात तेव्हा त्या ठिकाणी त्यांनी त्यांच्यासाठी शाळा सुरु केलेल्या आहेत. शेतीवर पिण्यासाठी पाटाचे पाणी उपलब्ध असते. त्यांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळणे गरजेचे आहे. काम केल्यानंतर जेवण घेत असताना त्यांना सावली मिळणे गरजेचे आहे. उन्हातान्हात काम करीत असताना काही वेळा ते आजारी पडतात. त्यांना त्या ठिकाणी दवाखान्याची सोय मिळणे गरजेचे आहे. या अनुषंगाने ऊसतोड कामगारांच्या युनियनमार्फत शासनाकडे मागणी करण्यात आल्यानंतर त्या अनुषंगाने शासनाने 1988 साली श्री. दादासाहेब रुपवते यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नियुक्त केली. त्या समितीचा अहवाल 1993 साली प्राप्त झाला. त्यानंतर श्री. पंडितराव दौंड यांच्या नेतृत्वाखाली सन 2001 मध्ये अभ्यासगटाची नियुक्ती करण्यात आली. त्यांचा अहवाल 2005 मध्ये प्राप्त झाला. एक कुटुंब किती शेती धारण करु शकतो, पाटाच्या पाण्याखालील शेती, इरिगेशनखाली असलेली शेती, हॉर्टिकल्चरखाली असलेली शेती किंवा हंगामामध्ये पीक घेण्यात येत असलेली किती शेती त्यांच्याकडे असावी याबाबतीत महाराष्ट्रामध्ये कमाल जमीन धारणा कायदा आहे. राज्यामध्ये काही शेतकऱ्यांच्या वाट्याला एक एकर, दोन एकर, तीन एकर अशी शेतजमीन येते. 99.99 टक्के शेतकऱ्यांकडे दोन एकर, तीन एकर, चार एकर किंवा पाच एकर शेतजमीन आहे. 0.01 टक्के शेतकऱ्यांकडे 5-25 एकर जमीन असू शकते. एकत्र कुटुंब पध्दतीमध्ये काही कुटुंबांकडे 200 ते 250 एकर शेतजमीन असू शकते. जगाच्या पाठीवर ऊस पिकवणारे जे देश आहेत त्यामध्ये ब्राझील, ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड या देशामध्ये मोठ्या प्रमाणावर ऊस घेतला जातो. त्या देशातील शेतीमध्ये उत्पादित होणाऱ्या ऊसाचे टनेज आणि आपल्या महाराष्ट्रातील शेतीमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक .....

उत्पादित होणाऱ्या ऊसाचे टनेज यामध्ये खूप फरक आहे. पश्चिम महाराष्ट्र फार प्रगत आहे असे म्हटले तरी त्या देशांच्या तुलनेमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील ऊसाची शेती सुध्दा अप टू दी स्टँडर्ड किंवा फार नफा देणारी शेती आहे असे म्हटले तर ते चुकीचे होईल. खरे म्हणजे आपल्याला या मजुरांविषयी कणव आहे. सन्माननीय सदस्य श्री. गिडवाणी यांची अशी भावना आहे की, या कामगारांना माथाडी कायद्याचे स्वरुप द्यावे. ऊसतोड करणारे, बैलगाड्यांमध्ये ऊस भरणारे, बैलगाड्या चालविणारे जे कामगार आहेत त्यांना माथाडी कायद्याचे स्वरुप द्यावे असे सन्माननीय सदस्यांची भावना आहे. त्या ठिकाणी आपण विचार केला तर ते शेतकरी स्वत:च्या पायावर उभे राहण्याची क्षमता नसलेले शेतकरी आहेत. त्या शेतकऱ्यांवर माथाडी कामगारांप्रमाणे ऊसतोड कामगारांचा बोजा टाकला तर ते शेतकरी कोलमडून पडतील. या देशातील शेतकरी सक्षम कसे होतील याबाबतीत राज्य सरकार आणि केंद्र सरकार प्रयत्न करीत आहे. त्यादृष्टीने पावले टाकण्यात येत आहेत. भारतातील जनता ही सहिष्णू आहे. भूतदया, क्षमा, शांती हा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. आपण जगावे आणि दुसऱ्याला वाळीत टाकावे किंवा दुसऱ्याला गुलामाची वागणूक द्यावी अशी आपल्या देशाची संस्कृती नाही. परंतु जे शेतकरी स्वत:च पिचलेले आहेत, जे शेतकरी कर्जाच्या खाईत लोटलेले आहेत अशा शेतकऱ्यांवर माथाडी बोर्डाच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांचा बोजा टाकला तर त्याचे आर्थिकबाबतीत आणि सर्वच बाबतीत परिणाम होतील.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गणेश नाईक पुढे सुरु...)

माननीय केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवारसाहेब आणि माननीय सदस्य श्री. गोपीनाथ मुंडे या दोघांच्या नेतृत्वाखली साखर कारखान्यांचे काही प्रतिनिधी तसेच ऊसतोड कामगारांचे प्रतिनिधी, ऊस उत्पादक शेतक-यांचे प्रतिनिधी या सर्वांची बैठक होऊन याबाबतीत तडजोड झालेली आहे. त्यांची मजुरी वाढलेली आहे. तसेच त्यांच्या सर्व्हिस कंडिशनस अपग्रेड करण्याचा विचार झालेला आहे. माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी ऊसतोड आणि वाहतूक कामगारांच्या संदर्भात अगदी माणुसकीच्या भावनेतून याठिकाणी विधेयक मांडलेले आहे. त्यांच्या या भावनेशी मी पूर्णपणे सहमत आहे. परंतु महाराष्ट्रातील शेतक-यांची परिस्थिती लक्षात घेता माथाडी कामगारांच्या संदर्भातील कायद्यामध्ये त्यांचा समावेश करणे या क्षणाला तरी उचित होणार नाही. परंतु माननीय सदस्यांनी जे अशासकीय विधेयक याठिकाणी मांडलेले आहे त्याबाबतीत शासन सहानुभूतीपूर्वक विचार करील. तेव्हा माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी आपले विधेयक मागे घ्यावे अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : माननीय मंत्रीमहोदयांनी मी मांडलेल्या अशासकीय विधेयकाच्या बाबतीत याठिकाणी खुलासा करताना असे सांगितलेले आहे की ऊस तोडणी व गाडीवान कामगार यांचा बोजा हा शेतक-यांवर पडेल. माझ्या माहितीप्रमाणे माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेली माहिती बरोबर नाही. याचे कारण असे की, ऊस तोडणी कामगार आणि गाडीवान कामगार यांचा खर्च हा साखर कारखान्यांमार्फत केला जातो. शेतक-यांवर तो बोजा पडत नाही. तेव्हा याबाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी घ्यावी. आपल्या राज्यातील साखरकारखाने इतर राज्यातील साखर कारखान्यां पेक्षा ऊस तोडणी व वाहतुकीच्या पाठीमागे 100 रु. जास्त देतात. मला एवढेच सांगावयाचे आहे की, हा बोजा शेतक-यांवर पडणार नसून तो साखर कारखान्यांवर पडेल. हा बोजा जर शेतक-यांवर पडणार असेल तर मी माझे विधेयक मागे घेण्याच्या संदर्भात विचार करीन.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, 1969 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक सन्माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवानी यांनी मांडलेले आहे. या विधेयकाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी आपला खुलासा केलेला आहे. सभापती महोदय, राज्यामध्ये जेव्हा ऊस तोडणीचा हंगाम सुरु होतो त्यावेळी राज्यातील ऊस तोडणी कामगार आणि वाहतूक करणारे गाडीवान आपल्या परिवारासहीत वर्षातून ते 5 ते 7 महिने आपली गावे सोडून अन्य ठिकाणी स्थलांतरीत होतात. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, ऊस उत्पादक शेतक-यांकडे दोन एकर, तीन एकर, पाच एकर जमीन असते. अशा अल्पभूधारक ऊस उत्पादक शेतक-यांवर हा भूर्दंड पडू नये. माननीय मंत्री महोदयांची ही भूमिका स्वागतार्ह आहे. या स्थलांतरीत होणा-या ऊस तोडणी कामगारांना जुजबी आणि आवश्यक अशा सोयीसुविधा मिळाव्यात त्यांच्या राहाण्याची चांगली सोय व्हावी, त्यांच्या औषधपाण्याची सोय व्हावी यासाठी साखर कारखान्यांनी विशेष अशा प्रकारचा राखीव फंड तयार केला तर त्या फंडातून ही व्यवस्था निश्चितपणे करता येईल. तेव्हा या दृष्टीकोनातून विचार करुन हंगामामध्ये जे ऊस तोडणी कामगार आणि गाडीवान कामगार आपल्या कुटुंबासहीत स्थलांतरीत होतात त्यांच्यासाठी शुध्द पिण्याच्या पाण्याची, त्यांच्या राहाण्याची, औषधपाण्याची, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी साखर यकारखान्यांनी विशेष असा फंड तयार करावा अशी माझी सूचना आहे.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ...

त्या पध्दतीने या बाबींकडे जर शासनाने लक्ष दिले तर मला वाटते की स्थलांतरित कामगारांना निश्चितपणाने न्याय मिळेल. शासनाची नेहमीच पुरोगामी भूमिका राहिलेली आहे. यादृष्टिकोनातून माणुसकीचा विचार मांडलेला आहे आणि म्हणून मानवतेच्या दृष्टिकोनातूनच याचा विचार करावा अशी माझी शासनाला विनंती आहे. भारतीय समाज हा सहिष्णू आहे. "जगा आणि जगू द्या" असा म्हणणारा आपला समाज आहे. म्हणून अशा परिस्थितीत एक नवीन क्रांतिकारक निर्णय शासनाने घ्यावा अशी विनंती करतो.

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गिडवाणी यांनी सांगितले की, वाहतूक आणि मजुरीचा बोजा शेतकऱ्यांवर न पडता कारखान्यांवर पडणार आहे. सभापती महोदय, कारखान्याचे जे सभासद असातात ते सभासद कर्मचारी ऊस पुरवितात त्यामध्ये प्रॉडक्शन कॉस्ट तसेच तोडणी आणि वाहतूक हा सगळा खर्च करुन जे पैसे उरतात त्यातून शेतकऱ्यांना पेमेंट केले जाते. कारखान्यावर बोजा पडतो म्हणजे पर्यायाने शेतकऱ्यांवर पडतो कारण कारखाने शेतकऱ्यांच्या मालकीचे आहेत. आदरणीय श्री. पवार साहेब आणि श्री. मुंडे साहेब यांनी ऊस तोडणी कामगारांची मजुरी वाढवून दिली होती. यासंबंधातील माहिती मी याठिकाणी सभागृहाला दिलेली आहे.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गिडवाणी यांनी असंघटित कामगार आणि ऊसतोड कामगारांना संरक्षण मिळावे म्हणून अशासकीय विधेयक मांडलेले आहे. अशासकीय कामकाजाच्या संदर्भात विधेयके किंवा ठराव आणले जातात त्याला मूर्त स्वरुप येणे आवश्यक आहे. याच विषयावर अशासकीय ठराव दोन वर्षापूर्वी परिषदेत आला होता. त्यानंतर माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी असाच एक अशासकीय ठराव सदनामध्ये मांडला होता. याच विषयावर लक्षवेधी सूचना आली होती. त्यावेळी या खात्याशी संबंधित म्हणून त्यावेळचे मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी सभागृहात फार मोठे आश्वासन दिले होते. मी कोल्हापूरचा सुपुत्र असल्यामुळे परत सभागृहात हा विषय येणार नाही अशा पध्दतीने आम्ही दक्षता घेऊ असे राणा भीमदेवी थाटामध्ये आश्वासन दिले होते. त्याला आता दोन वर्षे झालेली आहेत. त्यावेळी माझा त्या आश्वासनावर विश्वास बसला होता. परंतु आता विश्वास राहिला नाही. काही साखर कारखान्यांची स्वत:पुढाकार घेऊन साखर शाळा चालविल्या आहेत. अशासकीय विधेयकामागील जो दृष्टिकोन आहे तो लक्षात घेणे आवश्यक आहे. सगळयाच कंत्राटदारांवर बंधन आणू शकत नाही. सिक्युरिटी गार्ड कंत्राटदार असतील किंवा ऊसतोडणी कंत्राटदार असतील त्यांच्यावर बंधन आणू शकत नाही. ऊसतोडणी कामगार स्वत:ची गावे सोडून येत असतात. सांगली,सातारा,कोल्हापूर या भागामध्ये हे कामगार येतात. तेथील परिस्थिती वेगळी असते. दुसरे एक माननीय सदस्य श्री. अैनापुरे यांनी सांगितले होते की, आमच्या भागामध्ये तर अल्पवयीन मुलींवर अत्याचार होतात. शाळेकडून ट्रान्सफर सर्टिफिकेट न मिळाल्यामुळे मुलांच्या शाळा खंडित होतात. या विषयासंदर्भातील जी जी कार्यवाही अपेक्षित आहे ती होणे आवश्यक आहे. शिक्षण विभागाशी संबंधित कार्यवाही होणे अपेक्षित आहे. कामगारांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,स्वच्छतागृहे असणे आवश्यक आहे. रानटीपणाने त्यांना रहावे लागते. निर्मल ग्राम योजना बरेच कारखाने राबवीत असतील आणि अशा प्रकारच्या सोई-सुविधा उपलब्ध करुन देत असतील. स्थलांतरित झालेल्या कामगारांना सुध्दा दर्जा दिला पाहिजे. जेव्हा एखादे विधेयक मागे घ्यावे असा आग्रह धरतो त्यावेळी काय उपाययोजना करणार याबद्दल आश्वासन दिले पाहिजे.

अशुद्धीत प्रत / मुद्रितशोधनाची नाही

नंतर श्री. खर्चे पी.

डॉ. नीलम गोऱ्हे .....

आपण तालिका सभापती स्थानावर बसलेला आहात, आपणास देखील माहिती असेल की या सदनात काही विधेयके चर्चेला आली असतांना पाहिलीत की, वर्षानुवर्षे त्याच त्याच विषयावर चर्चा होते आणि माननीय मंत्री महोदय सुध्दा तेच उत्तर थोडयाफार फरकाने देत असतात. ज्याप्रमाणे शाळेत मुले लुटुपुटुचा खेळ खेळतात असे हे अशासकीय कामकाजाबाबत चालू असते की काय अशी मला शंका येते. म्हणून माननीय मंत्री महोदय जे आश्वासन या अशासकीय विधेयक अथवा ठरावांच्या माध्यमातून देत असतात त्या आश्वासनाची पुर्तता सहा महिन्यात तरी झाली पाहिजे अशा प्रकारे एक स्वयंशिस्त ठेवावी आणि तशी ती ठेवली नाही तर आपणच आपल्या विचारांपासून परावृत्त होतो की काय अथवा खास करुन ज्या जनतेचे प्रश्न मांडतो ते अनुत्तरीतच राहतात. म्हणून सन्माननीय सदस्य जो खटाटोप या माध्यमातून करीत असतात त्यामागे असलेल्या हेतूलाच हरताळ फासला जातो की काय असे वाटते. असे होऊ नये म्हणून शासनाने लवकरात लवकर व कालमर्यादा लक्षात घेऊन यासंबंधीची पुर्तता करणे आवश्यक असते. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, आज जग खुल्या अर्थव्यवस्थेकडे चालले आहे. पूर्वीच्या कालखंडात आपल्याकडे साखर आयातीवर बंधन होते आणि आज आपण साखर निर्यात आणि आयात करण्याची देखील भूमिका स्वीकारलेली आहे. अशा परिस्थितीत जगातील अन्य देातील एकरी ऊसाचे उत्पन्न, त्याची साखर निर्माण करण्याची पध्दती आणि त्याला पडणारी प्रॉडक्शन कॉस्ट आणि आपल्या देातील, आपल्या राज्यात एकरी ऊसाचे उत्पन्न आणि त्याला मिळणारा भाव व साखरेच्या उत्पनासाठी त्यासाठी द्यावी लागणारी किंमत या सर्व बाबी लक्षात घेण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी सांगितले त्यानुसार शेवटी कारखानदार तरी काय करणार ? ज्यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्याचा माल येतो त्यातून ेतकऱ्याची 10 टक्के रक्कम कापली जाते. कारण कृषी उत्पन्न बाजार समित्या आपल्या खिशातून ही रक्कम टाकत नाही तर शेतकऱ्यानी विकलेल्या मालाच्या किंमतीतूनच कापून घेतात. सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी उपस्थित केलेला मुद्दा खरा आहे की जी रक्कम कापण्यात येईल ती ेतकऱ्याच्या ऊसाच्या किंमतीतूनच कापली जाणार म्हणजेच अप्रत्यक्षपणे हा बोजा शेतकऱ्यांवरच पडणार आहे. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी कामगार कल्याण केंद्राच्या माध्यमातून एक रुपया कामगारांचा, एक रुपया कारखानदारांकडून आणि एक रुपया ासनाचा आा प्रकारे शासन निश्चितपणे विचार करील. कारण शेवटी ऊस तोडणी कामगार केवळ एकाच जिल्हयात काम करीत नाही, हंगामी कालखंडात तो एका जिल्हयातून वेगवेगळया ठिकाणी जात असतो. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी कारखान्यावर काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेची कुठलीही हमी नाही, त्यांना शौचालयाची व्यवस्था नसते, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच साखर शाळा नसेल तर तशी व्यवस्था करावी. एकूणच राज्यातील साखर कारखाने डबघाईला आलेले आहेत, बोटावर मोजण्याइतके कारखाने सोडून दुसऱ्या कारखान्यांना जिल्हा सहकारी बँकांनी दिलेले कर्ज किंवा ऊस खरेदी करण्यासाठी अथवा ऊसाचे चुकारे देण्यासाठी दिलेले कर्ज सुध्दा हे कारखाने फेडू शकलेले नाहीत. अशा परिस्थितीत मनात कितीही इच्छा असली तरी देखील या अनुषंगाने जर विचार केला तर पूर्ण अर्थकारणच बदलून जाईल आणि ऊस तोड कामगारांच्या ऐवजी शासनाला शेतकऱ्यांच्याच आंदोलनाला फेस करावे लागेल. म्हणून या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक .....

क्षेत्रातील अतिशय दांडगा अनुभव असलेल्या दोन व्यक्ती म्हणजेच माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरदचंद्र पवार आणि आपल्या राज्यातील नेते माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली साखर कारखान्यांचे, शेतकऱ्यांचे तसेच कामगारांचे प्रतिनिधी यांच्याबरोबर बोलणी चालू आहे. शासनाला देखील या दोन्ही घटकांविषयी सहानुभूती आहे आणि कामगारांच्या दृष्टीने तसेच त्यांची आर्थिक स्थिती चांगली व्हावी म्हणून शासन नेहमीच प्रयत्नशील आहे. म्हणून यासंबंधी उगाचच मी आश्वासन देणार नाही आणि माजी मंत्री महोदयांनी सभागृहात यासंदर्भात काय सांगितले हे मला माहिती नाही पण मी जे बोलतो ते व्यवहाराशी सांगड घालूनच बोलत आहे. म्हणून ज्या दिवशी या शेतकऱ्याची ताकद कामगारांना रोजंदारी जास्त देण्याची असेल त्या दिवशी शासन देखील अशा प्रकारचा निर्णय ठामपणे घेईल, एवढे सांगून सन्माननीय सदस्यांनी आपले विधेयक मागे घ्यावे अशी मी त्यांना विनंती करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, यात एकच विषय होतो. सन्माननीय सदस्य श्री.गडाख यांनी सांगितले ते बरोबर आहे. कारखाना हा खरे तर शेतकऱ्यांचा असतो. पण आज शेतकऱ्यांच्या नावाखाली महाराष्ट्रात काय चालले आहे हे सर्वांनाच माहिती आहे. कारखाना सुरू होण्यापूर्वी ऊसाला रुपये 800/- पेक्षा जास्त भाव देऊ नये व जो कोणी कारखाना यापेक्षा जास्त भाव देईल त्याचा परवाना रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे आज ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेतले जात नाही हे जगजाहीर आहे. आज केंद्र व राज्य शासन हे साखर कारखान्याच्या पाठिमागे उभे आहेत. शेतकऱ्यांच्या नाहीत. म्हणूनच मी कायद्याप्रमाणे संरक्षण दिले पाहिजे अशी विनंती शासनाला केली आहे. श्रमजीवी कामगारांना किती पैसे द्यायचे हा मुद्दा उपस्थित केलेला नाही. श्री.पवार साहेब आणि श्री.मुंडे साहेब यांनी साखर कारखाने सुरू करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. ऊस तोड कामगारांना गेल्या दहा वर्षापासून वाढ मिळाली नव्हती. ती त्यांनी 50 टक्क्यांनी वाढवून दिली आहे. यासंबंधी देखील मला काही बोलावयाचे नाही. जे श्रमजीवी कामगार आहेत त्यांना कायदेशीर संरक्षण मिळावे एवढीच मी विनंती केली आहे.

तालिका सभापती (श्री.गुरूनाथ कुलकर्णी) : सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत, त्या शासनाने तपासून त्यातून मार्ग काढण्याची भूमिका राज्य शासनाने घ्यावी.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, मला हे विधेयक परत घेण्यासाठी सभागृहाने अनुमती द्यावी.

सभागृहाच्या अनुमतीने विधेयक मागे घेण्यात आले.

.....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक.

L.C.BILL NO. IX OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI PROVINCIAL MUNICIPAL CORPORATION ACT, 1949).

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 9 - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, 1976 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, मुंबई शहराची लोकसंख्या सुमारे 1 कोटी 25 लाख इतकी आहे. मुंबई बेटावर कुलाब्या पासून सायन पर्यंत आणि शिवडी पासून वरळी पर्यंत सुमारे 50 ते 60 लाख लोक जुन्या चाळीत राहतात. युती शासनाच्या काळात उपकर प्राप्त ज्या इमारती आहेत त्यांना मॅचिंग ग्रँट देण्याची तरतूद कायद्याने करण्यात आली. Now, at the sweet will of the Government and the Finance Department of the State Government, this matching grant is given to the Board. माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी झोपडपट्टीवासियांना 225 चौरस फुटाची मोफत घरे देण्याची घोषणा केली होती व अंमलात देखील आणली. परंतु, जे जुन्या चाळीत राहत होते त्यांना 160 ते 180 चौरस फुटाची जागा मुंबई इमारत व दुरुस्ती मंडळाकडून देण्यात येत होती. त्यामुळे रहिवाशांनी किमान 225 चौरस फुटाची जागा देण्यात यावी अशी मागणी केली. याचा विचार करण्यासाठी सुकथनकर समिती नेमण्यात आली होती. या समितीने पुनर्रचित इमारतीमध्ये 225 चौरस फुटाच्या जागा देण्यात याव्यात असा निर्णय घेतला.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

युती सरकारने 225 चौ.फू.जागा देण्याचा निर्णय घेतल्यानंतर, स्वाभाविकपणे त्या व्यक्तीला बांधकामासाठी जास्त पैसा लागणार होता. त्यामुळे युती सरकारने सेक्शन-97 मध्ये बदल केला. मी माननीय मंत्री महोदयांना सांगेन की, या विषयाबाबत आम्ही चर्चा उपस्थित केल्यानंतर ती शक्य तितक्या लवकर उडविली जाते. क्रॉफर्ड मार्केटच्या डेव्हलपमेंट मधून किंवा गिरण्यांच्या जमिनी विकून शासनाकडून केवळ श्रीमंत माणसांचीच सोय केली जात आहे. मागासवर्गीयांचे प्रश्न सुटावेत, गरीबांचे प्रश्न सुटावेत म्हणून गृहनिर्माण विभागातर्फे कसल्याच प्रकारचे धोरण स्वीकारण्यात येत नाही किंवा आलेले नाही. कंडक्टर, वाहक, कारकून, शिपाई, छोटा दुकानदार, शिक्षक, पोलीस, भाजीपाला विक्रेता अशा लहानलहान घटकांबद्दल कसल्याही प्रकारे विचार करण्यात आलेला नाही. जी व्यक्ती प्रामाणिकपणे जीवन जगते त्या व्यक्तीसाठी मात्र शासनाकडून काहीही केले जात नाही. ज्यावेळी युतीची सत्ता होती त्यावेळी युती सरकाने जाहीर केले की, 225 चौ.फू. जागा देत असताना, आर्थिक मदत करणे सुध्दा आवश्यक आहे. त्यामुळे युती सरकारने सेक्शन-97 मध्ये बदल केला. आज तुम्ही कितीही युती सरकारबद्दल वाईट बोलत असला तरी, मी सांगू इच्छितो की, युती सरकारने खरोखरच जनताभिमुख राज्य केले. सामान्य माणसाला डोळयासमोर ठेऊन, युती सरकारने राज्य केले. मुंबईच्या चाळीत राहणाऱ्या लोकांसाठी सुकथनकर समितीच्या शिफारशीची अंमलबजावणी करण्याचा निर्णयही आमच्या सरकारने घेतला होता. पूर्वी जर 30 कोटी रुपये उपकर गोळा झाला असेल तर शासनाकडे तीन-चार कोटी यावयाचे. बाकी गृहनिर्माण खात्याकडे दिले जात. पंरतु आम्ही सेक्शन-97 मध्ये बदल केला. पूर्वी जो "May" शब्द होता, त्यामध्ये बदल करुन आम्ही "Shall" हा शब्द समाविष्ट केला. That Section reads as under:" 97(1). The State Government shall, under appropriation duly made by law in this behalf, pay an annual contribution to the Authority equal to the amount of cess recovered during that year, and the Municipal Corporation shall pay the annual contribution of rupees ten crores to the Authority." साधारणपणे पूर्वी हा उपकर 20-30 कोटी रुपये जमा होत असे. उपकराबाबत आम्ही जो निर्णय घेतला तो चांगला होता. कारण त्यामुळे 30-40 कोटी रुपये उपकर गोळा व्हावयास लागला. त्याच वेळी शासनानेही यामध्ये मॅचिंग ग्रँट टाकण्याबाबत तरतूद

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केली. कारण जर या इमारती उभ्या राहिल्या तर त्यातून महापालिकेला प्रॉपर्टी टॅक्सच्या माध्यमातून उत्पन्न मिळेल. त्यामुळे महापालिकेने प्रत्येक वर्षी 10 कोटी रुपये रिपेअर बोर्डाला द्यावेत अशी तरतूद केली. वास्तविक पाहता म्हाडाच्या अखत्यारित 9 बोर्ड आहेत. Repair Board is one of them. Further it is stated that: "The Authority from its own funds shall pay an annual contribution of Rs.10 crores to the Board for the purpose of reconstruction of the building."

महोदय, या माध्यमातून गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये जो पैसा गोळा करण्यात आलेला आहे तो या बोर्डाला देण्यात आलेला नाही. मुंबईतील 52 ट्रान्झिट कॅम्पमध्ये लाखो नागरिक गेल्या 10-15-20 वर्षांपासून जनावरांसारखे जीवन जगत आहेत. हा विषय आम्ही लक्षवेधी सूचना, नियम 93 अन्वये वरील सूचना वा अन्य आयुधांमार्फत सदनाच्या निदर्शनास आणून दिला. परंतु तो विषय दोन-तीन मिनिटांच्या चर्चेनंतर उडविला जातो. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपणांस अतिशय महत्वाचे असे खाते मिळालेले आहे. त्यामुळे आपण जर या खात्याचा सोन्यासारखा उपयोग केला तर, गरीब माणसांकडून आपणास दुवा मिळेल. गेल्या दोन वर्षांपासून रिपेअर बोर्डाने दैनंदिन कामकाज वगळता, मुंबईतील जनतेला दिलासा देणारे एकही काम केलेले नाही. एक रुपया जो उपकर जमा होतो, त्यामध्ये 90 पैसे हे भाडेकरुंचे आणि 10 पैसे लँडलॉर्ड यांचे असतात. त्यामध्ये शासन काहीही पैसा देत नाही. महानगरपालिकेने उपकर गोळा करावयाचा, त्यातील दोन-चार टक्के घ्यावयाचे आणि बाकीचे शासनाकडे आणि म्हाडाकडे द्यावयाचे असा हा प्रकार आहे.

नंतर श्री.व्ही.खर्चे....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण..

मी येथे एक उदाहरण देतो, सन 2003-2004 या वर्षी 44 कोटी 10 लाख रुपये उपकर गोळा करण्यात आला सन 2004-2005 मध्ये 40 कोटी, 45 लाख रुपये उपकर गोळा झाला, या दोन वर्षामध्ये 90 कोटी 55 लाख रुपये उपकर गोळा झालेला असतांना 66 कोटी 11 लाख रुपये महानगरपालिकेकडे शासनाने भरावयास पाहिजे होते, परंतु तो पैसा शासनाने दिलेला नाही. कायद्यामध्ये प्रोव्हीजन आहे त्याप्रमाणे 35 कोटी कोटी रुपये महानगरपालिकेला दिले होते. शासनाने या पैशातून राज्यातील किंवा मुंबईतील जनतेसाठी कोणत्याही नागरी सुविधा किंवा सुख सोयी उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. गरजू लोकांसाठी काहीही करण्यात आलेले नाही, सन 2004 मध्ये जो उपकर गोळा झाला त्यातील एक नवा पैसाही शासनाने महानगरपालिकेस मॅचिंग ग्रँट म्हणून दिलेला नाही. 47 कोटी रुपये उपकर सन 2004 मध्ये गोळा झालेले असतांना अर्थसंकल्पामध्ये काहीतरी कारणे सांगून हा पैसा देता येणार नाही. असे सांगण्यात येते, मुंबई महानगरपालिकेसाठी हा पैसा दिला गेला पाहिजे. मुंबई महानगरपालिकने सन 2005 मध्ये 63 कोटी 22 लाख रुपये उपकर गोळा केला. त्यातील फक्त 25 कोटी रुपये शासनाने महानगरपालिकेला दिले. तसेच 46 कोटी 19 लाख रुपयांपैकी फक्त 7 कोटी रुपये महानगरपालिकेला दिले. त्यानंतर जानेवारी 2006 मध्ये 72 कोटी 66 लाख रुपये कायद्यातील नियम 97 अन्वये द्यावयास पाहिजे होते, परंतु 25 कोटी 33 लाख रुपये दिले, त्यापेक्षा एक पैसाही शासनाने महानगरपालिकेस दिलेला नाही. हा पैसा देण्याबाबत माननीय मुख्यमंत्री यांच्यासोबत सहयाद्री येथे बैठक झाली त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी असे सांगितले की, 10 हजार घरे 3 वर्षामध्ये मुंबईत बांधावयाची आहेत, परंतु यासाठी गेल्या तीन वर्षामध्ये एक रुपया सुध्दा खर्च करण्यात आलेला नाही. म्हणजे " हलवायाच्या घरावर तुळशीपत्र " अशा प्रकारे शासन चालले आहे. मुंबई महानगरपालिकेचे 1000 कोटी रुपयांचे बजेट असतांना त्यातील 300 कोटी रुपये मॅचिंग ग्रँट म्हणून शासनाने महानगरपालिकेला द्यावयाचे आहेत. पंरतु या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये मुंबईमध्ये 10 हजार घरे बांधण्यासाठी शासनाने एका पैशाचीही तरतूद केलेली नाही. गृहनिर्माणच्या 2 हेड खाली फक्त काही तरतूद करण्यात आलेली आहे. या वर्षामध्ये 47 कोटी रुपये उपकर गोळा झालेला असतांना आपण फक्त 37 कोटी रुपयेच अर्थसंकल्पामध्ये ...

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधु चव्हाण...

दाखविलेले आहेत, म्हणजे महानगरपालिकेचे 10 कोटी रुपये शासनाने चोरटया मार्गाने पळविले आहे. यातील एक पैसाही शासनास घेण्याचा अधिकार नाही. 52 ठिकाणी संक्रमण शिबिरात जे लोक राहत आहेत त्यांच्याकडून जमीन संपादित करण्यात आलेली आहे, जिल्हाधिकारी यांनी जमीन उपलब्ध करुन घेतलेली आहे. त्या जागेवर 225 स्क्वेअर फुंटाची घरे बांधून देण्यास शासनाकडे पैसा नाही. चांगल्या प्रकारची घरे बांधण्यासाठी पैसा खर्च करावा लागतो. शासनाने रेट कॉन्ट्रक्टर ठरविलेले आहेत..

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : सन्माननीय सदस्य श्री. मधूकर चव्हाण यांनी कृपया बिलाच्या अनुषंगानेच बोलावे.

श्री. मधु चव्हाण : सभापती महोदय, मी बिलाच्या अनुषंगानेच बोलत आहे, माझ्या बिलातील सुधारणा अशी आहे की " या कलमान्वये प्रत्येक आर्थिक वर्षात जमा होणारी सर्व रक्कम या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ त्याच वर्षी मुंबई दुरुस्ती व पुनर्बांधणी मंडळाकडे जमा करण्यात येईल." यातील एक पैसाही शासन घेऊ शकणार नाही. गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियमाच्या कलम 98 मध्ये आणखी अशी सुधारणा सुचविलेली आहे की," The moneys paid at the disposal of the Board by the Authority under this Chapter shall be applied for the purposes of this Chapter." कलम 97 अन्वये मुंबई दुरुस्ती व पुनर्बांधणी मंडळाकडे जमा करण्यात आलेली प्रत्येक रक्कम फक्त दुरुस्ती व पुनर्रचना या प्रयोजनार्थ वापरण्यात येईल. हा पैसा गृहनिर्माण महामंडळाचा असतो, परंतु सर्वसाधारणपणे झोपडपट्टी पुनर्विकास महामंडळ असेल, कोकण गृहनिर्माण महामंडळ असेल, नागपूर गृहनिर्माण महामंडळ असेल, पुणे गृहनिर्माण महामंडळ असेल त्याकडे हा पैसा दिवसेंदिवस वळविला जात आहे. उपकराच्या माध्यमातून जमा झालेली रक्कम मुंबई इमारत दुरुस्ती महामंडळ व दुरुस्ती पुनर्रचना महामंडळाकडे देण्यात यावयास पाहिजे. माननीय मंत्रीमहोदयांना माझी अशी विनंती आहे की, उपकराची सगळी रक्कम किती होती व त्यापैकी किती रक्कम मुंबई महानगरपालिकेला देय आहे, व किती रक्कम दिलेली आहे यासंदर्भातील माहिती आपण आपल्या उत्तरामध्ये सांगावी..

यानंतर श्री. सांगळे...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ KGS/ MAP/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे ... 11:30

श्री.मधुकर चव्हाण ...

सभापती महादय, माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, मुंबई महानगरपालिका इमारतींवर इमारत दुरुस्ती व पुनर्रचना उपकर आकारुन पैसे गोळा करते व स्वत:चे 10 कोटी रुपये देत नाहीत, जमवलेले पैसे देत नाहीत. या ठिकाणी महानगरपालिकेने जो रिपेअर सेस गोळा केलेला आहे तो आपल्याला दिला जाणार आहे. शासनाचा या पैशाशी काही संबंध नाही. परंतु मुंबई महानगरपालिकेला देय असलेली म्हाडाची रक्कम वळती करुन उर्वरित रक्कम या निधीत जमा केली जाते. अशाप्रकारे निधी वळता करु शकत नाही. म्हणून मी या विधेयकाद्वारे दोन कलमांमध्ये सुधारणा सूचवली आहे, ही सुधारणा सभागृहाने स्वीकारावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी विधेयक क्र.9 - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास विधेयक, 2005 या ठिकाणी मांडलेले आहे. त्याला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. या विधेयकातील उद्देश व कारणे वाचून मला धक्का बसला. शासन जे नियम बनवते, कायदे बनवते त्याचे उल्लंघन शासन स्वत: करते, ही अतिशय गंभीर परिस्थिती आहे. अशाप्रकारे शासनाने कायद्याची अवहेलना करण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे सर्वसामान्य जनतेचा शासनावर विश्वास राहील किंवा नाही ? याबाबत गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मांडलेल्या विधेयकामध्ये मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती व पुनर्रचना करण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, 1976 च्या कलम 18 अन्वये मुंबई दुरुस्ती व पुनर्बांधणी मंडळ गठीत करण्यात आले आहे. सभापती महोदय, या नियमाअंतर्गत या मंडळाकडे मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती करणे वा पुनर्रचना करण्याचे काम सोपवण्यात आले आहे. यासाठी ज्या निवासी इमारती आहेत त्यांच्याकडून उपकर वसूल केला जातो व त्यामध्ये तेवढयाच रकमेचा शासनाचा मॅचिंग ग्रँटचा हिस्सा असतो. अशाप्रकारे प्रत्येक वर्षी शासनाने 10 कोटी रुपयांचा मॅचिंग ग्रँटच्या स्वरुपात हिस्सा द्यावयाचा असतो. तसेच नियमानुसार म्हाडासाठी 10 कोटी रुपयांची सांविधानिक तरतूद असते. दुर्दैवाने या विधेयकाच्या माध्यमातून ही बाब आमच्या सारख्या मुंबईच्या बाहेर वास्तव्यास असलेल्या लोकांच्या लक्षात येते. तसेच एकीकडे शासनाकडून आपत्तीमध्ये लोकांचे प्राण वाचविण्यासाठी प्रयत्न केला जातो आणि दुसरीकडे मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये राहत असलेल्या लोकांवर संकट टाकण्याचा या ठिकाणी प्रयत्न केला जातो. हा विरोधाभास समजायचा काय ? ही आपल्या पुरोगामी शासनाची जबाबदारी आहे. तसेच शासनाची जी मॅचिंग ग्रँट असते ती ऑब्लिगेटरी व मँडेटरी आहे. या संदर्भात आधी " may " हा शब्द होता, आता त्याऐवजी " shall " हा शब्द वापरलेला आहे. म्हणून मुंबईतील मोडकळीस आलेल्या व जीर्ण झालेल्या इमारतींमध्ये राहत असलेल्या लोकांचे प्राण सुरक्षित राहण्यासाठी शासनाने गंभीरपणे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे .....

प्रश्न आहे की, हा निधी गोळा होतो तो इतर कामांकडे वळविला जातो. आता इतर कामांसाठी वळविला जातो हे ठीक आहे पण मग जेव्हा घरदुरूस्ती मंडळाला गरज पडेल तेव्हा त्याला का दिला जात नाही ? खरे तर हा निधी इमारतींच्या दुरूस्तीसाठी, पुनर्रचनेसाठी वापरला जावा आणि जीव मुठित धरून जगणाऱ्या त्या इमारतीतील रहिवाशांना एक प्रकारे आधार देऊन, कारण शेवटी हा सामाजिक सुरक्षेचा, सामाजिक न्यायाचा देखील प्रश्न आहे., तेव्हा सामाजिक न्यायाचे धोरण स्वीकारलेल्या या पुरोगामी शासनाने याबाबतीत गंभीरपणे विचार करावा आणि या निधीचा पुरेपूर वापर मुंबईतील जुन्या इमारती दुरूस्त आणि पुनर्रचित करण्यासाठीच वापरावा एवढे बोलून सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी भाषण संपवितो.

*****

..... टी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जे विधेयक येथे आणले आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. त्यातील काही गोष्टींच्या बाबतीत मी माझे वेगळे विचार मांडणार आहे. मूलत: मुंबईची रचना ही कुलाबा ते माहीम अशी आहे आणि ही खरी मूळ मुंबई आहे. या मूळ मुंबईतील चाळींमध्ये राहणाऱ्या, उपकरप्राप्त इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांचे जे प्रश्न आहेत ते सोडविण्यासाठी म्हाडाचा निधी, उपकर आणि त्यावरील मॅचिंग अनुदान या सगळ्यांचा विचार करून हे विधेयक सन्माननीय सदस्यांनी आणले आहे. ही सगळी रक्कम त्यांना वेळेवर दिली गेली असती तर हा प्रश्नच आला नसता. आजही आपण ट्रांझिट कॅम्पमध्ये जाऊन पहावे. जनावरांपेक्षाही अत्यंत हीन दर्जाची वागणूक तेथील रहिवाशांना मिळते आहे. गेली कित्येक वर्षे ही माणसे त्या ट्रांझिट कॅम्प मध्ये राहताहेत. मध्यंतरी वर्तमानपत्रांमध्ये अगदी छायाचित्रांसह त्याची माहिती आली होती इतकेच नाही तर दूरदर्शनवर देखील तेथील परिस्थितीचे चित्रण दाखविले गेले आहे. तेथील पिण्याच्या पाण्याची अवस्था, गलिच्छ वस्ती, मलनिस्सारणाची दुरावस्था आणि इतर घाट यामुळे रोगराईचे पसरलेले साम्राज्य आपल्याला पहावयास मिळते. म्हणजे असुनि खास मालक घरचा, तरीही त्याची ही अवस्था शासनाने आणि गृहनिर्माण मंडळाने करून टाकली आहे. जो या मुंबईतील घरमालक होता व आहे त्याला तुम्ही या अवस्थेमध्ये आणून टाकले आहे. आता येथे सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, मुंबई महानगरपालिका घरदुरूस्ती मंडळाचे हक्काचे पैसे वळते करून घेते आहे आणि ते योग्य नाही. पण मी त्यांच्या म्हणण्याशी सहमत नाही. कारण शेवटी मुंबई महापालिका तरी काय करणार ? शासनाच्या विविध खात्यांकडून महापालिकेला येणारे पैसे शासन महापालिकेला वेळेवर देत नाही तेव्हा साहजिकच महापालिका देखील हाच विचार करणार की आपल्याकडे हे जे पैसे आलेले आहेत वा येत आहत त्यातून आपण आपले पैसे वळते करू या. अर्थात हे कायद्याच्या दृष्टीने गैर आहे, पण त्याला दुसरा पर्याय नाही. कारण शासनाने स्वत:चा विश्वास गमाविला आहे. शासनाच्या विविधी खात्याकडून येणे असलेले पैसे शासन या महापालिकेला वेळेवर नाही तर कधी देतच नाही. म्हणून माझी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना हात जोडून विनंती आहे की, आपण हे विधेयक मागे घ्या असे नुसते येथे सांगू नका. आज सुद्धा मुंबईतील अनेक इमारती, चाळी या पडण्याच्या अवस्थेमध्ये आहेत, टेकू लावलेल्या अवस्थेत आहेत. त्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने युतीचे राज्य असताना एसआरए योजना आणली

.... टी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

होती. त्यामुळे चाळीतील लोक नवीन घरात गेले पण त्याबाबतीत देखील त्या लोकांची अवस्था अधिक वाईट झाली आहे. या संदर्भात संबंधित विभागाचे राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांच्याकडे गेल्या आठवड्यातच बैठक आम्ही घेतली. या लोकांकडून 187 टक्के प्रॉपर्टी टॅक्स आकारला गेला आहे, शिवाय पुनर्रचित इमारतीच्या विकासकाने पाणी दिले नाही म्हणून पुन्हा त्याचा कर. त्यामुळे हे लोक आता म्हणत आहेत की, पूर्वीचे बरे होते आम्ही 10-15 रूपये भाड्यामध्ये सुखाने रहात होतो. आता हा सगळा त्रास नव्याने निर्माण झालेला आहे. आता हे सारे 33-7, 33-10 अंतर्गत प्रश्न येतात म्हणून मी त्यावर बोलत नाही. परंतु या विधेयकाच्या बाबतीत एवढीच विनंती आहे की, आजही डिलॅपिलेटेड कंडिशनमध्ये अनेक इमारती आहेत. तुम्ही वेळेवर पैसे यासाठी दिले नाहीत तर त्या इमारतींची दुरूस्ती होणार नाही. त्यासाठीच 96-97 ची जी तरतूद आहे ती मॉंडेटरी आहे की, तुम्ही पैसे दिलेच पाहिजेत. आता सन्माननीय गृहनिर्माण मंत्री हे सज्जन आहेत. आणि त्याचाच गैरफायदा प्रशासन घेत आहे. वित्त विभाग तर त्यांना विचारीतच नाही. तेव्हा प्रथम तुम्ही तुमचे पैसे मिळवा आणि मग महापालिकेचा विचार करा. माझे किती देणे आहे ते द्या असे सांगा आणि मग तुम्ही महापालिकेचे कान धरू शकता. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... यू 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

तुम्हाला त्यांचे कान धरण्याचा नैतिक अधिकार शिल्लक राहिलेला नाही. म्हणून तुम्ही जर पैसे दिले तर ही माणसे वर्षानुवर्षे पुनर्रचित इमारती तयार झाल्यानंतरही संक्रमण शिबिरामध्ये राहात आहेत त्यांना पुन्हा त्यांच्या इमारतीमध्ये आणण्याचे काम तुमच्या कारकिर्दीमध्ये होईल ते होण्याकरीता तुमची कारकीर्द वाढो एवढे बोलून आणि माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी मांडलेल्या विधेयकाला पाठिबा देऊन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, 1976 साली सरकारने निर्णय घेतल्यानंतर घरदुरुस्ती मंडळाची स्थापना झाली. या मुंबई शहरामध्ये 16 हजार जुन्या इमारतींचा प्रश्न आहे. या इमारतींमध्ये रहाणारे लोक मूळचे मुंबईकर आहेत. त्यामुळे त्यांच्या या प्रश्नाचे गांभीर्य आहे. या मुंबई शहरामध्ये सरकारने कुणाची चिंता व्हायची? कोणतेही प्रगतीशील पाऊल उचलतांना कुणाचा विचार करायचा? मुंबई शहरासंबंधीची ध्येय धोरणे ठरवितांना कुणाबाबत ती ध्येय धोरणे ठरवावयाची हा मूलभूत प्रश्न आपण विचारात घेतला पाहिजे. आपण या ठिकाणी राणा भीमदेवी थाटामध्ये 105 हुतात्मे देऊन मुंबई मिळविली असे भाषण करण्याचा आता जमाना गेला. त्यांची पुन्हा आठवण झाली की, आपण त्यांना हार वाहतो. त्यांचे स्मारक दूषित झाले तर माननीय श्री. भुजबळ यांचेसारखे गोमूत्र टाकून शुध्दीकरण करतो. तेव्हा आता त्या हुतात्म्यासंबंधी जास्त न बोलणे चांगले. कारण ज्यांनी ही मुंबई मिळविली त्यांची आज दुरावस्था होत आहे. त्यासाठी सरकारने धोरणे राबविली पाहिजेत असे आपणा सर्वांना मनापासून वाटते. परंतु दुर्दैवाने घरदुरुस्ती मंडळ या मूळ उध्दिष्टांपासून बाजूला गेले अशी परिस्थिती कालांतराने निर्माण झाली आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी हे विधेयक आणले आहे त्याच्या पाठीमागची हीच भूमिका आहे. घरदुरुस्ती मंडळाचा उपकर सुरुवातीला 60 रुपये होता, तो नंतर 90 रुपये झाला, त्यानंतर 120 रुपये झाला आणि तो पुढे वाढायला लागला. आता तो 1200 रुपये पर स्क्वेअर मीटर झाला आहे. यासंबंधी मंत्रिमहोदय खुलासा करतील की नाहीत याविषयी माझ्या मनात शंका आहे. या कायद्यांतर्गत अशी परिस्थिती निर्माण झाली की, ज्या जुन्या इमारती आहेत व त्यांची जुनी भाडी आहेत. त्या जुन्या भाडयांमध्ये मालकाला इमारतीची दुरुस्ती करणे परवडत नाही. आणि मग जे इमारतीत रहातात, भोगवटा घेतात त्यांना इमारतीत राहायचे असेल आणि त्या इमारतीची दुरुस्ती करावयाची असेल तर त्यामध्ये त्यांचाही सहभाग असला पाहिजे. आणि मग पुन्हा त्यामधून उपकर आला. हा उपकर आणतांना त्या भाडेकरुंवर किती बोजा लादायचा हा मूलभूत प्रश्न होता. 1968 साली मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे नगरसेवक बहुसंख्येने निवडून आले. त्यावेळी माननीय श्री. मनोहर जोशी हे दादर मतदारसंघामधून निवडून आले. त्यावेळी आम्ही पक्षामध्ये नवीन कायकर्ते होतो. त्यावेळी आम्ही प्रश्न समजावून, जाणून घेत होतो, कायदा समजावून घेत होतो. त्यावेळी दादरमधील जुन्या इमारती व नवीन बांधलेल्या इमारतीमध्ये राहाणाऱ्या लोकांमध्ये संघर्ष झाला. त्यावेळी आपटेवाडीमध्ये बैठक झाली. आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्यामधून गृहनिर्माण मंडळाची निर्मिती झाली. आणि मग माननीय श्री. मनोहर जोशी यांनी हे विधेयक आणले व कायदा निर्माण झाला. 1968 नंतर 1976 मध्ये माननीय श्री. मनोहर जोशी विधान परिषदेमध्ये सदस्य म्हणून आले. आणि मग त्यांनी सरकारला भाग पाडल्यानंतर या जुन्या इमारतींचा कायदा अस्तित्वात आला. त्याअन्वये उपकर किती घ्यायचा हे ठरविण्यात आले. आणि शासनावर असे निर्बंध घातले की, जेवढा उपकर जमा होईल तेवढी मॅचिंग ग्रँट शासनाची असेल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु..

मुंबई महानगरपालिकेने 10 कोटी रुपये द्यायचे आहेत. या संदर्भात जो काही निधी जमा होईल त्यामध्ये इमारतींची दुरुस्ती करायची आहे. काही इमारती अशा अवस्थेमध्ये होत्या की,त्या दुरुस्त करुन काही उपयोग नव्हता, त्या दुरुस्त करता येत नव्हत्या. म्हणून त्या इमारतीची पुर्नबांधणी करण्याचे ठरविण्यात आले. घरदुरुस्ती व पुनर्रचना मंडळ निर्माण करण्यात आले. इमारत बांधण्याचे काम घर दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाकडे आल्यानंतर असे लक्षात आले की, महाराष्ट्र शासनाची म्हाडा सारखी एजन्सी ही देखील घरे बांधण्याचे काम करते. त्यांच्या अधिपत्याखाली इमारत पुर्नबांधणी आणि डेव्हलपमेंट करण्याचे काम दिलेले आहे. मूळ प्रश्न असा आहे की, या शासनाला अजूनही हा प्रश्न सोडविता आलेला नाही. आज 16 हजार इमारतींचा प्रश्न आहे. जे बनिये बिल्डर्स होते त्यांनी एफ.एस.आय. लाटून टोलेजंग इमारती बांधल्या. आता कोर्टामध्ये प्रकरण आहे. कोर्टाने यासाठी कमिटी नेमलेली आहे. खरे तर कोर्टाचा हा विषय नाही. शासनाचे हे अपयश आहे. ज्या काही 15 इमारतींचे बांधकाम झालेले आहे, त्यामध्ये खोटे भाडेकरु दाखवून टोलेजंग इमारत बांधल्या, त्यासाठी बिल्डरनी एफ.एस.आय. वापरलेला आहे. त्यामध्ये बिल्डर मालामाल झालेले आहेत. तरी देखील आता कोर्टाकडून कमिटी नेमलेली आहे. ते आता याबाबतीत ठरविणार आहेत. त्यांची कामकाजाची पध्दती ही विक्षिप्त आहे. मी ज्या इमारतीमध्ये रहात असेन तरी मला कमिटीसमोर जाण्याचा अधिकार नाही. My case goes to that Committee and I have no right to make a plea. या कमिटीचे अध्यक्ष हे रिटायर्ड जज्ज आहेत. म्हाडाचे अधिकारी त्यांना जज्जसाहेब असे म्हणतात. भाडेकरुंच्या वतीने अधिकारी काही सांगण्यास गेले तर त्यांना तुम्ही कशाला सामील झाला, असे म्हणून त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप केला जातो. जी काही फॅक्ट्स आहे,त्याप्रमाणे त्यांनी सर्टिफाय करायला पाहिजे परंतु विक्षिप्तपणे तेथील डेव्हलपमेंट थांबविले जाते. एका ठिकाणी अर्धी इमारत रिकामी करुन तेथील भाडेकरुंना ट्रान्झीट कॅम्पमध्ये पाठविण्यात आले, त्यानंतर या कमिटीने विक्षिप्तपणे निर्बंध आणलेले आहे. ते क्लारिफिकेशन सांगत नाहीत. या संदर्भात माझ्याकडे मॅटर आलेले आहे. त्यांचा निर्णय झाल्यानंतर पुढे काय करायचे ते पाहू. लोकशाहीमध्ये अपील करण्याचा अधिकार आहे. सुप्रीम कोर्टामध्ये देखील 15-20 जज्ज नेमून अपिलावर विचार केला जातो. ही कमिटी काही सुपर नाही. जुन्या इमारतींनी श्वास कोंडून धरलेला आहे, तो श्वास कसा मोकळा करणार आहात ? हा खरा प्रश्न आहे. कमिटीने जरुर निर्णय ध्यावा. 100 वर्षाची इमारत असेल आणि पुढच्या 10 वर्षांनी ती पडणार असेल तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु....

त्याला समिती जबाबदार राहील. कमिटीने 'इमारतीची पुनर्रचना करण्याची गरज नाही', असे सांगितले आणि पुढच्या पावसाळयामध्ये ती इमारत पडली तर याला कमिटी जबाबदार रहाणार आहे काय ? त्यांना पर्यायी जागा दिली जाते की नाही] पुनर्रचित इमारतीमध्ये 225 स्के.फू.ची जागा भाडेकरुंना दिली जाते की नाही ? एफ.एस.आय. किती दिला जातो,

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

नकाशे बरोबर पास केले जातात की नाही हे पाहण्याचे त्यांचे काम आहे. ते काम थांबवणे हे त्यांचे काम नाही. महत्वाचा मुद्दा असा आहे की, जो फंड जमा होतो आणि आपण जी मॅचिंग ग्रँट आपण द्यावयाची आहे त्यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांकडून खुलासा हवा आहे. आपण कोणती मॅचिंग ग्रँट पकडणार आहात ? यामध्ये आपण ओपन चिंटींग करता असा माझा आरोप आहे. मी जबाबदारीने बोलतो.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, "चिटींग" हा असंसदीय शब्द आहे. त्यामुळे तो शब्द कामकाजातून काढून टाकावा अशी मी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी तो शब्द मागे घेतो.

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : तो शब्द कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी तो शब्द मागे घेतलेला आहे. आपण जुन्या इमारतींमध्ये राहणाऱ्या भाडेकरुंची खुलेआम फसवाफसवी करीत आहात असा माझा आरोप आहे. काहीवेळा काही शब्द झोंबायला लागतात त्यावेळी असे शब्द वापरावे लागतात. एखादी इमारत पहिल्यांदा दुरुस्त झाली तर त्या ठिकाणी प्रति चौरस फूट 700 ते 800 रुपये खर्च असेल आणि इमारत दुरुस्त झाली असेल तर त्या दुरुस्तीच्या खर्चाएवढा ॲडिशनल कर पुन्हा लावता. इमारत दुसऱ्यांदा नादुरुस्त झाली आणि ती दुरुस्त करण्याचा खर्च 1000 रुपये प्रति चौरस फूट असेल किंवा 1200 रुपये प्रति चौरस फूट खर्च असेल तर 800 रुपये आणि अधिक जादा रक्कम द्यावी लागते. ती रक्कम तुम्ही त्यांच्याकडून वसूल करता. आपण सर्व इमारतींचा उपकर जमा करतो पण सर्वच इमारती दुरुस्त करत नाही. उपकराची प्रचंड रक्कम जमा होते. 250 रुपये उपकर लावतो. दुरुस्तीचा खर्च 800 रुपये किंवा 1000 रुपये असेल तर इमारत दुरुस्त करताना उपकर रिकव्हर करुन दुरुस्तीनंतर जास्तीचा जो उपकर येणार आहे ती रक्कम आपण मॅचिंग ग्रँट म्हणून पकडणार काय ? 900 रुपयांऐवजी 1200 रुपये दर केला तर 1200 रुपये दराप्रमाणे जेवढा उपकर येईल त्याची मॅचिंग ग्रँट पकडणार की, दुरुस्त केलेल्या इमारतीला जो अधिभार लावणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्याची मॅचिंग ग्रँट पकडणार ? आणखी एक मुद्दा असा की, समजा एखाद्या इमारतीच्या दुरुस्तीचा खर्च 10 लाख रुपये आहे असे आपण समजू या. त्यांना जो खर्च येणार असेल त्यापैकी 7 लाख रुपये मंजूर खर्च असेल तर मग जे 3 लाख रुपये जादाचे लागतात त्याबाबत भाडेकरुंना सांगण्यात येते की, तुम्ही हे 3 लाख रुपये जमा करा. भाडेकरु असे म्हणतात की, आम्ही ही रक्कम कोठून जमा करावयाची ? तेवढे पैसे भरण्याची भाडेकरुंची ऐपत नसते. त्या ठिकाणी आमदार निधीतून खर्च करण्यास परवानगी मिळाली होती. सगळे भाडेकरुन आमदारांकडे धावतात. आमदारांनाही आपल्या मतदारांना खूष करावयाचे असते. ते त्या ठिकाणी 3 लाख रुपये देण्याऐवजी 1 लाख रुपये देतात. मग परत 2 लाख रुपयांचा प्रश्न शिल्लक राहतो. मग ते भाडेकरु आणखी दुसऱ्या आमदारांकडे जातात. अशा प्रकारे तीन चार आमदार त्या इमारतीच्या दुरुस्तीशी अटॅच होतात. मध्यंतरी शासनाने अशा प्रकारे खर्च करण्याचे बंद केले होते. आमदार निधीतून खर्च करण्याची ती पध्दत पुन्हा चालू केली. हा आमदार निधी कोणाचा आहे ? हे आमच्या स्वत:च्या खिशातील पैसे आहेत काय ? हे सरकारचे पैसे आहेत. ते पैसे फक्त त्या आमदाराने सांगितलेल्या कामाकरिता वापरावयाचे आहेत. शेवटी इमारत दुरुस्त होणे महत्वाचे आहे. जादा पैसे जमा होत नाहीत या नावाखाली जी इमारत तातडीने दुरुस्त व्हावयास पाहिजे ती दुरुस्त होत नाही. भाडेकरु पैसे जमा करीत नाहीत, आमदार त्याकडे बघत नाहीत अशी त्या भाडेकरुंची अवस्था निर्माण झालेली आहे. आपण जमा करीत असलेल्या निधीतून मॅचिंग ग्रँट देणार काय ? 1200 रुपयांमध्ये अधिकची जी रक्कम आहे ती मॅचिंग ग्रँट म्हणून धरणार काय ? सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे सर्व उपकराचा निधी शहरातून जमा होतो. तो निधी आपण शहरातील इमारतीसाठीच वापरला पाहिजे. तो निधी उपनगरातील झोपडपट्टयांसाठी वापरला जातो असे माझे मत आहे. जर त्या ठिकाणी तो निधी वापरत नसाल तर आनंद आहे. त्या ठिकाणी जर तो निधी वापरत असाल तर तो अधिकार आपल्याला आहे काय ? असा मूलभूत प्रश्न मी उपस्थित करीत आहे. त्याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मुंबईतीच्या इतिहासाची सुरुवात या मुंबईतील जुन्या इमारतींपासून करावी लागेल. कारण मुंबईचा सर्व इतिहास या जुन्या इमारतींमध्ये दडलेला आहे. 70-80 वर्षा पेक्षा जास्त वर्षे झालेल्या अशा 16 हजारा पेक्षा अधिक इमारती या मुंबईमध्ये आहेत. या विधेयकवर माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण, माननीय सदस्य प्रा. जोगंद्र कवाडे आणि अन्य माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त करुन शासनाला काही महत्वाच्या सूचना केल्या आहेत. याबाबतीत मी सांगू इच्छितो की, 2000 ते 2005 पर्यन्तचा सेस पूर्ण देण्यात आलेला आहे. महानगरपालिकेकडेही काही थकबाकी आहे. त्याविषयी चर्चा झालेली आहे. कालच महानगरपालिकेच्या अधिका-यांशी माझे बोलणेही झालेले आहे. या ठिकाणी पाणीपट्टीचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. ती महानगरपालिकेची आपसातील देणी-घेणी आहेत. त्याबाबतीत शासन निर्णय घेण्याच्या स्तरावर आलेले आहे. ज्यावेळी दुरुस्तीसाठी पैसे नसतात त्यावेळी म्हाडाकडून पैसे घेऊन काम केले जाते.

श्री. दिवाकर रावते : 100 कोटी रु. हे कायम स्वरुपी असलेच पाहिजेत. गेल्या 10 वर्षात पुनर्बांधणी आणि दुरुस्तीसाठी किती खर्च केलेला आहे ?

श्री. दयानंद म्हस्के : यासंदर्भातील माहिती माझ्याकडे आता उपलब्ध नाही. ती माहिती मी पटलावर ठेवण्याचा प्रयत्न करीन.

श्री. दिवाकर रावते : उपकर वाढल्यामुळे भाडेकरुंचे जे मूळ भाडे 15 ते 20 रु. होते ते आता 125 ते 150 रु. इतके झालेले आहे.

श्री. दयानंद मस्के : माननीय सदस्यांनी केलेल्या सर्व सूचनांचा विचार करण्यात येईल..

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी कायद्यामध्ये ज्या काही त्रुटी आहेत त्या निदर्शनास आणून ज्या ठिकाणाहून उपकर घेतला जातो तो उपकर त्याच ठिकाणी तेथील कामासाठी देण्याचे बंधनकारक करावे असे सांगितलेले आहे.

श्री. दयानंद मस्के : या विधेयकाच्या अनुषंगाने आलेल्या सूचना ह्या मुंबईच्या प्रगतीच्या दृष्टीने उपयोगी ठरणार आहेत. जो उपकर प्राप्त होणार आहे तो त्याच कारणासाठी वापरण्यात येतो...

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, कायद्यात अशी सुधारण करावयाची आहे की जेवढी मॅचिंग ग्रॅन्ट असेल तेवढी.. The wording in the Act is "shall" and not "may". सरकार ती स्वत:कडे ठेवू शकत नाही. कायद्यात मँडेटरी प्रोव्हीजन आहे. The State Government shall, under appropriation duly made by law in this behalf, pay an annual contribution to the Authority equal to the amount of Cess recovered during that year....." जेवढा उपकर गोळा होतो तेवढीच रक्कम तदर्थ अनुदान म्हणून कायद्याने बोर्डाला दिली पाहिजे. बोर्डाचे काम अडत नाही किंवा अडते असे म्हणून चालणार नाही. सरकारने योजना आखली होती की जी काही बैठी घरे किंवा ट्रँझीट कॅम्प असतील त्यांच्याकडील एफएसआय फुकट चालला आहे तेथे उंच इमारती बांधावयाच्या तसेच चांगली संक्रमण शिबिरे तयार करावयाची आणि उरलेल्या ठिकाणी चांगल्या पुनर्रचित इमारती बांधावयाच्या. शासनाला तदर्थ अनुदानाचे ते पैसे ठेवता येणार नाहीत दरवर्षी बोर्डाला द्यावेच लागतील. कायद्याने शासन ते पैसे देणार आहे किंवा नाही याचे उत्तर मंत्रीमहोदयांनी द्यावे.

श्री. दयानंद मस्के : माननीय सदस्यांनी केलेली सूचना योग्य आहे. बोर्डाला वर्षाच्या वर्षाला तदर्थ अनुदानाचे पैसे देण्यात येतील.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, एक महिन्याच्या आत बोर्डाला 80 कोटी रुपये शासन देणार आहे काय ? बोर्डाचे वसूल झालेले पैसे शासनाकडे आहेत. सदरहू पैसे कलम 97 प्रमाणे बोर्डाला देणे बंधनकारक आहे.

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, बोर्ड हे गृहनिर्माण विभागाच्या अखत्यारित आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला सरकारच्या वतीने उत्तर हवे आहे. बोर्डाला पैसे देणे बंधनकारक आहे. त्याठिकाणी "shall" हा शब्द वापरण्यात आला आहे. अशा प्रकारे वर्षानुवर्षे सदरहू पैसे न देण्याचे काम अर्थखात्याने केलेले आहे. अर्थखात्यातील ज्या अधिकाऱ्यांना "shall" या शब्दाचा अर्थ समजला नाही आणि बोर्डाला पैसे दिले नाहीत त्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस शासनाकडून बजावण्यात येईल काय ? आपण तशा प्रकारचे निदेश शासनाला द्यावेत.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, कायद्याच्या अंतर्गत जे नियम आणि तरतुदी आहेत त्याचे काटेकोरपणाने पालन केले जाईल एवढे तरी मंत्रीमहोदयांनी सांगावे.

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी जी सूचना केली आहे त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कायद्याची जर पायमल्ली होत असेल तर आपण संरक्षण देणे आवश्यक आहे.

तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी) : अशासकीय विधेयक असले तरी यावर सभागृहामध्ये गांभीर्याने चर्चा सुरु आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी उपस्थित केलेला मुद्दा चुकीचा आहे. अशासकीय विधेयक आहे म्हणून या विधेयकाला किंमत नाही असे शासनाने गृहीत धरु नये.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या सभागृहामध्ये गांभीर्याने या विषयाकडे पाहिले जात आहे आणि त्याप्रमाणे चर्चा होत आहे. मुंबई शहरात राहणाऱ्या भाडेकरुंचा आणि माणसांचा प्रश्न आहे.

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे की कायद्यात ज्या तरतुदी आहेत त्या अनुषंगाने जो उपकर भाडेकरुंकडून वसूल केला जातो तेवढी मॅचिंग ग्रॅन्ट शासनाच्या वतीने दिली गेली पाहिजे. अधिकाऱ्यांच्या डिस्क्रीशनवर हे अवलंबून नाही. It is a mandatory and it shall be paid. असे शब्द आहेत. "shall" या शब्दाचे Interpretation जर अधिकारी बरोबर करीत नसतील तर ते Financial implication होईल. यासंदर्भात वित्त विभागाशी चर्चा करुन जे मुद्दे माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले आहेत आणि जे पैसे सरकारकडून बोर्डाला देय आहेत त्याचे वाटप Regular व्हावयाला पाहिजे याअनुषंगाने मंत्रीमहोदयांनी उत्तर द्यावे.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुद्धीत प्रत / मुद्रणेसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे : महोदय, यामध्ये बंधनकारक, मॅन्डेटरी असा शब्द असतांना सुध्दा वित्त विभागाचे अधिकारी जर त्याचा अर्थ चुकीचा लावत असतील तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही बाब माननीय राज्यमंत्री गृहनिर्माण यांच्या अखत्यारितील बाब नसल्यामुळे कृपया आपण शासनाला तसे निदेश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकणी) : या कलमात जी तरतूद केलेली आहे तिचा तंतोतंत वापर अथवा तिचा उपयोग केला जाईल इन्क्ल्युडिंग फिनान्शिअल इम्प्लीकेशन्स, हे पहावे.

श्री. गणेश नाईक : सभपती महोदय, या तरतुदीमध्ये जी बाब कंपल्सरी सांगितलेली आहे त्यासंदर्भात वित्त विभागाला कळविण्यात येईल.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, गेल्या पाच सहा वर्षात हा प्रश्न सभागृहात या ना त्या रुपाने उपस्थित होत आहे व त्यावर चर्चा झालेली आहे. कायदयाचे उल्लंघन ज्यांनी केलेले असेल त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यक आहे. ज्यावेळी माननीय गृहनिर्माण मंत्री आश्वासन देतात त्यांची पुर्तता यामुळेच होत नाही.

तालिका सभापती : माननीय कामगार मंत्र्यांनी यासंदर्भात वित्त विभागाला तसे कळविण्यात येईल असे उत्तर दिलेले आहे.

श्री. दयानंद मस्के : महोदय, माननीय सदस्यांनी आपले विधेयक मागे घ्यावे अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, शासनाच्या वतीने जे आश्वासन दिले त्यामुळे माझे समाधान झाले तसेच आपण देखील न्याय भूमिका घेऊन शासनाला यासंदर्भात आदेश दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो व हे विधेयक मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने विधेयक मागे घ्येण्यात आले आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक.

L.C.BILL NO.II OF 2005

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.)

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्र. 2 - महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

महोदय, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, 1994 च्या कलम 25 अन्वये सिनेटची रचना झालेली आहे आणि त्यामध्ये 25 (पी) कलमात 20 क्षिक प्रतिनिधी निवडणुकीद्वारे निवडून येतील अशी तरतूद आहे. या संपूर्ण प्रक्रियेत या कलमात नमूद केलेल्या विद्याशाखानिहाय जागा व मतदान अशी सध्याची तरतूद आहे. विद्यापीठाच्या ज्या 7 फॅकल्टीज आहेत त्यापैकी जे रिझर्वेशन्स आहेत त्यामध्ये तीन महिला, दोन एस.सी./एस.टी./ओबीसी/ अथवा व्हीजेएनटी अशा प्रकारे रोटेशनवाईज रिझर्वेशन्स नुसार मतदान होते. पण या मतदानामध्ये अंध पध्दतीने ब्लाइंड व्होटिंग होऊन कुठल्याही फॅकल्टीला व्यवस्थित न्याय मिळत नाही. वेगवेगळया संस्था आपले पॅनल्स उभे करतात आणि त्यांच्या माध्यमातून या सात फॅकल्टीजच्या 20 जागांचे उमेदवार उभे केले जातात. परंतु आर्टस फॅकल्टीजमधील जे उमेदवार आहेत त्याला कॉमर्स, सायन्स व बाकीच्या फॅकल्टीजमधील मतदार मतदान करतात त्यामुळे त्या त्या फॅकल्टीजमधील अडचणी इतर फॅकल्टीजमधील उमेदवारांना समजत नाहीत. म्हणून आर्टस, कॉमर्स तसेच इतर ज्या ज्या फॅकल्टीज आहेत त्यांच्यातील मतदारांमधूनच त्या फॅकल्टीजच्या उमेदवारांना निवडून द्यावे, अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी विद्यापीठ क्षेत्राला नवीन दिशा देणारे जे अशासकीय विधेयक आणले आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. विद्यापीठाची रचना फॅकल्टी, डीन, बोर्ड ऑफ स्टडीज,सिनेट, व्हाईस चांसलर, कुलगुरू, कुलसचिव अशापध्दतीची असते. Knowledge and excellence हा विद्यापीठाचा आत्मा आहे. विद्यापीठ क्षेत्रात नॉन एक्स्लन्स लॉबी निवडणुकीमध्ये तयार होते. यासंबंधी मी उदाहरण देऊ इच्छितो. आर्टस् फॅकल्टीमध्ये सायकॉलॉजी, हिंस्ट्री विषय शिकविणाऱ्या प्राध्यापकाची 5-6 वर्षाची सेवा झालेली असते असा प्राध्यापक राजकारण्यांच्या पाठिंब्यावर वर्षानुवर्षे काम करणाऱ्या प्राध्यापकाच्या विरोधात निवडून येतो. परंतु, त्याला त्यातील काहीही माहिती नसते.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एका बाजूला जग गतीने प्रगती करीत आहे. आता आपण स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठाचे विधेयक आणू पाहत आहोत. महोदय, मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये शिक्षण घेतलेले आहे. मी त्या विद्यापीठातील प्रत्येक फॅकल्टीच्या विद्यार्थ्यांशी चर्चा केली. मराठवाडा विद्यापीठातील जर्नालिझम डिपार्टमेंट सोडले तर एकही फॅकल्टी देशातील पहिल्या 100 मध्ये येत नाही. जर्नालिझ ाम विभाग हा देशात पहिल्या पाच मध्ये येतो. मी तेथील विद्यार्थ्यांना या संदर्भातील अडचण विचारली असता त्यांनी सांगितले की, सायन्स विभागातील फिजिक्स विषयात पी.जी. करण्यासाठी विद्यार्थी नाहीत, शिवाय रिसर्च करणारे स्टुडंट सुध्दा नाहीत. महोदय, टेक्नॉलॉजीचा आत्मा असणाऱ्या फिजिक्स विषयामध्ये आज विद्यार्थी नाहीत. तसेच शिकविण्यासाठी फॅकल्टीसुध्दा नाही. याबाबत मी जेव्हा त्यांना विचारले तर, त्यांनी सांगितले की, फिजिक्स विषय शिकण्यासाठी प्रथम फिजिक्स समजून घ्यावे लागते. परंतु फिजिक्स विषय समजून घेणारे प्राध्यापक आणि प्रोफेसर सिनेटमध्ये निवडून येऊ शकले नाहीत. कारण अभ्यास करीत असताना त्यांना इलेक्शनकडे लक्ष देता आले नाही. विभागाचेच काम करण्यामध्ये त्यांचा वेळ गेला. फॅकल्टी डीनला सिलॅबस रेफरंस, पेपर सेट, प्राध्यापक ओरिएंटेशन इ.काम त्यांना असते. मी शासनाला विचारु इच्छितो की, फॅकल्टीचे डीन ज्युनिअर असले, त्यांना अनुभव नसला तर बाकीचे त्याच्या हाताखाली कसे काम करतील ? महोदय, सिनेटची निवडणूक लोकशाही पध्दतीने होणे आवश्यक आहे. कॉमर्स फॅकल्टीचा मतदार सायन्सच्या उमेदवाराला मतदान करतो, सायन्सचा आर्टच्या उमेदवाराला मतदान करतो. असा जो प्रकार आहे तो थांबला पाहिजे. कारण अशा प्रकारे मतदान करण्याची पध्दत चुकीची आहे. त्यामुळे या विधेयकाच्या माध्यमातून ही पध्दत बंद केली पाहिजे अशा प्रकारची मी विनंती करीत आहे.

महोदय, फॅकल्टी डीन यांच्या बाबतीत सिनिऑरिटीचा काही तरी क्रायटेरिया असावयास हवा. तीन सिनीअर मोस्ट पैकी एकास मतदान करा, असा काही क्रायटेरिया असावयास हवा. फॅकल्टी डीन डॉक्टरेट असावा अशी कंडीशन टाकण्यात यावी. कारण फॅकल्टी डीनमधून एक सदस्य मॅनेजमेंट ऑफ कौन्सिलवर जात असतो. त्यामुळे माझी मागणी आहे की, फॅकल्टी डीनच्या निवडणुकांबाबतचे विशेषाधिकार कुलगुरु यांनी वापरले पाहिजे. शासनाने या बाबीकडे वेळीच लक्ष

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी....

दिले नाही तर विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या शिक्षणाचे वाटोळे होऊ शकते.या विधेयकाला पाठिंबा देत असताना मी प्रामुख्याने दोन सूचना करु इच्छितो. मला वाटते यासंदर्भात आपण त्वरेने पावले उचलावयास हवीत. जर या विषयाबाबतचे विधेयक लगेच आणता आले तर बरे होईल. विद्यापीठांत फॅकल्टी डीनची निवडणूक घेण्याची पध्दत सुरु करण्याबाबत काही करता आले तर तेही करावे. परंतु आज जगामध्ये जे स्थित्यंतर झालेले आहे त्याचा विचार करता, सिनेटच्या आणि ॲकॅडेमिक कौन्सिलच्या बैठका दर महिन्याला होणे आवश्यक आहे.

महोदय, मी एका गंभीर बाबीकडे आपले आणि सदनाचे लक्ष वेधू इच्छितो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या एस.एफ.आर. च्या विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाला कुलूप ठोकले. यु.जी.सी. ने ठरवून दिलेले सिलॅबस आम्हाला पुस्तकामध्ये दाखवून द्या आणि ती पुस्तके उपलब्ध करुन द्या अशा प्रकारची त्यांची मागणी होती. महोदय, मी या संदर्भात ज्यावेळी विद्यापीठाच्या कुलगुरुंना भेटलो त्यावेळी त्यांनी मला असे सांगितले की, ही पुस्तके आमच्याकडे नाहीत ही गोष्ट खरी आहे. आम्ही यु.सी.जी.च्या अभ्यासक्रमाचा समावेश केला हे जरी खरे असले तरी, मात्र ती पुस्तके घेण्याचे विसरलो आहोत.

नंतर श्री.व्ही.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रारंभीची नाही

श्री. श्रीकांत जोशी...

आता आम्ही काय करीत आहोत, तर त्यांना नोटस् देऊन त्यांच्याकडून अभ्यास करुन घेतो. विद्यार्थ्यांना पास करण्याबाबत अशा पध्दतीने व्यवस्था करण्यात येत आहे. असे प्रकार जर झाले तर आपण अशा विद्यार्थ्यांना नोकऱ्या कशा देणार ? जागतिक स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना टिकण्यासाठी चांगली लायब्ररी पाहिजे, ग्रंथालय पाहिजे, असे नसेल तर विद्यार्थ्यांनी फक्त पास व्हावे पण त्यांच्या डोक्यात काही नाही. म्हणून यासंदर्भात काय सुधारणा करता येईल याबबात मंत्रीमहोदयांनी विशेष अशी दक्षता घ्यावी आणि सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांजी जे बील मांडले त्याला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक आणले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनिमय, 1994 च्या कलम 25 अन्वये अधिसभेची संरचना विशद करण्यात आलेली आहे. त्यामध्ये 25 (पी) कलमामध्ये 20 शिक्षक प्रतिनिधी निवडणुकीद्वारा सिनेटमध्ये निवडून येतील, असे म्हटले आहे. वेगवेगळया विधी शाखांमधील प्राध्यापकांनी सर्व विधी शाखेतील उमेदवारांनाच मतदान करावे ही सूचना योग्य अशी आहे. म्हणून मी सन्माननीय सदस्य यांचे अभिनंदन करतो. कोणत्याही विधी शाखेच्या निवडणुका झाल्यानंतर त्या सामाईक पध्दतीने मतदान करावे लागत असे, त्यामध्ये त्या सदस्यांना कोणी ओळखत सुध्दा नसे, ज्याप्रमाणे विधानपरिषदेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाचे प्रतिनिधी हे त्या-त्या विभागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून येतात व पदवीधर मतदार संधातील प्रतिनिधी त्या-त्या पदवीधर मतदारसंघातून निवडून येतात त्या प्रमाणे त्या विधी शाखेतील सिनेट सदस्य हे त्या शाखेमधूनच निवडून येणे आवश्यक आहे अशी सूचना केलेली आहे. यासंदर्भातील ज्या त्रुटी आहेत त्या दूर करुन प्रत्येक विधी शाखेमध्ये निश्चितपणे त्या-त्या विषयाचे प्राध्यापक सिनेट सदस्य म्हणून निवडून येतील. सन्माननीय सदस्य श्री. जोशी यांनी एक्सलन्सचा मुद्दा उपस्थित केला, एक्सलन्स हे वेगवेगळया प्रकारचे असण्याची गरज आहे. एक्सलन्स प्राध्यापक निवडून गेले पाहिजेत. विद्याशाखानिहाय जागा व मतदान मात्र एकत्रित हा अंध मतदानाचा प्रकार आहे. या प्रकारामुळे एखादी संघटना मतदारांना अंध मतदान करण्यास सक्ती करुन संघटनेचा उमेदवार उभा करते, त्या माध्यमातून सर्वांना आदेश दिले जातात, निवडून आणले जाते ही पध्दत बंद झाली पाहिजे. सगळया विधीशाखानिहाय प्रस्ताव करुन निश्चितपणे त्या त्या शाखेतील एक्सलन्सची निवड करुन कार्यक्षमता वाढविण्यास मदत होईल. याचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. तो शासनाने जरुर करावा. ही जी दुरुस्ती आणलेली आहे ती लवकरात लवकर मंजूर करावी. यामुळे निश्चितपणे विधी शाखेला न्याय मिळेल असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

.....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांचे मी अभिनंदन करतो. या अधिवेशनामध्ये पहिल्यांदा सन्माननीय सदस्यांनी एक चांगला विषय चर्चेसाठी मांडलेला आहे. आपण पाहत आहात की, सभागृहामध्ये फक्त, वेतन, भत्ते,प्रमोशन यासंदर्भातच या कायद्याची चर्चा होत असते. पहिल्यांदा सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो अत्यंत महत्वाचा असा आहे. या बिलाच्या संदर्भात सेक्शन 25 (पी) मध्ये दुरुस्ती करण्याबाबतचा तो आहे.

यानंतर श्री. सांगळे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी आताच आपल्या भाषणामध्ये सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी मंत्रिमहोदयाच्या खात्याच्या संदर्भात ऍकेडॅमिक चर्चा केल्याचा उल्लेख केला होता. मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, या सदनामध्ये इतर वेळी जे कामकाज केले जाते त्याला काही महत्वच नाही असा आपल्या बोलण्याचा अर्थ होतो. ही बाब बरोबर नाही. या संदर्भात कालच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या सदनाची ग्रॅव्हिटी सांगितली आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माझ्या म्हणण्याचा तसा उद्देश नव्हता. सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी या महाराष्ट्र विद्यापीठ विधेयकाच्या माध्यमातून उपस्थित केलेल्या मुद्दांच्या संदर्भात मी उल्लेख केला होता. सभापती महोदय, या ठिकाणी आपण ग्लोबलायझेशनबद्दल चर्चा करीत आहोत. सध्या शिक्षण क्षेत्रामध्ये अतिशय बदल होत आहेत. आता आपल्या देशात डीम्ड युनिव्हर्सिटी, सेल्फ फायनान्स युनिव्हर्सिटी, फॉरेन युनिव्हर्सिटीज येत आहेत. तसेच सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, या संदर्भात शासनाने पावले उचलली आहेत. दि.17/2/2005 रोजी राज्य शासनाने डॉ.विजय कोल्हे, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीमध्ये आठ सदस्य होते. त्यापैकी काही सदस्य खाजगी संस्थेत प्राध्यापक होते, काही सदस्य विद्यापीठाचे उपकुलगुरु होते. महाराष्ट्र युनिव्हर्सिटीज ॲक्ट, 1995 च्या बाबतीत समितीने मुंबई, पुणे व नागपूर या ठिकाणी असलेल्या विद्यार्थी संघटनेला, शिक्षक संघटनेला, विद्यापीठाचे जे अधिकारी, प्राध्यापक शिक्षण क्षेत्रामध्ये रुची ठेवतात अशा लोकांना भेटी देऊन नोव्हेंबर, 2005 मध्ये त्याबाबतचा सार्वत्रिक रिपोर्ट शासनाला सादर केला. त्या रिपोर्टमधील सेक्शन 27 (2) (3) या मुद्दांवर आधारित सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी हे विधेयक सादर केले याबद्दल मला आनंद होत आहे. ते मुद्दे मी आपल्याला वाचून दाखवतो. "twenty teachers of which 3 shall be womens and two shall be persons belonging to the Scheduled Castes or Scheduled Tribes or Denotified Tribes(Vimukta Jatis)/Nomadic Tribes or Other Backward Class, by rotation, having teaching experience of not less than five years other than Heads of University Departments or

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी ....

University Institutions or Principals or Heads of recognised institutions elected by the teachers from amongst themselves, these seats being allotted faculty wise proportionately but voting to be in common;.."तसेच एक्झिस्टींग प्रोव्हीजनच्या बाबतीत शेवटच्या ओळीमध्ये अशा सूचना केल्या की, "and shall be elected by the teachers of the concerned faculty" या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या मुद्दांचा या ठिकाणी उल्लेख केला आहे. त्याच प्रकारचा रिपोर्ट डॉ.विजय कोल्हे यांनी शासनाकडे सादर केलेला आहे.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी तो रिपोर्ट सभागृहाच्या पटलावर ठेवावा.

तालिका सभापती : सभागृहाची सकाळच्या सत्राची बैठक दुपारी 12.30 वाजेपर्यंत होती. या बैठकीसाठी मी दहा मिनिटांचा वेळ वाढवित आहे.

श्री.सुरेश शेट्टी : रिपोर्ट सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. सभापती महोदय, हा रिपोर्ट सादर झाल्यानंतर आमच्या खात्याच्या प्रधान सचिवांनी मंत्रालयामध्ये दोन बैठका घेतलेल्या आहेत. या बैठकीला राज्याचे सर्व विद्यापीठांचे कुलगुरु उपस्थित होते.त्या बैठकीमध्ये .....

यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .....

या संबंधात चर्चा झाली आणि मला वाटते की, आम्ही ही बाब गांभीर्यानेच घेत आहोत आणि या बरोबरच या ॲक्टमध्ये आणखी दुसऱ्याही काही सुधारणा या समितीने सुचविलेल्या आहेत त्याही यामध्ये समाविष्ट करून मला वाटते पुढील अधिवेशनामध्ये एक कन्सॉलिडेटेड विधेयक या सभागृहात आम्ही घेऊन येत आहोत. तेव्हा सन्माननीय सदस्यांना मी विनंती करीन की, आपण या ठिकाणी ज्या हेतूने हे विधेयक आणले आहे त्याबाबतीत माझ्या या खुलाशानंतर आपले समाधान झाले असेल. तरी आपण हे विधेयक मागे घ्यावे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, मी आणलेल्या अशासकीय विधेयकावर सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री श्री.सुरेश शेट्टी यांनी आता आश्वासन दिले आहे की, डॉ.विजय कोल्हे समितीने दिलेल्या अहवालाचा गांभीर्याने विचार करून, त्यातील शिफारशींच्या आधारे पुढील अधिवेशनामध्ये या संबंधात एक विधेयक आणले जाईल. तेव्हा त्यांच्या या आश्वासनाने मी संतुष्ट असून, मी आणलेल्या या विधेयकाला सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे, श्री.श्रीकांत जोशी आणि इतरही सदस्यांनी जो पाठिंबा दिला आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानून, मी हे विधेयक मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने विधेयक मागे घेण्यात आले.

<u>आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील अशासकीय विधेयकांबाबत</u> .....

तालिका सभापती (श्री.गुरूनाथ कुलकर्णी) : सकाळी सभागृहाच्या या विशेष बैठकीमध्ये अशासकीय कामकाजामध्ये पुर:स्थापनार्थ काही विधेयके होती. त्या संदर्भात मला सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कळविले की, सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांची दोन विधेयके पुर:स्थापनार्थ आहेत आणि काही अडचणीमुळे ते आता उपस्थित राहू शकणार नाहीत, तरी ती विधेयके नंतर पुर:स्थापनार्थ घेण्यात यावीत. तसेच सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी देखील मला नोट पाठवून तशी विनंती केली आहे. त्यांची ही विनंती मी मान्य केली आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.तरे आता उपस्थित झाले असल्याने मी त्यांना त्यांची अशासकीय विधेयके पुर:स्थापनार्थ मांडण्यास परवानगी देत आहे.

..... इइ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अन्न भेसळ प्रतिबंध (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. VIII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE PREVENTION OF FOOD ADULTERATION ACT, 1954, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.अनंत तरे (रायगड,रत्नागिरी,सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 8 - अन्न भेसळ प्रतिबंध अधिनियम 1954 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 8 मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

***

(यानंतर श्री. सरफरे ..... 2एफ 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. IX OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI PROVINCIAL MUNICIPAL CORPORATION ACT, 1949.)

श्री. अनंत तरे (रायगड,रत्नागिरी,सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, स□2006 चे वि.प.वि. □मां□ 9 मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 यात आणखी सुधारणा करण्याकरीता विधेयक मांड□यासाठी मी सभा□हाची अ□मती मा□तो.

प्रश□मतास टा□□संमत झाला.

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : अ□मती दे□यात आली आहे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, मी आपल्या अ□मती□स□2006 चे वि.प.वि. □मां□ 9 मांडतो.

तालिका सभापती : विधेय□ मांड□यात आले आहे.

आता सभागृहाची बैठक स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक दुपारी ठीक 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.36 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

... ...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी. व मु.शी. : तोंडी उत्तरे.

सभापती : तारांकित प्रश्न क्रमांक 12803.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी फक्त आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची नावे वाचतो.

सभापती : कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

--

ठाणे महापालिका क्षेत्रातील डायघर येथे घनकचऱ्यापासुन

विज निर्मीती करणाऱ्या प्रकल्पाबाबत

(1) * 12803 श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. राजेंद्र जैन , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्री. सदाशिवराव पोळ , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. वसंतराव चव्हाण , डॉ. वसंत पवार : तारांकित प्रश्न क्रमांक 11013 ला दिनांक 14 डिसेंबर, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे महापालिका क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनासाठी डायघर येथील 45 एकर भुखंडावर घनकचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्पासाठी मे.एन्व्हायरोसिस इंटरनॅशनल प्रा.लि. या कंपनीने सादर केलेल्या ड्राफ्ट ॲग्रीमेंटची करण्यात येत असलेली तपासणी पूर्ण झाली आहे काय,

(2) असल्यास, तपासणीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) उक्त प्रश्न भाग (1) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच याप्रकरणी करण्यात येत असलेली कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण व्हावी यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता : (1) नाही.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) कंपनीने सादर केलेले ड्राफ्ट ॲग्रीमेंट व इतर कागदपत्रांच्या अनुषंगाने विधी सल्लागार यांचा सल्ला घेऊन पुढील कार्यवाही ठाणे महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ SBT/ MAP/

ता.प्र.क्र.12803 (पुढे सुरु....

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, अनेक वेळा ठाणे महापालिका क्षेत्रातील घन कचऱ्यापसून वीज निर्मिती प्रकल्पाची घोषणा आम्ही ऐकतो आहोत. साधारणत: हा प्रकल्प केव्हापर्यन्त पूर्ण होईल. यासाठी महानगरपालिका जमीन केव्हा ताब्यात घेणार आहे ? अधिकाऱ्यांनी रस्ता अडविलेला आहे तो केव्हा मोकळा होईल तसेच हा प्रकल्प केव्हा मार्गी लागेल ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मे.एनवहायरोसिस इंटरनॅशनल प्रा.लि. या संस्थेला महानगरपालिकेने लेटर ऑफ इंटेन्ट दिलेले होते. त्यांची प्रूव्ह टेक्नॉलॉजी नाही किंवा पेटंट वापरण्याची त्यांच्याकडे परवानगी उपलब्ध नाही अशा स्वरुपाच्या काही तांत्रिक बाबी महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्या. न्यायालयाने कमिटी नेमली. त्यामध्ये ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांचा सल्ला आणि त्यांची असलेली टेक्नॉलॉजी आपल्या देशात कोठेही उपलब्ध नसल्यामुळे या प्रस्तावाला थोडे थांबविण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आला. त्या ठिकाणच्या घन कचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावावी या दृष्टीने 20 हेक्टर जमिनीवर आज उपलब्ध झालेली आहे त्यापैकी 10 हेक्टर जमिनीवर कंपोस्ट खत तयार करण्याचे काम हँगर बायोटेक प्रा.लिमिटेड यांच्याकडून सुरु केलेले आहे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, अत्यंत गंभीर असा प्रश्न आहे. ठाणे महानगरपिलकेने यापूर्वी देखील अशा प्रकारच्या वीज निर्मितीचा प्रकल्पासाठी एका कंपनीबरोबर कॉन्ट्रॅक्ट केलेले होते. त्यासाठी 18 एकर जमीन देखील महापालिकेने उपलब्ध करुन दिलेली होती परंतु तो प्रकल्प बंद पडलेला आहे. आज ठाणे शहरात कचरा टाकण्यासाठी जागा नाही. प्रश्न असा आहे की, घन कचऱ्यापासून वीज निर्माण करण्याचा प्रकल्प प्रलंबित आहे. ठाण्यातील घन कचरा टाकण्यासाठी डंपिंग ग्राऊंड नाही, त्याबाबतची व्यवस्था शासन करेल काय ?

श्री.राजेश टोपे : मी पहिल्यांदाच उतर दिलेले आहे. ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रामधील कळवा येथील कोलशेत-खारेगाव येथील जागा उपलब्ध होईल. डायघर येथील 19 हेक्टरचे क्षेत्र संपादन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. डायघर येथील 19 हेक्टरपैकी 10 हेक्टर जागेवर हँगर बायोटेक प्रा.लिमिटेड ही कंपनी कंपोस्ट खत, सिमेंट फॅक्टरीसाठी फ्युवेल तसेच वीटा तयार करण्याचे काम होणार आहे. तसे लेटर ऑफ इंटेन्ट साईन झालेली आहे 20 टक्के जागेवर लॅन्ड फिलींग करण्यात येणार आहे. यासाठी त्यांना जमीन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता. प्र. क्र. 12803.....

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, खत प्रकल्पाच्या माध्यमातून कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने एक तारीख ठरवून दिलेली होती तसेच यासंदर्भात ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांनी सुध्दा महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका आणि 40 "अ" वर्ग नगरपालिकांमध्ये सुध्दा खत प्रकल्पाच्या माध्यमातून कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या संदर्भात सूचना दिल्या होत्या. त्याची अंतिम तारीख ठरविण्यात आली होती. राज्य शासनाने ती तारीख वेळोवेळी संधी देऊन वाढविली. सन 2002 पासून नंतर 2004 पर्यंत तारीख वाढविली. त्या तारखेमध्ये कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी ज्या महानगरपालिकने खत प्रकल्प उभा केला नाही त्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. आपल्याकडे घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम2000 अस्तित्वात आहे. त्याअनुषंगाने नगरपालिका असेल, महानगरपालिका असेल त्यांनी त्यांच्या घनकचऱ्याची विल्हेवाट शास्त्रीय पध्दतीने लावावी अशी तरतूद आहे. आपल्या राज्याचा जो पर्यावरण विभाग आहे त्यांच्या वतीने याबाबतची कार्यवाही करण्यात येते. त्यांच्याकडून प्रत्येक नगरपालिकेला, महानगरपालिकेला नोटिस देऊन घनकचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावणे अशा पध्दतीची कार्यवाही केली जाते. बी.ओ.टी. तत्वावर अशा पध्दतीचे प्रोजेक्टस् पुढे येत आहेत. अनेक ठिकाणी असा प्रोजेक्ट एका नगरपालिकेला परवडत नाही. एका नगरपालिकेच्या माध्यमातून निघणाऱ्या घनकचऱ्यावर अशा पध्दतीचे प्रोजेक्टस् फिजिबल किंवा व्हायेबल होत नाही म्हणून कधी कधी दोन, तीन, चार नगरपालिका एकत्र येऊन तशा पध्दतीचा प्रकल्प करता येऊ शकतो किंवा छोट्या स्तरावरील महानगरपालिका असेल तर अशा एक दोन महानगरपालिका एकत्र येऊन असा प्रकल्प होऊ शकतो. त्यामुळे व्हायेबिलिटी आणि सर्व गोष्टी तपासून नगरविकास विभागाच्या माध्यमातून या सगळ्या गोष्टी अधिक तत्परतेने व्हावयास पाहिजे अशा सूचना निशितपणे देण्यात येतील.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील धनकचऱ्याच्या संदर्भात मे. एन्व्हायरोसिस इंटरनॅशनल प्रा.लि. या कंपनीने सादर केलेले ड्राफ्ट ॲग्रीमेंट व इतर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कागदपत्रांच्या अनुषंगाने विधी सल्लागार यांचा सल्ला घेऊन पुढील कार्यवाही ठाणे महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे असे उत्तरामध्ये म्हटले आहे. हे ॲग्रीमेंट या कंपनीसोबत होणार आहे काय ? यामध्ये ज्या तांत्रिक बाबी सांगितलेल्या आहेत त्याच्या संदर्भात केव्हा पूर्तता होणार आहे ? 45 एकराचा भूखंड या कंपनीला देण्यात आला आहे काय ? जर देण्यात आला असेल तर त्या भूखंडावर प्रकल्प का उभा झाला नाही ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी सुरुवातीच्या प्रश्नाच्या उत्तरात सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाची एक कमिटी आणि ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांच्या माध्यमातून ठाण्याचा जो घनकचरा उपलब्ध आहे त्यामध्ये कॅलरिक व्हॅल्यू तेवढी उपलब्ध होत नसल्याने 7 ते 10 मेगावॅट वीज निर्मितीचा प्रकल्प त्या ठिकाणी होऊ शकत नाही असा तांत्रिक सल्ला मिळालेला आहे. त्याचबरोबर यासाठी जी काही टेक्नॉलॉजी वापरली जाते तसेच त्या कंपनीकडे जे पेटंट उपलब्ध आहे ते पेटंट वापरण्याची तारीख संपलेली आहे. अमेरिकेच्या कंपनीने त्यांना एका वर्षासाठी पेटंट वापरण्याची संधी उपलब्ध करुन दिली होती. आता त्यांच्याकडे या दोन्ही गोष्टी नसल्यामुळे तसेच देशामध्ये ही टेक्नॉलॉजी प्रूव्हड झालेली नसल्यामुळे हा प्रस्ताव थांबविण्याचे काम महानगरपालिकेने केलेले आहे. परंतु जी 20 हेक्टर जमीन संपादन करण्याचे काम झालेले होते त्यापैकी 10 हेक्टर जमीनीमध्ये हँगर बायोटेक प्रा.लि. या कंपनीकडून शास्त्रीय पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे काम केले जाते.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय म्हणतात त्याप्रमाणे त्या कचऱ्यापासून वीज निर्मिती होणे कठीण आहे. कारण आपल्याकडे ज्या प्रकारचे आरगॅनिक मॅन्युअल मिळावयास पाहिजे ते मिळत नाहीत. या कचऱ्यामध्ये दगड, माती असल्यामुळे त्याची कॅलरिक व्हॅल्यू कमी आहे. नाशिक महानगरपालिकेने यासंदर्भात यशस्वी प्रयोग करुन बायोकंपोस्ट करुन त्या ठिकाणी खत उपलब्ध होत आहे. काही लोक बी.ओ.टी. तत्वावर हे काम करण्यास तयार आहे. त्या ठिकाणी वीज निर्मिती करणे शक्य नाही. आपल्याला यासंदर्भात जो तांत्रिक सल्ला मिळाला त्याप्रमाणे वीज निर्मिती करणे शक्य नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नगरपालिका, महानगरपालिका यांनी या गोष्टी कराव्यात यासाठी त्यांना मागदर्शन आणि आर्थिक मदत करण्याची आवश्यकता आहे. हे केले तर राज्यातील सर्व घनकच-याचा प्रश्न सुटून त्यापासून उत्पन्न आणि रोजगार मिळेल. यादृष्टीने शासनाने एक विशेष भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. तेव्हा याबाबतीत अभ्यास करुन महाराष्ट्रातील सर्व नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये ऑर्ग्यानीक खत तयार करण्याचे प्रकल्प होण्याच्या दृष्टीने शासन काही धोरण आखणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : एमआयडीसी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नगरविकास विभाग यांच्या माध्यमातून जो निधी उभा केला जातो त्यामध्येदेखील 50 टक्के निधी हा पर्यावरणासाठी खर्च करावा अशा प्रकारची तरतूद नियमामध्ये करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ तसेच एमआयडीसी यांच्या नियमामध्ये देखील तशी तरतूद आहे. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जी सूचना केली त्याचा शासन निश्चितपणे विचार करील.

श्री.जितेंद्र आव्हाड : ठाण्यामध्ये अशा प्रकारचे किती प्रोजेक्ट येण्याची शक्यत आहे? प्रोजेक्टच्या संदर्भात एलओआयची प्रोव्हीजन आहे किंवा टेंडर बोलाविण्याची प्रोव्हिजन आहे. तसे टेंडर बोलावले होते काय ? टेंडर न बोलावता ॲग्रीमेंट केले असेल तर ते कायद्याला धरुन आहे काय ?

श्री. राजेश टोपे : मे. एन्व्हायरोसिस इंटरनॅशनल प्रा.लि.या कंपनीच्या संदर्भात जो एल.ओ.आय. झाला होता त्यावेळी एकूण 5 प्रस्ताव आले होते. त्यावेळी सर्व तांत्रिक बाबींचा अभ्यास करुन एल.ओ.आय. केलेला आहे. तसेच 5 प्रस्तावातील मधील दोन प्रस्तावांची तांत्रिक आणि आर्थिक बाबींचे निकष लक्षात घेऊन निवड करण्यात आलेली आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : या प्रकल्पामधून वीज निर्मिती होऊ शकेल काय असा माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. तेव्हा घनकच-याची व्यवस्था करण्यासाठी शासनाने कोणती उपायोजना केलेली आहे ? यासंदर्भात कोणत्या कंपनीला कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे ? या कामाला कधी सुरुवात होणार आहे ? त्याठिकाणी आता कचरा टाकायला जागा नाही. ठाण्यातील लोक त्या कच-यामुळे हैराण झालेले आहेत. यासंदर्भात शासनाने आणखी कोणत्या कंपनीशी ॲग्रीमेंट केलेले आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 12803....)

श्री. राजेश टोपे : यासंदर्भात मी उत्तर दिलेले आहे. जे पहिले प्रपोझल होते त्यामध्ये 7 ते 10 मे.वॅ.वीज निर्मिती करण्याचा विषय होता. परंतु त्याठिकाणी कॅलरिक व्हॅल्यू उपलब्ध नाही. पूर्वीचा प्रस्ताव थांबवून आता हँगर बायोटेक प्रा.लि.च्या माध्यमातून एल.ओ.आय. करयात येत आहे. ठाणे शहरातील घनकच-याचे व्यवस्थापन व्हावे यादृष्टीने शासनाच्यावतीने पावले उचलली जातील.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नागपूरातील श्री रेणूका देवी संस्थान, हिंगणा रोड, नागपूर या संस्थानच्या विकासासाठी विशेष कृती आराखडा तयार करण्याबाबत

(२) * १३६०६ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.सागर मेघे , श्री. जगदिश गुप्ता : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरातील सुप्रसिध्द श्री रेणूका देवी संस्थान हिंगणा रोड, येथील संस्थानास जिल्हा नियोजन विकास मंडळ, नागपूर च्या समितीने 'क' वर्ग तिर्थक्षेत्र म्हणून मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मंदिर हे नागरी क्षेत्रात येत असून या मंदिरामध्ये दररोज हजारो भाविक दर्शनास येत असल्याने या मंदीराच्या विकासाकरीता विशेष कृति आराखडा तयार करण्याची सुरु असलेली कारवाई पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, या भागातील विदर्भातील व मराठवाड्यातील अनेकांचे कुलदैवत असलेल्या श्री रेणूका मंदिर परिसरात विकास कामे करण्याकरीता शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली आहे वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१) होय.

(२), (३) व (४) जिल्हास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

श्री. नितीन गडकरी : श्री रेणुका देवी संस्थान हिंगणा रोड, येथील संस्थानास जिल्हा नियोजन विकास मंडळ, नागपूरच्या समितीने "क" वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून मान्यता दिलेली आहे. कार्यकारी अभियंत्यांना आराखडा तयार करण्यास सांगितलेले आहे. हा आराखडा त्यांनी तयार केलेला आहे काय ? "क" वर्ग तीर्थक्षेत्रासाठी 50 लाख रुपये मंजूर केलेले आहेत. त्यातील कमीत कमी 1012 लाख रु. तरी या वर्षी मंजूर करण्यात येतील काय ?

...नंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13606 पुढे सुरु ...

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, रेणुका देवी संस्थान,हिंगणा रोड,नागपूर या देवस्थानाची "क" वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून निवड करण्यात आलेली आहे. तीर्थक्षेत्र म्हणून निवड झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाला या क्षेत्राचा विकास करण्यासाठी प्लॅन आणि एस्टीमेट तयार करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचे काम सुरु आहे. येत्या 15 दिवसांच्या आत बांधकाम विभागाकडून प्लॅन आणि एस्टीमेट तयार करुन घेण्यात येतील. ही जिल्हा योजना असल्यामुळे 50 लाख रुपयांची तरतूद यावर्षी नागपूर जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेली आहे. त्यापैकी 10 लाख रुपये निश्चित प्रकारे देण्यात येतील.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, उत्तरामध्ये सांगण्यात आले आहे की,जिल्हा स्तरावर कार्यवाही सुरु आहे. माझा प्रश्न असा आहे की, ही कार्यवाही केव्हापासून सुरु करण्यात आली आणि त्याची सद्यस्थिती काय आहे ? सदरहू कार्यवाही केव्हा पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या संस्थानाची "क" वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून 24.8.2004 रोजी निवड करण्यात आली. त्यानंतर बांधकाम विभागाला प्लॅन आणि एस्टीमेट तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. कार्यवाही सुरु आहे. येत्या 15 दिवसांच्या आत ही कार्यवाही पूर्ण केली जाईल. यावर्षीच्या उपलब्ध निधीमधून निश्चितपणाने पैसे उपलब्ध करुन देण्यात येतील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना सांगितले की, यावर्षी 10 लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला जाईल. माझा प्रश्न असा आहे की हा निधी संबंधित विभागाला किती दिवसात देणार आहात ? यानंतर पुढे थोडयाच दिवसात नवरात्र येत आहे. नवरात्रीच्या आधी या तीर्थक्षेत्राच्या विकासाची कामे पूर्ण करण्यात येतील काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, नवरात्रीच्या अगोदर या तीर्थक्षेत्राच्या विकासाची सर्व कामे पूर्ण केली जातील.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, तीर्थक्षेत्राच्या विकासाची कामे नवरात्रीपूर्वी पूर्ण होतील असे मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे. या तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी किती निधी लागणार आहे ? त्यापैकी किती निधी यावर्षी उपलब्ध करुन दिला जाणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी पूर्वीच सांगितले आहे की तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी बांधकाम विभागाकडून प्लॅन आणि एस्टीमेट तयार करुन घेण्यात येत आहेत.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13606 पुढे सुरु ...

श्री. राजेश टोपे ...

यावर्षी नागपूर जिल्हा नियोजन समितीकडून 50 लाख रुपयांची तरतूद या कामासाठी करण्यात आली आहे. निश्चितपणाने प्राधान्याने या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भाईंदर (प.) येथील सर्व्हे नं. ३४३/७ या जागेवर विकासकांनी अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

(३) * १२९९० प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर पश्चिम (जिल्हा ठाणे) सर्व्हे नं. ३४३/७ यामधील सुर्यकांत हरगोविंदा शाहा व इतर या जागेवर विकासकांनी एकूण तीन टॉवरच्या तळमजल्यावरील मोकळ्या जागेमध्ये अनधिकृतपणे विकासकांनी बांधकाम करुन सदनिकाधारक सोसायटी यांची लाखो रुपयांची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबतच्या तक्रारी मा.आयुक्त मीरा-भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे स्थानिक नगरसेवकानी दिनांक ४ फेब्रुवारी, २००६ वा त्या दरम्यान केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन आयुक्त श्री. आर.डी.शिंदे व बिल्डर विकासक श्री. भीमराव चव्हाण व आर्किटेक्ट श्री. डी.एन.पटेल यांच्या संगनमताने याच जागेतील सार्वजनिक बाजाराचे आरक्षण क्र.६८ वगळण्यामध्ये आर्थिक गैरव्यवहार करुन मीरा भाईंदर महानगरपालिकेची व नागरिकांची घोर फसवणूक केलेली आहे हे खरे आहे काय ?

श्री. राजेश टोपे , श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता : महानगरपालिकेच्या अहवालानुसार :-

(१)सर्व्हेक्र.३४३(नविन) ७ (जुना) या जागेवरील इमारत क्र.१ मध्ये विकासकाने अनधिकृत बांधकाम केले होते. सदर बांधकाम दि. १६-३-०६ रोजी तोडण्यात आले आहे.

(२) व (३) नगरसेवक, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी दि. ४-२-२००६ रोजी भाईंदर (पश्चिम) सर्वे क्र. ३४३/७ या जागेतील आरक्षण कमी करुन बेकायदेशीर परवानग्या दिल्याबाबत आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे तक्रार केली आहे. तथापि, सुर्यकांत हरगोविंद शहा व इतर विकासकांच्या सर्व्हे क्र.३४३ (नविन) ७ (जुना) या जागेवरील बांधकाम प्रस्तावास तत्कालीन आयुक्त यांनी त्यांना मिरा-भाईंदर शहरासाठीच्या विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम १० (४) व विनियम २१(५) नुसार असलेल्या अधिकारांचा वापर करुन आरक्षणाचे क्षेत्र कायम ठेवून, या जागेसाठी पोहोच रस्ता मंजूर करुन दि.२१-२-२००३ रोजी बांधकाम परवानगी दिली आहे. या जागेतील क्र.६८ चे सार्वजनिक बाजाराचे आरक्षण वगळण्यात आलेले नाही.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय,उत्तरात म्हटले आहे की, मिरा-भाईंदर शहरासाठीच्या विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम १०(४) व विनियम २१(५) अनुसार असलेल्या अधिकारांचा वापर करुन आरक्षणाचे क्षेत्र कायम ठेवून या जागेसाठी पोहोच रस्ता मंजूर करुन दि. २१.३.०३ रोजी बांधकाम परवानगी दिली आहे. जागेतील क्र.६८ चे सार्वजनिक बाजाराचे आरक्षण वगळण्यात आलेले नाही. माझा प्रश्न असा आहे की, पोच रस्ता मंजूर करण्यापूर्वी सार्वजनिक बाजारासाठी आरक्षित असलेली जमीन जमीन मालकांकडून आपल्या ताब्यात आयुक्तांनी का घेतली नाही ? खाजगी मालकाची जागा आहे ती अद्याप मिरा-भाईंदर महानगरपालिकेने ताब्यात का घेतली नाही ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, डीसी रुलमधील कलम २१(५) अनुसार " In case of plots surrounded by all sites of other plots.." लॅन्ड लॉर्डचा प्लॉट असला तरी रस्ता उपलब्ध करुन देण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुद्धीकरण प्रत / अशुद्धीकरणाशी संबंधित नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12990 ..... श्री. राजेश टोपे .....

त्या अधिकाराचा वापर करुन जो बगीचा अथवा मार्केट प्लेसच्या समोरच्या बाजूला आणि त्याच्या आतल्या बाजूस असलेली जागा लॅंडलॉक झाली होती त्या जागेसाठी रस्ता उपलब्ध करुन देण्यासाठी जेवढी जागा लागली तेवढी जागा कुठल्याही प्रकारे आरक्षण न करता, आरक्षणाची बॉन्ड्री त्याच जागेवर बदलण्याचे अधिकार कलम 10 (4) प्रमाणे मुख्याधिकाऱ्यांना आहेत. म्हणून या 10 (4) आणि 21 (5) चा वापर करुन आयुक्तांनी हे आरक्षण कुठल्याही प्रकारे बदललेले नाही.

डॉ. अशोक मोडक : माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्याकडे प्रथम त्यांचे लक्ष वेधून नंतर मूळ प्रनाकडे मी वळणार आहे. मुळात मीरा भाईंदर नगरपालिकेच्या नगरसेवकांनी 4 फेब्रुवारी रोजी तक्रार केलेली आहे आणि ज्या सर्व्हे नंबरविषयी ही तक्रार आहे त्यासंबंधी आपण म्हणालात की, 16 मार्चला हे बांधकाम पाडले आहे. याचा अर्थ 21 फेब्रुवारीला यासंबंधीची संपूर्ण कागदपत्रे माननीय आयुक्तांच्या नजरेत आली होती. मग 21 तारखेलाच हे बांधकाम पाडण्याचा निर्णय का घेतला नाही ?

श्री. राजेश टोपे : जे अनधिकृत बांधकाम होते ते परवानगी दिल्यानंतर झालेले आहे, त्यामुळे बांधकामाची तक्रार आल्यानंतर माहिती घेतली असता त्या ठिकाणी जी खोली बांधण्यात आली होती, ती पाडण्यात आलेली आहे अशी माहिती मिळाली.

श्री. विलासराव देशमुख : महोदय, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचा रोख अतिशय योग्य आहे. त्यांनी प्रश्न विचारला की, नगरसेवकांनी तक्रार करेपर्यंत आयुक्त काय करीत होते ? ही तक्रार केल्यानंतर हे बांधकाम पाडण्यात आले अशा प्रकारे यामध्ये विलंब झालेला आहे. याबाबतची चौकशी करुन जर याकडे दुर्लक्ष झाले असेल तर योग्य ती शिक्षा मीरा-भाईंदर नगरपालिकेच्या आयुक्तांना केली जाईल. कारण अनेक अधिकारी मीरा-भाईंदर महापालिका म्हटल्यानंतर जाण्यासाठी उत्सुक असतात व त्या जागेसाठी माझ्याकडे अनेक अर्जही आलेले आहेत. त्यावरुन त्या जागेचे महत्व लक्षात येईल.

प्रा. शरद पाटील : महोदय, जी जागा बाजाराच्या आरक्षणात गेलेली आहे ती मीरा-भाईंदर महापालिकेने अद्याप ताब्यात का घेतली नाही ?

श्री. राजेश टोपे : महोदय, मार्केटसाठी जी जागा आहे ती ताब्या घेण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या वतीने निश्चितपणे पुढील कारवाई करण्यात येईल. (.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नांदेड जिल्ह्यातील हदगांव तहसिलमध्ये संजय गांधी निराधार योजना आणि इंदिरा गांधी निराधार योजनेत झालेल्या अपहाराच्या चौकशीबाबत

(4) * 14617 श्री. गुरुमुख जगवानी , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे : सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नांदेड जिल्ह्यातील हदगांव तहसिलमधील संजय गांधी निराधार योजना आणि इंदिरा गांधी निराधार योजनेत सन 1995 ते 2005 या दहा वर्षाच्या काळात एक कोटी सत्तावीस लाख अडूसष्ट हजार सातशे पंचवीस रुपयांचा अपहार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या संदर्भात चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी, श्री. मनोहर नाईक यांच्याकरिता : (1), (2) व (3) सदरील अपहाराची रक्कम रुपये 1,32,68,725/- आहे. तहसिल कार्यालय, हदगाव येथील अपहाराचे अनुषंगाने पोलिस स्टेशन, हदगाव येथे दिनांक 4.5.2005 रोजी गुन्हा नोंदविला असून पुढील तपास पोलिसामार्फत करण्यात येत आहे, पोलिस तपास अद्याप पुर्ण झालेला नाही.

श्री. गुरुमुख जगवानी : सभापति महोदय, नांदेड़ जिले की हदगांव तहसील में संजय गांधी निराधार योजना के तहत वहां के नायब तहसीलदार ने 10 साल के अन्दर 1 करोड़ 32 लाख रुपए का अपहार किया है. इस बारे में उत्तर में बताया गया है "पोलिस तपास अद्याप पूर्ण इ ालेला नाही." इस बात को आज 11 महीने हो गए हैं तो 11 महीने के अन्दर तपास पूरा क्यों नहीं हुआ है ? मेरा दूसरा सवाल यह है कि नायब तहसीलदार और उनके 4 साथियों से यह पैसा रिकवर करने के लिए क्या कदम उठाए गए हैं ? तपास में इतनी देरी क्यों हो रही है ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापति महोदय, माननीय सदस्य ने बहुत महत्वपूर्ण प्रश्न पूछा है कि 1 साल पहले एफ.आई.आर. होने के बाद अभी तक पुलिस के द्वारा कुछ कार्रवाई नहीं हुई है. सभापति महोदय, यह बात सही है कि . . .

(कुछ माननीय सदस्य मराठी में उत्तर देने का आग्रह करते हैं)

. . . नंतर भारवी.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी ....

याप्रकरणी एक वर्षभर काहीही कारवाई झालेली नाही. शासनाने दिनांक 4.5.2005 रोजी एफ.आय.आर.नोंदविला आहे. या प्रकरणात 38 जण गुंतलेले असून 7 जणांना निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणासंबंधी मी आजच माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना भेटलो व त्यांना सांगितले की, आपल्या विभागाने एक वर्ष झाले तरी कुठलीही कारवाई केली नाही. तेव्हा त्यांनी मला यासंबंधी एक महिन्यात चौकशी करून अहवाल सादर करण्यात येईल असे आश्वासन सभागृहला द्यावे असे सांगितले आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मैं मंत्री महोदय से यह पूछना चाहती हूँ कि यह जो अपहार हुआ है, इसका "मोड्स ऑफ ऑपरेन्डी" क्या था ? इस प्रकार का अपहार राज्य में कहां नहीं हो रहा है ? जहां भी हम ग्रामीण भाग में जाते हैं, गरीब और निराधार लोग हमें इस बारे में बताते हैं. मेरा प्रश्न यह है कि सही लाभार्थी तक यह लाभ मिले, इसके लिए शासन क्या कदम उठाएगा ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापति महोदय, इस प्रकरण में बैंक से नकद पैसा लाभार्थी के नाम पर गया है और यह पैसा असली लाभार्थी तक नहीं पहुंचा है. इन योजनाओं के अन्तर्गत पूरे महाराष्ट्र में इस तरह की गड़बड़ हुई है और कोर्ट के आदेश पर सारे विभागीय प्रमुखों ने इस बारे में इन्क्वायरी शुरु की है. सभी विभागीय कमिश्नर से कहा गया है कि पिछले 10 साल के सभी मामलों की इन्क्वायरी करके रिपोर्ट दें. केवल 1-2 डिवीजन से रिपोर्ट नहीं आई है, शेष सभी डिवीजन से रिपोर्ट आ गई है और जो भी दोषी अधिकारी हैं, उनके ऊपर जरुर एक्शन लेंगे. माननीय सदस्या ने बहुत अच्छा मुद्दा उपस्थित किया है कि आने वाले दिनों में शासन क्या करने वाला है. मैं सभागृह को बताना चाहता हूँ कि एक तो हम ए.टी.एम. मशीन इन्ट्रोड्यूस करेंगे और इसके आदेश भी दिए गए हैं. लाभार्थियों को ए.टी.एम. कार्ड दिए जाएंगे, जिससे वे स्वंय जाकर ए.टी.एम. मशीन से पैसा निकाल सकते हैं. इसके अतिरिक्त संजय गांधी निराधार योजना में जो सम्माननीय आमदार चेयरमेन हैं, उन सभी के साथ बैठकर इस समस्या को हल करने की कोशिश करेंगे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन 1995 मध्ये रुपये 1,32,725/- इतक्या रकमेचा अपहार झालेला आहे. म्हणजे जवळपास दीड कोटीचा हा अपहार आहे. संजय गांधी निराधार योजना व इंदिरा गांधी निराधार योजनेसाठी त्या त्या स्तरावर कमिटया नेमलेल्य आहेत. असे असताना आता दहा वर्षानंतर अपहार झाल्याचे लक्षात आले आहे. तो पर्यंत अपहार झाल्याचे लक्षात आले नव्हते काय ? या अपहारामुळे गोरगरीब जनतेच्या तोंडातील घास काढून घेतला आहे. शासनाने दिनांक 4.5.2005 रोजी गुन्हा दाखल केला आहे, त्याचे स्वरूप काय आहे ? तसेच, या गुन्हयामध्ये कोणाकोणाला आरोपी करण्यात आले आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी श्री.सुभाष वानखेडे यांनी तक्रार केली होती. त्यांच्या तक्रारीनुसार जिल्हा स्तरावर चौकशी करण्यात आली व सदर चौकशी एप्रिल 2005 मध्ये पूर्ण झाली. त्यानंतर इंटरनल ऑडिट करण्यात आले.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14617....

श्री.सुरेश शेट्टी....

दिनांक 10 मे रोजी इंटरनल ऑडिटचा रिपोर्ट आला आहे. त्यानंतर 409, 420, 468, 471, 201 आणि 334 या कलमांन्वये एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे. 1995 ते 2005 पर्यंत त्या विभागात 34 व्यक्ती काम करीत होत्या. त्यांच्याविरुध्द ॲक्शन घेण्यात आली आहे. त्या व्यक्तींपैकी 17 व्यक्ती अजूनही त्या ठिकाणी कार्यरत असून, 6 व्यक्ती सेवानिवृत्त झालेल्या आहेत आणि 7 व्यक्तींना निलंबित करण्यात आलेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, गरीबांसाठी असलेल्या योजनेमध्ये कोटयावधी रुपयांचा अपहार करणारे लोक आजही त्या विभागात कार्यरत आहेत. त्यांच्यावर ॲक्शन घेतली असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. त्यांच्यावर नेमकी काय ॲक्शन घेतली आहे ?

सभापती : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, संजय गांधी निराधार योजना आणि इंदिरा गांधी निराधार योजनेत 1 कोटी, 32 लाख रुपयांचा अपहार झाल्याचे चौकशीमध्ये आढळून आलेले आहे. 1995 ते 2005 च्या कालावधीतील ही रक्कम आहे. या अपहारामध्ये विभागातील 34 लोक गुंतलेले आहेत. गुन्हा नोंद होऊन 11 महिने झाले आहेत. परंतु.....

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, या अपहार प्रकरणातील 34 व्यक्ती या विभागामध्ये काम करीत होत्या. त्यातील काही व्यक्ती या प्रकरणात सहभागी होत्या, तर काही व्यक्ती सहभागी नव्हत्या. ज्या व्यक्ती सहभागी होत्या त्यांच्यावर ॲक्शन घेऊन, त्यांना निलंबित केले आणि त्यांच्यावर कारवाई केली. डॉ.फुलके, नायब तहसीलदार, श्री.बोराडे, नायब तहसीलदार, श्री.कोलाटणे, श्री.पाटील, श्री.शेकापुरे आणि अन्य एका व्यक्तीस सस्पेंड केले आहे. पोलीस चौकशीनंतर त्या व्यक्तींना अटक करण्यात आली होती. परंतु त्यांची बेलवर सुटका झाली. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील कार्यवाही सुरु आहे. माननीय उपमुख्यमंत्री महोदयांशी झालेल्या चर्चेनुसार सांगू इच्छितो की, एका महिन्याच्या आत या प्रकरणाची चौकशी पूर्ण करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, संजय गांधी निराधार योजना आणि इंदिरा गांधी घरकुल योजनांबाबत मला माहिती आहे. परंतु मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, इंदिरा गांधी निराधार योजना अस्तित्वात आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, संजय गांधी निराधार योजना आणि इंदिरा गांधी निराधार योजना या दोन्ही योजना त्या ठिकाणी लागू आहेत.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, या योजनांमध्ये अपहार झाल्याचे शासनाने मान्य केले आहे. तसेच या प्रकरणामध्ये ज्या व्यक्ती गुंतलेल्या आहेत त्यांच्यावर गुन्हे दाखल करुन, त्यांच्यावर ॲक्शन घेतल्याचेही माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. या योजनांमधील मूळ लाभार्थ्यांचे पैसे उचलण्यात आल्याच्या घटनेला आज 10 वर्षे होत आहेत. जे खरोखरच पात्र लाभार्थी होते त्यांना अपहार झाल्यामुळे या योजनांचे पैसे मिळाले नाहीत. त्यामुळे ते आपल्या हक्कापासून वंचित राहिले. म्हणून मी शासनाला विचारु इच्छितो की, ज्यांना या योजनेच्या पैशांपासून वंचित राहावे लागले त्यांना त्यांच्या हक्काचे पैसे शासन देणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, नांदेड जिल्हयापुरता हा विषय आहे संपूर्ण महाराष्ट्राचा रिपोर्ट आल्यानंतर व संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई झाल्यानंतर कॅबिनेट समोर हा विषय नेऊन त्याबाबत निर्णय घ्यावा लागेल.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला अद्यापी उत्तर मिळालेले नाही. माझा साधा प्रश्न आहे की, पात्र लाभार्थ्यांना शासन त्यांचे पैसे देणार आहे काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, ज्या लाभार्थ्यांच्या नावावरील पैसे उचलण्यात आले आणि जे या योजनांपासून वंचित राहिले आहेत त्यांची पुन्हा तपासणी करण्यात येईल. जे या योजनांसाठी पात्र असतील त्यांना संजय गांधी निराधार योजनेतून जी काही मदत मिळते ती दिली जाईल.

नंतर श्री.व्ही.खर्चे....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, संजय गांधी निराधार योजनेमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे असे प्रश्नाच्या उत्तरामधून स्पष्ट होते, त्यावेळी जे स्थानिक आमदार होते त्यांनी यासंदर्भात किती बैठका घेतल्या. गेल्या 10 वर्षामध्ये ज्या तक्रारी आलेल्या आहेत त्या अनुषंगाने सदर आमदारांनी किती बैठका घेतल्या, त्या बैठकांच्या इतिवृत्तामध्ये या भ्रष्टाचाराची नोंद झालेली आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सदर स्थानिक आमदार श्री. सुभाष वानखेडे हे होते, परंतु त्यांनी त्या कालावधीमध्ये किती बैठका घेतल्या यासंदर्भातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही, सदर माहिती घेऊन मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपकर प्राप्त इमारती भूखंडासह ताब्यात घेण्याची प्रक्रिया

(५) * १३१४८ श्री. मधुकर चव्हाण , डॉ. अशोक मोडक , श्री. विनोद तावडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ३१ जानेवारी २००६ पर्यंत म्हाडाच्या कायद्यांतर्गत किती उपकर प्राप्त इमारती भूखंडासह ताब्यात घेण्याची प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे,

(२) असल्यास, यापैकी किती उपकरप्राप्त इमारतींची ताब्यात घेण्याची प्रक्रिया पूर्ण होऊन मुंबई जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचा ताबा पुनर्रचनेसाठी म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे दिला आहे,

(३) असल्यास, यापैकी किती इमारतींच्या बांधकामाचे आराखडे तयार करुन म्हाडाने मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित खात्याकडे मंजुरीसाठी सादर केले आहेत ?

श्री. दयानंद मस्के, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता: (१) ११४९ जुन्या इमारती भूखंडासह ताब्यात घेण्यासाठी भूसंपादनासंबंधीची कार्यवाही करण्यात आली आहे.

(२) यापैकी १०५४ इमारतींचा जमिनीसह ताबा मिळाला आहे.

(३) इमारतीच्या भूसंपादनाचा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी पुनर्बांधणीच्या आराखड्यास महानगरपालिकेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार उपरोक्त इमारतींच्या आराखड्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त झाली आहे.

श्री. मधूकर चव्हाण : सभापती महोदय, मुंबईच्या जनतेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे उत्तर शासनाकडून या प्रश्नाच्या निमित्ताने मिळालेले आहे. त्याचे गांभीर्य या ठिकाणी आपल्या लक्षात येईल. 1054 इमारतींचा ताबा हा म्हाडाकडे आलेला आहे. सदर इमारती भूखंडासह ताब्यात घेतलेल्या आहेत म्हणजे हया इमारती राहण्यायोग्य नाहीत म्हणून त्यांची पुनर्रचना करावयाची आहे. माझा प्रश्न असा आहे की, या 1054 इमारतींची पुनर्रचना करण्यासाठी किती खर्च येणार आहे ? त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे काय ? यासाठी एक हजार कोटी रुपये लागणार आहेत अशी आमची माहिती आहे, तसेच किती कालावधीमध्ये हया इमारती बांधल्या जाणार आहेत ? तसेच संक्रमण शिबिरात जे लोक राहतात त्यांना त्या इमारती केव्हा त्यांच्या ताब्यात मिळणार आहेत ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, 1054 इमारतींचा जमिनीसह ताबा मिळालेला आहे. त्यातील 902 इमारतींची पुनर्रचना करण्याच्या आराखडयास मंजूरी दिलेली आहे. त्यापैकी, 451 नवीन इमारती बांधण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये 30688 निवासी गाळे आहेत, 2206 ही अनिवासी गाळे आहेत, एकूण 32904 गाळे बांधण्यात आलेले आहेत.

.....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, एकंदर 1054 इमारतींचा ताबा मिळालेला आहे याचाच अर्थ त्या सगळया इमारतीमधील लोकांना संक्रमण शिबिरात पाठविलेले आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, 1054 इमारती पैकी किती इमारती पूर्ण झालेल्या आहेत व किती इमारती हया अपूर्ण आहेत. पूर्ण झालेल्या इमारतींचा ताबा संक्रमण शिबिरातील लोकांना मिळालेला आहे काय ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, 1054 इमारती पैकी 431 नवीन इमारती बांधलेल्या आहेत, त्या ठिकाणी 30688 निवासी गाळे व 2206 अनिवासी गाळे काढलेले आहेत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, 1149 इमारती भूखंडासह ताब्यात घेण्यासाठी भूसंपादनासंबंधीची कार्यवाही करण्यात आली आहे असे उत्तरात दिलेले आहे. त्यापैकी 1054 इमारतींचा जमिनींसह ताबा मिळालेला आहे, या 1054 इमारतींपैकी किती इमारती बांधून पूर्ण झालेल्या आहेत, किती लोक या इमारतीमध्ये राहावयास आलेले आहेत, उर्वरित इमारती किती कालावधीत बांधून पूर्ण करणार आहात ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, 1054 इमारतीपैकी 902 इमारतींचे पुनर्रचना करण्यात येणार आहे त्यातील 431 इमारती नव्याने बांधण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये 30688 निवासी गाळे व 2206 अनिवासी गाळे काढलेले आहेत.

यानंतर श्री. सांगळे...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक : एकूण 1149 इमारतींपैकी 1054 इमारतींचा जमिनीसह ताबा मिळालेला आहे. उर्वरित 95 इमारतींची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री.दयानंद मस्के : उर्वरित 95 इमारतींच्या संदर्भात भूसंपादनाची प्रक्रिया सुरु आहे.

डॉ.दीपक सावंत : भूसंपादनाची प्रक्रिया किती कालावधीत पूर्ण होणार आहे ?

श्री.दयानंद मस्के : उर्वरित 95 इमारतींच्या भूसंपादनाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बेघर गरीबांसाठी एक लाख घरकुले बांधण्याबाबत

(६) * १४७२३ श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. विनायकराव मेटे , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. कन्हैयालाल गिडवानी , श्री. लक्ष्मण जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ९९६१ ला दिनांक ७ डिसेंबर, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आणि दारिद्र्य रेषेवरील दुर्बल, बेघर आणि अल्पभूधारकांकरीता एक लाख घरे बांधून देण्याची योजना राबविण्याचा शासनाने माहे जानेवारी, २००६ मध्ये निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे,

(३) ही योजना प्रत्यक्षात केव्हा अंमलात येणार आहे ?

श्री.दयानंद मस्के, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता: (१) होय, त्याबाबतचा आदेश दिनांक २९.११.२००५ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

(२) दारिद्र्य रेषेखालील बेघर कुटुंबासाठी राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र. १ व दारिद्र्य रेषेवरील अल्प उत्पन्न गटातील बेघर कुटुंबासाठी राजीव गांधी निवारा योजना क्र. २ अशा दोन योजना राबविण्यात येणार असून त्याचे स्वरुप पुढील प्रमाणे आहे.

अ) राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्रमांक १

एक) लाभपात्र कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २०,०००/- पेक्षा जास्त असू नये.

दोन) लाभपात्र कुटुंबाची स्वत:ची जागा असल्यास त्यावर व शासकीय/ग्रामपंचायतीची जागा असल्यास ५०० चौ.फू. क्षेत्रफळाच्या भूखंडावर २०० चौ. फूट क्षेत्रफळाच्या घरकुलाचे बांधकाम लाभार्थ्यांने शक्यतोवर स्वत: करावयाचे आहे.

तीन) घरकुलाच्या बांधणीसाठी लाभार्थ्यांना रु. २८,५००/- चे अर्थसहाय्य बांधकामाच्या प्रगतीनुसार एकूण ४ टप्प्यात देण्यात येणार आहे.

ब) राजीव गांधी निवारा योजना क्रमांक २

एक) लाभपात्र कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ५०,०००/- पेक्षा जास्त असू नये.

दोन) लाभपात्र कुटुंबाची स्वत:ची जागा असल्यास त्यावर व शासकीय/ग्रामपंचायतीची जागा असल्यास ७५० चौ.फू. क्षेत्रफळाच्या भूखंडावर कमीत-कमी २५० चौ.फू. क्षेत्रफळाच्या घरकुलाचे बांधकाम लाभार्थ्याने शक्यतोवर स्वत: करावयाचे आहे.

तीन) लाभ इच्छूक कुटुंबाचे घरबांधणीत स्वत:चे योगदान म्हणून रु. ५,०००/- रोख रक्कम किंवा बांधकाम साहित्य व मजूरीच्या स्वरुपात देणे आवश्यक राहील.

चार) सुमारे ५०,०००/- किंमतीचे घर बांधणीसाठी लाभार्थ्याला रु. ४५,०००/- पर्यंत कर्ज वित्तीय संस्थांकडून म्हाडाच्या मदतीने उपलब्ध करुन देण्यात येईल. या कर्जाची परतफेड लाभार्थ्याने २० वर्षात करावयाची आहे.

पाच) कर्जावू घेतलेल्या रक्कमेवरील व्याजाची फेड राज्य शासनाकडून करण्यात येईल.

पूर्वी इंदिरा आवास योजना, प्रधानमंत्री ग्रामोदय योजना व तत्सम शासकीय योजनेतून घरकुलांचा लाभ घेतलेल्या कुटुंबाना वरील योजनांचा लाभ घेता येणार नाही.

(३) ही योजना सन २००६-२००७ या वित्तीय वर्षापासून कार्यान्वित होणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . तारांकित प्रश्न क्रमांक १४७२३

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : राज्यातील ग्रामीण भागांमध्ये बेघर आणि गरीबांसाठी 1 लाख घरे बांधून देण्याची योजना राबवण्यासाठी शासनाने दि.29/11/2005 रोजी आदेश काढलेले आहेत. ही योजना राज्य शासनाची आहे की, केंद्र शासनाची आहे याबाबत कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. या योजनेअंतर्गत बेघर कुटुंबियासाठी राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्रमांक 1 व 2 राबवण्यात येणार आहेत. पहिल्या क्रमांकाच्या योजनेमध्ये लाभपात्र कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.20,000 पेक्षा जास्त असता कामा नये. घरकुलाच्या बांधणीसाठी लाभार्थ्यांना रु.28,500 एवढे अर्थसहाय्य 4 टप्प्यात देण्यात येणार आहे. तसेच दुस-या क्रमांकाच्या योजनेमध्ये लाभपात्र कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.50,000 पेक्षा जास्त असता कामा नये. घरकुलाच्या बांधणीसाठी लाभार्थ्यांना रु.45,000 एवढे अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

श्री.दयानंद मस्के : ही महाराष्ट्र शासनाची योजना आहे. या योजनेअंतर्गत 1 लाख घरकुले बांधण्यात येणार आहेत. पहिल्या क्रमांकाच्या योजनेमध्ये लाभपात्र कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.20,000 पेक्षा जास्त असता कामा नये. तसेच लाभार्थ्याची स्वत:ची 500 चौ.फुटाची जागा असली पाहिजे. तसेच दुस-या क्रमांकाच्या योजनेमध्ये लाभपात्र कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.50,000 पेक्षा जास्त असता कामा नये. सुमारे रु.50,000 एवढया रकमेचे घर बांधणीसाठी लाभार्थ्यांना रु.45,000 पर्यंतच्या रकमेचे कर्ज वित्तीय संस्थांकडून म्हाडाच्या मदतीने उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या योजना पहिल्या योजनांसारख्याच सुरु करणार आहात काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, गरीब लोगों के लिए घर बनाने की महाराष्ट्र शासन की जो योजना है तो क्या आमदार इस बारे में सिफारिश कर सकता है, आमदार का इस योजना में क्या महत्व है ? क्योंकि ग्राम सभा को ही पूरे अधिकार हैं और गांव के अन्दर जो अलग अलग गट होते हैं, उसकी वजह से कहीं कहीं लाभार्थी वंचित रह जाते हैं. मेरा दूसरा प्रश्न यह है कि शहरों में म्हाडा के अन्तर्गत घर देने की योजना माननीय मुख्य मंत्री की तरफ से चलाई जा रही है और यह बात सुनने में आई है कि ग्रामीण भाग के लिए भी यह योजना अमल में आने वाली है तो इस बारे में क्या स्थिति है ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . तारांकित प्रश्न क्रमांक १४७२३

श्री.दयानंद मस्के : ही योजना ग्रामीण लोकांसाठी आहे. ही योजना सन 2006-07 या वित्तीय वर्षांपासून कार्यान्वित होणार आहे. या योजनेअंतर्गत 1 लाख घरकुले बांधले जातील.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : या योजनेमध्ये लाभार्थी निवडीची प्रकिया कशी असणार आहे ? इंदिरा आवास योजनेच्या धरतीवर लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे काय ?

यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14723 ..

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, आतापर्यंत जशी निवड करण्यात येते त्याच पद्धतीने करण्यात येईल.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या योजनेचा ट्रस्ट महाराष्ट्र सरकारकडून नेमक्या कोणत्या गोष्टींवर असणार आहे. कारण 1 लाख घरे आपण बांधणार आहात तर ती किती वर्षात बांधण्यात येणार आहे आणि या वर्षामध्ये त्यासाठी आर्थिक तरतूद केलेली आहे काय ? तसेच मानव विकास निर्देशांक ज्या जिल्ह्यांमध्ये कमी आहे त्या जिल्ह्यांना विशेष निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे काय ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, या योजनेचा मुख्य हेतू हा आहे की, इंदिरा आवास योजना किंवा पंतप्रधान ग्रामीण उद्योग योजना यांचा लाभ ज्या लोकांना मिळतोत्या लोकांना यातून थोडेसे बाजूला ठेवणे. कारण ग्रामीण भागामध्ये अशी अनेक शेतकरी कुटुंबे आहेत की, जे भूमिहीन नाहीत आणि बेघर देखील नाहीत. त्यांना अशा योजनांचा फायदा मिळत नाही, मिळणार नाही. असे लोक शहरामध्ये गेले की तेथे त्यांना घर फुकट मिळते. वाल्मिकी योजना वगैरे सारख्या योजनांतू अशा लोकांना शहरात आल्यावर ताबडतोब घरांची व्यवस्था होते. परंतु गावी शेती असल्याने जे लोक शहराकडे जाऊ शकत नाहीत अशा लोकांचा फार मोठा वर्ग आहे. त्यांना दारिद्र्यामुळे आपले घर देखील दुरूस्त करता येत नाही. त्यामुळे त्यांचेसाठी आपण 50 हजार रूपयांची मर्यादा ठेवली आहे. त्यामध्ये किमान 5 हजार रूपये त्याने स्वत:ची कॉन्ट्रीब्यूशन द्यायची आणि बाकी राहिलेले 45 हजार रूपये कर्ज म्हणून त्याला द्यायचे आणि ते कर्ज त्याने 20 वर्षात फेडावयाचे आहे अशी ही योजना आपण ठरविली आहे. हे सगळे करीत असताना मानव विकास निर्देशांक जेथे कमी आहे तेथे लक्ष्य देतानाच प्राधान्य देण्यावर आपला भर राहील आणि तेथे जिल्ह्याचे पालकमंत्री अध्यक्ष आणि उपाध्यक्ष म्हणून जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असतील आणि त्या कामाचा त्यांचेकडून रिव्ह्यू घेतला जाईल. परंतु लाभार्थी निवडीचे काम हे ग्रामसभेकडे राहील. ग्रामसभेने यातील लाभार्थी निवडले तर त्यातून फारसे वाद निर्माण होणार नाहीत. कारण जवाहर विहिरीच्या योजनेमध्ये आपण पाहतो की, अनेक वाद निर्माण होतात. म्हणून याबाबतीत ग्रामसभेने लाभार्थ्यांची निवड करावी असा आपला हेतू आहे.

.... पीपी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14723 ....

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, ही योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत किती लाभर्थ्यांना या योजनेचा फायदा झालेला आहे ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, ही योजना आपण याच वर्षी सुरू केलेली आहे आणि त्याचा रिझल्ट मार्च अखेर आपल्याला दिसेल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी जे या ठिकाणी रॅशनल सांगितले ते चांगले आहे. या योजनेमध्ये आपण लाभार्थ्याचे योगदान 5 हजार रूपये पर्यंत साहित्य किंवा परिश्रम या स्वरूपात मागितले आहे. पण ते आपण 10-15 हजार रूपये केले तर त्याच्यावरील कर्जाचा बोजा कमी होऊ शकेल. तेव्हा याबाबत आपण पुनर्विचार करणार का ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, कमीत कमी 5 हजार रूपये असे आपण म्हटलेले आहे. तेव्हा लाभार्थ्याने जर आपली मजुरी-परिश्रम, साहित्य अधिक प्रमाणात कॉंट्रीब्यूट केले तर तेवढा कर्जाचा भाग कमी होईल.

*****

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील 35 शहरांमध्ये येत्या दोन वर्षात विमानसेवा पुरविण्याबाबत

(7) * 13280 श्री. संजय दत्त, मेजर सुधीर सावंत, श्री. सुधाकर गणगणे, श्री.गोविंदराव आदिक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील 35 शहरांमध्ये येत्या दोन वर्षात विकास व उद्योगधंदे वाढविण्याच्या दृष्टीने विमानसेवा देण्याचा निर्णय डिसेंबर, 2005 रोजी वा त्या सुमारास केंद्र शासनाने राज्य शासनास कळविला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकरणी राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(3) अद्याप कोणताच निर्णय घेता आला नसल्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता : (1) नाही.
(2) प्रश्न उद्भवत नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, 17 मार्च 1997 च्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सर्व जिल्हे आणि मोठी शहरे विमान सेवेने जोडणार असल्याचे आणि त्यासाठी स्पॅन एव्हिएशन लि. या कंपनीबरोबर संयुक्त कंपनी सुरू केल्याचा उल्लेख केलेला आहे. तसेच 17 फेब्रुवारी 1999 च्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये यवतमाळ, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात तसेच बीड जिल्ह्यातील परळी येथे धावपट्टी बांधली असल्याचे म्हटले आहे. आजच्या प्रश्नामध्ये शासनाचे धोरण काही आलेले नाही, तरी याबाबत माननीय मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

(यानंतर श्री. सरफरे ..... क्यूक्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13280...

श्री. संजय दत्त...

सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा की,...

सभापती : माननीय सदस्यांकडे जर प्रश्न नसेल तर त्यांनी प्रश्न विचारलाच पाहिजे असे नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, या सदनातील ज्येष्ठ माननीय सदस्यांना पार्श्वभूमी तयार करण्याची संधी मिळते. तेव्हा आमच्यासारख्या नवख्या सदस्यांना देखील ती संधी मिळाली पाहिजे.

सभापती : पार्श्वभूमी तयार करणे सुध्दा गैर आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सध्याच्या युगाचा विचार करता ही विमान सेवा उपलब्ध करुन देणे आवश्यक ठरले आहे. राज्यातील पर्यटन उद्योग वाढविण्यासाठी आणि परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी आणि राज्याच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी जिल्हा मुख्यालये जोडण्याचे नियोजन सरकार करणार आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आजच्या परिस्थितीत एकूण विमानतळांची संख्या 24 आहे. आणि 35 जिल्हयांमध्ये ही सेवा देण्याच्या दृष्टीकोनातून अजून तरी राज्य शासनाचा विचार नाही. त्यादृष्टीने याठिकाणी विचार व्यक्त करण्यात आले आहेत त्यावर निश्चितपणे विचार करता येईल. आज 24 ठिकाणी धावपट्टया आहेत त्यांची व्हायाबिलिटी चेकअप करण्यासाठी महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनीला सूचना देण्यात आल्या आहेत. त्यांचा अहवाल लवकरच प्राप्त होत आहे. त्या व्हायाबिलिटीच्या माध्यमातून ज्या ठिकाणी व्हायेबल होईल त्याठिकाणी विमान सेवा सुरु करण्याचा शासन विचार करीत आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, सिंधुदुर्ग येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ तयार होत आहे असे आम्ही अनेक वर्षापासून ऐकत आहोत. त्याकरीता बीसीए ची मान्यता मिळाली आहे. रत्नागिरी विमानतळ येथील धावपट्टी अरुंद असल्यामुळे त्याठिकाणी विमाने येत नाहीत. त्याठिक्राणी मोठी धावपट्टी तयार करुन ते मोठे विमानतळ तयार करण्यात येईल काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सिंधुदुर्ग व रत्नागिरी येथील विमानतळासंबंधी प्रश्न विचारला आहे. त्या संदर्भात काही गोष्टींची माहिती घेऊन कार्यवाही करता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारला आहे. रत्नागिरी येथे अरुंद धावपट्टी असल्यामुळे, व ती लांबीला कमी असल्यामुळे विमानसेवा पूर्ववत सुरु झालेली नाही. त्यामुळे त्या कामाला गती देण्याची भूमिका राज्य शासनाने घेतली आहे. त्याचबरोबर सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये हवाईपट्टी तयार करण्याचे काम रेंगाळले होते. सदरचे काम माननीय सदस्यांच्या प्रयत्नाने आणि त्यांच्या ज्येष्ठ सहकाऱ्यांच्या सल्ल्याने एम.आय.डी.सी.मार्फत करण्याच्या दृष्टीने सूचना दिल्या आहेत. त्यामुळे ते काम तातडीने हाती घेतले जाईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये उल्लेख केला आहे त्यासंबंधी अतिरिक्त माहिती माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये दिली. प्रश्न असा आहे की, 35 ठिकाणी विमान सेवा सुरु करण्यासंबंधीचा उल्लेख करीत असतांना त्यामध्ये नांदेडसाठी देखील तरतूद करण्यात आली होती काय? तसेच, सिंधुदुर्ग जिल्हयाप्रमाणे नांदेडचा देखील त्यामध्ये अंतर्भाव केला जाईल काय?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, नांदेडचे काम प्रत्यक्षात सुरु झाले आहे. आणि 2008 मध्ये त्या ठिकाणी मोठा महोत्सव होणार आहे हे लक्षात घेऊन...

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख (पुढे सुरु...

आंतरराष्ट्रीय विमाने उतरविण्यासाठी धावपट्टया बांधली जात आहे. इतरही जिल्ह्यांमध्ये धावपट्टया आहेत, त्यांची लांबी वाढविण्याचाही राज्य सरकारच्यावतीने प्रयत्न चाललेला आहे. एअरपोर्ट ऑथरटी आणि राज्य सरकर मिळून 40 सिटरचे विमान उपलब्ध करुन द्यायचे आहे. एअरपोर्ट ऑथरटीच्या नासिक, कोल्हापूर, सोलापूर, अकोला, लातूर या ठिकाणी हवाई धावपट्टया आहेत. तिथे आपल्याला ही सेवा वाढविता येते. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी सांगितल्याप्रमाणे पर्यटन आणि उद्योग या दोन्ही बाबींना चालना देण्यासाठी सेवा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : अलिबाग येथे केव्हा विमानतळ होणार आहे ?

श्री.विलासराव देशमुख : अलिबागला अजिबात होणार नाही. अलिबाग येथे एअरपोर्ट होणार, अशा अगोदरच बातम्या येत आहेत. त्या तशा बातम्या छापून आणल्या जातात आणि नतर शासनाकडून त्याचा खुलासा मागविला जातो. ही पध्दत थांबली पाहिजे. म्हणून मी पहिल्यांदाच सांगितले की, अलिबाग येथे विमानतळ होणार नाही. आपण पनवेलजवळ विमानतळ बांधतो आहोत. त्या ठिकाणी विमानतळ उभारण्याचे काम अंतिम टप्प्यामध्ये आलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : अलिबाग येथील विमानतळाचे आरक्षण उठविले पाहिजे.

श्री.विलासराव देशमुख : आरक्षण उठविण्यासंबंधी सन्माननीय सदस्य मला भेटले तर जरुर त्याचा विचार केला जाईल. एअरपोर्ट होणार असल्याच्या बातम्या सातत्याने छापून आणल्या जातात. त्यामुळे त्या संदर्भाने मी निवेदन केलेले आहे. मी या दृष्टीकोनातून एवढेच सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांचा मूळ प्रश्न आहे, त्या संदर्भात केंद्र सरकारला कळविले परंतु त्यांच्याकडून "नाही", असे उत्तर दिलेले आहे. नागपूर आणि इतर जिल्ह्यांमध्ये विमान सेवा उपलब्ध व्हावी, महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्ये या सेवने जोडले जावेत अशाप्रकारचा प्रयत्न राज्य सरकारच्या वतीने केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/ MAP/ SBT/

मुंबई महानगरपालिकेतील मागासवर्गीयांच्या पदांच्या भरतीबाबत

(8) * 14849 श्री. रमेश निकोसे , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. सुधाकर गणगणे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई महानगरपालिकेतील मागासवर्गीयांच्या निरीक्षक पदाच्या भरतीबाबत न्यायालयाच्या आदेशानुसार मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यासाठी महानगरपालिकेने दुकाने व आस्थापना विभागातील निरीक्षक पदांचा भरतीचा कार्यक्रम जाहीर करुनही सन 2003 ला सुरु झालेली प्रक्रिया अद्याप अंतिम टप्प्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, भरतीप्रक्रिया पूर्ण न करण्याची कारणे कोणती,

(3) उक्त भरतीच्या पदाचा निकाल जाहीर न केल्यास आर्थिक गैरव्यवहार होण्याची भिती कर्मचाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(4) भरती प्रक्रियेबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री.राजेश टोपे,श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता : (1), (2), (3) व (4)

महानगरपालिकेच्या प्रशासनाने महानगरपालिकेच्या दुकाने व आस्थापना खात्यातील "निरीक्षक" वर्गातील अनुशेषांतर्गत पद भरण्यासाठी 2003 मध्ये सुरु केलेली प्रक्रिया पूर्ण झाली असुन 24 उमेदवारांनी नियुक्ती स्विकारली आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेतील मागासवर्गीयांच्या निरीक्षक पदाच्या भरतीबाबत न्यायालयाच्या आदेशानुसार मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यासाठी महानगरपालिकेने दुकाने व आस्थापना विभागातील निरीक्षक पदांचा भरतीचा कार्यक्रम जाहीर केला. ही प्रक्रिया 2003 मध्ये सुरु झाली परंतु अद्यापपर्यन्त दुकाने आणि आस्थापना विभागातील "निरीक्षक" संवर्गातील अनुशेषा अंतर्गत असलेल्यापदांच्या भरतीची प्रक्रिया अद्यापपर्यन्त सुरु झालेली नाही, त्याचे कारण काय आहे ? ही प्रक्रिया सुरु झाली नसेल तर ती केव्हा सुरु होईल ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, 32 पदांचा अनुशेष होता त्यापैकी 26 पदे भरलेली आहेत. उर्वरित 6 पदे भरावयाची आहेत, ती लवकरात लवकर भरण्यात येतील.

प्रा.जोगेंद्र कवाडे : लवकरात लवकर म्हणजे किती कालावधीमध्ये ती पदे भरण्यात येणार आहेत ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14849 पुढे सुरु...

श्री.राजेश टोपे : निवड प्रक्रिया असते. विभागाअंतर्गत मागासवर्गीयांमधून ते पद भरले जाते. त्यासाठी तीन वर्षाचा अनुभव लागतो. त्याप्रमाणे अर्ज मागवून त्यांची लेखी आणि तोंडी परीक्षा घेऊन ही पदे भरण्यात येतील.

--

4...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/ MAP/ SBT/

सभापती : तारांकित प्रश्न क्रमांक 14982.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 9 आणि अनुक्रमांक 10 वरील प्रश्न हे एकाच विषयाशी संबंधित असल्यामुळे दोन्ही प्रश्न एकत्रित चर्चेला घ्यावेत, अशी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे, तारांकित प्रश्न क्रमांक 14982 आणि तारांकित प्रश्न क्रमांक 13651 एकत्रित चर्चेला घेण्यात येतील.

अमरावती विभागात बोगस कृषी साहित्याचा

88 लाखांचा जप्त केलेला साठा

(9) * 14982 **श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अमरावती विभागात यवतमाळ, अकोला, अमरावती, बुलढाणा व वाशीम या जिल्ह्यामध्ये बोगस बियाण्यांची तसेच रासायनिक खतासह कीटकनाशक औषधांची माहे मे ते माहे ऑक्टोबर, 2005 दरम्यान बोगस विक्री केली जात असल्याने अशा प्रकारचा कृषि उत्पादनाच्या गुणनियंत्रण पथकाने 88 लाख रुपयांचा साठा जप्त केला हे खरे आहे काय,

(2) या प्रकरणी 57 आरोपींना अटक करण्यात आली हे खरे आहे काय,

(3) अटक करण्यात आलेल्या 57 आरोपींमध्ये शासकीय अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे काय,

(4) असल्यास, त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील, श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (1) अमरावती विभागात माहे मे ते ऑक्टोबर,2005 दरम्यान 90.66 लाख रक्कमेचे अनधिकृत बी.टी कापूस बियाणे, रु. 2.41 लाख रकमेचे अप्रमाणित/बनावट रासायनिक खत व रु. 0.61 लाख रकमेची बोगस किटकनाशके असा एकूण रु. 93.68 लाख रकमेचा साठा जप्त करण्यात आला आहे.

(2) सदर प्रकरणी अनधिकृत बी.टी. कापूस बियाणे संदर्भात 30, बनावट खताच्या संदर्भात 3 व बोगस किटकनाशकासंदर्भात 4 असे एकूण 37 आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(3) नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/ MAP/ SBT/

राज्यात नकली व अनधिकृत बी.टी. बियाणे विक्री करणाऱ्या

टोळीविरुध्द करण्यात येत असलेली कार्यवाही

(10) * 13651 **श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. श्रीकांत जोशी , श्रीमती कांता नलावडे , श्री.सागर मेघे , श्री. जगदिश गुप्ता : तारांकित प्रश्न क्रमांक 11115 ला दिनांक 14 डिसेंबर, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात नकली व अनधिकृत बी.टी. बियाणे विक्री करणाऱ्या एका टोळीला जून 2005 मध्ये अटक करण्यात आलेल्या 18 आरोपींची नावे काय आहेत व त्यांच्या विरुध्द जे गुन्हे दाखल झालेले आहेत त्याप्रमाणे त्यांना प्रत्यक्ष कोणती शिक्षा झालेली आहे,

(2) विक्री करणाऱ्या टोळीप्रमाणेच ज्या कंपन्याची ही बोगस बियाणे होती त्या कंपन्यांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(3) याबाबत कार्यवाही झाली नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(4) सदरहू कार्यवाही लवकरात लवकर केव्हा पूर्ण होणार आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील, श्री. बाळासाहेब थोरात यांच्यासाठी : (1) माहे जुन, 2005 मध्ये बुलढाणा पोलीसांनी अटक केल्या व्यक्तींची नावे पुढीलप्रमाणे आहेत :-

1) श्री. रमेश द. नवथळे, जळगांव जामोद, 2) डॉ. ज्ञानेश्वर मो. उमाळे, जळगांव जामोद, 3) श्री. अजय श्री. कटयारमल, अकोला, 4) श्री. राजेंद्र मा. चव्हाण, अकोला ,5) श्री. सुनिल व. चोपडे, अकोला, 6) श्री. संदिप ह. साबळे, कानशिवणी अकोला, 7) श्री. राजु रा. लोटे, पळसोबडे, अकोला, 8) श्री. संदिप शा. चौरसीया, अकोला, 9) श्री. अशोक कुमार जा. शुक्ला, अकोला, 10) श्री. अशोक वा. गांवडे, मांजरी अकोला, 11) श्री. आत्माराम ब. खांरोडे, अकोला, 12) श्री. दिनकर पा. लोणकर, सवदळा, अकोला, 13) श्री. भरत पटेल, पिंपळोद नंदूरबार, 14) श्री. प्रमोद कोंडीया स्वामी, साई सिडस नांदेड, 15) श्री. गजेंद्र काकडे, नारसिंगी नागपूर, 16) श्री. पांडूरंग आ. सहाणे, जालना, 17) श्री. विजयकुमार ज. पटेल, पुनियाद बडोदा, 18) श्री. जयदेवभाई बारोट, अहमदाबाद

सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र.13651 (पुढे सुरु....

(2) व (3) अनधिकृत बी.टी. कापूस बियाणेच्या जप्त करण्यात आलेल्या साठ्यावर उत्पादक कंपनीचे नाव व पत्ता इत्यादी बाबतचा तपशिल नियमानुसार छापलेला नव्हता तसेच सदरचा साठा राज्याबाहेऊन आलेला होता त्यामुळे कंपनीचा निश्चित तपास अद्याप लागलेला नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14982..... व ता. प्र. क्र. 13651 .....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ज्या 57 आरोपींना अटक केलेली आहे त्यांच्यावर कोणकोणत्या कलमाखाली कोणकोणते गुन्हे दाखल केलेले आहेत ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, 37 लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी 4 केसेसमध्ये सीड ॲक्टच्या अंतर्गत गुन्हे दाखल केले गेले. रासायनिक खताच्या संदर्भात जे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत त्याचा तपास सी.आय.डी.मार्फत चालू आहे. किटकनाशकांच्या बाबतीत पेस्टीसाईडस् कंट्रोल ॲक्टच्या माध्यमातून गुन्हे दाखल केलेले आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, बियाणांच्या बाबतीत सीड ॲक्टप्रमाणे गुन्हे दाखल केलेले आहेत. त्यासंदर्भात कोणती कारवाई करावयाची याबाबत त्या ॲक्टमध्ये बदल करणे अपेक्षित आहे. ते बियाणे बोगस आहे हे ठरविण्यासाठी कोणते निकष लावले ? आपण काही आरोपींना पकडले. जे मूळ उत्पादक आहेत त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, बीटी बियाणांच्या बाबतीत ज्यांना मान्यता दिलेली आहे त्या मान्यतेव्यतिरिक्त जे बीटी बियाणे राज्यामध्ये आले ते आपण पकडलेले आहे आणि ते पकडत असताना जे छापे टाकले त्या छाप्यामध्ये जे लोक सापडले त्या आरोपींना अटक केली. त्यामध्ये असेही आढळून आले की, हे बीटी बियाणे प्रामुख्याने गुजरातमधून आलेले आहे. म्हणून गुजरातमधून आरोपीला आणले. एक आरोपी फरारी आहे. एका आरोपीला पकडून आणले. त्याच्यावर कारवाई झाली. नंतर तो जामिनावर सुटला. यासंदर्भात कायदेशीर कारवाई चालू आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 13651 च्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, बीटी बियाणाची विक्री करणाऱ्या एका टोळीला अटक करण्यात आली. या ठिकाणी 18 आरोपींची नावे दिलेली आहेत. या 18 आरोपींच्या दुकानांमध्ये बोगस बीटी बियाणे पकडण्यात आले. दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, अनधिकृत बीटी कापूस बियाणेच्या जप्त करण्यात आलेल्या साठ्यावर उत्पादक कंपनीचे नाव व पत्ता नव्हता तसेच सदरचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

साठा राज्याबाहेरुन आलेला होता त्यामुळे कंपनीचा निश्चित तपास अद्याप लागलेला नाही. ज्या अर्थी या राज्यातील दुकानामध्ये ते बियाणे विक्रीला आले त्या अर्थी ते कोठून तरी या दुकानांमध्ये विक्रीला आले. आपण पोलीस कारवाई केली. ज्या दुकानदारांवर आपण पोलीस कारवाई केली त्यांचे परवाने शासनाने रद्द केले आहेत काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अनधिकृत बीटी बियाणे विकले जात आहे अशी माहिती ज्यावेळी मिळाली त्यावेळी ते बियाणे दुकानांमध्ये सापडले नाही. ते बियाणे खाजगी घरांमध्ये सापडले. त्यांना अटक केली. त्याबाबतीत पोलीस कारवाई सुरु केली. ते बियाणे कोठून आणले याचा शोध घेण्यात आला. नंतर असे लक्षात आले की, गुजरातमध्ये काही ठिकाणी ते बियाणे तयार होते. आपले पोलीस गुजरातमध्ये गेले. एका व्यापाऱ्याला अटक केली. हे बियाणे दुकानांमध्ये सापडले नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : हे 18 आरोपी दुकानदार नाहीत काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : पहिला एक आरोपी जो सापडला तो तर व्यवसायाने डॉक्टर आहे. दुसरा एक आरोपी व्यापारी आहे. प्रमुख जे आरोपी सापडले त्यानुसार या आरोपींची एक साखळी आहे. ज्यांनी ज्यांनी असे बियाणे नेले असे जे लोक सापडले त्यातील काही लोक दुकानदार आहेत. त्यांचे लायसन्स सस्पेंड केलेले आहे.

डॉ. एन. पी. हिराणी : सभापती महोदय, शेतकऱ्यांना नकली बियाणे मिळणे ही खरोखरच अत्यंत गंभीर बाब झालेली आहे. बीटी बियाणे मार्केटमध्ये आले ते शेतकऱ्यांना वरदान ठरेल अशी अपेक्षा होती आणि ते बियाणे खरोखरच वरदान आहे. शेतकऱ्यांना निसर्गाने व्यवस्थित साथ दिली तर त्या बियाणामुळे तिप्पट पीक येते. नकली बियाणे मार्केटमध्ये यावयास लागले तर त्या शेतकऱ्यांनी आता काय करावयाचे ? बीटी बियाणे हे टर्मिनेटर बियाणे आहे. एकाच वर्षात ते बियाणे लावावे लागते. दुसऱ्या वर्षी त्या बियाणाचा असर होत नाही. याबाबतीत सध्या प्रचलित असलेले जे कायदे आहेत ते या नकली मालाला मार्केटमध्ये येण्यापासून थांबवत नाहीत.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तर हा कायदा जास्त कडक करुन याबाबतीत शासन लवकरात लवकर उपाययोजना करील काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : कंपनी ॲक्टमध्ये बदल करण्याचे अधिकार केन्द्र सरकारला आहेत. त्यासंदर्भात आपण केन्द्र सरकारला काही सूचना केलेल्या आहे. बी.टी.बियाण्याची विक्री करण्याच्या बाबतीत आपण काही कंपन्यांना मान्यता दिलेली आहे. हे अनधिकृत बी.टी.बियाणे वेगवेगळया मार्गाने गुजरात राज्यातून येते. हे अनधिकृत बी.टी.बियाणे वापरु नये याबाबतीत शेतक-यांमध्ये जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न शासनाने केलेला असून राज्यातील 184 लोकांना बियाणे विकतांना पकडले. तसेच 52 अरोपींना अटक सुध्दा करण्यात आलेली आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कु. तेजस्विनी सांवत हिचे अपूर्व क्रीडा यशाबाबत अभिनंदन

श्री. विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : ऑस्ट्रेलिया येथील मेलबर्नमध्ये नुकत्याच संपलेल्या अठराव्या राष्ट्रकुल स्पर्धेत कोल्हापूर येथील कु. तेजस्वीनी सावंत हिने 10 मीटर एअर रायफल स्पर्धेत एक आणि सांघिक स्पर्धेत एक अशी दोन सुवर्णपदके प्राप्त केली आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन या खेळाडूने हे यश मिळविलेले आहे. तिच्या या अपूर्व यशाबद्दल राज्य शासनातर्फे तिला मुख्यमंत्री निधीतून पाच लाख रुपयाचे पारितोषिक देण्यात येईल. तसेच तिला कोल्हापूर येथे नागरी जमीन कमाल धारणा कायद्यांतर्गत मुख्यमंत्र्यांच्या स्वेच्छाधिकरातून एक सदनिका देण्यात येईल. या सदनिकेच्या खरेदीसाठी येणारा संपूर्ण खर्चसुध्दा शासन करील.

कु. तेजस्विनी सावंत हिने जे यश मिळविले आहे त्याबद्दल या अधीच मी तिचे अभिनंदन केले आहे. या निमित्त पुन्हा एकदा संपूर्ण राज्याच्यावतीने कु. तेजस्विनीचे अभिनंदन करुन तिला भविष्यातील यशासाठी शुभेच्छा देत आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : कु. तेजस्विनी सावंत हिला 5 लाख रु.चे बक्षिस दिल्याबद्दल मी शासनाने अभिनंदन करतो. कु. तेजस्विनी सावंत हिने ॲम्यूनेशनचा कोटा वाढवून देण्याची विनंती केलेली आहे. तो कोटा तिला वाढवून दिला तर त्याचा उपयोग तिला पुढच्या यशासाठी होऊ शकेल. तिला उद्या पंजाब येथे ट्रेनिंगला जावयाचे आहे.

श्री. आर.आर.पाटील : तीन दिवसापूर्वीच हा कोटा वाढवून देण्यात आलेला असून भारतभर वापरता येईल असा शस्त्रपरवाना दिलेला आहे.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेतक-यांच्या आत्महत्येबाबत

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 1) श्री. किशोर शामराव कडू, राहाणार देवधरी, ता.घाटंजी, जिल्हा यवतमाळ 2) श्री. गंगाधर गोमाजी रेवतकर, वॉर्ड क्रमांक 4, नरखेड, जिल्हा नागपूर आणि 3) श्री. शिवाजी शंकर चाटे, केतनवाडी, ता.जि.बीड या तीन शेतक-यांनी काल आत्महत्या केलेल्या आहेत. आत्महत्या करणा-यांची एकूण संख्या 423.

...4..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत

डॉ. अशोक मोडक : आमदार निवासातील कक्षसेवकांच्य प्रश्नाकडे. मी माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधित आहे. 5 ऑक्टोबर 2005 या दिवशी माननीय मंत्रीमहोदय श्री.छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली 508 कक्षसेवकांची गा-हाणी ऐकण्यात आली आणि त्यांना न्याय मिळाला. 94 कर्मचा-यांना पुन्हा कामावर घेण्याचे ठरविण्यात आले. परंतु माझी माहिती अशी आहे की, त्या 94 कर्मचा-यांना डावलून भाई-भतिजा वाद चाललेला आहे. जे कक्षसेवक गेली 10-12 वर्षे आमदार निवासामध्ये काम करण्यासाठी येतात त्यांना डावलून इतरांना घेण्यात आलेले आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, उर्वरित काळात त्यांना काम मिळाले नाही तर भविष्यात त्यांना कधीच काम मिळणार नाही. म्हणून याबाबतीत आपण लक्ष द्यावे.

--

...नंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या दृष्टीने एक अत्यंत महत्वाचा प्रश्न मी औचित्याच्या मुद्याद्वारे उपस्थित करु इच्छितो. वर्तमानपत्रामध्ये आणि विशेषत: आमच्या जिल्हयातील वर्तमानपत्रमाध्ये नुकतीच एक बातमी आली आहे त्यामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्राचे 80 टीमएसी पाणी परराज्यात जाणार आहे. त्यानंतर अनेक लोक मला भेटण्यासाठी आले होते. या राज्यातील 80 टीएमसी पाणी इतर राज्याला जाणार या बातमीने लोकांच्या मनामध्ये प्रकोप निर्माण झालेला आहे. कृष्णा खोऱ्यातील पाण्याचा विचार केला तर जवळजवळ आतापर्यंत या खोऱ्यातील कामांसाठी 18 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च झालेला आहे आणि त्या भागातील योजनाही पूर्ण झालेल्या नाहीत. अशा परिस्थितीत हे पाणी इतर राज्याला जर जाणार असेल तर हे प्रकल्प पूर्ण होणार नाहीत आणि राज्याला महसूल सुध्दा मिळणार नाही. यासंदर्भात शासन काय करणार आहे असा माझा प्रश्न आहे. यासंदर्भात निश्चित धोरण शासनाने सभागृहामध्ये निवेदनाद्वारे जाहीर करावे अशी मी शासनाला या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. मुंबईमध्ये लॅक्मेतर्फे जो फॅशन शो झाला त्याबाबतीत शासनाने काल खुलासा केला. हा खुलासा सभागृहाची दिशाभूल करणारा आहे. सगळी चौकशी केली आणि पोलिसांचा रिपोर्ट घेतला असे शासनाने सांगितले." केवळ सरकले आणि टरकले" अशा प्रकारची चौकशी झाली. याबाबतीत पूर्ण चौकशी झालेली नाही. ज्या दोन मॉडेल्सच्या बाबतीत हा प्रकार घडला त्या परदेशात गेलेल्या आहेत. सरकारला ही चौकशी करण्याची एवढी घाई कशासाठी होती ? दोन दिवस थांबले असते तर काय बिघडणार होते ? मॉडेल्सना बोलावून घेऊन चौकशी करता आली असती. आपले सरकार आणि पोलीस जगाच्या पाठीवरील कोणत्याही व्यक्तीला चौकशीसाठी बोलावू शकते. त्या मॉडेल्सना फोन केले असे उपमुख्यमंत्री सांगत आहेत. टेलिफोनवरुन चौकशीची पध्दत पोलिसांनी केव्हापासून सुरु केली आहे ? त्या मॉडेल्सचे नंबर कसे मिळाले ? टेलिफोनवरुन केलेल्या चौकशीवर सरकारने विश्वास कसा ठेवला ? ज्या लॅक्मे कंपनीने हा फॅशन शो आयोजित केला होता त्या कंपनीची चौकशी केली काय ? ती झालेली नाही असे माझे मत आहे. जो ड्रेस पुढून सरकला आणि पाठिमागून टरकला त्याची पाहणी केली काय ? ड्रेसला मानेवर गाठ मारली असताना ती गाठ कशी काय सुटू शकेल ? असे होणे शक्यच नाही. चेनची जीप खालून वर येते वरुन खाली येत नाही. या दोन्ही ड्रेसची तपासणी केली नाही आणि संबंधित लोकांना विचारले

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर ..

नाही. बॅकस्टेजवरील लोकांची चौकशी केली. पण त्यांना काहीच दिसलेले नाही मग त्यांची चौकशी कशासाठी केली ? अशा प्रकरणांमध्ये 24 तासांच्या आत अहवाल घेण्याइतपत पोलीस खाते सतर्क कधीपासून झाले ? म्हणून मला म्हणावयाचे आहे की, या प्रकरणाची चौकशी झालेली नाही. गृहमंत्र्यांनी जो खुलासा केला आहे तो सदनाची दिशाभूल करणारा आहे. त्यांच्यावर प्रेशर आले आणि पोलिसांनी सांगितल्यानुसार अहवाल दिला आहे. केवळ "सरकले आणि टरकले" एवढयापुरता हा विषय नाही.संस्कृती वाईट आहे. कोणीही तक्रार केली नाही म्हणून कारवाई केली नाही असे शासनाने सांगितले. जनतेमध्ये या विषयी काय प्रतिक्रिया उमटली आहे हे माहीत असताना पोस्टकार्ड पाठवून शासनाकडे तक्रार करावयाची काय ? कोण तक्रार करणार आणि कशाची तक्रार करणार ? अशा प्रकरणांबाबत लोक तक्रार करणे शक्य नाही. कारण असा फॅशन शो बघायला जाणारे आंबटशौकिन असतात ते तक्रार करणार नाहीत. माझी शासनाला विनंती आहे की, याची पुन्हा एकदा चौकशी करावी. आवश्यकता असेल तर मी याबाबतीत अधिक माहिती पुरवीन. म्हणून या प्रकरणाची पुन्हा चौकशी करुन सुधारित उत्तर द्या. शासनाची कोणीतरी फसवणूक केलेली आणि त्यातून सभागृहाची दिशाभूल झालेली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती : ज्या माननीय सदस्यांनी माझ्या दालनात येऊन सभागृहात औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी मागितली त्यांनाच मी येथे औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी देणार आहे. माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापासी नाही

(सभागृहातील महिला सदस्या बोलण्याची परवानगी मागतात.)

सभापती : सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी आपला मुद्दा मांडतांना काल सभागृहात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जे निवेदन केले ते त्यांना अपुरे वाटत आहे. म्हणून त्यांनी शासनाला या प्रकरणाची सखोल चौकशी करणे आवश्यक आहे, अशी मागणी केली. मी देखील माननीय उप मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, जेणेकरुन अशा प्रकारची अश्लिलता यापुढे होणार नाही.

(माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे बोलत असतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, सभागृहात चारच महिला सदस्या आहेत व त्या सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी जो मुद्दा मांडला त्या मुद्दयाच्या समर्थनार्थच आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न करीत आहेत.

सभापती : माननीय सदस्या डॉ. नीलमताई यांनी कृपया खाली बसावे. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना निदेश दिलेले आहेत त्या अनुषंगाने शासन या प्रकरणाची पुन्हा सखोल चौकशी करणार. म्हणून ज्या सन्माननीय सदस्यांनी औचित्याचे मुद्दे मांडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे त्यांनाच प्रथम मी परवानगी देणार आहे, त्यानंतर आपल्याला एक एक मिनिट बोलण्यासाठी परवानगी देईन.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्दयासंबंधी.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मार्च, 2000 पासून माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकेत्तर पदांची भरती करण्यावर शासनाने बंदी घातलेली आहे. त्यानंतर दिनांक 21 नोव्हेंबर, 2004 रोजी शासनाने एक जी.आर. काढला पण तो जी.आर. रद्द करण्यात आला. त्यानंतर 25 नोव्हेंबर, 2005 रोजी जो जी.आर. काढण्यात आला तो देखील रद्द केला. हिवाळी अधिवेशनामध्ये आम्ही यासंबंधीची चर्चा दरवर्षी करतो आणि शासन नवीन निर्णय घेते पण अद्यापही या जागा भरण्याच्या बाबतीत कुठलाही विचार शासनाने केलेला दिसत नाही. दिनांक 23 मार्च रोजी मा. शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात एक आश्वासन दिलेले आहे की, मागासवर्गीयांची भरती करण्यामध्ये कुठलीही अडचण नाही पण प्रत्यक्षात जागा भरण्यावर जर बंदी आहे तर ही भरती की करणार ? म्हणून यासंदर्भात चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत शासनाला निदेश द्यावेत, अशी माझी विनंती आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये गेली अनेक वर्षे परंपरेने चालत आलेल्या बैलगाडयांच्या शर्यतीवर अचानक भारतीय जीव-जंतू कल्याण बोर्डाने हरकत घेतल्यामुळे बंदी आणली तसेच शासनाच्या पशुसंवर्धन खात्याने देखील या शर्यतींवर बंदी आणल्यामुळे राज्यातील विशेषत: आमच्या अलिबाग जिल्हयातील शेतकरी या शर्यतीपासून वंचित होण्याची शक्यता आहे. आमच्या जिल्हयातील हया बैलगाडयांच्या शर्यती वैशिष्टयपूर्ण आहेत. म्हणून ही बंदी शासन उठविणार काय ? त्याचप्रमाणे या बैलगाडयांच्या शर्यती शासनाने पुन्हा चालू कराव्यात. तसेच त्यांच्यावर शासनाच्या वतीने ज्या केसेस घालण्यात आल्या आहेत, त्या केसेस देखील शासनाने काढाव्यात असे निदेश शासनाला व्हावेत, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जीव जंतू कल्याण बोर्डाने राज्य सरकारला कळविल्यानंतर बैलगाडीच्या शर्यतीवर बंदी घालण्यात आली होती. आता केवळ बैलाच्या झुंजीला बंदी आहे. बैलगाडीच्या शर्यतीला बंदी नाही. त्यामुळे राज्यामध्ये शर्यत घेता येईल. शक्यतो बैलांना मारू नये. याबाबतची दक्षता सर्वांनी घेतली पाहिजे. बैलगाडी शर्यतीसंबंधी ज्या शेतकऱ्यांच्या विरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, खटले दाखल करण्यात आले आहेत, ते मागे घेण्यात येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभापती महोदय, चार तारखेपासून शिवसेनेचे खासदार सन्माननीय सदस्य श्री.एकनाथ ठाकूर यांच्या नेतृत्त्वाखाली जकात निर्मूलन समितीने आझाद मैदान, मुंबई येथे उपोषणाला आणि आंदोलनाला सुरूवात केली आहे. राज्यातील जकात कर पूर्णपणे बंद करण्यात यावा अशी या आंदोलक व्यापाऱ्यांची मागणी आहे. व्हॅट लागू झाल्यानंतर जकात कर रद्द करण्यात येईल असे सन्माननीय वित्त मंत्र्यांनी सूतोवाच केले होते. केंद्राकडून आलेल्या महसूली नुकसानीच्या प्रमाणात जास्तीत जास्त परतावा मिळणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. जकात कर व व्हॅट या दोघांचा परिणाम व्यापाऱ्यांच्या धंद्यावर होत आहे. 4 तारखेपासून महाराष्ट्रातील व्यापारी आमरण उपोषणाला बसले आहेत. तेव्हा यासंबंधी शासनाने तातडीने निर्णय घेतला पाहिजे. सदर आंदोलन थांबविले पाहिजे. अन्यथा राज्यातील व्यापाऱ्यांचे व्यवहार बंद होतील. तेव्हा याबाबत आपण शासनाला निदेश दिले तर ते अधिक चांगले होईल.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, आझाद मैदान येथे गेल्या 2 दिवसांपासून 80 व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांची प्रकृती खालावलेली आहे. जकात कर रद्द करण्याची बाब गेल्या तीन महिन्यापासून त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. तेव्हा यासंबंधी शासनाने ठोस भूमिका घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे. ही राज्याच्या दृष्टीने गंभीर बाब आहे.

सभापती : संसदीय कामकाज मंत्र्यांनी याची नोंद घ्यावी व संबंधित विभागाच्या मंत्रिमहोदयांशी संपर्क साधून ही बाब निदर्शास आणावी. तसेच यासंबंधी लवकरात लवकर निर्णय होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावा.

श्री.हर्षवर्धन पाटील : होय. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, सहकार विभाग की तरफ से 20 करोड़ रुपये की अंदाज पत्रकीय तरतूद के संबंध में सहकार विभाग ने 9 साखर कारखानों को भाग भांडवल मंजूर किया है और यह मामला 21 मार्च को वित्त विभाग के पास भेजा है लेकिन टॅक्नीकल कारण से वित्त विभाग की ओर से यह राशि मंजूर नहीं हुई है. इसलिए इन 9 साखर कारखानों को शासकीय भाग भांडवल तत्काल मंजूर किया जाए, ऐसा मेरा अनुरोध है.

सभापति महोदय, दूसरी बात यह है कि, आज कल दूरदर्शन पर कुछ टी.वी. चॅनल अश्लील प्रसारण कर रहे हैं. दो दिन पहले लॅक्मे फॅशन शो में एक मॉडेल युवती के शरीर पर से ड्रेस फिसल गया था. इस घटना का प्रसारण बार बार किया जा रहा है. इस घटना की अश्लील क्लिप्स बार बार दिखाई जा रही है. अश्लील प्रसारण प्रतिबंध संबंधी कानून होने के बावजूद भी अश्लील प्रसारण किया जा रहा है. इसलिए इस घटना की जांच की जाए और अश्लील प्रसारण प्रतिबंध कानून के अन्तर्गत कठोर कदम उठाए जाए.

सभापती : सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी सहकारी साखर कारखान्यांना पैसे मिळण्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. याबाबत संबंधित मंत्रिमहोदयांना लक्ष घालण्यास सांगवे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : होय.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, लॅक्मे फॅशन-शो मध्ये वस्त्र घसरणे, टरकणे, फाटणे असा जो काही प्रकार झाला त्या संदर्भात तीन दिवसांपूर्वी सभागृहात मुद्दा उपस्थित झाला होता. आताही सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. काल ज्यावेळी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी या विषयाबाबत निवेदन केले त्यावेळी मी तालिका सभापती म्हणून चेअरमध्ये होते. त्यावेळी मी म्हटले होते की, वस्त्र घसरण्यासंदर्भात जी चौकशी झालेली आहे ती वरवर झालेली आहे असे वाटते. महोदय, वस्त्र घसरण्याबाबतच्या क्लिपींग्स् सतत टी.व्ही.चॅनेल्सद्वारे दाखविल्या जात आहेत. वास्तविक पाहता असे करणे ऑब्जेक्शनेबल आहे. त्यामुळे या प्रकरणी आयोजकांची सुध्दा चौकशी होणे आवश्यक आहे. त्यामुळे या संदर्भात आपण शासनाला आदेश द्यावेत एवढीच या औचित्त्याच्या मुद्याद्वारे विनंती करते.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, अत्यंत खळबळजनक आणि संतापजनक असा प्रकार काल लातूर शहरामध्ये दुपारी 1.00 वाजता घडलेला आहे. इयत्ता 10 मध्ये शिकणाऱ्या कु.स्वाती दत्तात्रय जोगदंड या मागासवर्गीय विद्यार्थीनीला पकडून न्हाव्याने बळजबरीने तिचे मुंडण केले. मुंडण करुन एकप्रकारे त्या मुलीवर आणि पर्यायाने मागासवर्गीयांवर अन्याय आणि अत्याचार करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणासंदर्भात कठोर कारवाई करण्याबाबत आपण शासनास निदेश द्यावेत एवढीच या औचित्त्याच्या मुद्याद्वारे मागणी करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, लॅक्मे फॅशन-शो मध्ये कपडे घसरण्याचा जो काही प्रकार घडला आहे तो एक अपघात होता असे सांगितले जात आहे. मी विचारु इच्छिते की, तो अपघात कसा असू शकेल ? कारण असा शो होण्यापूर्वी अनेकदा रिअर्सल होत असते. कारण ज्यावेळी त्या मुलीने कॅट-वॉक साठी एंट्री केली त्यावेळी तिच्या खांद्यावर शॉल होती. एंट्री केल्यानंतर ती शॉल पाडली जाते, त्यामुळे माझ्या मते हा अपघात नसावा. या संदर्भात शासनाने जी चौकशी केली आहे ती केवळ वरवर केलेली आहे. माझी या औचित्त्याच्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी.

तसेच या फॅशन-शो च्या माध्यमातून जो काही कपडे घसरण्याचा प्रकार घडलेला आहे तो झी आणि एम. टी.व्ही. या चॅनेल्सद्वारे वारंवार दाखविला जात आहे. त्यामुळे अशा प्रकारचे प्रसारण करण्याचा प्रकार बंद व्हावा अशी या निमित्ताने मागणी करते.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री महोदयांनी काल फॅशन-शो मध्ये जो काही प्रकार घडला त्या बाबत सभागृहामध्ये निवेदन केले. मी सदनाला सांगू इच्छिते की, उच्च न्यायालय, मुंबई यांनी 2004 मध्ये निकाल दिला होता. त्यानुसार केबलवर जे अश्लिल प्रसारण होते ते रोखण्याची जबाबदारी, अश्लिलता प्रतिबंधक कायदा-1986 अन्वये राज्य सरकारवर आहे. केबल वाहिन्यांवरुन कोणकोणत्या गोष्टींचे प्रसारण होत आहे या बाबत विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. हा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारित आहे असे उत्तर पुरेसे नाही. फॅशन-शो मध्ये घडलेला प्रकार अपघात आहे की नाही, एवढयापुरता हा प्रश्न मर्यादित नाही. संयोजकांनी कायद्याच्या कलम 292 चा भंग केल्यामुळे त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. ज्यावेळी या प्रकरणाची चौकशी करण्यात आली त्यामध्ये हा मुद्दा घेतला गेला नाही. म्हणून चौकशी मध्ये हा मुद्दा घेण्यात यावा अशी मी मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या सभागृहातील सन्माननीय सदस्य निरनिराळया लोकोपयोगी कामांसाठी विविध ठिकाणी फंड देत असतात. मुंबईमध्ये महिला आणि लहान मुलांसाठी असलेल्या कामा अलब्लेस या प्रसिध्द रुग्णालयाला सभागृहातील सन्माननीय ज्येष्ठ सदस्य यांनी 2002 मध्ये फंड दिला होता. त्या निधीतून रुग्णालय परिसरामध्ये विश्रांती गृह बांधण्यात आले होते. त्या विश्रांती गृहाच्या कार्यक्रमाला मी सुध्दा उपस्थित होतो. त्या ठिकाणी अतिशय उत्कृष्ट अशा प्रकारचे विश्रांती गृह बांधण्यात आले होते. परंतु आता त्या विश्रांती गृहाला कुलूप लावण्यात आलेले आहे. ज्यावेळी आम्ही फंड देत असतो त्यातून लोकोपयोगी कामे घेऊन, त्या निधीचे चीज होणे आवश्यक असते. आजपर्यंत लोकांना विश्रांती गृहाची जी सेवा मिळत होती त्या सेवेपासून कामा अलब्लेस हॉस्पीटल आणि संबंधित अधिकारी वंचित ठेवत आहेत.

तसेच व्ही.एन.देसाई हॉस्पीटलला मी स्वत: दोन वर्षापूर्वी आमदार फंडातून 5 लाख रुपये आय.सी.सी.यू.ची मशिनरी खरेदी करण्यासाठी निधी दिला होता. याबाबत सभागृहामध्ये सुध्दा चर्चा झाली होती. परंतु त्या निधीचे युटीलायझेशन अद्यापपर्यंत झालेले नाही. दोन वर्षांपासून 5 लाख रुपये तसेच पडून आहेत. त्यामुळे याबाबत त्वरित चौकशी होणे आवश्यक आहे याबाबत मी या औचित्त्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

नंतर श्री.व्ही.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, वाडा तालुक्यातील 24 गावांमध्ये कोकाकोला कंपनीकडून पाण्याचा वापर मोठया प्रमाणात होत आहे यासंदर्भात मी लक्षवेधी दिली होती. परंतु मी आपणास विनंती केली होती की, मला महत्वाचे काम असल्यामुळे, तसेच सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई सुध्दा सभागृहामध्ये उपस्थित राहणार नव्हत्या. म्हणून आपण मला रजा द्यावी असे मी आपणास पत्र दिले होते, व ही लक्षवेधी 5 एप्रिल, 2006 रोजी घेण्यात यावी अशी विनंती केली होती. परंतु मी सभागृहामध्ये उपस्थित नसतांना लक्षवेधी पुकारण्यात आली व यासंदर्भात सदनातील काही सदस्यांनी आरोप केले, अपमानकारक अशी भाषणे केली. मागील काळात 16 एप्रिल, 2003 रोजी मी लक्षवेधी सूचना आली होती. त्याठिकाणचे स्थानिक आमदार सन्माननीय श्री. विष्णू सावरा व सन्माननीय खासदार श्री. वनगा यांनी सुध्दा वाडा येथील 24 गावांना यामुळे पाणी मिळत नाही असा प्रश्न उपस्थित केला होता. अशा प्रकारचे हे गंभीर प्रकरण असतांना या प्रश्नाला न्याय देण्यासाठी ही लक्षवेधी परत सदनामध्ये चर्चेला आली पाहिजे, मी उपस्थित नसल्याबाबत वर्तमानपत्रांनी प्रसिध्दी दिलेली आहे, जेव्हा चांगली कामे करण्यात येतात तेव्हा वर्तमानपत्राकडून प्रसिध्दी देण्यात येत नाही. म्हणून माझी मागणी आहे की हा विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे ही लक्षवेधी चर्चेसाठी घेण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ही लक्षवेधी पुढे ढकलण्याबाबत आपणास पत्र दिलेले होते अशा वेळी उपसभापती यांनी सभागृहामध्ये लक्षवेधी पुकारणे हे बरोबर नाही यामुळे मोठे प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे, आम्ही अहिंसेच्या मार्गाने काम करीत असतांना यापुढे आम्हाला अहिंसेचा मार्ग सोडावा लागेल काय व त्या शिवाय आमचे प्रश्न निकालात निघणार नाहीत काय असे वाटते.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी 3 एप्रिल, 2006 रोजी महत्वाच्या कामानिमित्त मला बाहेर जावे लागत असल्यामुळे आपण मला रजा द्यावी, व कोकाकोला कंपनीच्या संदर्भातील लक्षवेधी सूचना पुढे ढकलावी असे पत्र दिले होते. ही वस्तुस्थिती आहे. त्या लक्षवेधीसूचने समोर ही लक्षवेधी पुढे ढकलावी असे लिहीले होते, त्यानंतर कोणत्या परिस्थितीत ही लक्षवेधी आली यादृष्टीने विचार करुन नोंद घेतलेली आहे. आपण या ठिकाणी सूचना केली ती अत्यंत महत्वाची आहे या प्रश्नाच्या अनुषंगाने जी लक्षवेधी मांडली होती, यासाठी आपणास कोणत्या पध्दतीने न्याय देता येईल यादृष्टीने विचार करण्यात येईल, यासाठी आपण मला दालनात येऊन भेटावे, याबाबत आता मला काही सांगता येणार नाही. .....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ MHM/ SBT/ प्रथम श्री. बोर्डे.. 14:30

सभापती....

या ठिकाणी औचित्याच्या मुद्दांवर कधी नव्हते एवढे औचित्य मांडलेले आहे, मी विधानमंडळाच्या अधिकाऱ्यांना सांगू इच्छितो की, आता जे औचित्यांचे मुद्दे मांडलेले आहेत ते त्या त्या मंत्रीमहोदयांकडे पोहचतील अशी व्यवस्था करण्यात यावी. माननीय मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांना सांगू इच्छितो की, यासंदर्भात आपण संबंधित मंत्री महोदयांना सांगावे की, अत्यंत महत्वाच्या विषयाच्या अनुषंगाने हे औचित्याचे मुद्दें मांडलेले आहेत. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी लॅक्मे फॅशन शोच्या संदर्भातील मुद्दा मांडला तो अत्यंत महत्वाचा आहे. एकंदरीत गृहविभागाच्या दृष्टीने यासंदर्भात कठोर पावले उचलली जाणे अत्यंत आवश्यक आहे. या संदर्भातील भावना उपमुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित असतांना मी त्यांना निदेश दिलेले आहेत. या प्रकरणाबाबत सखोल चौकशी करण्यास मी सांगितले आहे. औचित्याच्या मुद्यांच्या संदर्भात कठोर बंधन पाळणे आवश्यक आहे त्यासाठी सभागृह सुरु होण्याच्या एक तास अगोदर माझ्या दालनामध्ये औचित्याचे मुद्दे आणून द्यावेत तेच मुद्दे सभागृहात मांडता येतील, त्यानंतर आलेला कोणताही औचित्याचा मुद्दा सभागृहात मांडता येणार नाही. आता यासंदर्भात कृपया कोणी बोलू नये मी निर्देश दिलेले आहेत, विधानमंडळामार्फत त्या त्या विभागांना औचित्यांच्या मुद्दयांच्या संदर्भात कार्यवाहीसाठी कळविण्यात येईल, त्यादृष्टीने सन्माननीय मंत्री महोदय कार्यवाही करतील. व तसे यासंदर्भात सर्व मंत्री महोदयांना कळविण्यात यावे.

यानंतर श्री. सांगळे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ.सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादितचा सन 2003-2004 चा चौतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा सन 2003-2004 चा प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने राज्य सार्वजनिक उपक्रमांचे कार्य (2004-2005) हा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील (उर्जा मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा सन 2003-2004 चा वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन 2004-2005 चा वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे, यांनी "मार्च, 2006 च्या पहिल्या आठवडयात वा त्या सुमारास वेंगुर्ले, देवगड, मालवण तालुक्यांतील (जि.सिंधुदुर्ग) मच्छिमारांचे केंड माशांच्या धाडीने झालेले मोठया प्रमाणावर नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबतीत शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील तहसील कार्यालयासमोर कोपरगाव, सिन्नर, राहाता व संगमनेर या चार तालुक्यांतील 80 कुक्कुटपालन व्यावसायिक शेतकरी दि.3 एप्रिल, 2006 पासून आमरण उपोषणास बसलेले असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबतीत शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी, यांनी "दि. 4 एप्रिल, 2006 पासून शिवसेनेचे खासदार श्री.एकनाथ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र जकात निर्मूलन समितीने आझाद मैदानात सुरु केलेले उपोषण व धरणे आंदोलन" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबतीत शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "राज्य शासनाने महसूल वाढीसाठी दारुचे नवे परवाने जारी करण्याचे धोरण राबविण्याचा घेतलेला निर्णय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबतीत शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती .....

त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.विनोद तावडे, अरविंद सावंत, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, गुरुमुख जगवानी व इतर वि.प.स. यांनी "दि.28 मार्च, 2006 रोजी कल्याण बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी जळगांवमधून येणा-या ट्रकमधून 4 किलो सोने व 3 कोटी रुपये रोकड हस्तगत करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबतीत शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत व इतर वि.प.स. यांनी "ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील दुर्गम भागात गेल्या पंधरवडयात पाच बालके कुपोषणामुळे मृत्यूमुखी पडल्याची धक्कादायक माहिती उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबतीत शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, डॉ.नीलम गो-हे व इतर वि.प.स. यांनी "दि. 4 एप्रिल, 2006 रोजी लातूर शहरातील यशवंत विद्यालयात शिकणा-या कु.स्वाती दत्तात्रय जोगदंड या मागासवर्गीय विद्यार्थीनीचे केशकर्तनकार सूर्यकांत शिवराज चिखलीकर यांनी आपल्या साथीदारांच्या मदतीने केलेले मुंडण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबतीत शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू. डायगव्हाणे, वि.प.स. यांनी "राज्यातील आदिवासी नक्षलग्रस्त अति संवेदनशील क्षेत्रात काम करणा-या खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक कर्मचारी यांना शासनाच्या निर्णयानुसार भाडे माफ निवासस्थान सुविधा व एकस्तर पदोन्नती योजना लागू न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबतीत शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण या ठिकाणी आम्ही दिलेल्या नियम 93 खालील सूचनांवर शासनाने निवेदन करावे असे आदेश देत आहात. परंतु अशी अनेक निवेदने अजून शासनाकडून यावयाची आहेत. 22 मार्चला आम्ही दिलेल्या नियम 93 च्या सुचनेवर आपण शासनास निवेदन करण्यास सांगितले होते पण अजूनही त्यावरील निवेदन करण्यात आलेले नाही आणि मग असे होते की, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी एकदम एकगठ्ठा निवेदने दिली जातात आणि त्यामुळे त्यावर प्रश्नोत्तरे होऊन आम्हाला अधिक माहिती वा खुलासा शासनाकडून करून घेता येऊ शकत नाही. तेव्हा आपण निवेदनाचे आदेश दिल्यानंतर एक आठवड्याच्या आत निवेदन सभागृहात झाले पाहिजे असे बंधन घातले व त्या दृष्टीने आदेश दिले तर बरे होईल.

सभापती : मी या संदर्भात अशा सूचना दिल्या आहेत की, दररोज साधारणपणे 7 निवेदने सभागृहात यावीत. परंतु त्यापेक्षा काही जास्त निवेदने शासनाकडून आमच्या कार्यालयाकडे आलेली आहेत. तेव्हा दररोज 7 ऐवजी 8 किंवा 9 निवेदने सभागृहामध्ये केली गेली तर मग ही अडचण येणार नाही. तेव्हा कामाचे नियोजन म्हणून सध्या सभागृहामध्ये 7 निवेदने होत आहेत त्या ऐवजी 8 किंवा 9 निवेदने यापुढे घेतली गेल्यास अडचण येणार नाही. तरी त्याप्रमाणे कार्यवाही होईल.

आता यानंतर नियम 93 खालील निवेदने शासनाकडून केली जातील.

****

..... एएए 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : तुरंबाडी (ता.म्हसळा,जि.रायगड) येथे तसेच मुंबई शहरात झालेली गॅस्ट्रोची लागण.

मु. शी. : तुरंबाडी (ता.म्हसळा,जि.रायगड) येथे तसेच मुंबई शहरात झालेली गॅस्ट्रोची लागण याबाबत श्री.अनंत तरे, डॉ.दीपक सावंत, श्री.विलास अवचट, श्री.अरविंद सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, श्री.सुरेश जेथलिया, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे, डॉ.दीपक सावंत, श्री.विलास अवचट, श्री.अरविंद सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, श्री.सुरेश जेथलिया यांनी " तुरंबाडी (ता.म्हसळा,जि.रायगड) येथे तसेच मुंबई शहरात झालेली गॅस्ट्रोची लागण " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(नियम 93 खाली मा.आरोग्य राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये सांगितले आहे की, रायगड जिल्ह्यातील म्हसाळा तालुक्यातील तुरंबाडी येथे गॅस्ट्रोची लागण झाल्याचे समजताच मुख्य आरोग्य अधिकारी तेथे गेले. त्यानंतर जानेवारी, फेब्रुवारी मध्ये तेथील पाण्याचे नमुने घेऊन तपासण्यात आले असता ते पाणी पिण्यासाठी लायक नाही, ते अशुद्ध पाणी आहे असे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. सभापती महोदय, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी असे स्पष्टपणे सांगितले असताना देखील गावकऱ्यांना गावातील ते पाणी पिण्यास प्रतिबंध का केला नाही किंवा त्यांना पिण्याचे शुद्ध पाणी पुरविण्याची व्यवस्था का करण्यात आली नाही ?

(सभापतीस्थानी - माननीय उपसभापती)

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, तेथील पाण्याचे नमुने घेऊन ते तपासल्यानंतर ते पाणी अशुद्ध असल्याचे निष्पन्न झाल्यावर त्याची माहिती तेथील ग्रामसेवकाला दिली जाते. कारण क्लोरिनेशनचे काम ग्रामसेवकाचे असते. त्याप्रमाणे तेथील ग्रामसेवकाला याबाबत माहिती दिली गेली होती.

श्री. अनंत तरे : मग त्या ग्रामसेवकाने तेथील पाणी शुद्ध करण्याच्या दृष्टीने, क्लोरिनेशनच्या दृष्टीने काही केले नाही त्याबद्दल त्याचेवर काय कारवाई आपण केली आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, त्याच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. गावातील पिण्याच्या पाण्याचे क्लोरिनेशन करणे हे त्याचे कामच आहे, त्याच्या कर्तव्याचाच तो एक भाग आहे. ....

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, पण वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तेथील पाणी पिण्यास लायक नाही, ते अशुद्ध आहे असे आपल्याला कळविल्यानंतरही त्याबाबत कोणतीही खबरदारी न घेतल्यामुळे ते पाणी पिऊन लोकांना गॅस्ट्रोची लागण झाली ...

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, जेथे पिण्याचे पाणी पिण्यालायक नव्हते, दूषित पाणी होते तेथे पाण्याचे टँकर पाठवून शुद्ध पाणी देण्याची व्यवस्था आपण केलेली आहे आणि आताही तेथे नियमितपणे पिण्यालायक पाणी पुरवठा सुरू आहे.

..... 3ए 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या नियम 93 खालील सूचनेचे दोन भाग आहेत एक रायगड जिल्ह्यातील तुरंबाडी गावासंबंधात आहे आणि दुसरा भाग मुंबईमध्ये सुरू झालेल्या गॅस्ट्रोच्या साथी संबंधातील आहे. या ठिकाणी निवेदनामध्ये आपण सांगितले आहे की, दिनांक 13 मार्च ते 28 मार्च 2006 या कालावधीत गॅस्ट्रोची लागण झालेल्या एकूण 607 रूग्णांना विविध रूग्णालयात दाखल करून औषधोपचार करण्यात आले. सभापती महोदय, ही साथ नळ गळतीमुळे पाणी दूषित होऊन उद्‌भवली असल्याचेही या निवेदनात सांगण्यात आले आहे. या निवेदनात शेवटी आपण म्हटले आहे की, महापालिकेच्या आरोग्य विभागाने सदर परिसराचे सर्वेक्षण करण्याचे काम हाती घेतले असून क्लोरिनच्या गोळ्या आणि जलसंजीवनीची पाकिटे यांचे वितरण करण्यात आले आहे. सभापती महोदय, मुंबईमध्ये हे वारंवार होत आहे. मुंबई शहरातील नळजोडण्या आणि जलवाहिन्या या दोन्हीही अत्यंत जुन्या आहेत. तेव्हा त्याची पिरिऑडिकली सर्वेक्षण होणे आणि ते देखील सक्तीचे होण्याची गरज आहे. तरी त्या दृष्टीने आपण महापालिकेला निदेश द्याल काय ? तसेच इमारतीवरील पाण्याच्या टाक्या स्वच्छ करण्यासंबंधात देखील आपण महापालिकेला निर्देश देणार काय ?

श्री. रणजित कांबळे : तशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील.

(यानंतर श्री. सरफरे ..... 3बी 1...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पृ.शी. : वीजेच्या बिलाची थकबाकी न भरल्यामुळे खटाव मिलचा वीज पुरवठा खंडीत करणे

मु.शी. : वीजेच्या बिलाची थकबाकी न भरल्यामुळे खटाव मिलचा वीज पुरवठा खंडीत करणे याबाबत सर्वश्री. मधुकर चव्हाण, विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी "वीजेच्या बिलाची थकबाकी न भरल्यामुळे खटाव मिलचा वीज पुरवठा खंडीत करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या सभागृहामध्ये या विषयासंबंधी चार वेळा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. आणि माननीय मंत्री श्री. गणेश नाईक यांनी दोन वेळा उत्तर दिले होते. या गिरणीतील 7 हजार कामगारांना गेली दहा वर्षे पैसे मिळाले नाहीत. निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, "मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे गिरण्यांच्या जमिनीच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला असून मे. खटाव गिरणीच्या निर्णयामुळे गिरण्यांच्या जमिनीच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला असून" या वाक्याचा अर्थ मला समजला नाही. मंत्रिमहोदयांना निवेदनामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, उच्च न्यायालय ने मिल की जमीन विक्रय के लिए स्टे दिया था. लेकिन उच्चतम न्यायालय के 07.03.2006 के निर्णयानुसार यह स्टे उठा लिया गया है. A.A.I.F.R. अपिलेट अथॉरिटी ने रिवायव्हल की स्कीम बी.आय.एफ.आर.को रिवर्ट की है. अब यह मामला सबज्युडिश है.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, 7 हजार कामगार गेली दहा वर्षे देशोधडीला लागले आहेत आणि शासन उदासीनतेची भूमिका घेत आहे. या गिरणीच्या मालक श्रीमती पन्ना खटाव वेगवेगळी कारणे सांगत आहेत ते निवेदनामध्ये आले आहे. कामगारांना त्यांचे पैसे त्वरीत मिळण्यासाठी आपण कोणत्या प्रकारचा हस्तक्षेप करणार आहात? जोपर्यंत योग्य बाजार भाव मिळत नाही तोपर्यंत श्रीमती पन्ना खटाव एक इंच जमीन देखील विकणार नाहीत. कामगारांच्या कुटुंबाची अवस्था शासनाने पाहिली आहे कां? एक तरफ आपकी पार्टी कहती है कि " कॉग्रेस का हाथ आम आदमी के साथ, काँग्रेस का हाथ गरीब आदमी के साथ " और दूसरी तरफ शासन त्यांची सात वर्षापासून दखल घेत नाही. या लोकांची देणी त्यांना मिळण्यासाठी शासन हस्तक्षेप करुन कोणती कारवाई करणार आहे?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी यापूर्वी सांगितले आहे. मॅनेजमेंटने स्कीम रिवायव्हल केली आहे.इसमें सब की सहमति है. मान्यता प्राप्त युनियन और अमान्यता प्राप्त युनियन की सहमति प्राप्त होने के बाद यह मामला अपिलेट अथॉरिटी के पास गया और अपिलेट अथॉरिटी ने A.A.I.F.R.से कहा है कि वह इस मामले को जल्दी से जल्दी डिसाइड करें.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण म्हटले आहे की, मॅटर सबज्युडिस आहे. बी.आय.एफ.आर. कडे जाणे म्हणजे मॅटर सबज्युडिस आहे कां? सुप्रिम कोर्टाचा निर्णय हा एन.टी.सी.च्या गिरण्यांसंबंधी आला आहे? खटाव गिरणी एन.टी.सी. च्या अंतर्गत आहे कां? नसेल तर या गिरणीसाठी तो नियम लावू शकत नाही. तसेच, मॅटर सबज्युडिस आहे तरमग कोणत्या कोर्टामध्ये श्रीमती पन्ना खटावची केस चालू आहे ते सांगा?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, श्री तावडे जी वरिष्ठ सदस्य है इसलिए उनको यह पता होना चाहिए कि बी.आय.एफ.आर. एक ज्युडिशियल अथॉरिटी है. मॅनेजमेंट ने रिव्हायवल स्कीम युनियन की सहमति से बी.आय.एफ.आर. अपिलेट अथॉरिटी को दी थी. शासन इस मामले में गंभीर है.

.....

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्य ग्रंथ संचालनालयातील अधिकाऱ्यांनी पुस्तक खरेदीमध्ये केलेला लाखो रुपयांचा भ्रष्टाचार

मु.शी. : राज्य ग्रंथ संचालनालयातील अधिकाऱ्यांनी पुस्तक खरेदीमध्ये केलेल्या लाखो रुपयांच्या भ्रष्टाचाराबाबत सर्वश्री. विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, अशोक मोडक, श्रीमती कांता नलावडे, शरद पाटील, जयंत प्र. पाटील वि..प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे पाटील (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री . विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, अशोक मोडक, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री प्रा. शरद पाटील, जयंत प्र. पाटील यांनी "राज्य ग्रंथ संचालनालयातील अधिकाऱ्यांनी पुस्तक खरेदीमध्ये केलेला लाखो रुपयांचा भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन सादर करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ग्रंथालयांसाठी पुस्तके खरेदी केली जातात ती कोणत्या दर्जाची असतात हे पाहिले जात नाही. "तरस," "पारवा" अशी पुस्तके खरेदी केलेली आहेत. सभापती महोदय, पुस्तक खरेदीमध्ये भ्रष्टाचार उघडकीस आलेला आहे. माझे या संदर्भाने स्पेसिफिक 3 प्रश्न आहेत. ग्रंथालय संचालक, श्री.मेश्राम यांनी यामध्ये भ्रष्टाचार केलेला आहे, त्यांना निलंबित करणार आहात काय ? दुसरा प्रश्न असा की, प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे. ती मोठी अडचण आहे, त्या समितीची बैठकच होत नाही. सचिव महोदयांना पुस्तक वाचण्यासाठी वेळ नाही. तेव्हा त्याऐवजी तज्ज्ञांची समिती नेमण्यात येईल काय ? समितीची बैठक आतापर्यन्त झालेली नाही.

दुसरा प्रश्न असा की, राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान अंतर्गत सार्वजनिक ग्रंथालयासाठी ग्रंथ व इतर खरेदी साठी दीड कोटी रुपये दिले जातात. परंतु आपण 75 लाख रुपयेच घेतो. दीड कोटीची मर्यादा पूर्ण करण्यासाठी आपल्याकडून मॅचिंग ग्रॅन्ट दिली गेली पाहिजे. 75 लाख रुपयामध्ये जास्त पुस्तके घेण्याच्यादृष्टीने शासन आपले कॉन्ट्रीब्युशन वाढविण्याचा प्रयत्न करेल काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ग्रंथालय संचालनालयाअंतर्गत पुस्तक खरेदीसाठी मान्यता देणे किंवा त्यांना अनुदान देणे अशा अनेक कृतीच्या संदर्भात वारंवार राज्य शासनाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. राज्य सरकारकडे तक्रारी प्राप्त झाल्यानंतर राज्य सरकारने त्याची दखल घेऊन चौकशी करण्यासाठी समिती देखील नियुक्त करण्यात आलेली आहे. दरम्यानच्या काळामध्ये या सगळया गैरप्रकाराच्या स्वरुप वाढत असल्याच्या तक्रारी जसजशा शासनाकडे प्राप्त व्हायला लागज्ल्या तशा राज्य सरकारने क1 जून 205 रोजी संचालक ग्रंथालय यांची सर्व अधिकार काढून घेतले. त्यांनंतर राज्य सरकारने राज्यातल्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांना जी अनुदानित ग्रंथालये आहेत, ती जागेवर आहेत की नाहीत, त्या ठिकाणी पुस्तके आहेत की नाहीत, या संबंधीची चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत, दिनांक 27 फेब्रुवारी 2006 रोजी आदेश दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांचे पुस्तके ही सुमार दर्जाची खरेदी केलेली आहेत असे म्हणणे आहे. या संबंधात अनेक संस्थांकडून राज्य शासनाकडे निवेदने आलेली आहेत. म्हणून या कामामध्ये सहभागी असलेले श्री.बी.ए.सनान्से आणि श्री.तायडे या दोन कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या दिनांक 29 मार्च 2006 रोजी बदल्या करण्यात आलेल्या आहेत. संचालक, ग्रंथालय यांची देखील बदली करण्याबाबत राज्य सरकारने निर्णय घेतलेला आहे. त्यांच्यावर जे आरोप आहेत, त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु....

संदर्भात वेगळी कमिटी नेमण्यात आलेली असली तरी एकंदरित या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, अनुदान वाटप, ग्रंथालयाच्या श्रेणीमध्ये वाढ आणि पुस्तक खरेदी या तिन्ही बाबीच्या संदर्भात अधिक गांभीर्याने चौकशी करण्यात येणार असल्यामुळे ही चौकशी लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल. चौकशी अहवाल प्राप्त होताच संबंधितांविरुध्द कारवाई होईल. आवश्यकता वाटली तर ॲन्टी करप्शन ब्युरोकडे चौकशीचे काम सोपविले जाईल. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान अंतर्गत अनुदान मिळते, त्या संबंधातील मॅचिंग कॉन्ट्रीब्युशन वाढविण्याबाबत राज्य सरकारचा प्रयत्न आहे. हे कॉन्ट्रीब्युशन वाढवून दीड कोटीपर्यन्तची मर्यादा पूर्ण करण्याचा प्रयत्न होईल.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

तसेच प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली जी समिती आहे त्या समितीची फेररचना करुन तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात येईल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, 1 जून, 2005 पासून सर्व काम ठप्प झालेले दिसते. त्याचा उलट परिणाम होण्याचा धोका वाटतो. ग्रंथालय संचालकांचे नवीन सार्वजनिक ग्रंथालयांना मान्यता देण्याचे, दर्जा वाढ करण्याचे अधिकार काढून घेण्यात आलेले आहेत. या संचालकांकडे खरेदीचे अधिकार सिमित करण्यात आले होते. आता ते खरेदी करु शकत नाहीत. बोगस ग्रंथालयांना अनुदान देण्यासंबंधीचा अहवाल प्रतिक्षाधीन आहे. यासाठी एक वर्ष तरी लागेल. या सर्व गोष्टींचा परिणाम ग्रंथालय चळवळीच्या उत्कर्षावर होईल. सरकार याबाबतीत काही करणार आहे काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक साहेब जे सांगत आहेत त्यामध्ये थोडेसे तथ्य आहे. कारण ग्रंथालय सुरु करावयाचे म्हटले तर एखाद्या संस्थेने पुस्तके खरेदी करावयाची आणि ग्रंथालयाच्या रजिस्ट्रेशनसाठी अर्ज करावयाचा असे होत असते. आतापर्यंत कोणत्या ग्रंथालयाला मान्यता द्यावयाची, कोणाला किती अनुदान द्यावयाचे याबाबतीत मेकॅनिझम नव्हते. ही बाब राज्य शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर यामध्ये कोठे तरी मेकॅनिझम आले पाहिजे म्हणून संचालकांचे अधिकार काढून घेतले. या वर्षी 8 हजार पेक्षा जास्त अर्ज नवीन ग्रंथालय स्थापन करण्यासाठी राज्य सरकारकडे आलेले आहेत. म्हणजे राज्यात लोकांमध्ये अचानक वाचनाची एवढी आवड कशी काय निर्माण झाली ? एक एक व्यक्ती दहा दहा नवीन ग्रंथालये सुरु करण्याचे अर्ज घेऊन येतो. याबाबतीत संचालकांचे आणि संचालनालयाचे अधिकार काढलेले असले तरी यासंदर्भात राज्य सरकारच्या वतीने राज्याच्या अनुदानातून तरतूद करण्यापासून, छाननी करण्यापासून सर्व प्रोसेसिंग करण्यापर्यंत आणि प्रोसेसिंग फी लावण्यापर्यंत पारदर्शक अशी प्रक्रिया सुरु करण्याचा प्रयत्न विभागामध्ये केलेला आहे. ज्या वर्षी ज्या ग्रंथालयाला मान्यता देतो त्यावेळी प्रामुख्याने हे पैसे डीपीडीसीमधून उपलब्ध करुन दिले जातात. पहिली पाच वर्षे डीपीडीसीमधून तरतूद होते. नंतर नॉनप्लॅनमध्ये हे पैसे गेल्यानंतर पुढील भार राज्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

सरकारवर येतो. ग्रंथालयांसाठी अनुदानापोटी राज्य सरकारकडून 40 कोटी रुपये मिळतात. यावर्षी राज्य सरकारने नवीन प्रयोग करुन पाहिला. डीपीडीसीकडून येणाऱ्या अनुदानाव्यतिरिक्त राज्य सरकारच्या राज्यस्तरीय योजनेतून 40 लाख रुपयांची तरतूद केलेली होती. परंतु या सगळ्या गोष्टी निदर्शनास आल्यानंतर 31 मार्चच्या आदल्या दिवशी रात्री 40 लाख रुपये खर्च करुन कोणती तरी पुस्तके घेण्याऐवजी आणि कोणाला तरी मान्यता देण्याऐवजी राज्य सरकारने असा निर्णय घेतला की, सन 2005-06 या वर्षामध्ये ही प्रोसेस पूर्ण होईपर्यंत नवीन ग्रंथालयांना मान्यता देऊ नये. या वर्षी जे 40 लाख रुपये आपण राज्य सरकारच्या राज्यस्तरीय निधीतून उपलब्ध करुन दिले होते, त्याबाबत वर्तमानपत्रात बातमी आली होती, ते पैसे जरी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे वळविण्यात आले असले तरी जे.जे. कला महाविद्यालयाला, मुंबई, नागपूर आणि अन्य कला महाविद्यालयांना देण्याच्या संदर्भातील निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. येत्या तीन महिन्याच्या कालावधीत नवीन ग्रंथालयांना मान्यता देणे, श्रेणीच्या संदर्भात, प्रोसेसिंग करणे, भ्रष्टाचार निपटून काढणे, चौकशी पूर्ण करणे आणि दोषींविरुध्द कारवाई करणे ही संपूर्ण प्रक्रिया ठराविक कालावधीमध्ये केली जाईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, ग्रंथालय संचालकांनी ग्रंथ व इतर खरेदीमध्ये जो गैरकारभार केला त्यामध्ये ग्रंथ खरेदीचे संपूर्ण अधिकार केवळ ग्रंथालय संचालकांनाच होते की ग्रंथांची निवड करण्याकरिता शिफारस करण्यासाठी समिती होती ? जर अशी समिती असेल आणि त्या समितीने केलेल्या शिफारशीनुसार पुस्तके घेण्यात आली असतील तर त्या समितीमध्ये शिफारस करणारे जे सदस्य आहेत ते जबाबदार आहेत काय ? ग्रंथालय संचालक श्री. मेश्राम यांनाच ग्रंथ निवडण्याचे आणि खरेदी करण्याचे संपूर्ण अधिकार होते काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : होय. जोपर्यंत त्यांच्याकडील अधिकार काढण्यात आले नव्हते तोपर्यंत संपूर्ण अधिकार ग्रंथालय संचालकांना आणि ग्रंथालय संचालक यांनी नेमलेल्या कमिटीला होते. राज्य सरकारच्या वतीने त्यामध्ये काहीही हस्तक्षेप केला गेला नाही. यामध्ये आम्ही कधी काही पाहिले नाही. आपणा सगळ्यांची अशी अपेक्षा असते की, ज्यांचे त्याचे अधिकार ज्यांनी त्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

वापरले पाहिजेत. म्हणून यासंदर्भातील सगळे अधिकार त्यांना दिलेले होते. चौकशीमध्ये जे जे लोक जबाबदार आढळून येतील, त्यामध्ये जर ग्रंथालय संचालक जबाबदार आढळून आले, कमिटी जबाबदार आढळून आली किंवा मंत्रालयातील अधिकारी जबाबदार आढळून आले तरी कोणाचीही गय केली जाणार नाही. आवश्यकता असेल तर ॲन्टी करप्शन ब्युरोकडे ही चौकशी दिली जाईल. राज्यातील ग्रंथालये तपासण्याचे काम जिल्हाधिकाऱ्यांमार्फत आपण सुरु केलेले आहे. या ग्रंथालय चळवळीतील त्रुटी दूर करुन, दोष दूर करुन ही चळवळ आपल्याला पुढे घेऊन जावयाची आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.बरवड 15:00

पृ.शी. : मिडलस्कूल व प्राथमिक शाळांतील प्रशिक्षित अपदवीधर शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी मंजूर न करणे

मु.शी : मिडलस्कूल व प्राथमिक शाळांतील प्रशिक्षित अपदवीधर शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी मंजूर न करणे याबाबत श्री. व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते व गजेंद्र अैनापुरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री . व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते व गजेंद्र अैनापुरे, वि.प.स. यांनी " मिडलस्कूल व प्राथमिक शाळांतील प्रशिक्षित अपदवीधर शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी मंजूर न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2..

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, आपण अनेक वेळा शिक्षकांना संरक्षण दिलेले आहे. 8-10 वेळा हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. मिडलस्कूल व प्राथमिक शाळांतील प्रशिक्षित अपदवीधर शिक्षकांना केंद्रातील शिक्षकांप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी न देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सभापती महोदय, हा प्रश्न दिनांक 24 मार्चला सभागृहामध्ये उपस्थित झालेला होता. परंतु त्या दिवशी प्रश्नोत्तरे झाली नाहीत. 24 तारखेच्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, याबाबतीत मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार यथोचित आदेश काढण्यात येतील. आजच्या निवेदनामध्ये शेवटच्या दोन ओळींमध्ये असे नमूद केलेले आहे की, याबाबत वित्त विभागाने त्यांच्या दिनांक 27 फेब्रुवारी, 2006च्या शासननिर्णयान्वये आदेश निर्गमित केले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, मंत्रिमंडळाच्या कोणत्या तारखेच्या बैठकीमध्येय हा निर्णय घेण्यात आला ? तसेच हा निर्णय कोणत्या निकषावर घेतलेला आहे ? महाराष्ट्रातील सर्व संवर्गातील कर्मचा-यांना 5वा वेतन आयोग लागू केलेला आहे. फक्त मिडल स्कूल आणि प्राथमिक शाळांतील प्रशिक्षित शिक्षकांना हा वेतन आयोग लागू झालेला नाही. तेव्हा मंत्रिमंडळाच्या कोणत्या तारखेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आणि या शिक्षकांची मागणी अमान्य करण्यासाठी कोणते निकष लावण्यात आले ?

श्री. हसन मुश्रीफ : शासनाने अनेक संवर्गाच्या संदर्भात वेतन असमानता त्रुटी समिती नेमली होते. जेथे जेथे वेतनामध्ये असमानता आहे त्याबाबतीत या समितीने निर्णय घ्यावयाचा आहे. या समिती समोर राज्यातील 250 संवर्गाचे प्रस्ताव आले होते आणि त्यापैकी 44 संवर्गाना वेतन असमानता त्रुटी समितीने मान्यता दिली आणि बाकीचे प्रस्ताव नामजूर केले.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : मंत्रिमंडळाच्या कोणत्या तारखेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आणि कोणते निकष लावण्यात आले ?

श्री. हसन मुश्रीफ : वेतन असमानता त्रुटी समिती समोर हा प्रस्ताव गेला होता. 250 प्रस्तावांची वेतन असमानता त्रुटी समितीने छाननी केली आणि त्यापैकी 44 संवर्गाच्या संदर्भातील प्रस्ताव मंजूर केले.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : माननीय मंत्री महोदय या सभागृहामध्ये हजर राहात नाहीत आणि माननीय राज्यमंत्रीमहोदय हे गोलगोल उत्तर देत आहेत.

प्रा. बी.टी.देशमुख : मंत्रिमंडळाने कोणत्या तारखेला निर्णय घेतला ?

श्री. हसन मुश्रीफ : ती माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्याचे स्पष्टपणे सांगितलेले आहे. पण हा निर्णय केव्हा घेतला हे मात्र मंत्री महोदयांना सांगता येत नाही. दोन दिवसापूर्वी सभागृहामध्ये दिलेल्या निवेदनामध्ये असे सांगितलेले आहे की, मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार यथोचित आदेश निर्गमित करण्यात येतील. 27 फेब्रवारी 2006 रोजी शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले. तेव्हा मंत्रिमंडळाने कोणत्या तारखेच्या बैठकीत हा निर्णय घेतला आहे ? हा निर्णय घेण्यापूर्वी सर्क्युलर कसे काय इश्यू झाले ?

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, केंद्र शासनाच्या वेतनश्रेणीप्रमाणे परमनंट शिक्षकांना ती वेतनश्रेणी लागू करावी याबाबतचा प्रश्न अनेक वेळा या सभागृहामध्ये चर्चेला आला होता. त्यानंतर वेतन असमानता त्रुटी समितीने अहवाल तयार केला आणि त्या अहवालावर मंत्रिमंडळाने निर्णय घेतला. मंत्रिमंडळाच्या कोणत्या तारखेच्या बैठकीत हा निर्णय झाला त्याची माहिती मी पटलावर ठेवतो.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमंडळाच्या कोणत्या तारखेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला याची माहिती जाणून घेण्याचा आम्हांला अधिकार नाही काय ? मंत्र्यांना परस्पर विरोधी उत्तरे देण्याचा अधिकार आहे. त्यांना दोन प्रकारची उत्तरे देण्याचा अधिकार आहे काय ? तीन दिवसापूर्वी सभागृहात उत्तर दिले होते की मंत्रिमंडळाचा निर्णय झाल्यावर यथोचित आदेश निर्गमित करण्यात येतील आणि आज उत्तर दिले आहे की दिनांक 27.2.06 रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. दोन उत्तरापैकी कोणत्या तरी एका उत्तरामध्ये लबाडी केलेली आहे. असे उत्तर देण्याचा अधिकार मंत्रीमहोदयांना आहे काय? असा माझा आपल्याला प्रश्न आहे.

उपसभापती : एकाच प्रश्नावर दोन उत्तरे देता येणार नाहीत ही गोष्ट खरी आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पहिल्यांदा ज्यावेळी या विषयावर निवेदन करण्यात आले त्यावेळची जी वस्तुस्थिती होती त्याप्रमाणे निवेदन केले होते. त्यानंतर प्रस्ताव वित्त विभागाकडे गेला होता. वित्त विभागाच्या असमानता त्रुटी समितीसमोर हा प्रस्ताव होता. त्यानंतर कळविल्यानंतर उत्तर दुरुस्त करुन दिले आहे. 27.2.06 रोजी आदेश निर्गमित केले आणि त्याची प्रत माझ्याजवळ आता उपलब्ध आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय आपल्याला जर कळले असेल की कोणत्या तारखेला मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे तर मी खाली बसतो.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, निवेदनामध्ये स्पष्ट म्हटले आहे की केंद्र शासनाच्या सुधारित वेतनश्रेणीप्रमाणे वेतनश्रेणी देण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाने अमान्य केला. मंत्रिमंडळाच्या कोणत्या तारखेच्या बैठकीत हा प्रस्ताव अमान्य केला तेवढे मंत्रीमहोदयांनी सांगावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मंत्रिमंडळाच्या कोणत्या तारखेच्या बैठकीत या प्रस्तावावर निर्णय झाला ती तारीख आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. मी ती माहिती पटलावर ठेवतो. मात्र यासंदर्भातील जी.आर. ची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या प्रश्नाबाबत मागील वेळी सभापतींनी निर्णय दिला होता. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनेच्या कार्यवाहकांनी निवेदन पाठविले त्याची झेरॉक्स प्रत आहे असे उत्तर मंत्रीमहोदयांनी दिले होते. सभापतींनी सांगितले असे उत्तर देता येणार नाही. स्वतंत्र कॉपी मागवून घ्या. मंत्रिमंडळाने किती तारखेच्या बैठकीमध्ये हा प्रस्ताव फेटाळला हे जाणून घेण्याचा आम्हाला अधिकार आहे. हा धोरणात्मक निर्णय आहे. मंत्रीमहोदयांनी किमान एवढी गोष्ट सांगता येत नाही म्हणून या सूचनेवरील निवेदन राखून ठेवावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी पूर्वीच सांगितले आहे की मंत्रिमंडळाच्या निर्णयाची तारीख मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे त्याची तारीख मंत्रिमहोदयांना माहीत नसावी ही अत्यंत दुर्देवाची बाब आहे. तारीख अशासाठी महत्वाची आहे की उत्तर देणाऱ्या अधिकाऱ्यांची लबाडी यातून उघडी पडते. निर्णय झाल्यावर आदेश काढू असे उत्तर आधी दिले होते आणि दोन दिवसात उत्तर आले की निर्णय झाला आणि आदेश निर्गमित केले. अशा प्रकारच्या असत्य उत्तरांना सभागृहात संरक्षण मिळते अशी भावना निर्माण होणे हे अत्यंत घातक आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, यासंबंधीचा प्रस्ताव वित्त विभागाच्या सूचनेनुसार वित्त विभागाच्या वेतन असमानता समितीकडे पाठविण्यात आला होता. त्या समितीसमोर एकूण 250 संवर्गांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी 44 प्रस्ताव मान्य केले होते व बाकीचे प्रस्ताव फेटाळल्यानंतर 27 फेब्रुवारी हे आदेश काढले. म्हणून सन्माननीय सदस्य म्हणतात की, कोणत्या तारखेच्या बैठकीत यासंबंधीचा निर्णय घेण्यात आला या तारखेने काय फरक पडणार आहे ?

प्रा. बी.टी.देशमुख : महोदय, मंत्रिमंडळाचा निर्णय होण्याच्या अगोदर हे आदेश काढलेले आहेत हा फरक पडतो आणि ही गोष्ट अत्यंत लाजिरवाणी आहे.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, तसे असेल तर मी माझ्या मंत्रिपदाचा राजीनामा देतो.

प्रा. बी.टी.देशमुख : महोदय, हे निवेदन राखून ठेवावे अशी माझी विनंती आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : महोदय, माननीय सदस्यांना जे उत्तर अपेक्षित आहे तेच मंत्री महोदयांनी द्यावे असा आग्रह धरणे योग्य नाही. माननीय मंत्री महोदय म्हणतात की, मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय झालेला आहे आणि त्या बैठकीची तारीख पटलावर ठेवीन.

प्रा. बी.टी.देशमुख : महोदय, अपेक्षित उत्तर आम्हाला नको आहे, परंतु निगेटीव्ह उत्तर तरी मंत्री महोदयांनी देऊ नये, अशीच आमची अपेक्षा आहे. आम्हाला या शिक्षकांची काळजी आहे, ते आम्हाला म्हणतील की, अशा प्रकारची चुकीची उत्तरे शासनाकडून दिली जात होती त्यावेळी तूम्ही जिवंत होता की मेला होता ?

उपसभापती : माननीय मंत्री महोदयांनी 15-20 मिनिटात या बैठकीची तारीख मागवून घ्यावी, तोपर्यंत आपण हे निवेदन थांबवू. तोपर्यंत निवेदन क्र. 5 घेण्यात येईल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: ऑईल मिलच्या आवारात ठेवलेल्या पणन महासंघाच्या गाठींना लागलेली आग.

मु.शी.: ऑईल मिलच्या आवारात ठेवलेल्या पणन महासंघाच्या गाठींना लागलेली आग, या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व विनोद तावडे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर (पणन राज्यमंत्री) : महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व विनोद तावडे वि.प.स. यांनी "ऑईल मिलच्या आवारात ठेवलेल्या पणन महासंघाच्या गाठींना लागलेली आग" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. सदर निवेदनामध्ये मला आपल्या परवानगीने पुढीलप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे.

निवेदनातील ओळ क्र. 3 मध्ये "20461 गाठी" या शब्दांऐवजी "2461" गाठी असा शब्दप्रयोग करण्यात यावा. बाकी छापल्याप्रमाणे.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, दिनांक 5 मार्च, 2006 रोजी रात्री साडेतीनच्या सुमारास या गोडावूनला आग लागली. ही आग लागल्यानंतर तेथील वन विभागाच्या झोनल मॅनेजरला फॅक्टरीच्या व्यवस्थापनाने फोनवरुन सकाळी 6.30 च्या सुमारास ही माहिती दिली. खरे म्हणजे ज्या सिंघानिया ऑईल मिलच्या आवारातील गोडावूनमध्ये कापसाच्या रुईच्या गाठी ठेवलेल्या होत्या त्या ठिकाणी ही पहिलीच आग लागली नसून यापूर्वी सुध्दा त्या ठिकाणी गाठी ठेवण्यात आल्या होत्या व त्या गाठींना आग लागली होती. ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागली की काय यासंबंधीची चौकशी केली असता विद्युत विभागाने सांगितले की, शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागलेली नाही. वास्तविक पणन महासंघाच्या नियमाप्रमाणे ऑईल मिलच्या आवारात अशा प्रकारे रुईच्या गाठी ठेवता येत नाहीत असे सन्माननीय सदस्य डॉ. एन.पी.हिराणी जे सध्या पणन महासंघाचे प्रशासक आहेत त्यांनी देखील पत्रकार परिषदेमध्ये ही गोष्ट कबूल केली. हे चुकल्याचे त्यांनी सांगितले. माझी माहिती आहे की, हया गाठी ठेवण्यासाठी गोडावून निश्चित करतांना त्याचे प्रथम टेंडर बोलाविले जातात व सर्व निकष पूर्ण झाल्यानंतरच गोडावून कोणते असावे, हे फायनल केले जाते. या ठिकाणच्या झोनल मॅनेजरने कुठलेही निकष पाळले नाहीत व त्यामुळे हे गोडावून पूर्णपणे असुरक्षित होते. असे असतांना 2 हजार गाठी आा असुरक्षित ठिकाणी ठेवल्या जातात व जवळपास 2 कोटीचा माल त्या आगीत भस्मसात होतो. यापूर्वी सुध्दा दिग्रस आणि पांढरकवडा अशा दोन्ही गोडावूनला जी वनी झोनमध्येच आहेत, त्यांना आग लागली होती. परवाच सभागृहात वनी झोन मधील भ्रष्टाचाराचे प्रकरण उघडकीस आले त्यावेळी संबंधितांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

आता चौकशी करण्यासाठी पणन महासंघाचे दोन अधिकारी पाठविण्यात आले आहेत. जेथे वारंवार मोठया आगी लागतात तेथेच रुई गाठी ठेवण्यात आल्या आहेत. म्हणजे किती जाणीवपूर्वक सुरक्षितता ठेवली आहे ते पहावे. म्हणूनच या प्रकरणाची वेगळया यंत्रणेमार्फत चौकशी करून संबंधित झोनल मॅनेजरवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.जयप्रकाश दांडेगावंकर : सभापती महोदय, आगीचे कारण समजू शकलेले नाही. चौकशी अहवाल प्राप्त झालेला नाही. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषींविरूध्द कारवाई केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,सर्वश्री पुरोहित आणि घाटोळे हे चौकशी अधिकारी हे विक्री विभागातील आहेत. श्री.कोहाडकर हे प्रशासनामध्ये काम करीत होते. त्यांच्या बिल्डरचा व्यवसाय आहे. अशा अधिकाऱ्याला आता फिल्डवर पाठविण्यात आले आहे. यवतमाळ-वणी हा मोठा झोन आहे. पण तेथील झोनल मॅनेजर हा दुर्लक्षितपणे वागत आहे. रात्रौ 3.30 वाजता आग लागल्यानंतर देखील त्याला पणन महासंघाकडून माहिती मिळत नाही. सकाळी 6.30 वाजता आगीच्या घटनेची माहिती मिळाल्यानंतर हे महाशय सकाळी 9.00 वाजता घटनास्थळी पोहोचलेले आहेत. विमा काढला आहे हे मला देखील कबूल आहे. परंतु, राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान झाले आहे, त्याला जबाबदार कोण आहे ? ज्या झोनल मॅनेजरने बेजबाबदार वर्तन केले आहे, त्याची वेगळया यंत्रणेमार्फत चौकशी करून कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, याप्रकरणी उप व्यवस्थापकाला निलंबित केले आहे. तरी सुध्दा या संपूर्ण प्रकरणाची जिल्हाधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात येईल. त्यांचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, सन्माननीय श्री.फुंडकर साहेबांनी मी पत्रकार परिषद घेतली असा उल्लेख केला आहे. मी याबाबत खुलासा करू इच्छितो की, या विषयावर कुठलीही पत्रकार परिषद घेतलेली नाही.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : "मुंबईत चालणाऱ्या टॅक्सी,ऑटोरिक्षा चालक आकारीत असलेले मनमानी भाडे."

मु.शी. : "मुंबईत चालणाऱ्या टॅक्सी,ऑटोरिक्षा चालक आकारीत असलेले मनमानी भाडे" याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, श्रीमती कांता नलावडे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, श्रीमती कांता नलावडे यांनी "मुंबईत चालणाऱ्या टॅक्सी,ऑटोरिक्षा चालक आकारीत असलेले मनमानी भाडे" विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, नागपूर येथील डिसेंबर 2005 या महिन्यातील हिवाळी अधिवेशनात मुंबईत चालणाऱ्या टॅक्सी, ऑटोरिक्षांनी परिहवन विभागाने नेमून दिलेल्या छापील तक्त्याप्रमाणे भाडे न आकारता मनमानी भाडे आकारून जनतेची लूट करीत आहेत. तेव्हा टॅक्सी व ऑटोरिक्षाकरिता इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्यात यावेत अशी मी मागणी केली होती.

सभापती महोदय, शासनाच्या लेखी निवेदनाकडे मी आपले लक्ष वेधत आहे. यात असे नमूद करण्यात आले आहे की, "....टॅक्सींकरिता इलेक्ट्रॉनिक डिजीटल मीटर हे ऐच्छिक आहे. मेकॅनिकल मीटर हे त्याच्या गतीमुळे टॅक्सीचालक आणि प्रवासी यांच्या मधील तंटयाचे मूळ ठरत आहे. सध्याच्या मेकॅनिकल मीटरमध्ये टॅक्सी चालक मेकॅनिकच्या सहाय्याने फेरफार करवून ते वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मीटरबाबतचे वाढते गैर प्रकार रोखण्याकरिता जुनी मेकॅनिकल मीटर बदलून नवीन इलेक्ट्रॉनिक डिजीटल मीटर बसविण्याची गरज आहे." यात असेही नमूद करण्यात आले आहे की, "मुंबईतील टॅक्सीमध्ये इलेक्ट्रॉनिक मीटर अनिवार्य करण्याबाबतचा निर्णय प्रधान सचिव (परिवहन) यांच्या अध्यक्षतेखालील राज्य परिवहन प्राधिकरणाच्या दिनांक 25.2.2005 रोजीच्या बैठकीमध्ये घेण्यात आला. या बैठकीमध्ये मुंबईतील टॅक्सीकरिता इलेक्ट्रॉनिक मीटर बसविणे अनिवार्य करून सदरची कार्यवाही 2 वर्षाच्या आत पूर्ण करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत." तेव्हा आतापर्यंत किती टॅक्सीजना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्यात आले आहेत ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

दुसरा प्रश्न असा आहे की, "महाराष्ट्र मोटार वाहन नियम, 1989 च्या नियम 137 मध्ये योग्य ती सुधारणा करणे आवश्यक आहे. विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने नियमात सुधारणा करण्याची कार्यवाही चालू आहे." असा निवेदनामध्ये उल्लेख आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, विधी व न्याय विभागाचा या संदर्भात सल्ला घेतला आहे काय ? घेतला असल्यास, या कायद्यात केव्हा सुधारणा करणार आहात ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये 55 हजार टॅक्सीज आहेत. त्यापैकी 661 कुल-कॅब या गाडयांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्यात आले आहे. 54,400 टॅक्सीजमध्ये अजूनही इलेक्ट्रॉनिक मीटर बसविलेले नाहीत. उर्वरित टॅक्सीजमध्ये इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याची कार्यवाही करणार आहोत. इलेक्ट्रॉनिक मीटर पुरविण्याबाबत सहा कंपन्यांकडून प्रस्ताव आलेले आहेत. परिवहन विभागाच्या आयुक्तांनी त्या कंपन्यांना इलेक्ट्रॉनिक मीटरचा पुरवठा करण्याविषयी मान्यता दिलेली आहे. मुंबई शहरामध्ये दीड लाख मीटर लागणार आहेत. या मीटरचे मॅन्युफॅक्चरींग करणाऱ्या केवळ सहा कंपन्या राज्यात आहेत. या कंपन्यांकडून मीटर घेऊन ते टॅक्सींना लावावयाचे झाल्यास त्यासाठी दोन वर्षांचा कालावधी लागेल. तशा प्रकारचे आम्ही आदेशही निर्गमीत केलेले आहेत.

श्री.मधुकर चव्हाण : महोदय, दिनांक 25 फेब्रुवारीला टॅक्सीजमध्ये इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. एक वर्षाचा कालावधी उलटूनही टॅक्सीमध्ये इलेक्ट्रॉनिक मीटर का बसविण्यात आले नाही ? परिवहन खात्यावर कोणाचा दबाव आहे ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, मीटर बसविण्याबाबतचा निर्णय मागील अधिवेशनात घेतला होता ही वस्तुस्थिती आहे. परंतु सन्माननीय सदस्य विचारीत आहेत की, परिवहन खात्यावर कोणाचा दबाव आहे ? मी त्यांना सांगू इच्छितो की, परिवहन खाते कोणाच्याही दबावाखाली काम करीत नाही. इलेक्ट्रॉनिक मीटर पुरविणाऱ्या कंपन्या नसल्यामुळे उशीर झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु येत्या दोन वर्षांच्या कालावधीत नवीन मीटर लावण्याचे काम पूर्ण करणार आहोत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मागील अधिवेशनात जी लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती, त्यामध्ये माझे सुध्दा नाव समाविष्ट होते. मी ठाणे आणि मुंबईबाबत जॉईंट प्रश्न उपस्थित केला होता. मी त्यावेळी ठाण्यामध्ये ज्या टॅक्सींज आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविणार काय ? अशा प्रश्न माननीय मंत्री महोदयांना केला होता. या प्रश्नाला त्यांनी होकारार्थी असे उत्तर दिले होते. त्यांनी दोन वर्षात इलेक्ट्रॉनिक मीटर लावण्यात येतील असे सांगण्यापूर्वी, कोणत्या अंतिम तारखेपर्यंत हे मीटर लावले जातील हे सांगणे आवश्यक आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, केव्हा पर्यंत सर्व टॅक्सीजमध्ये इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्यात येणार आहेत ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, दिनांक 25 फेब्रुवारी, 2005 रोजीच्या बैठकीमध्ये याबाबत निदेश दिले होते. विधी व न्याय विभागाकडे कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. हा कायदा पास झाल्यानंतर तातडीने तो राज्यात कम्पलसरी करण्यात येईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या विषयाबाबत मागील अधिवेशनात लक्षवेधी सूचना उपस्थित होऊन, त्यावर चर्चा सुध्दा झाली होती. आज मुंबईमध्ये ज्या टॅक्सीज आहेत त्या जुन्या काळातील फियाट कंपनीच्या आहेत. वास्तविक पाहता फियाट कंपनी कालबाहय होऊन, 10-12 वर्षे उलटून गेली असली तरी, त्या कंपनीच्या गाडयांमध्ये दुरुस्ती करण्याचे, सांधे जोडण्याचे काम केले जाते. दिल्लीमध्ये सुध्दा अशीच परिस्थिती होती. त्यामुळे दिल्ली हाय कोर्टाने दिलेल्या निर्देशानुसार तेथील टॅक्सी चालकांना नवीन टॅक्सी देण्यात आल्या. शासनाने टॅक्सी चालकांना कर्ज उपलब करुन, त्यांना आर्थिक मदत केली. त्यामुळे आज दिल्ली येथे व्यवस्थितररित्या टॅक्सी व्यवसाय चालतो. आज आपल्याकडे ज्या टॅक्सी आहेत त्यामध्ये माणूस बसू शकत नाही अशी स्थिती आहे. बाहेरचा पर्यटक आला तर तो अशा टॅक्सीत कसा बसेल ? त्यामुळे या टॅक्सी बदलण्याच्या दृष्टीने शासकीय यंत्रणेने काही पर्याय उपलब्ध करुन दिला आहे काय ? 20 वर्षे जुन्या असलेल्या टॅक्सीमध्येच मीटर लावून ग्राहकांकडून भाडे वसूल करणार आहात काय ? जे काही प्रश्न मी उपस्थित केले आहे त्यातून मार्ग काढण्यासाठी शासनाकडे विल पॉवर आहे काय ? तसेच मीटर बसविण्याचे काम नेमके किती दिवसांत पूर्ण करणार आहात ?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, कायद्यामध्ये सुधारणा झाल्यानंतर, दोन वर्षात मीटर बसविण्याचे काम करणार आहोत.

नंतर श्री.व्ही.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: उच्च माध्यमिक शिक्षकांना वेतन न मिळणे तसेच वाढीव पदांना मंजूरी प्रदान करणे

मु.शी.: उच्च माध्यमिक शिक्षकांना वेतन न मिळणे तसेच वाढीव पदांना मंजूरी प्रदान करणे याबाबत श्री. रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ. अशोक मोडक, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ : (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ. अशोक मोडक, वि.प.स. यांनी उच्च माध्यमिक शिक्षकांना वेतन न मिळणे तसेच वाढीव पदांना मंजूरी प्रदान करणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : सोबतचे निवेदन येथे छापावे)

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सन 2003-2004, 2004-2005 आणि सन 2005-2006 या 3 वर्षात जी पायाभूत पदे निर्माण झाली या पदांना मान्यता देण्याबातची सूचना मी मांडलेली आहे. येथे शासनाने असे उत्तर दिलेले आहे की, यासाठी तरतूद प्राप्त झालेली नाही, पदांना मान्यता मिळालेली नाही, तरतूद करणे व पदांना मान्यता देणे हा वेगळी बाब आहे. या ठिकाणी स्पष्ट म्हटलेले आहे की, 31 ऑक्टोबर पर्यंत दरवर्षी शिक्षण संचालकांनी प्रस्ताव पाठवून मंत्रालयातून पदांना मान्यता घ्यावयाची आहे. माझा प्रश्न असा आहे की, 2003-2004 व 2004-2005 चे प्रस्ताव शिक्षण संचालकांकडून शासनाला केव्हा प्राप्त झाले. मंत्रालयात जर विचारले तर सदर प्रस्ताव आमच्याकडून वित्त विभागाकडे गेलेला आहे, तेथे विचारणा केली असता सदर प्रस्ताव नियोजन विभागाकडे पाठविलेला आहे असे उत्तर देण्यात येते. सन 2003-2004 व सन 2004-2005 चे प्रस्ताव शासनाला शिक्षण संचालकांकडून केव्हा प्राप्त झाले, ही पदे मंजूर करण्यासाठी विलंब का झाला, यासंदर्भातील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सदर प्रस्ताव बऱ्याच दिवसापूर्वी प्राप्त झालेला आहे. सन 2003-2004 मधील 238 पदे व सन 2004-2005 मधील 331 पदे असे एकूण 569 पदांच्या बाबत नियोजन विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, त्यांच्याकडून सदर वर्षामध्ये आऊटले उपलब्ध झालेला नाही, या वर्षामध्ये आऊटले उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

उपसभापती : सभागृहात 93 ची सूचना क्रमांक 4 च्या निवेदनाची मागणी करण्यात आलेली आहे, ते निवेदन येईपर्यंत आपण लक्षवेधी सुरु करु या.

.....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नटश्रेष्ठ प्रभाकर पणशीकर यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करणे यासबंधी माननीय सांस्कृतिक मंत्र्यांचे निवेदन.

श्री. अशोक चव्हाण (सांस्कृतिक मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

" मराठी रंगभूमीवरील ज्येष्ठ अभिनेते नटश्रेष्ठ प्रभाकर पणशीकर यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने पहिला महाराष्ट्र राज्य रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

रुपये 1लाख रोख, मानपत्र आणि सन्मान चिन्ह असे या परस्काराचे स्वरुप आहे.

मराठी रंगभूमीच्या क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या आणि वैशिष्टयपूर्ण कामगिरी बजाविणाऱ्या रंगकर्मीला नाटय क्षेत्रातील एकूण कामगिरीसाठी हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

श्री. प्रभाकर पणशीकर यांनी मराठी रंगभूमीवर अलौकिक कामगिरी करुन एक इतिहास घडविला आहे. पाच विविध प्रकारच्या भूमिका असणाऱ्या "तो मी नव्हेच " या नाटकाचे त्यांनी 2800 पेक्षा जास्त प्रयोग केले. एवढेच नव्हेतर या नाटकाचे त्यांनी कानडी भाषा शिकून त्याचे कानडी भाषेत प्रयोग केले. "अश्रूंची झाली फुले" या त्यांच्या गाजलेल्या नाटकांचे त्यांनी गुजराथी भाषेतही प्रयोग केले. फिरता रंगमंच, सरकता रंगमंच या अभिनव साधनांचा व्यावसायिक रंगभूमीवर अत्यंत कौशल्यपूर्ण आणि यशस्वी वापर त्यांनी केला. त्यांनी मराठी रंगभूमीला दिलेली ही मोठी देणगी आहे. श्री. पणशीकर हे अखिल भारतीय मराठी नाटय संमेलनाचे सलग दोन वेळा अध्यक्ष होते हाही एक विक्रमच आहे.

रंगभूमी हा व्यवसाय न मानता ती जीवन निष्ठा समजणारे श्री. प्रभाकर पणशीकर यांचे मराठी नाटयक्षेत्रासाठी, वयाची पंच्याहत्तरी पार केल्यानंतरही, काम करणे सुरुच आहे. अशा या अष्टपैलू कलावंताने मराठी रंगभूमीची आणि महाराष्ट्राची कीर्ती देशभर गाजविली आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

त्यांच्या या योगदानाबद्दल पहिला मराठी राज्य रंगभूमी "जीवन गौरव पुरस्कार" जाहीर करतांना आम्हास आनंद होत आहे.

.....4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सांस्कृतिक मंत्री यांनी जी घोषणा केली त्याबद्दल मी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो. तसेच श्री. प्रभाकर पणशीकर यांचे सुध्दा मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. मराठी रंगभूमीवरील ज्येष्ठ अभिनेते नटश्रेष्ठ प्रभाकर पणशीकर यांनी मराठी नाटय रंगभूमीवर "तो मी नव्हेच ", "अश्रूंची झाली फुले ", " रायगडाला जेव्हा जाग येते" अशी अनेक नाटके रंगभूमीवर वठविलेली आहेत. प्रभाकर पणशीकर यांनी मराठी रंगभूमीसाठी आपले जीवन समपित केलेले आहे, आता ते वयोवृध्द झाल्यामुळे नाटकामध्ये काम करीत नाहीत, त्यांचा जो गौरव करण्यात आला तो अत्यंत उचित असा आहे. याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. 12 तारखेला त्यांचा सत्कार समारंभ आयोजित केलेला आहे, त्या कार्यक्रमासाठी मी जाणार होतो त्या अगोदरच त्यांना जीवन गौरव पुरस्कार मिळाला त्याबाबत मी शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

यानंतर श्री. सांगळे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मराठी रंगभूमीवरील ज्येष्ठ अभिनेते नटश्रेष्ठ प्रभाकर पणशीकर यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने पहिला महाराष्ट्र राज्य "रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार" प्रदान करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो. " तो मी नव्हेच " तसेच " अश्रुंची झाली फुले " या नाटकांमधील त्यांच्या भूमिका अतिशय गाजल्या आहेत. त्यामुळे त्यांना अविरत सम्राट म्हटले तर ते वावगे होणार नाही. या नाटयक्षेत्रामध्ये त्यांनी तरुण वयापासून सुरुवात केली. आता त्यांची वयाची 75 वर्षे होऊन सुध्दा जिद्दीने भूमिका सादर करीत आहेत. त्यांच्यातील अभिनय अतिशय जीवंत आहे. यापुढे त्यांचा अभिनय पाहण्यासाठी मिळावा म्हणून त्यांना दीर्घायुष्य लाभावे, यापुढेही भविष्यात ज्येष्ठ अभिनेते नटश्रेष्ठ प्रभाकर पणशीकर यांचे कार्य अविरत सुरु राहो व यासाठी त्यांना परमेश्वराने दीर्घायुष्य देवो. आज शासनाने त्यांना पहिला महाराष्ट्र राज्य रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेतल्यामुळे मी ज्येष्ठ अभिनेते नटश्रेष्ठ प्रभाकर पणशीकर यांचे आणि माननीय सांस्कृतिक कार्य मंत्री श्री.अशोक चव्हाण यांचे अभिनंदन करतो व माझे दोन शब्द संपवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(निवेदन क्र. 4 पुढे सुरु .....)

पृ.शी.: मिडलस्कूल व प्राथमिक शाळेतील प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी मंजूर न करणे.

मु.शी.: मिडलस्कूल व प्राथमिक शाळेतील प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी मंजूर न करणे याबाबत श्री. व्ही.यु. डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते व गजेंद्र ऐनापुरे वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

(चर्चा पुढे चालू....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या संदर्भात दि.7/2/2006 रोजी मंत्रिमंडळामध्ये निर्णय झाला व त्यानंतर दि.26/7/2006 रोजी वित्त विभागाने जी.आर. निर्गमित केला.

प्रा.बी.टी. देशमुख : सभापती महोदय, दि. 24 मार्च, 2006 रोजी या संदर्भात सभागृहामध्ये असे निवेदन करण्यात आले होते की, हा प्रस्ताव वित्त विभागाच्या सूचनेनुसार वेतन विभागाकडे पाठवण्यात आला असून या संदर्भात मंत्रिमंडळाचा निर्णय झाल्यानंतर वित्त विभागाकडून शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. परंतु वित्त विभागाने अगोदर जी.आर. काढलेला असताना सुध्दा माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदन करतेवेळी जी.आर. काढण्यात आला नसल्याची असत्य माहिती सभागृहाला दिली, याबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त करावी.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, त्यावेळी केलेल्या निवेदनामध्ये ही माहिती देणे आवश्यक होते. या बाबीसाठी जे कुणी संबंधित असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्याला याबाबत नक्की चर्चा करावयाची असेल तर आपण या विषयाबाबत स्वतंत्र लक्षवेधी आणावी.

प्रा.बी.टी. देशमुख : गेल्या तीन वर्षांपासून हा विषय प्रलंबित ठेऊन शिक्षकांवर अन्याय केल्यामुळे आंदोलने करणे, कोर्टकचेरी करणे हाच मार्ग रहातो. परंतु सभागृहाची दिशाभूल करणे, सभागृहाला असत्य माहिती देणे, याबाबत येथे चर्चा सुरु आहे. सभापती महोदय, मला आपल्याकडून संरक्षण मिळाले पाहिजे. हा प्रश्न आम्हाला राखून ठेवायचा नाही किंवा याबाबत वेगळी लक्षवेधी सूचना सुध्दा द्यायची नाही. परंतु फेब्रुवारी महिन्यामध्ये मंत्रिमंडळाचा निर्णय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बी.टी.देशमुख....

झालेला असताना सुध्दा सभागृहात याबाबत निर्णय झाला नसल्याची चुकीची माहिती का देण्यात आली ?

श्री.हसन मुश्रीफ : त्यावेळी निवेदनामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक होते. परंतु ती होऊ शकली नाही, सभागृहाला त्या निवेदनामध्ये दुरुस्ती करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांच्या सत्कृत्यामुळे आता आपली जबाबदारी अधिक वाढली. त्या दिवशी त्यांना हे निवेदन दुरूस्त करता आले नाही तर आज तरी त्यांना पहिल्याप्रथम ते दुरूस्त करता आले असते. आम्ही त्यांचेविरूद्ध हक्कभंगाचा प्रस्ताव द्यावा, तुम्ही त्यांचा खुलासा मागवावा हे सारे नंतरचे झाले. पण खरे तर या ठिकाणी चुकीचे निवेदन केले आहे तेव्हा त्यांनी येथे प्रथमत: त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करायला पाहिजे आणि ज्यांनी कोणी त्यांचेकडे ही चुकीची माहिती दिली आहे त्यांचे विरूद्ध कारवाई त्यांनी करावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी गेली 18 वर्षे या सदनाचा सदस्य आहे. मला आश्चर्य वाटते की, आज तुम्ही सांगितले म्हणून ही खरी माहिती सभागृहासमोर आली. या सभागृहामध्ये अधिकारी दृश्य स्वरूपात नाहीत. मंत्री हेच येथे माहिती देत असतात. तेव्हा आपल्याला चुकीची माहिती दिली त्याबद्दल तुम्ही त्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करावी, तो आमचा भाग नाही. अधिकाऱ्यांचा आणि आमचा येथे संबंध नाही. ते सगळे आमच्यादृष्टीने अदृश्य आहेत. आता या ठिकाणी तरी देखील सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख हे सामोपचाराने येथे सांगत आहेत, विनंती करीत आहेत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ही माहिती येथे मागविली नसती तर ही अशीच चुकीची माहिती निघून गेली असती, राहून गेली असती. आणि रेकॉर्डवर अशीच चुकीची माहिती राहिली असती. परंतु आता हे सगळे स्पष्ट झालेले आहे. त्याचे मेरिट काहीही असो. पण ज्या मंत्र्यांकडून ही चुकीची माहिती सभागृहापुढे आली असेल त्याबद्दल त्याने दिलगिरी व्यक्त करणे आवश्यक आहे. या ठिकाणी आलेल्या या दोन्ही निवेदनामध्ये अंतर आहे. ते लक्षात घेता मंत्र्यांकडून दिलगिरी व्यक्त व्हायला पाहिजे. अन्यथा सभापती महोदय, आपण याबाबत स्पष्ट निदेश दिले पाहिजेत.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, चूक झाली असती तर निश्चितपणे मी दिलगिरी व्यक्त केली असती. परंतु या निवेदनामध्ये मी अगोदरच माझ्या हस्ताक्षरामध्ये दुरूस्ती करून ठेवली आहे. परंतु त्या दिवशी निवेदन येथे होऊ शकले नाही त्यामुळे त्यात दुरूस्ती करता आली नव्हती. पण आज जेव्हा सभागृहामध्ये निवेदन आले तेव्हा त्यामध्ये दुरूस्ती मी केलेली आहे आणि तशी दुरूस्ती करण्याचा आपल्याला अधिकार आहे. तेव्हा मी दुरूस्त करूनच हे निवेदन दिलेले आहे. त्यामुळे सभागृहाची चुकीची माहिती देऊन दिशाभूल करण्याचा यामध्ये कोणताही हेतू नाही आणि नव्हता.

..... 3एल 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या निवेदनामध्ये मंत्रिमंडळाच्या निर्णयाची तारीख मुद्दाम टाकलेली नाही. याचे कारण काल असत्य माहिती दिली होती म्हणून. आता सभागृहाला चुकीची माहिती दिली होती याचा कोणालाच संकोच वाटत नसेल तर मग या गोष्टीचा निषेध करून आम्ही सभात्याग करू इतकेच मला सांगावेसे वाटते. येथे आपण का म्हणून चुकीची माहिती दिली ? तुम्ही हे करणारच होता तर मग अगोदरच हे निवेदन दुरूस्त करून का दिले नाही, त्यामध्ये मंत्रिमंडळाच्या निर्णयाची तारीख का दिली नाही ? आता तुम्हाला यामध्ये दुरूस्ती करावयाची होती तर ते आम्हाला कसे काय समजणार ? आम्ही काय मनकवडे आहोत का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आज हे निवेदन दुरूस्त करून मी दिलेले आहे, किंबहुना ही दोन्ही निवेदने मी आपल्याकडे दिलेली आहेत. ...

(काही सदस्य एकदम उठून बोलतात .... अडथळा ...)

सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्या. निवेदनामध्ये काही दुरूस्ती करावयाची असेल तर तो करण्याचा आमचा अधिकार आहे आणि त्याप्रमाणे दुरूस्ती करूनच मी हे निवेदन आज येथे दिलेले आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हे चुकीचे आहे, हा दुराग्रह आहे. मग आम्ही पुन्हा पुन्हा आपल्याला म्हणत होतो तेव्हाच तुम्ही यामध्ये दुरूस्ती का केली नाही ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, त्या दिवशी हे निवेदन येथे होणार होते. पण त्या दिवशी हे निवेदन येथे होऊ शकले नाही. आज आता हे निवेदन येथे आलेले आहे आणि ते दुरूस्त करूनच मी आपल्याला दिलेले आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : उलट आपण त्यामध्ये मंत्रिमंडळाच्या निर्णयाची तारीख लपविली आहे.

श्री. हसन मुश्रीफ : तो भाग वेगळा.

उपसभापती : एक गोष्ट निश्चित आहे की, माननीय राज्यमंत्र्यांनी माझ्याकडे या निवेदनाचा जो कागद माझ्याकडे पाठविला आहे त्यामध्ये त्यांनी काही दुरूस्ती केल्याचे दाखविले आहे. पण त्यातील शेवटचे वाक्य निश्चितपणे आक्षेपार्ह वाटते. यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, "... वेतन असमानता समितीने हा प्रस्ताव अमान्य करून तसा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवला होता. मंत्रिमंडळाने केंद्र सरकारप्रमाणे या शिक्षकांना वेतनश्रेणी देण्याचा प्रस्ताव अमान्य केलेला आहे.

..... 3एल 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याबाबत 27 फेब्रुवारी 2006 रोजी वित्त विभागाने आदेश काढले आहेत. " यानंतर शेवटी त्यांनी खाली म्हटले आहे की, 'वरीलप्रमाणे दुरूस्ती सुचविणे योग्य ठरेल.' म्हणजे ही पश्चात्बुद्धी आहे याबद्दल माझ्या मनामध्ये कोणतीही शंका नाही. तेव्हा मला असे वाटते की, ज्यांनी कोणी आपली दिशाभूल केली असेल, .. कारण शेवटी असे आहे की, हे आपण स्वत:हून सांगितलेले नाही., तेव्हा ज्यांनी कोणी हे केले असेल त्यांचेवर आपण योग्य ती कारवाई करावी इतकेच मी सांगतो.

श्री. हसन मुश्रीफ : होय, सभापती महोदय.

(यानंतर श्री. सरफरे ... 3एम 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्ही आपले आभारी आहोत...

उपसभापती : उद्या रामनवमी आहे आणि माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांचा उद्या वाढदिवस आहे. तेव्हा माननीय सदस्यांनी मंत्रिमहोदयांना जास्त त्रास देऊ नये.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांच्या वाढदिवसानिमित्त आम्ही त्यांना आजच शुभेच्छा देतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ल□वेधी सूच□ा

पृ. शी. : महात्मा ज्योतिबा फुले मंडई पुनर्विकासाच्या नावाखाली
खाजगी बिल्डर्सला देण्याचा मुंबई महानगरपालिकेने घेतलेला निर्णय

मु. शी :महात्मा ज्योतिबा फुले मंडई पुनर्विकासाच्या नावाखाली
खाजगी बिल्डर्सला देण्याचा मुंबई महानगरपालिकेने घेतलेल्या निर्णयासंबंधी स□मा□□ीय सदस्य सर्वश्री. सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, शरद पाटील, जयंत पाटील, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती मंदा म्हात्रे, प्रा.फौजीया खान, सर्वश्री सदाशिवराव पोळ, जितेंद्र आव्हाड, विनायकराव मेटे, प्रा. शरद पाटील, श्री.जयंत पाटील, वि.प.स. यां□ी दिलेली ल□वेधी सूच□ा

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : अध्य□ महोदय, मी आपल्या अ□ुमती□ ि□यम 101 अ□ये पुढील तातडीच्या व सार्वजनि□□ महत्वाच्या बाबी□डे स□मा□□ीय मुख्यमंत्र्यांचे ल□ वेधू इच्छितो आ□ि त्याबाबत त्यां□ी ि□वेद□ □रावे, अशी वि□ती □रतो.

"मुंबईचे भूषण असलेल्या छत्रपती शिवाजी टर्मिनल जवळील अब्जावधी रुपये किंमतीची महात्मा ज्योतिबा फुले मंडई (क्रॉफर्ड मार्केट) पुनर्विकासाच्या नावाखाली नाममात्र दराने एका खाजगी बिल्डर्सला देण्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतलेला धक्कादायक निर्णय, यात झालेला करोडो रुपयांचा भ्रष्टाचार, प्राचीन वास्तु असलेले क्रॉफर्ड मार्केट जतन करण्यामागे व खाजगी बिल्डर्सला पुनर्विकासासाठी देण्याचा घेतलेला निर्णय रद्द करण्याची मुंबईतील नागरिकांची होत असलेली मागणी, शासनाची परवानगी न घेता व व्यापाऱ्यांची बनावट सहमती पत्रके सादर करण्यात येऊन घेण्यांत आलेला निर्णय, त्यामुळे व्यापाऱ्यांत व नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, अशाच प्रकारे मुंबईतील इतर आरक्षणे रद्द करण्याचा मुंबई महानगरपालिकेने घेतलेला निर्णय, या सर्व व्यवहाराची चौकशी होण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व उपाययोजना."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : अध्य□ महाराज, ल□वेधी सूच□संबंधीच्या □वेद□ाच्या प्रती मा□□ीय सदस्यां□ा आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते □वेद□ आपल्या अ□ुमती□ सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : □वेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

□वेद□

(प्रेस : येथे सोबतचे □वेद□ छापावे.)

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, एका महत्वाच्या विषयावर या सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना चर्चेकरीता आलेली आहे. या लक्षवेधी सूचनेमध्ये दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने निवेदनामध्ये जे उत्तर दिले आहे त्यातील फक्त पहिला परिच्छेद आपल्या माहितीसाठी वाचून दाखवितो. "क्रॉफर्ड मार्केट सन 1868 मध्ये बांधण्यात आलेले असून "महात्मा फुले मंडई" नावाने प्रसिध्द आहे. हे मार्केट एकूण 22,471.75 चौ. मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडावर व्यापलेले आहे. या इमारतीमधील 5515 चौ.मी. क्षेत्रफळाचा भाग हा हेरिटेज वास्तू म्हणून यापूर्वीच जाहीर झालेला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुधार समितीने महात्मा फुले मंडईच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास दिनांक 24.3.2006 रोजी मंजूरी दिलेली आहे. सदर पुनर्विकासामध्ये हेरिटेज वास्तू वगळून उर्वरीत 16,956.75 चौ.मी. भूखंडावर 1940 चे अगोदरपासून अस्तित्वात असलेल्या एक मजली चार पत्र्याच्या शेड्स, तसेच चिकूमाळा नावाची तळमजला+एक मजली असलेली मोडकळीस आलेली व धोकादायक असलेली इमारत अशा एकंदर पाच इमारतींचा एकत्रित पुनर्विकास प्रस्तावित केला आहे". सभापती महोदय, माझ्याकडे 24 मार्चच्या लोकसत्ता वर्तमानपत्रामध्ये पहिल्या पानावर "अब्जावधीचे क्रॉफर्ड मार्केट युतीने फुंकले" या हेडींगखाली प्रसिध्द झालेल्या बातमीचे कात्रण आहे. हे मार्केट ज्यावेळी नव्या मुंबईला शिफ्ट झाले त्यावेळी काही गाळेधारक नव्या मुंबईला न जाता त्याच मार्केटमध्ये राहिले व बाकीचे नव्या मुंबईला गेले...

श्री. दिवाकर रावते (बसून बोलतात) : शरद पवारांनी संरक्षणाचे भूखंड फुंकले त्याचे काय?....

(गोंधळ)

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : 1995 मध्ये पहिल्या प्रथम तुम्ही निवडून आल्यानंतर काय केले?...

(दोन्ही बाजूकडील माननीय सदस्य उभे राहून एकाचवेळी बोलू लागतात.)

उपसभापती : सर्व माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे. याठिकाणी माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी प्रश्न विचारीत असतांना माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी खाली बसून माननीय श्री. शरद पवार साहेबांविषयी जो उल्लेख केला आहे तो याठिकाणी गैरलागू आहे. तेव्हा कृपया आपण खाली बसून कुणाही व्यक्तीचे नाव घेऊन बोलू नये.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. युतीने कोणतेही मार्केट फुंकलेले नाही....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, एवढेच नव्हेतर या मार्केटचा विकास करण्याच्या नावाखाली दिनांक 24 मार्च 2006 च्या रात्री साडे दहा वाजता सुधार समितीची बैठक घेण्यात आली....

(गोंधळ)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीचा या ठिकाणी दाखला देता येत नाही...

उपसभापती : माननीय सदस्यांनी लोकसत्ता वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली आहे असे म्हटले आहे...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझ्याकडे असलेले त्या बातमीचे कात्रण मी आपणाकडे पाठवून देतो.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी व्यक्तिश: तो उल्लेख केला असेल तर तो उल्लेख कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी लोकसत्ता दैनिकाचा आधार घेऊन आमचा उल्लेख केलेला. त्या मार्केटशी आमचा काही संबंध नाही. युतीने ते मार्केट फुंकले असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. युती म्हणजे भारतीय जनता पक्ष-शिवसेना युती. या निवेदनामध्ये शासनानेच सांगितले आहे की, ते नियमाप्रमाणे झालेले आहे. सरकारच्या भूमिकेनुसार ते झालेले आहे असे शासनाने म्हटले आहे. सरकार तुमच्या पक्षाचे आहे. सरकारवर कारवाई करा.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : त्या ठिकाणी कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे.

श्री. नितीन गडकरी : या ठिकाणी शासनाने असे म्हटले आहे की, ते कायदेशीर झालेले आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या ठिकाणी लक्षवेधी सूचनेवर चर्चा व्हावयास पाहिजे.

श्री. विनोद तावडे : तो सौदा रद्द करा.

श्री. नितीन गडकरी : क्रॉफर्ड मार्केटचा तो सौदा रद्द करा. हिंमत असेल तर चौकशी करा.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

उपसभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.30 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 3.46 ते 4.30 मध्यंतर)

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>मध्यंतरानंतर</u>

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री. विनोद तावडे : उपसभापती महोदय, सभागृहामध्ये एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

उपसभापती : सभागृहाची बैठक 4.40 वाजेपर्यन्त स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 4 32 ते 4.40 वाजेपर्यन्त स्थगित करण्यात आली.)

...नंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी उपसभापती)

पृ.शी. : महात्मा ज्योतिबा फुले मंडई पुनर्विकासाच्या नावाखाली एका खाजगी बिल्डरला देण्याचा मुंबई महानगरपालिकेने घेतलेला निर्णय

मु. शी :महात्मा ज्योतिबा फुले मंडई पुनर्विकासाच्या नावाखाली एका खाजगी बिल्डरला देण्याचा मुंबई महानगरपालिकेने घेतलेल्या निर्णयासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री. सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, शरद पाटील, जयंत पाटील, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती मंदा म्हात्रे, प्रा.फौजीया खान, सर्वश्री सदाशिवराव पोळ, जितेंद्र आव्हाड, विनायकराव मेटे, प्रा. शरद पाटील, श्री.जयंत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली ल□वेधी सूचना.

(चर्चा पुढे सुरु)

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, क्रॉफर्ड मार्केटच्या संदर्भात एकंदर 7 लाख 25 हजार चौ.फुटाचे बांधकाम होणार आहे. फक्त हेरीटेजसाठी 5 ते 5.5 हजार चौ.फूट बांधकाम केल्यानंतर उरलेली जागा विकासकाला उपलब्ध होणार आहे. 1 हजार चौ.फुटाप्रमाणे बांधकाम झाले तर 75 कोटी रु. खर्च येईल. 2 लाख 65 हजार चौ.फूट विकासकाला मिळेल. क्रॉफर्ड मार्केटचा विकास करण्यासाठी विकासकाला जी जागा मिळणार आहे ती 1 रु. दराने 60 वर्षांच्या लीजवर त्याने वापरावयाची आहे. हे प्राईम लोकेशन असल्यामुळे 400 कोटी रुपये एवढी रक्कम त्यातून प्राप्त होते. 75 कोटी रु. बांधकामाचा खर्च येईल.

उपसभापती : ही लक्षवेधी सूचना महत्वाची आहे. या सूचनेच्या मेरीटवर चर्चा करु या. या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेला पक्षीय संदर्भ कृपया माननीय सदस्यांनी देऊ नये.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, 1995 साली ज्यावेळी हे मार्केट नवी मुंबईला स्थलांतरित झाले त्यावेळी या मार्केटमध्ये असलेल्या गाळेधारकांची संख्या 585 होती. ज्यावेळी 23 मार्च,2006 रोजी इंप्रुव्हमेंट कमिटीची बैठक झाली त्यावेळी जी माहिती समोर आली त्यानुसार 727 गाळेधारक झाले. म्हणजे 142 गाळेधारक वाढलेले आहेत. या गाळेधारकांना रेंट ॲक्ट ॲप्लीकेबल आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. या व्यवहारामध्ये पारदर्शकता दिसून येत नाही. विकासाच्या नावाखाली पैसे कमावण्याचे साधन म्हणून या निर्णयाकडे पाहिले आहे. यासंदर्भात शासन संपूर्ण चौकशी करणार आहे काय ? ओरीजनल गाळेधारक वगळून जे बोगस गाळेधारक निघतील किंवा आढळून आले तर त्यांच्याविरुध्द फौजदारी खटला दाखल करण्यात येईल काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 16:40

लक्षवेधी सूचना पुढे सुरु ...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ...

तसेच या प्रश्नाची चर्चा करीत असताना या सभागृहातील सर्व पक्षीय सदस्यांना विश्वासात घेऊन यासदंर्भातील पुढील निर्णय शासन घेणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी दोन प्रश्न विचारले आहेत. इंप्रुव्हमेंट कमिटीने जो निर्णय केलेला आहे तो जनरल बॉडीपुढे आणि बिल्डींग प्रपोजल कमिटीकडे जाईल. गाळेधारकांच्या संख्येचाही प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यांनी सांगितले की 585 ऐवजी 727 गाळेधारक झालेले आहेत.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

सभापती महोदय, याबाबत निश्चितपणे कुठल्याही प्रकारची शंका सन्माननीय सदस्यांना असली तरी देखील त्याबाबतची चौकशी करण्यात येईल व हेच मी खालच्या सदनात देखील सांगितले आहे, की यासंदर्भात प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्या माध्यमातून चौकशी करण्यात येईल आणि त्यात जर खरोखरच बोगस गाळेधारक आढळून आले तर संबंधित जे जबाबदार असतील त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, हेच मी येथेही सांगत आहे. दुसरा प्रश्न म्हणजे मुंबईतील आमदारांना यासंदर्भात आपले मत व्यक्त करावयाचे असेल तर वरिष्ठ सभागृहातील सन्माननीय सदस्यांना सुध्दा या चर्चेच्या वेळी बोलावण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी तसेच मुंबई प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष माननीय श्री. गुरुदास कामत यांनी यासंबंधात महानगरपालिकेत न्याय मिळत नाही म्हणून विधानपरिषदेमध्ये हा विषय आणला. त्यांचे आग्रहाचे म्हणणे आहे की, महात्मा फुले मंडईचा विकास टेंडर काढून करावा, हे शासनाला मान्य आहे काय ?

श्री. राजेश टोपे : महोदय, टेंडर काढून विक्री करावयाचे की असोशिएशनच्या माध्यमातून विकासक नेमून हे गाळे लीजवर विकावयाचे अथवा महापालिकेने स्वत:च्या बजेटमध्येच तरतूद करुन त्यासंबंधीचा विकास करावयाचा अशा प्रकारे तिन्ही ऑपशन्स महापालिकेसमोर उपलब्ध आहेत. त्यापैकी कोणत्या ऑपशन्सचा विचार करावयाचा तो करुन तसा प्रस्ताव महापालिकेने निवडावा.

श्रीमती मंदा म्हात्रे : महोदय, मुंबईचे भूषण असलेल्या, छत्रपती शिवाजी टर्मिनसच्या जवळच्या आणि कोटयावधी रुपये किंमतीच्या महात्मा फुले मंडईच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना सदनात आलेली आहे व त्या निमित्ताने अत्यंत महत्वाचे व गंभीर प्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, महानगरपालिका अधिनियम, 1881 प्रमाणे सवलतीच्या दराने भूखंड घेण्यास कोण पात्र असतात व त्यासाठी महापालिका अधिनियम, 1881 अन्वये नियम तयार करण्यात आले आहेत काय ? दुसरा प्रश्न म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की 585 गाळयांमध्ये वाढ होऊन तो आकडा 727 एवढा म्हणजेच त्यात 142 गाळयांची वाढ झालेली आहे, हे वाढलेले गाळे नेमके कोणाला देण्यात आले आहेत ? तसेच या मंडईच्या भौगोलिक रचनेचा व हवामानाचा विचार करुन विकासासंबंधीचे संकल्पचित्र तयार केलेले आहे काय ?

(.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : महोदय, पुन्हा हया गाळेधारकांचा प्रश्न येथे उपस्थित करण्यात आला. मी यापूर्वीच या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे की, या प्रकरणाची चौकशी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांच्या माध्यमातून करण्यात येईल. तसेच 92 (डी)(डी) खाली लीजची परवानगी शासनाकडून घ्यावी लागत आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सन 1995 मध्ये माननीय शरदराव पवार या राज्याचे मुख्यमंत्री असतांना श्री. कांगा यांच्या अध्यक्षतेखाली, महापालिकेचे आयुक्त डॉ. शरद काळे व चार्ल्स कोरिया हेरिटेज यांच्या समितीने या मंडईच्या विकासाचा कार्यक्रम तयार केला होता. ज्यावेळी हा कार्यक्रम जाहीर झाला त्यावेळी सर्व दृष्टीने सर्व्हेक्षण करण्यात आले होते. या ठिकाणी 585 गाळयांमध्ये वाढ होऊन ती संख्या 727 एवढी झालेली आहे. मुळात प्रश्न असा निर्माण होतो की, 10 वर्षांमध्ये मंडईच्या क्षेत्रात कुठल्याही प्रकारची वाढ झालेली नाही आणि त्यात महत्वाचा मुद्दा म्हणजे असा की, त्यातील अर्धे गाळेधारक नवी मुंबईला ज्यावेळी या मंडईचे शिफ्टींग झाले त्यावेळी हे गाळेधारक तिकडे शिफ्ट झालेले आहेत म्हणजे ओरिजिनल ओनर्स देखील शिफ्ट झालेले असल्याने जे सध्या तेथे ओनर्स म्हणून आहेत ते लिजी आहेत.....

यानंतर श्री. भारवि .....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड..

लिजच्या गाळयांमध्ये पोट माळेतयार करून पोट भाडेकरू तयार केले आहेत. रेकॉर्डवर जरी ते गाळेधारक दिसत असले तरी प्रत्यक्षात ते अनधिकृत गाळेधारक आहेत. अशा अनधिकृत गाळेधारकांविरूद्ध कारवाई करण्यात येणार आहे काय ? सन 1995 मध्ये 585 गाळेधारक होते. आता जे गाळेधारक आहेत, त्यांना पहिल्या मजल्यावर गाळा देण्यात येणार आहे, असे प्रथमदर्शनी दिसते. पहिल्या मजल्यावर गाळे दिले तर यात विकासकाचाच फायदा होणार आहे. तेव्हा सदर गाळे तळमजल्यावर देण्यासंबंधी शासन महापालिकेला भाग पाडणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन 1995 मध्ये 585 गाळेधारक होते असे सांगण्यात आले आहे. गाळयांची संख्या वाढलेली नाही. गाळे आहेत तेवढेच आहेत. एखादा लायसेन्सी मृत पावल्यानंतर तेथे दुसरा लायसेन्सी हा लिलाव पध्दतीने घेतला जातो. 20-30 वर्षापासून 727 गाळेधारक आहेत. या आकडयांमध्ये कुठलाही बदल झालेला नाही. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती खरी आहे असे गृहीत धरून यासंबंधीची खात्री प्रधान सचिवांमार्फत करण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, गार्डन, क्रीडांगण, तसेच वेगवेगळया भूखंडाचे आरक्षण बदलण्याचे अधिकार नियम 37(1) नुसार आहेत. तेव्हा 37 (1) नुसार आरक्षण बदलण्यासंबंधीचे निदेश शासन देणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सदर भूखंडावर मार्केटचे आरक्षण आहे. आता फक्त महात्मा ज्योतिबा फुले मंडईचा पुनर्विकासाची योजनेचा प्रश्न आहे. विद्यमान जागेपैकी 70 टक्के जागा ही मार्केटसाठी उपलब्ध राहणार असून उर्वरित 30 टक्के जागा विकासकाकडे जाणार आहे.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, मुंबई शहराच्या मध्यवर्ती भागात असलेले क्रॉफर्ड मार्केट हे एका बदनाम व बदमाश अधिकाऱ्याच्या नावाने उभे आहे.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, क्रॉफर्ड मार्केटचे नाव आता महत्मा ज्योतिबा फुले मंडई असे करण्यात आलेले आहे. तशी नोंद शासनाच्या रेकॉर्डवरसुध्दा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, कॉफर्ड मार्केट विकण्याचा प्रयत्न महापालिकेमध्ये सत्तेत असलेल्या भाजप-शिवसनेच्या युतीने चालवलेला आहे. यास मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांची देखील साथ आहे. तेव्हा त्यांची देखील चौकशी झाली पाहिजे. सुधार समितीमध्ये ज्या पध्दतीने ठराव मंजूर करून घेण्यात आला आहे, ते पाहता सदर ठराव रद्द करण्याचा आदेश शासन देईल काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेसमोर तीन पर्याय आहेत. 1) स्वत:च्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करून ते सदर मंडईचा विकास करू शकतात. 2) BOT तत्त्वावर टेंडर काढून सदर मंडईचा विकास करू शकतात. 3) 33(9) खाली अर्बन रि-डेव्हलपमेंट स्कीम अंतर्गत शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार मंडईचा विकास करू शकतात. डी.सी.रुल्सचे उल्लंघन होऊन काही झाले असेल तर त्याची दखल घेऊन शासन कारवाई करू शकते.

यानंतर श्री.बोर्ड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे....

त्या ठिकाणी इम्प्रुव्हमेंट कमिटीने त्याला मान्यता दिली आहे. जनरल बॉडीसमोर हा प्रस्ताव जाणार आहे. महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. त्यामुळे शासन इम्प्रुव्हमेंट कमिटीच्या ठरावासंदर्भात डायरेक्ट काही कार्यवाही करु शकत नाही. जनरल बॉडीने मान्य केलेला ठराव, डी.सी.रुलप्रमाणे झालेला नसेल किंवा मार्गदर्शक तत्वानुसार झालेला नसेल तर तो ठराव विखंडीत करण्याचा अधिकार शासनाकडे आहे. डी.सी.रुलप्रमाणे किंवा मार्गदर्शक तत्वाप्रमाणे ठराव झाला नसेल तर शासन जरुर तसे करु शकते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेने महात्मा ज्योतिबा फुले मंडईच्या बद्दल जो निर्णय घेतलेला आहे तो महाराष्ट्र सरकारने जी पॉलिसी किंवा मार्गदर्शक तत्वे ठरवून दिली होती, त्या तत्वांचे पालन करुन, टेंडर काढण्यात आले आहे काय ? त्याच्या विपरित काही झाले आहे काय ? की जे झाले आहे ते नियमाप्रमाणे झाले आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मार्केटींग रि-डेव्हलपमेंट स्कीमच्या माध्यमातून असोसिएशन करुन, त्यांच्या वतीने पुनर्विकास करणे हा या योजनेचा महत्वाचा हेतू आहे. मी अगोदर जे तीन ऑप्शन सांगितलेले आहे, त्यातील तिसरा ऑप्शन महानगरपालिकेने स्वीकारलेला आहे. त्यानुसार मार्गदर्शक तत्वानुसार पुनर्विकासाचा प्रस्ताव आणण्यात आलेला आहे. जनरल बॉडी समोर जेव्हा याबाबतचा ठराव येईल, तेव्हा उक्त मार्गदर्शक तत्वानुसार हे काम झालेले नाही असे वाटले तर शासन पुढील उचित कार्यवाही करेल.

श्री.नितीन गडकरी : महोदय, या व्यवहारामध्ये आपणास आजपर्यंत काही गैर आढळून आले आहे काय ?

श्री.राजेश टोपे : नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या ठिकाणी लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जे निवेदन आलेले आहे त्यातील पहिला परिच्छेद सोडला तर उर्वरित उत्तर आम्हाला मान्य नाही. त्यामुळे या उत्तरामध्ये प्रथम दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

श्री.राजेश टोपे :मी या ठिकाणी स्पष्टपणे सांगितले आहे की.....

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून
एकत्रित बोलण्याचा प्रयत्न करतात.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय मंत्री महोदय आताच एका प्रश्नाला उत्तर देत असताना सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी त्यांना उद्देशून "उत्तर दुरुस्त कर" असे म्हटले. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे एक प्रकारे धमक्या देत आहेत. मी सन्माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारला होता की, आतापर्यंत या प्रकरणी महानगरपालिकेने जी कृती केली आहे, त्यामध्ये शासनाला काही बेकायदेशीर किंवा गडबडीचे घडले आहे असे वाटते काय ? त्याला माननीय मंत्री महोदयांनी "नाही" असे उत्तर दिले. याचा अर्थ त्या ठिकाणी सर्व काही नियमाप्रमाणे झाले असा होतो. त्यांनी माझ्या प्रश्नाला स्पष्टपणे, स्वच्छ भावनेने, तसेच पारदर्शक उत्तर दिले. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य आणि माय लर्नेड फ्रेंड ॲड.गुरुनाथ कुलकर्णी माननीय मंत्री महोदयांना "उत्तर दुरुस्त कर" असे म्हणत असतील तर ते योग्य होणार नाही.

नंतर श्री.व्ही.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्र बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

उपसभापती : आपण कृपा करुन सर्वांनी खाली बसावे, हे विधानमंडळ आहे, क्रॉफर्ड मार्केट नाही, याबाबतचे भान सर्व सदस्यांनी राखावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जो मुद्दा मांडला त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, शासनाला या प्रकरणामध्ये आतापर्यंत कोणत्याही प्रकारचे बोगस काम आढळून आलेले नाही. व्यापाऱ्यांची बोगस सहमती पत्रके घेण्यात आलेली आहेत अशी त्यांनी माहिती दिलेली आहे. मी या संदर्भात सांगू इच्छितो की, अशा पध्दतीचे जर काही घडलेले असेल तर पोलिसांकडून कारवाई करण्यात येऊन संबंधितांवर फौजदारी कारवाई करता येऊ शकेल. महात्मा ज्योतिबा फुले मंडईचा पुनर्विकास करण्यास इंम्प्रुमेंट कमिटीने मान्यता दिल्यानंतर त्यांच्या अहवालास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जनरल बॉडीने मान्यता दिल्यानंतर तेथील व्यापाऱ्यांना जर मार्गदर्शक तत्वानुसार गाळयांचे वाटप झाले नाही, महानगरपालिकेने जर मार्गदर्शक तत्वाचे पालन केले नाही तर सदर प्रस्ताव विखंडीत करण्याचा अधिकार शासनाला आहे. त्यामुळे हया सगळया बाबींची तपासणी प्रधान सचिव श्री. तिवारी यांच्याकडून करण्यात येत आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी असे सांगितले की, यामध्ये काही चुकीचे आढळल्यास चौकशी करुन त्यासंदर्भातील निर्णय घेण्यात येईल, दुसऱ्याबाजूला हे सर्व योग्य चालेले आहे असे ते म्हणतात. सन्माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये विरोधाभास आहे हे बरोबर आहे काय ? येथे भ्रष्टाचार झाल्याचे उघडपणे दिसत आहे. मुंबईतील अशा मोक्याच्या जागा बिल्डरांना देणे हा सर्वात मोठा भ्रष्टाचार आहे. या मार्केटचा विकास महानगरपालिकेने करावयास पाहिजे. यामध्ये अजून काय चौकशी करावयाची आहे ?

(उत्तर आले नाही.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अमरावती शहराच्या पश्चिम बाजूने अकोल्यावरुन जाणाऱ्या वळणरस्त्याचे बांधकाम बंद पडण्याची स्थिती निर्माण होणे

मु.शी.: अमरावती शहराच्या पश्चिम बाजूने अकोल्यावरुन जाणाऱ्या वळणरस्त्याचे बांधकाम बंद पडण्याची स्थिती निर्माण होणे याबाबत प्रा. बी.टी. देशमुख, सर्वश्री. व्हि.यु.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.अैनापूरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. बी.टी.देशमुख : (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अमरावती शहराच्या पश्चिम बाजूने अकोल्यावरुन जाणाऱ्या वळणरस्त्यासाठी मौजे बडनेरा (चमननगर) येथून जाणाऱ्या भागासाठी पर्यायी आखणी करुन चार महिन्याच्या आत महामंडळाकडे जागा हस्तांतरण करण्याबाबत मा.मंत्रिमहोदयांनी सभागृहात दिनांक १५ डिसेंबर, २००४ रोजी घोषणा करुन सुध्दा असे हस्तांतरण होण्यास अक्षम्य विलंब होणे, या रस्त्यासाठी लागणाऱ्या वनजमिनीच्या हस्तांतरणास केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाने दिनांक २१ डिसेंबर, २००५ च्या पत्रान्वये तत्वत: मान्यता देणे, किरकोळ अटींची पूर्तता करुन अंतिम मान्यता प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात होत असलेला विलंब, या दोन अडचणींमुळे या वळणरस्त्याचे बांधकाम बंद पडण्याची स्थिती निर्माण होणे, त्यामुळे लक्षावधी रुपयाचा भुर्दंड प्रकल्पावर पडण्याची निर्माण झालेली शक्यता व त्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भुमिका."

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.....३....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, जी लक्षवेधी सूचना दिलेली आहे त्या सूचनेमध्ये अमरावती शहराच्या पश्चिम बाजूने जाणारा जो वळण रस्ता आहे त्याचे काम बंद पडण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. लक्षवेधीच्या उत्तरामध्ये याची दोन कारणे दिलेली आहेत. अमरावती शहराच्या पश्चिम बाजूने जाणाऱ्या वळणरस्त्यासाठी मौजे बडनेरा येथून जाणाऱ्या भागासाठी पर्यायी आखणी करुन 4 महिन्यांच्या आंत महामंडळाकडे जागा हस्तांतरित करण्याबाबत मा. मंत्री महोदयांनी सभागृहात झालेला आहे. हे काम बंद पडण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. 15 डिसेंबर, 2004 रोजी सभागृहामध्ये मंत्री महोदयांनी असे सांगितले की, यामध्ये शासनाला जे अधिकार आहेत त्यानुसार या रस्त्याचे मायनर मॉडिफिकेशन निश्चितपणे 3 ते 4 महिन्याच्या आत करण्यात येईल.

यानंतर श्री. सांगळे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी. देशमुख ...

मी माननीय मंत्रिमहोदयांना, चार महिन्यांच्या आत रस्ते विकास महामंडळाकडे जागा दिली जाईल काय ? असा त्यावेळी प्रश्न विचारला होता. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांकडून या प्रश्नाला " जागा दिली जाईल " असे उत्तर देण्यात आले होते. परंतु या गोष्टीला 14 महिन्यांचा कालखंड होऊन सुध्दा ही जागा देण्यात आली नाही. तसेच याबाबत लक्षवेधीच्या निवेदनामध्ये कोणत्याही प्रकारचा उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे हे काम बंद पडण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणून माननीय मंत्रिमहोदयांनी आता तरी ताबडतोबीने कार्यवाही करुन किमान 10 ते 15 दिवसांत ही जागा रस्ते विकास महामंडळाच्या ताब्यात देणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : ही वस्तुस्थिती आहे की, सन 2004 मध्ये मी या प्रश्नाच्या अनुषंगाने आश्वासन दिले होते. याबाबतीत सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख यांना माहितच आहे की, त्यावेळी शासनाने याबाबतची बहुतांशी वैधानिक कार्यवाही पूर्णत्वाला आणली, परंतु त्या ठिकाणी जास्तीत जास्त घरे होण्याच्या दृष्टीने सूचना करण्यात आल्यामुळे यामध्ये थोडीशी दिरंगाई झाली. पंरतु आता वैधानिक स्वरुपाची कार्यवाही पुर्णत्वाला आली आहे. तसेच संचालक, नगररचना पुणे यांच्याकडे हा प्रस्ताव आलेला आहे. निश्चितपणे एका महिन्याच्या आतमध्ये रिअलाईनमेंटचा प्रस्ताव मंजूर करण्यात येईल व त्यानंतर रस्तेविकास महामंडळाला जागा हस्तांतरीत करण्यात येईल.

प्रा.बी.टी. देशमुख : पहिल्या मुद्दाच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर समाधानकारक आहे. परंतु या सर्व प्रक्रिया पूर्ण करुन एका महिन्याच्या आत एमएसआरडीसीकडे जागा देण्यात येईल काय ?

श्री.राजेश टोपे : निश्चितप्रकारे एका महिन्याच्या आत ही जागा एमएसआरडीसीकडे दिली जाईल.

प्रा.बी.टी. देशमुख : सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न वन विभागाच्या बाबतीत आहे. या संदर्भात भारत सरकारकडे जो प्रस्ताव पाठविण्यात आला होता त्याची एक प्रत मला पाठविण्यात आली होती. त्यानंतर या प्रस्तावाला तत्वत: मान्यता मिळाली त्याची सुध्दा मला प्रत पाठविण्यात आली. वन जमिनीसाठी आवश्यक असलेल्या सा-या गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक आहे.या अटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी. देशमुख ...

पूर्ण करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. कारण याबाबतचे आदेश भारत सरकारकडून मिळणार आहे. त्यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्याची आपल्या विभागाची जबाबदारी आहे. अशाप्रकारे या प्रस्तावाबाबतची पूर्तता करुन 15 दिवसांच्या आत हा प्रस्ताव भारत सरकारकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविला जाईल काय ?

श्री.राजेश टोपे : उपवन संरक्षक (केंद्रीय) भोपाळ यांच्या पत्राच्या अनुषंगाने उपवन संरक्षक, अमरावती तसेच वन विभाग अमरावती यांनी महानगरपालिकेला 5 प्रमुख अटींची पुर्तता करण्याबाबत कळवले होते. या 5 अटींची महानगरपालिकेकडून पूर्तता करण्यात आली आहे. या संदर्भात असलेल्या कामाचे अंदाजपत्रक रु.3,05,000 एवढया रकमेचे होते. हे अंदाजपत्रक दिनांक 3 एप्रिल रोजी आलेले आहे. त्यामुळे हा प्रस्ताव उपवन सरंक्षक (केंद्रीय), भोपाळ यांच्याकडे येत्या 8 दिवसांत निश्चितपणे पाठविण्यात येईल.

प्रा.बी.टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेल्या उत्तरामुळे माझे समाधान झाले आहे.

(सभापतीस्थानी : माननीय तालिका सभापती श्री.गुरुनाथ कुलकर्णी)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: बर्ड फ्ल्यू या रोगाने पोल्ट्री व्यावसायिक व कुक्कुट पालकांचे झालेले नुकसान

मु.शी.: बर्ड फ्ल्यू या रोगाने पोल्ट्री व्यावसायिक व कुक्कुट पालकांचे झालेले नुकसान यासबंधी माननीय पशुसंवर्धन मंत्र्यांचे निवेदन.

श्री. अनिस अहमद (पशुसंवर्धन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

" राज्यामध्ये नवापूर, जिल्हा नंदूरबार तसेच जळगांव जिल्हयामध्ये बर्ड फ्ल्यू या रोगाने पोल्ट्री व्यावसायिक तसेच कुक्कुट पालकांचे झालेले नुकसान त्याचबरोबर बर्ड फ्ल्यू या रोगामुळे सर्वसामान्य लोकांमध्ये पसरलेला गैरसमज या सर्व बाबींमुळे अंडी खाणे व कोंबडयांचे मांस खाणे यावर सुध्दा परिणाम झालेला आहे. परिणामी पोल्ट्री व्यवसाय ठप्प झाला आहे. पोल्ट्री व्यवसाय पुन्हा जोमाने सुरु करण्यासाठी पोल्ट्री व्यवसायिकांना आर्थिक मदतीची गरज आहे, त्यासाठी दि.5/4/2006 रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत :-

1) पोल्ट्री शेतक-यांकडील कोंबडयांची अंडी तसेच बॉयलर न विकल्यामुळे झालेले नुकसान याचा विचार करुन त्यांना दिलासा म्हणून प्रत्येक कोंबडीच्या मागे रु.20/- या दराने सानुग्रह अनुदान देण्यात यावे. हे अनुदान फक्त शेतकरी आणि त्यांच्या संस्था यांनाच देण्यात यावे आणि यापोटी शासनाचा जवळ-जवळ अंदाजे 80 कोटी रुपये खर्च होईल.

2) सांगली, पुणे, रत्नागिरी, वाशिम, अकोला, परभणी, जळगांव, धुळे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर व औरंगाबाद येथे कोल्ड स्टोअरेज एका महिन्यासाठी भाडयाने घेऊन त्यात पोल्ट्री शेतक-यांकडील कोंबडयांची अंडी ठेवण्याकरिता कोल्ड स्टोअरेज उपलब्ध करुन देण्यात येतील.

3) महाराष्ट्रातील एफ.सी.आय. च्या गोडाऊनमध्ये मनुष्यास खाण्याकरिता योग्य अन्नधान्य नाही ते पोल्ट्रीच्या शेतक-यांना सध्याच्या केंद्र शासनाच्या किंमतीत उपलब्ध करुन देण्यात येईल. याबाबत केंद्र शासनाकडे या धान्याच्या किंमती कमी करण्याकरिता विनंती करण्यात आली आहे. ती मान्य झाल्यास ते अन्नधान्य कमी किंमतीत उपलब्ध होऊ शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिस अहमद .....

4) शासकीय दवाखाने, आश्रमशाळा, कारागृह तसेच मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह यांना अदांजे 50 लाख अंडी विकत घेऊन ते त्यांच्या लाभार्थीसाठी विकत घ्यावे.

5) याशिवाय केंद्र शासनाने व्याजाच्या खर्चावरील सूट आणि कर्जाबाबत दिलेल्या इतर सवलतींसह पोल्ट्री शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

6) धान्य, पक्षी खाद्य व औषधे देखील शास्त्रोक्त पध्दतीने नष्ट करावी लागली आहेत. त्याचा देखील सहानुभूतीपूर्वक विचार करावा लागेल. त्यासंबंधीचा प्रस्ताव देखील मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करावा."

यानंतर श्री.सुंबरे ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : माधुरी अपार्टमेंट,वरळी येथे 31.12.2005 रोजीच्या रात्र पार्टीमध्ये मद्यधुंद अवस्थेत बोगस पोलीस गणवेशात केलेले गैरप्रकार.

मु. शी. : माधुरी अपार्टमेंट,वरळी येथे 31.12.2005 रोजीच्या रात्र पार्टीमध्ये मद्यधुंद अवस्थेत बोगस पोलीस गणवेशात केलेले गैरप्रकार यासंबंधी सर्वश्री विलास अवचट व प्रमोद नवलकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विलास अवचट (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" दिनांक 31 डिसेंबर 2005 रोजी नववर्षाच्या स्वागतासाठी रूपम स्टोअर्सचे मालक श्री.विरेन शाह यांनी माधुरी अपार्टमेंट,वरळी,मुंबई येथे आयोजित केलेल्या पार्टीमध्ये त्यांच्या मित्राने पोलीस नसताना बोगस पोलीस म्हणून खाली गणवेशात सार्वजनिक ठिकाणी उपस्थित राहून मद्यधुंद अवस्थेत गैरप्रकार केल्याबाबतची घडलेली घटना दिनांक 17 जानेवारी 2006 रोजीच्या दरम्यान उघडकीस येणे, याबाबत आमदार श्री.प्रमोद नवलकर यांनी वरळी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करूनही संबंधितांवर अद्यापही कारवाई न होणे., या प्रकरणी पोलिसांचे रूपम स्टोअर्सचे मालक यांचेशी असलेले संबंध, लोकप्रतिनिधींनी केलेल्या गंभीर तक्रारीनंतर देखील पोलिसांकडून संबंधितांवर कारवाई करण्यास होत असलेला विलंब व टाळाटाळ, यामुळे शासकीय यंत्रणेचा गैरवापर करण्याच्या वाढीस लागलेल्या अपप्रवृत्ती, तसेच याबाबत जनतेच्या मनात निर्माण झालेले संशयाचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, परिणामी पोलिसांची जनमानसातील बिघडत असलेली प्रतिमा, तसेच त्यांच्या कर्तव्यदक्षतेबद्दल निर्माण झालेला प्रश्न, याबाबत शासनाने संबंधितांवर केलेली कारवाई व प्रतिक्रिया."

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.गुरूनाथ कुलकर्णी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..... 3व्ही 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सुचनेवरील मा. गृह राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या निवेदनामध्ये जे काही आहे ते मी जी तक्रार केली आहे त्यावर आधारित आहे. पहिली गोष्ट म्हणजे मी तक्रार जानेवारीच्या पहिल्या आठवड्यामध्ये केली होती. त्यानंतर वरळी पोलीस ठाण्याकडून आजतागायत माझ्या तक्रारीबद्दल एका शब्दाने देखील मला उत्तर आलेले नाही वा मला विचारण्यात आलेले नाही. या निवेदनात याबाबत सखोल चौकशी केली असे म्हटले आहे. पण त्या चौकशीसाठी मला बोलाविण्यात आलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी या संबंधात पत्र लिहिले होते पण त्यांनाही त्यावर उत्तर आलेले नाही आणि असा काही प्रकार घडलेला असताना तो तेथे घडलाच नाही, ते एक छोटेसे नाटक होते अशा प्रकारची सारवासारव येथे करण्यात आली आहे. सभापती महोदय, मला जर या संबंधात चौकशीसाठी बोलाविले असते तर त्या रात्री घडलेला प्रकार मला चौकशीमध्ये सांगता आला असता, त्या रात्री जो काही प्रकार घडला तो वेगळा होता. 31 डिसेंबरची ती रात्र होती आणि माधुरी अपार्टमेंट सारख्या इमारतीच्या गच्चीवर ही पार्टी होती. ज्या इमारतीतील एक एक फ्लॅट 6 ते 8 कोटी रूपयांना विकला जातो, अशी ही इमारत आहे. या निवेदनामध्ये म्हटले आहे की, ती पार्टी 'जनजागृतीसाठी केली होती'. यावर कोण विश्वास ठेवेल ? सभापती महोदय, या प्रकरणी पोलिसांनी जी काही चौकशी केली आहे त्या चौकशीमध्ये मी तक्रारकर्ता असूनही मला बोलाविले गेले नाही. आरोपीला बोलाविले. आरोपीच्या इमारतीत राहणाऱ्या लोकांना बोलाविले गेले. वास्तविक मला देखील त्या चौकशीमध्ये बोलाविले गेले पाहिजे होते. तेव्हा या प्रकरणी वरळी पोलीस ठाण्याच्या नव्हे तर अन्य वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडून चौकशी होणे गरजेचे आहे. या पार्टीची कॅसेट माझ्याकडे आहे आणि चौकशीमध्ये मला बोलाविले गेले असते तर मी ती कॅसेट देखील चौकशीसाठी दिली असती आणि मग त्यातून अनेक धक्कादायक गोष्टी समोर आल्या असत्या. परंतु या निवेदनात आपण सांगता आहात की, असे काही घडलेले नाही आणि जे काही घडले ते एक नाटक होते. म्हणजे आपण येथे जे काही सांगाल, जे काही लिहून आमच्यासमोर ठेवाल ते आम्ही स्वीकारायचे, उचलून धरायचे. तर हे चालणार नाही. म्हणून सभापती महोदय, माझी मागणी आहे की, आपण ही लक्षवेधी सूचना आणि त्यावरील हे निवेदन रोखून ठेवावे. माझ्याकडे असलेल्या या कॅसेटमध्ये त्या पार्टीमध्ये घडलेल्या

..... 3व्ही 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नवलकर .....

सर्व घटना आहेत. तेव्हा या कॅसेटची देखील आपण वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडून चौकशी करावी, मात्र त्यात वरळी पोलीस ठाण्याचा अधिकारी असता कामा नये. कारण यामध्ये मोठमोठी माणसे गुंतलेली आहेत आणि मुंबई शहरातील एक अत्यंत श्रीमंत अशी ही 'माधुरी अपार्टमेंट' इमारत आहे. त्यामुळे त्या लोकांच्या खिशात या आपल्या वरळी पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी असण्याची शक्यता आहे. ....

(यानंतर श्री. सरफरे .....3डब्ल्यू 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर...

म्हणून आपण या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करावी. सभापती महोदय, त्याकरीता मी ही सी.डी.आपणाकडे सुपूर्द करीत आहे. आणि तोपर्यंत आपण ही लक्षवेधी सूचना रोखून धरावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर साहेबांनी पत्र लिहून पोलीस आयुक्तांकडे तक्रार केली होती. ती तक्रार पोलीस आयुक्तांनी उपायुक्तांकडे पाठविली, उपायुक्तांनी ती तक्रार असिस्टंट पोलीस इन्सपेक्टरकडे पाठविली...

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, मी देखील तक्रार केलेली आहे. त्या तक्रारीची तारीख माझ्याकडे आहे...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी देखील तक्रार केली आहे. ती तक्रार आल्यानंतर संबंधित बीटचे असिस्टंट पोलीस इन्सपेक्टर यांनी चौकशी केली. आपण तक्रारीमध्ये म्हटल्याप्रमाणे त्या इमारतीच्या चौदाव्या माळयावर 31 डिसेंबरच्या रात्री एक पार्टी आयोजित करण्यात आली होती. आणि त्या पार्टीमध्ये "नो टू ड्रग्ज" अशाप्रकारचा एक कार्यक्रम जनजागृतीसाठी...

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माझे म्हणणे असे आहे की, जे घडले आहे ते शासनाच्या निवेदनामध्ये नाही. म्हणून मी ही सी.डी. आपणाकडे सुपूर्द करतो. आणि याची एका वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत शासनाने पुन्हा चौकशी करावी...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नवलकर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे वरळी पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करुन त्यांच्याकडून चौकशी अहवाल मागवून घेण्यात येईल. त्यासाठी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याची आवश्यकता नाही.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, मी या ठिकाणी या सी.डी. च्या माध्यमातून आपणाकडे पुरावा देत आहे. असे असतांना मंत्रिमहोदय सांगत आहात ते खरे आणि आम्ही बोलतो ते खोटे ही पध्दत बरोबर नाही. एका सब इन्सपेक्टरमार्फत आपण या प्रकरणाची चौकशी करीत आहात हे योग्य नाही. या ठिकाणी सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित केल्यानंतर या सभागृहाचा सुध्दा मान राखला गेला पाहिजे. वास्तविक या प्रकरणाची तक्रार पोलीस आयुक्तांकडे केल्यानंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर...

ती तक्रार सरकत सरकत शेवटी सबइन्सपेक्टरकडे गेल्यानंतर सब इन्सपेक्टर विचारतो की, असे काही घडले आहे काय? त्यावेळी त्याला सांगण्यात येते की असे काही घडले नाही. सभापती महोदय, हा एक-दोन मिनिटांमध्ये घडलेला प्रकार नाही. अशाप्रकारे पोलीसांचे खाकी गणवेश परिधान करुन बोगस धाडी टाकण्याचे नाटक करुन कायदा धाब्यावर बसविणाऱ्यांना योग्य शिक्षा झाली पाहिजे. त्यासंबंधीचा पुरावा मी आपणाकडे देत आहे त्याबाबत आपण मला धन्यवाद दिले पाहिजेत...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, एका खाजगी जागेमध्ये 31 डिसेंबरच्या रात्री पार्टी सुरु होती. त्या पार्टीमध्ये दोन लोक पोलिसांच्या वेशामध्ये येऊन त्यांनी "नो टू ड्रग्ज" नावाचे एक नाटक केले. हे नाटक 5 मिनिटांचे होते...

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी होईपर्यंत ही लक्षवेधी सूचना राखून ठेवायला हरकत काय आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना रोखून धरण्यामध्ये अडचण काही नाही...

(गोंधळ)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य सन्माननीय श्री. नवलकर साहेबांनी याठिकाणी जी माहिती दिली आहे ती माहिती आणि या ठिकाणी दिलेले निवेदन यामध्ये विसंगती दिसत आहे. या सदनामध्ये माननीय सदस्य जी माहिती देत आहेत ती सत्य आहे असे गृहीत धरले जाते. ती माहिती सत्य असेल आणि मंत्रिमहोदयांनी दिलेल्या निवेदनामध्ये विसंगती असेल तर ती लक्षवेधी सूचना राखून ठेवली पाहिजे. सभापती महोदय,माननीय सदस्यांनी आपणाकडे सी.डी. दिल्यानंतर आपणामार्फत ती माननीय गृह राज्यमंत्र्यांकडे सुपूर्द करावी. आणि माननीय गृह राज्यमंत्र्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत त्याची चौकशी करुन माहिती सादर करावी. तोपर्यंत ही लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवावी अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : माननीय गृह राज्यमंत्र्यांनी मघाशी उत्तर देतांना सांगितले की, माननीय सदस्यांनी पोलीस आयुक्तांकडे तक्रार केल्यानंतर पोलीस आयुक्तांनी ती तक्रार पोलीस उपायुक्तांकडे पाठविली. पोलीस उपायुक्तांनी त्यानंतर ती तक्रार सिनियर पोलीस इन्सपेक्टरकडे सुपूर्द केल्यानंतर सिनियर पोलीस इन्सपेक्टर ती तक्रार असिस्टंट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती...

पोलीस इन्सपेक्टकडे सुपूर्द करतो. यावरुन माननीय सदस्यांनी ज्या गांभीर्याने हा प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याला अनुसरुन आपण दिलेले उत्तर हे न पटण्यासारखे आहे. तेव्हा आपण माननीय सदस्यांकडील सी.डी. ताब्यात घेऊन सर्व गोष्टींची चौकशी वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत करावी. आणि त्याचे उत्तर आपण उद्या सादर करावे तोपर्यंत मी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवतो.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी सुपूर्द केलेल्या सी.डी. बाबत आपण सांगितल्याप्रमाणे वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी केली जाईल...

तालिका सभापती : माननीय सदस्यांकडील सी.डी. मी आपणाकडे पाठवून देतो. ती सी.डी. आपण ताब्यात घेऊन त्याप्रमाणे चौकशी करावी आणि यासंबंधी सभागृहामध्ये निवेदन करावे. परवाच्या दिवशी सभागृह सुरु होईल त्या दिवशी ही लक्षवेधी सूचना घेण्यात येईल. त्यावेळी मंत्रिमहोदयांनी निवेदन करावे. तोपर्यंत मी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवतो.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ठीक आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मी या सभागृहामध्ये वारंवार एक विषय उपस्थित करीत आहे. या ठिकाणी दिली जाणारी उत्तरे ही अत्यंत संतापजनक असतात. सभापती महोदय, आपण याची केव्हा तरी दखल घेणार की नाही ?

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली त्याची अंमलबजावणी आपण करीत आहोत.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मी केवळ या विषयापुरतेच बोलत नाही. मला नेहमीसाठी हा बेसिक इश्यू उपस्थित करावयाचा आहे. श्री. विरेन शाह जे सांगतात ते पोस्टमनसारखे या ठिकाणी पोहोचविण्याचे काम माननीय मंत्रिमहोदय करीत आहेत. हे काय चालले आहे ? सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांच्यापेक्षा श्री. विरेन शाह महत्वाचे ठरतात काय ? या ठिकाणी जी उत्तरे दिली जातात त्यावर कोणी तरी काम करणार आहे की नाही ? प्रश्नाच्या उत्तराची तीच तऱ्हा आहे. लक्षवेधीच्या उत्तराची तीच तऱ्हा आहे. हे सर्व पाहिल्यानंतर त्यातून डायमेट्रिकली अपोझिट निष्कर्ष निघतात. आपण याबाबतीत आदेश दिले पाहिजेत की, अशी उत्तरे या ठिकाणी चालणार नाहीत.

तालिका सभापती : मी आदेश दिलेले आहेत.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, ही उत्तरे नेहमीसाठी डोळ्यात तेल घालून पाहिली पाहिजेत आणि त्यानंतर सदनासमोर आली पाहिजेत.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी जो मुद्दा मांडलेला आहे त्याबाबतीत मी बोलत आहे. मागे अंधश्रध्देच्या संदर्भात एक लक्षवेधी सूचना मांडलेली होती. त्या लक्षावेधी सूचनेच्या निवेदनामध्ये एक वाक्य असे होते की, "तिच्या अंगात देवीचे वारे आले होते." सरकारकडून उत्तर देत असताना " तिच्या अंगात देवीचे वारे आले होते" असे उत्तर माननीय मंत्रिमहोदय कसे काय देऊ शकतात ? नंतर ती लक्षवेधी सूचना सभागृहासमोर चर्चेला आलीच नाही. आता या ठिकाणी जे सांगण्यात आले त्याप्रमाणे श्री. विरेन शाह जे म्हणतात ते महत्वाचे आहे की, सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर साहेब सभागृहात जे सागत आहेत ते महत्वाचे आहे ? याबाबतीत आपली प्रथा आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड .....

परंपरा अशी आहे की, सन्माननीय सदस्य जे सांगतात ते सत्य आहे असे समजले जाते. या ठिकाणी अशा प्रकारचे उत्तर देणे हा या सार्वभौम सभागृहाचा अवमान आहे. याबाबतीत आपण गांभीर्याने नोंद घेतली पाहिजे. असे उत्तर यावयास लागले तर सभागृहाचा अवमान होतो.

तालिका सभापती : ही लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जी सीडी दिलेली आहे ती माननीय मंत्रिमहोदयांना देतो. यासंदर्भात सिनियर अधिकाऱ्याकडून चौकशी करावी आणि यासंदर्भातील निवेदन सोमवारी सभागृहासमोर ठेवावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ठीक आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनेसंबंधी.

तालिका सभापती : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील अनुक्रमांक 4 वर असलेली लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात येत आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याचे कारण काय आहे ?

तालिका सभापती : ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी असे पत्र माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले आहे

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना केव्हा घेण्यात येईल ?

तालिका सभापती : ही लक्षवेधी सूचना कामकाजामध्ये येईल अशी खबरदारी घेण्यात येईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना सोमवारी घ्यावी.

तालिका सभापती : ठीक आहे. ही लक्षवेधी सूचना सोमवारी घेण्यात येईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना सोमवारी पहिल्या क्रमांकावर घ्यावी.

तालिका सभापती : ही लक्षवेधी सूचना सोमवारी पहिल्या क्रमांकावर येईल की, नाही हे सांगता येणार नाही. पण ही लक्षवेधी सूचना सोमवारी घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : वसंतदादा पाटील शिक्षण संस्था, भांडूप (प), मुंबई या संस्थेत होत असलेला गैरकारभार.

मु. शी. : वसंतदादा पाटील शिक्षण संस्था, भांडूप (प), मुंबई या संस्थेत होत असलेला गैरकारभार यासंबंधी श्री. जी.एल.अैनापूरे, प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, नानासाहेब बोरस्ते, वसंतराव खोटरे, जितेंद्र आव्हाड व प्रा. शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जी.एल.अैनापूरे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वसंतदादा पाटील शिक्षण संस्था, भांडूप (प), मुंबई या संस्थेच्या दहशतवादी व नियमबाहय गैरकारभारामुळे श्रीनगर माध्यमिक शाळेवर प्रशासक नेमण्यात येणे, सदर संस्थेच्या प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पाटकर यांना बेकायदेशीररित्या कमी करणे, इतर सर्व शिक्षकांना निलंबित करुन शाळेतून काढून टाकण्याची धमकी देणे, त्यामुळे शिक्षकांत पसरलेली घबराट याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शिक्षक व पालकात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी. एल. अैनापूरे : सभापती महोदय, हे प्रकरण म्हणजे महाराष्ट्राचे शिक्षण आपण कोणाच्या हातामध्ये देत आहोत याचे उत्तम निदर्शक आहे. वसंतदादा पाटील शिक्षण संस्था, भांडूप या संस्थेचे जे संस्थापक आहेत त्यांच्या एकत्रित कारभाराच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना आहे. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये उत्तर देत असताना जे अनेक आरोप केले आहेत ते शासनाने मान्य केलेले आहेत. किंबहुना शिक्षण अधिकाऱ्यांनी सुध्दा असे सांगितले आहे की, त्या ठिकाणी प्रशासक नेमणे आवश्यक आहे. तशी शिफारस शिक्षण अधिकाऱ्यांनी सुध्दा केलेली आहे. त्याचबरोबर त्याच संस्थेच्या माध्यमिक विभागावर प्रशासक नेमला गेलेला आहे परंतु प्राथमिक विभागावर अद्यापही प्रशासक नेमला गेलेला नाही. चुका त्याच आहेत. या सगळ्या चुका असून सुध्दा सध्या असलेल्या शिक्षकांना मारहाण करण्याचे, धमकावण्याचे आणि दहशतीचे वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने त्या ठिकाणी प्रयत्न चालू आहेत. अशा परिस्थितीमध्ये या संस्थेवर आणि त्या प्राथमिक शाळेवर प्रशासक नेमणार काय ?

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : हे खरे आहे की, वसंतदादा पाटील शिक्षण संस्था, भांडूप (प), मुंबई या संस्थेच्या श्रीनगर विद्यामंदिर, ठाणे या माध्यमिक शाळेचे व्यवस्थापन शासनाने ताब्यात घेतले असून सदर शाळेवर दिनांक 14 सप्टेंबर 2005 पासून प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. प्राथमिक शाळोच्या बाबतीतही अशा प्रकारच्या तक्रारी उपलब्ध झालेल्या आहेत. शिक्षण संचालक प्राथमिक यांनी नोटीस देऊन 21.3.2006 रोजी सुनावणी झालेली आहे. शिक्षण संचालकांनी या शाळेवर प्रशासक म्हणून कोणाची नेमणूक करायची यासंबंधीचे मार्गदर्शन शासनाकडे मागितलेले आहे. या प्राथमिक शाळेवर प्रशासकाची नियुक्ती लवकरात लवकर करण्यात येईल.

श्री. जी.एल.अैनापुरे : त्या शाळेतील शिक्षकांना दररोज धमक्या दिल्या जात आहेत. तेथील शिक्षकांना काम करणे मुश्कील झालेले आहे. तेव्हा या प्राथमिक शाळेवर निश्चित किती दिवसात प्रशासक नेमण्यात येणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : 8 दिवसात प्रशासक नेमण्यात येईल.

श्री. जी.एल.अैनापुरे : धन्यवाद.

श्री. रामनाथ मोते : या संबंधित शाळेच्या व्यवस्थापन मंडळाच्या पदाधिका-यांनी गैरव्यवहार केलेला आहे हे शासनाने आपल्या उत्तरामध्ये मान्य केलेले आहे. प्रशासक नेमणे ही तात्पुरती कारवाई होईल. प्रशासक नेमून या संस्था सुधारणार आहेत काय ? दोन-तीन वर्षांनी या शाळा पुन्हा संस्थाचालकांच्या ताब्यात जाणार आहेत. माध्यमिक शाळेवर प्रशासक नेमलेला आहे. त्या संस्थाचालकाने जवळ जवळ 72 लाख रु.चा भ्रष्टाचार केलेला असल्यामुळे त्याच्यावर आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने गुन्हा दाखल केलेला आहे काय ? या संबंधित संस्थाचालकांच्या किती शाळा आहेत ? त्यांना राज्य शासनाने पुरस्कार दिलेला आहे काय ? अशा प्रकारे लाखो रुपयांचा गैरव्यवहार करण्या-या शाळांची शासन ताबडतोबीने मान्यता काढून घेणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : फार मोठा गैरव्यवहार होता. मुख्याध्यापक रामचंद्र जाधव यांना निलंबित करुन आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागामार्फत त्यांची चौकशी चालू आहे. श्री. दशरथ पाटील यांना महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेला आहे. याबाबतीत योग्य ती कारवाई होईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : शासनाने त्याचे बक्षिस विथ्ड्रा करील काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : बक्षिस विथ्ड्रा करण्याच्या बाबतीत काय कारवाई करता येईल याबाबतची माहिती घेतली जाईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : माननीय मंत्री महोदय प्रा. वसंत पुरके यांनी या दहशतवादी मंडळाच्या बाबतीत अशा प्रकारचे निवेदन केलेले आहे. सभापती महोदय, माझ्याकडे असलेले पत्र मी माननीय मंत्री महोदयांकडे देत आहे. या संस्था चालकांच्या विरुध्द शिक्षक साक्ष द्यायला गेले तर श्री. दशरथ पांडुरंग पाटील यांच्या पत्नी ज्या संस्था चालक आहेत त्या शिक्षकांना "तुम्हाला कामावरुन का कमी करण्यात येऊ नये" अशा प्रकारच्या नोटीसा पाठवत आहेत. अशा रीतीने धमक्या देऊन 18 शिक्षकांना त्यांनी जबरदस्तीने सेवामुक्त करुन टाकलेले आहे. माध्यमिक आणि प्राथमिक शाळेमध्ये सारखेच गुन्हे घडलेले आहे. माध्यमिक शाळेवर प्रशासक नेमण्यात आलेला असून प्राथमिक शाळेवर प्रशासक नेमण्यास 8 दिवसांचा विलंब का ? त्या शाळेतील सर्व शिक्षकांना शासन संरक्षण देणार आहे काय ? तेथील महिलांना फार त्रास होत असून 8 दिवसा ऐवजी आजच्या आज शासन प्रशासकाची नेमणूक करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : ज्या शिक्षकांना चौकशी शिवाय सेवामुक्त का करु नये अशा नोटीसा दिलेल्या आहेत त्या शिक्षणाधिका-यांनी ताबडतोबीने रद्द करायला लावलेल्या आहेत. म्हणजे शिक्षकांना संरक्षण मिळालेले आहे. या आणि पुढच्या आठवड्यात दोन-तीन दिवस सुट्टया आल्यामुळे प्रशासक नेमण्यासाठी मी 8 दिवसांची मुदत दिली आहे.

...नंतर श्री.कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना पुढे सुरु...

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, वसंतदादा शिक्षण संस्था,भांडूप या संस्थेचे विश्वस्त श्री. दशरथ पांडुरंग पाटील हे या संस्थेचे खलनायक आहेत. त्यांना पुरस्कार देऊन नायक करण्यात आले होते. या संस्थेचे अध्यक्ष श्री. दशरथ पाटील यांनी भूकंप पिडितांच्या मदतीसाठी निधी गोळा केला होता व त्यामध्ये गैरव्यवहार केला होता म्हणून त्यांची चौकशी सुरु आहे ही बाब खरी आहे काय ? या संस्थेच्या शाळेमध्ये अनु.जातीचा एक शिपाई आहे त्याला गुंडांकरवी शाळेमध्ये मारहाण करुन शाळेतून बळजबरीने कमी करण्यात आले आहे अशा प्रकारची तक्रार दोन दिवसापूर्वी मी माननीय शिक्षणमंत्र्यांकडे केली होती. श्री. पाटील यांच्या शिक्षण संस्थांवर शासन प्रशासक नेमणार आहे. परंतु संस्थेच्या अध्यक्षांचा हा दहशतवाद कमी करावयाचा असेल तर त्यांना शिक्षण संस्थेमध्ये तसेच त्या परिसरामध्ये प्रवेश न देण्याबाबत शासन कारवाई करील काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, निधीच्या अपहाराबाबत श्री. पाटील यांनी नोटीस दिलेली आहे. संस्थेवर प्रशासक नेमण्याची कारवाई येत्या आठ दिवसात केली जाईल. संस्थेमध्ये आणि संस्थेच्या परिसरामध्ये श्री. पाटील यांना येण्यापासून प्रतिबंध करण्याबाबत पोलिसांना कळविले जाईल.

श्री. जी.एल.अैनापुरे : सभापती महोदय, यापूर्वी श्री. पाटील यांच्यावर जे आरोप झाले ते सिध्द झालेले आहेत. आता चौकशी करण्यासारखे काही राहिलेले नाही. एकदा ते जेलमध्ये जाऊन आलेले आहेत. आता ते पुन्हा लोकांना सांगत आहेत की मी पुन्हा जेलमध्ये गेलो तरी बेहत्तर पण तुम्हांला सोडणार नाही. त्यामुळे शाळेमध्ये दहशतीचे वातावरण आहे. शिक्षकांना आणि स्टाफला कोणीतरी न्याय द्यावा अशी त्यांची इच्छा आहे. आता तर त्यांना राष्ट्रपती पुरस्कार देण्याचा प्रयत्न सुरु आहे अशी आमची माहिती आहे. शासन या संस्थेवर प्रशासक नेमणार आहे त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो. एवढेच नव्हे तर शिक्षण खात्यातील काही लोकांनी श्री.पाटील यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळवून देण्याबाबत सुपारी घेतली आहे. कदाचित ही सुपारी श्री.पाटील यांनी दिली असण्याची शक्यता आहे. म्हणून याबाबत मंत्रीमहोदयांनी स्वत: लक्ष घालावे आणि असे चुकून सुध्दा होऊ नये याची काळजी शासनाने घ्यावी नाही तर शिक्षण क्षेत्र बदनाम होईल. तसेच अशा संस्था चालकांना काढून टाकण्याबाबत शासन कायदा करणार आहे काय ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शिक्षणाचा आता बाजार झालेला आहे. कुठे कर्मवीर भाऊराव पाटील आणि महात्मा फुले यांच्या शिक्षण संस्था आणि कुठे आजच्या शिक्षण संस्था. अशा संस्था चालकांना संस्थेतून काढून टाकण्याबाबत आणि त्यांना अटक करण्याबाबत कायदा करण्याचा शासन विचार करील.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, या संस्थेच्या अध्यक्षांना 5-6 वर्षापूर्वी राज्य पुरस्कार मिळाला होता. त्या अगोदर त्यांनी वेगवेगळया नेत्यांच्या नावाने शिक्षण संस्था काढल्या आहेत. अशा संस्थांमधून लाखो रुपयांचा अपहार केला आहे. श्री. पाटील यांच्या जेवढया म्हणून शिक्षण संस्था आणि शाळा आहेत त्या सर्वांवर प्रशासक नेमण्याबाबत शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, श्री. पाटील यांच्या तीन अनुदानित,दोन विना अनुदानित आणि एक नाईट हायस्कूल आहे. एकूण 5 शाळा आहेत. दोन संस्थांवर प्रशासक नेमण्यात आलेला आहे. एका संस्थेवर येत्या 8 दिवसात किंवा त्यापूर्वीच प्रशासक नेमण्याची कारवाई करण्यात येईल. उरलेल्या संस्थांची सुध्दा चौकशी करु आणि त्यामध्ये जर दोष आढळून आले तर त्या संस्थांवर सुध्दा प्रशासक नेमण्याची कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 5.....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृहात लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने माहिती विचारत असतांना तसेच मागणी करतांना कुठल्या बाबतीत आपल्याला मागणी करता येईल, हे प्रथम समजून घेतले पाहिजे. जो मनुष्य अन्याय करतो, ज्याची दादागिरी आहे यासंदर्भात आपण सभागृहात अशी मागणी करतो की, या संस्थेच्या चालकाला त्या भागात प्रवेश मिळणार नाही अशी व्यवस्था मंत्री महोदयांनी करावी. परंतु अशा प्रकारची व्यवस्था करण्याबाबतची मागणी आपल्याला करता येईल काय ? याचाही विचार करणे आवश्यक आहे. खरे म्हणजे अशा प्रकारची प्रवेश बंदी करीत असतांना ज्यांच्या ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे अशा लोकांचे अर्ज तयार करुन ते माननीय मंत्री महोदयांकडे देणे आवश्यक असते, माननीय मंत्री महोदयांनी तसे आदेश पोलिसांना दिले पाहिजेत आणि त्यानंतर पोलिसांना कोर्टाच्या माध्यमातून, कोर्टाच्या परवानगीने तशी प्रवेश बंदी करता येऊ शकते. केवळ मंत्री महोदयांनी आदेश दिले म्हणजे प्रवेश बंदी होईल असे होऊ शकणार नाही, कारण त्याला अनेक मार्ग आहेत, तो त्यातून सुटू शकतो. म्हणून सभागृहात अशा प्रकारे प्रश्न विचारण्याची पध्दत योग्य नाही.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल
सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

"कामकाज सल्लागार समितीच्या बुधवार, दिनांक 5 एप्रिल, 2006 रोजी भरलेल्या बैठकीत गुरुवार, दिनांक 6 एप्रिल, 2006 ते शुक्रवार, दि. 21 एप्रिल, 2006 पर्यंतचा विधान परिषदेच्या कामकाजाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे.

(प्रेस : येथे सोबतचा कार्यक्रम छापावा.)

.....4 अे-2 (अे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: बंदी असतांना देखील छुप्या मार्गाने होत असलेली गर्भजल चिकित्सा.

मु.शी.: बंदी असतांना देखील छुप्या मार्गाने होत असलेली गर्भजल चिकित्सा यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, सुधाकर गणगणे, मुजफ्फर हुसेन, धनाजी साठे, मेजर सुधीर सावंत, श्री. रमेश निकोसे वि.प.स. यांनी दिलेली लक्षवूधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे माननीय आरोग्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गर्भजल परीक्षा करणे व स्त्री-भृणहत्या करणे यावर कायदेशीर बंदी असताना डोंबिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे काही दिवसांपासून बेकायदेशीरपणे काही खाजगी रुग्णालयांमध्ये सर्रासपणे गर्भजल परीक्षा व स्त्री-भृणहत्या केल्या जात असल्याचे युवक क्रांती दलाने एका गर्भवती असलेल्या डमी रुग्ण महिलेचे गर्भलिंग निदान करण्याचे सांगून दिनांक १२ फेब्रुवारी, २००६ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आणून देणे, यामुळे संपूर्ण ठाणे जिल्हयात एकच खळबळ निर्माण होणे, सोनोग्राफी यंत्र चालविणा-या सारिका दुबे यांचेकडे सोनोग्राफी यंत्र चालविण्याचा परवाना नसल्याचे आढळून येणे, तसेच गर्भलिंग निदान केल्याबाबतचे कोणतेही रेकॉर्ड ठेवले नसल्याचे दिसून येणे, सध्या गर्भलिंग निदान करुन भृणहत्या केल्या जात असल्याचे दिवसेंदिवस वाढत असलेले प्रकार, यामुळे मुलींच्या संख्येत मोठया प्रमाणात होत असलेली घट, या प्रकाराला आळा घालण्याच्या दृष्टीने व बेकायदेशीरपणे हा व्यवसाय करणा-या डॉक्टरांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. रणजित कांबळे (आरोग्य राज्यमंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

- नि वे द न -

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : महोदय, सन 2003 पासून या कायदयामध्ये सुधारणा करुन गर्भधारणा पूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र अधिनियम असे या कायदयाचे नांव केले आहे. परंतु या कायदयाच्या अंमलबजावणीमध्येच सुधारणा करण्याची गरज आहे. सन 2003 पासून केलेल्या कायदयाच्या अंमलबजावणीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे, अशी मला शंका वाटते म्हणून हा विषय अत्यंत गंभीर आहे. सन 2001 मध्ये महाराष्ट्र राज्यातील हजार पुरुषांच्या तुलनेत 922 इतके स्त्रियांचे प्रमाण आहे. केरळ राज्यात हे प्रमाण दर हजार पुरुषांमागे 1058 एवढे आहे. या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, शासनाने खाजगी रुग्णालयांची तपासणी यापूर्वी केली होती काय ? असल्यास केंव्हा ? आणि नसल्यास त्यांच्याविरुध्द काय कारवाई करणार आहे ? दुसरा प्रश्न म्हणजे यासंबंधी जी 19 प्रकरणे न्यायालयात निकाली काढण्यात आली आहेत, त्यांच्याविरुध्द न्यायालयाने कोणती शिक्षा सुनावलेली आहे अथवा शासनाकडून कोणती कारवाई केली आहे ?

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुदंडा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, सेक्स डिटरमिनेश केले जाते, हे खरे आहे. यासाठी अल्ट्रासोनोग्राफी सारख्या पध्दतीचा वापर केला जातो. आज सेक्स रेशो हजारी पुरूषांमागे 922 इतका आहे. याबाबत समाजामध्ये जनजागरूती होऊन, स्त्रिला समाजात स्थान मिळावे, सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी म्हणून शासनातर्फे प्रयत्न करण्यात येत आहेत. यासाठी केंद्र शासनाने प्रसवपूर्व निदान तंत्र कायदा मंजूर केला होता. सन 2003 मध्ये या कायद्यात सुधारणा केली असून त्याचे नामांतर गर्भधारणापूर्वी व प्रसवपूर्व यनिदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम असे केले आहे. सदर कायदा तेव्हा पासून आपल्या राज्यात लागू आहे. या कायद्याच्या तरतुदीनुसार राज्य पर्यवेक्षीय समितीची स्थापना करण्यात आले. तसेच, संचालक, आरोग्य सेवा मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सल्लागार समिती स्थापन करण्यात आली आहे. या अधिनिययमाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य व जिल्हा स्तरावर 423 समुचित प्राधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे राज्यात एकूण 49 प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली असून त्यापैकी 19 प्रकरणे निकालात निघाली आहेत. उर्वरित प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर निकालात काढण्यासाठी शासनातर्फे प्रयत्न करण्यात येत आहेत. तसेच,काही प्रकरणांमध्ये रुपये दहा हजाराची दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. सेक्स डिटरमिनेशन होता कामा नये म्हणून बनावट केसेससाठी स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. यासाठी त्यांना प्रत्येक बनावट केससाठी रुपये 15000/- पर्यंतचा खर्च मंजूर करण्यात येणार आहे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, स्त्रीवर अत्याचार किती होतात ते पहा. जन्माला येण्यापूर्वीच स्त्रीवर अत्याचार केला जातो. स्त्रिला जन्मापासू रोखणारे डॉक्टर्स आहेत. अशा डॉक्टर्सवर नजर ठेवण्यासाठी शासनाकडे कोणती योजना आहे ? असल्यास ती कितपत कार्यरत आहे ? यासंबंधी जनजागृती करणे आवश्यक आहे. त्याकरिता शासन कोणती पावले उचलणार आहे ?

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, यासंबंधी प्रभावी मोहीम व्हावी याबद्दल दुमत नाही. गर्भधारणपूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र अधिनियम राज्यात अधिकाधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यात 15 ते 20 दिवसांचा कार्यक्रम हाती घेण्यात येईल. या अधिनियमास प्रसिद्धी देण्याकरिता वेगवेगळया माध्यामातून प्रयत्न करण्यात येईल. सिव्हील सर्जन यांना डॉक्युमेंटेशन,रजिस्ट्रेशन तपासण्याचे अधिकार दिले आहेत. जेथे असे प्रकार चालत असतील आणि ते सिव्हीज सर्जन यांच्या निदर्शनास आले तर संबंधितांचे लायसेन्स रद्द करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. राज्य व जिल्हास्तरावर चांगल्या पध्दतीने काम व्हावे म्हणून संबंधित अधिकाऱ्यांची महिन्या-दोन महिन्यात बैठक घेण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय आरोग्य मंत्री हया महिला आहेत. त्या स्वत: डॉक्टर आहेत. त्यामुळे त्यांना चांगलीच जाण आहे, हे मी जबाबदारीने सांगत आहे. त्यांनी जी काही माहिती दिली आहे ती फक्त पेपरवर असते. जर शासनाने आपली यंत्रणा प्रभावीपणे राबविली असती तर आज दर हजारी पुरूषामागे स्त्रीचे प्रमाण 922 इतके झाले नसते.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यामध्ये शिक्षा करण्याची जी तरतूद आहे ती कमी स्वरुपाची आहे. म्हणून मोठया प्रमाणावर कडक शिक्षेची तरतूद करावयास पाहिजे. कारण आजचा जो कायदा आहे तो कमकुवत आहे. त्यामुळे त्या कायद्यामध्ये सुधारणा करुन, त्यामध्ये कडक शिक्षेचे प्रावधान आपण करणार आहात काय ? गर्भजल परीक्षा व स्त्री-भृणहत्या करणाऱ्या किती डॉक्टरांना आजपर्यंत पकडण्यात आले आहे ? त्यातील किती डॉक्टरांना शिक्षा झाली आहे ? आपण जी 19 प्रकरणे निकालात काढलेली आहेत त्यामध्ये डॉक्टरांना कोणती शिक्षा झाली ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, 19 प्रकरणांची नोंद झालेली आहे. काही केसेसमध्ये कोर्टाने फाईन केले आहेत. डॉ.अग्रवाल यांचे प्रकरण कोर्टामध्ये प्रलंबित आहे.

डॉ.विमल मुंदडा : महोदय, ही प्रकरणे लवकरात लवकर मार्गी काढावीत म्हणून आम्ही उच्च न्यायालयाला विनंती करणार आहोत. गव्हर्नमेंट प्लीडर, वकील किंवा महिला वकीलांना जी प्रलंबित प्रकरणे आहेत ती निकाली काढावी यासाठी विधी व न्याय विभागाच्या माध्यमातून विनंती करणार आहोत. तसेच सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी या योजना फक्त कागदांवरच राहतात असा मुद्दा उपस्थित केला. मी त्यांना सांगू इच्छिते की, शासन, प्रशासन आणि समाज हे घटक यामध्ये अंतर्भूत असतात. वास्तविक पाहता डॉक्टर ही समाजातील प्रतिष्ठीत अशी व्यक्ती आहे. त्यामुळे त्यांना असे जे काही प्रकार सुरु आहेत ते करु नये असे सांगण्याची वेळ येता कामा नये असे मला वाटते. कायद्याचा उपयोग ज्या कामासाठी करावयास पाहिजे त्याचा गैरवापर होता कामा नये. त्यामुळे कायद्याचा दुरुपयोग होतो किंवा कसे हे पाहण्यासाठी विभागाकडे भरारी पथक आहे. या पथकाच्या माध्यमातून डायरेक्ट संबंधित ठिकाणी जाऊन रजिस्ट्रेशन सील केले जाते.

महोदय, राज्यातील विदर्भ, मराठवाडा या भागात मेडिकल कॉलेजमधील तिसऱ्या वर्षातील जे स्टुडंटस् असतात त्यांच्यासाठी वर्कशॉप घेतले. अशाच प्रकारे मुंबईतील नायर मेडिकल कॉलेज, के.ई.एम. मेडिकल कॉलेजमधील वर्कशॉपचा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने घेणार आहोत. ए.एन.एम.च्या माध्यमातून कार्यक्रम घेत आहोत. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी जनजागरणाच्या माध्यमातून व्यापक मोहीम घेण्याबाबत सुचविले आहे. अशा प्रकारची मोहीम स्त्री केंद्रीकरण नियोजनाच्या माध्यमातून घेण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा....

महोदय, या संदर्भात दिनांक 19 ऑक्टोबर रोजी विभागाने जी.आर. काढलेला आहे. खरे म्हणजे गर्भजल परीक्षेसाठी स्त्री स्वत:च तयार असते ही वस्तुस्थिती आहे. अशा परीक्षेसाठी कायद्यामध्ये तरतूद नसतानाही डॉक्टरांची 1500 रुपये फी ठरलेली आहे. म्हणून बनावट केसेस शोधून काढण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहभागी करुन घेण्यास शासनाने मान्यता दिली आहे. गर्भजल परीक्षा किंवा स्त्री-भृणहत्येचे प्रकार ज्या ठिकाणी घडतात त्या ठिकाणी स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून धाड टाकून जर असे प्रकार आपण उघडकीस आणले तर प्रत्येक बनावट केसेसमागे स्वयंसेवी संस्थांना 15,000/- रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध करुन देणार आहोत. समाजामध्ये या प्रकारावर जरब बसल्याशिवाय हा प्रकार थांबणार नाही असे मला वाटते.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी कायद्यामध्ये सुधारणा करण्याबाबत सुचविले आहे. 1994 चा जो ॲक्ट आहे त्यामध्ये 2003 मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. परंतु त्यांनी कायद्यातील सुधारणेबाबत जे सुचविले आहे त्याबाबत "सजेशन फॉर ॲक्शन" एवढेच मी त्यांना सांगेन. या कायद्यामध्ये सुधारणा करुन, तो केंद्र सरकारकडे पाठविण्यात येईल.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, डॉ.दिनेश अग्रवाल, डॉ.अमोल गाडगीळ व डॉ.सारिका दुबे यांच्याविरुध्द कारवाई करण्यात आली आहे. परंतु मला या ठिकाणी सांगावेसे वाटते की, महिलांच्या संमतीविना ही बाब झालेली नाही. आज स्त्रीच तिच्या पोटातील स्त्रीला मारावयास निघाली आहे. हा फार विलक्षण आणि काळजी करण्याजोगा विषय आहे.

नंतर श्री.व्ही.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक...

ज्या स्त्रीने गर्भलिंग निदान करण्यास संमती दिली, त्या स्त्रीवर कारवाई करण्याबाबत आपण काय करणार आहात ? बरे झाले त्या महिलेचे नाव येथे आपण दिलेले नाही, त्या संबंधित बाईच्या बाबतीत कृती होण्याची गरज आहे, यासंबंधीचा उल्लेख या निवेदनामध्ये नाही.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, यासंदर्भातील निवेदनात उल्लेख नाही त्याचे कारण असे की, ही बनावट (डिकॉय केस) केस होती. गर्भलिंग निदान करणारे डॉक्टरांचा शोध घेण्यासाठी स्वयंसेवी संस्थांकडून बनावट केस तयार करण्यात आली होती.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. अशोक मोडक ने कहा है कि स्त्री ही स्त्री की हत्या करती है, यह बात बिल्कुल सच है और इसलिए समाज प्रबोधन की जरुरत है. वेरियस स्टडीज में यह बात खास तौर पर सामने आई है कि सुशिक्षित सेक्टर में यह चीज ज्यादा होती है, इसलिए सुशिक्षित लोगों का प्रबोधन करने के लिए और उनमें जागरुकता लाने के लिए अलग प्रकार के स्टेप्स शासन को उठाने पड़ेंगे. मेरा प्रश्न यह है कि क्या शासन सुशिक्षित सेक्टर के लोगों का प्रबोधन करने के लिए कदम उठाएगा ? इस कार्य के लिए क्या शासन के पास एडीक्वेट फंड उपलब्ध है ? अगर शासन के पास फंड उपलब्ध नहीं है तो शासन को फंड उपलब्ध करके देना चाहिए.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, व त्यांनी ज्या सजेशन केलेल्या आहेत त्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, भर्गजल परीक्षेच्या संदर्भात जे स्ट्रींग ऑपरेशन करण्यात आलेले आहे, यासंदर्भात आताच सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी मुद्दा मांडलेला आहे. यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, जे कोणी या गर्भजल परीक्षेच्या माध्यमातून फसवेगिरी करीत आहेत, त्यामध्ये दूरदर्शन व मिडीयाच्या माध्यमातून मोठया प्रमाणात जाहिरात करण्यात येत आहे. विशेषत: पत्रके काढून यासंदर्भातील माहिती देण्यात येते. भर्गजल परीक्षा करण्याचा प्रकार सुशिक्षित वर्गामध्ये मोठया प्रमाणात आढळून येत आहे. सुशिक्षित वर्गामध्ये गर्भजल परिक्षा करण्याचे प्रकार वाढत आहेत, सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी सांगितले की,

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

एक महिलाच दुस-या महिलेचा जीव घेत आहेत, अशा प्रकारे ज्या महिला गर्भजल परीक्षा करण्यासाठी सहमती देतात त्यांच्यावर कलम 307 अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करणार आहात काय ? डॉक्टर आणि संबंधित पेशंटवर अशा प्रकारचा गुन्हा दाखल करता येईल काय ? गर्भजल परीक्षा करणारे डॉक्टर व संबधित महिला यांच्यांवर आपण काय कारवाई करणार आहात ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान व सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी जो मुद्दा मांडलेला आहे, यासंदर्भातील मी मघाशी उत्तर दिलेले आहे की, ज्या समाजामध्ये आर्थिक सुबत्ता वाढलेली आहे तेथेच गर्भजल परीक्षेचे प्रमाण जास्त झालेले आहे. म्हणून मुंबई, ठाणे, सांगली, सातारा, कोल्हापूर अशी आर्थिक सुबत्ता असलेल्या पट्टयामध्ये मुलींची संख्या दर हजारी 850 ते 870 एवढी खाली घसरलेली आहे. यासाठी डॉक्टर वर्ग व दुर्देवाने समाजातील महिला हया जबाबदार आहेत. वेगवेगळया स्तरांवरुन सुरक्षिततेची भावना महिला वर्गामध्ये निर्माण होणे गरजेचे आहे, संबंधित महिलांना जर शिक्षा करण्याचा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे, याबाबतीत कायद्याच्या माध्यमातून व कोर्टाच्या माध्यमातूनच शिक्षा व्हावयास पाहिजे. तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सांगितले की, सुशिक्षित लोकांचे प्रबोधन करण्याठी आर्थिक तरतूद उपलब्ध करण्यात येईल काय, याबाबत पी.एन.डी.टी. साठी जास्तीत जास्त तरतूद उपलब्ध होण्यासाठी पी.एन.डी.टी. ॲक्ट खाली आर्थिक सेवा व त्यांना सहकार्य करण्यासाठी विशेष असे प्रयत्न करण्यात येतील..

यानंतर श्री. सांगळे..

अशुधारित प्रत / शिक्षणासाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, काही लोक आपला वंश पुढे सुरु राहण्यासाठी मुलगा पाहिजे म्हणून गर्भलिंग निदान तपासणी करतात. या तपासणीनंतर जर गर्भामध्ये मुलगा नसला तर भृणहत्या केली जाते. ब-याच ठिकाणी मोठया प्रमाणावर असे प्रकार घडत आहेत. तसेच मुंबई शहरातील झोपडपट्टयांमध्ये आपण जर गेलात तर तेथे असलेल्या हेल्थ क्लिनिकमधील डॉक्टरांची डिग्री पाहिल्यास, ती डिग्री खरी आहे की नाही ? याची शंका येते. त्यामुळे झोन निहाय असलेल्या सर्व खाजगी नर्सिंग होमस्ची व 8-10 बेड्स असलेल्या दवाखान्यांची "डिकॉय सिस्टीम" तपासण्याची आवश्यकता आहे. याबाबत शासन कार्यवाही करणार आहे काय ?

डॉ.विमल मुंदडा : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दाच्या संदर्भात मी सांगू इच्छिते की, या संदर्भात खाजगी नर्सिंग होम तसेच दवाखान्यांचे रजिस्ट्रेशन नोंदवलेले असते. या संदर्भात थोडी शंका आली तरी त्या ठिकाणी भरारी पथक पाठवून आमच्या खात्यामार्फत तपासणी केली जाते. परंतु आता याबाबत पुन्हा संपूर्ण तपासणी करुन काही अपुर्तता आढळून आल्यास त्यांचे रजिस्ट्रेशन रद्द केले जाईल. याबाबत संबंधित समूचित प्राधिकारी अधिकारी यांना अधिकार दिलेले आहेत. व एका वर्षांच्या आत पुन्हा सर्व खाजगी नर्सिंग होमस् तसेच हॉस्पीटलस् यांची पूर्णपणे तपासणी करुन त्यांचे रजिस्ट्रेशन रिन्युएशन करण्यात येतील. याबाबतचा अहवाल एका वर्षानंतर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : आज सभागृहामध्ये " गर्भजल परीक्षा करणे व स्त्री भृणहत्या करणे" या महत्वाच्या विषयावर लक्षवेधी मांडण्यात आली आहे. या अधिनियमास प्रसिध्दी देण्याकरिता बॅनर्स, पोस्टर्स, रेडिओ, जिंगल, सिनेमा स्लाईड तसेच टी.व्ही स्पॉटस् इत्यादी माध्यमाद्वारे आपल्याला काम करता येऊ शकेल व यामुळे जनजागरण होऊ शकेल. या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने माझा माननीय मंत्रिमहोदयांना असा स्पेसिफिक प्रश्न आहे की, दवाखान्याची तपासणी करण्यासाठी आवश्यक असलेला पुरेसा स्टाफ दिला आहे काय ? लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये लोकप्रतिनिधींना विचारात घेऊन कार्यशाळा घेतल्या जातात, असे म्हटलेले आहे. परंतु या कार्यशाळेमध्ये लोकप्रतिनिधी या नात्याने आम्हाला का बोलवण्यात येत नाही ? माझा माननीय मंत्रिमहोदयांना दुसरा प्रश्न असा आहे की, आतापर्यंत किती स्त्री भृणहत्या केसेसची नोंद झाली आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : मी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी उपस्थित केलेल्या दुस-या प्रश्नाचे उत्तर प्रथम देतो. आतापर्यंत स्त्री भृणहत्याच्या एकूण 49 केसेसची नोंद करण्यात आली आहे. तसेच 31 केसेस नॉन रजिस्ट्रर झालेल्या आहेत. नॉन मेटंनन्स ऑफ रेकॉर्डच्या बाबतीत 3 केसेसची नोंद करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या पहिल्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी पुरेसा स्टाफ आहे. तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी उपस्थित केलेल्या कार्यशाळेच्या मुद्दाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, आयोजित करण्यात येत असलेल्या कार्यशाळेसाठी लोकप्रतिनिधींना बोलावण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात येतील.

यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करू इच्छितो. कारण त्यांनी या विषयामध्ये अत्यंत गंभीरतेने आणि आत्मियतेने काम केलेले आहे. सभापती महोदय, या निवेदनामध्ये म्हटले आहे की, सदर अधिनियमाची राज्यात अमलबजावणी करण्यासाठी विविध स्तरावर 423 समुचित प्राधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर आता हा जो प्रकार झालेला आहे त्याबाबत या विभागासाठी नेमण्यात आलल्या समुचित प्राधिकाऱ्यांनी यापूर्वी दखल घेतली होती काय ? याबाबत त्याने तपासणी केली होती काय आणि नसल्यास त्याचेवर याबाबत जबाबदारी फिक्स केली हाती काय ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, मी पहिल्याच प्रश्नाच्या उत्तरामध्ये याबाबत माहिती दिली आहे. राज्य स्तरीय समिती आरोग्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापण्यात आली आहे. तसेच ॲडिशनल डायरेक्टर यांनी केलेल्या कारवाईमुळेच या केसेस झालेल्या आहेत आणि याबाबतत कोठे काही दुर्लक्ष झाले असेल तर संबंधितांना निश्चितपणे विचारणा करण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या संदर्भात युवक क्रांतीदलाच्या लोकांनी स्ट्रींग ऑपरेशन केलेले आहे. आणि अशा प्रकरणांमध्ये आपण अशा संस्थांचे सहकार्य घेत असतो. तेव्हा युवक क्रांतीदल या संस्थेला देखील राज्य स्तरावर कार्य करण्याची संधी दिली तर एक नोडल संस्था म्हणून काम करण्यास सोपे होईल. तसेच हे जे खटले डॉक्टरांवर चालतात त्याबाबत अनुभव असा आहे की, त्यामध्ये अनेक वर्षे जातात. उदाहरण सांगावयाचे तर अकोल्यातील एक खटला 4-5 वर्षे झाली अजूनही चालूच आहे. तेव्हा द्रूतगती न्यायालयांकडून हे खटले चालविले पाहिजेत जेणे करून एका वर्षामध्ये अशा खटल्यांचा निकाल लागेल. दुसरे म्हणजे राजस्थानमध्ये आता असा नियम केला गेला आहे की, ज्याला बहीण असेल त्यालाच मुलगी द्यायची. कारण गावातील मुलींची संख्या अदृश्य झालेली आहे. त्यामुळे तेथील स्त्री देखील अगतिक होऊन गेली आहे. म्हणून आपल्याला या संबंधात मोठ्या प्रमाणात समाज प्रबोधन करण्यासाठी ग्रामसभा वगैरे घेऊन प्रचार केला पाहिजे तसेच याबाबत कठोर भूमिका घेतल्याशिवाय काही होणार नाही. कारण महाराष्ट्रातील लोक आता फार हुशार झालेले आहेत. मी या ठिकाणी विरोधी पक्षाची सदस्य असूनही माननीय मंत्री महोदयांचे या संदर्भात अभिनंदन करते. त्यांनी या विषयामध्ये चांगले काम केलेले आहे आणि त्या या लोकांना सामील होणार नाहीत याची मला खात्री आहे.

..... 3एफ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, मला एक गोष्ट सांगितली पाहिजे की, युवक क्रांतीदलातील श्रीमती वर्षा देशपांडे यांना आम्ही त्या समितीमध्ये घेतलेले आहे. दुसरे म्हणजे यासाठी अवेअरनेस कँपेन राबविले पाहिजेत. ग्रामपातळीवर यासाठी सर्व संबंधितांचा अगदी एएनएम असतील त्यांचा देखील समावेश करून वर्षभर एक व्यापक मोहीम आपण घेणार आहोत. तसेच आमच्या राज्य स्तरीय समितीमध्ये महिला आमदार देखील आमच्याबरोबर असतील जेणे करून कठोर पावले आपल्याला या संदर्भात उचलता येतील. ज्या गोष्टी आपल्या अखत्यारीत येत नसतील त्याबाबत केंद्र सरकारकडे देखील आपण आग्रह धरू, केंद्र सरकारकडे त्या पाठवू. तेव्हा आपल्या या संबंधात ज्या काही सूचना आहेत त्यांचा निश्चितपणे विचार करण्यात येईल इतकेच मी सांगेन. तसेच या विषयातील पेंडींग केसेस लौकर निकाली काढण्यासाठी म्हणून प्रसंगी खास कोर्ट निर्माण करण्यात येऊन त्याच्यापुढे या केसेस चालविण्यात याव्यात असेही आम्ही केंद्र सरकारला सांगणार आहोत.

तालिका सभापती : लक्षवेधी सूचनांवरील चर्चा आता संपली आहे. यानंतर 'विशेष उल्लेख' घेण्यात येतील.

विशेष उल्लेखासंबंधी

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया यांनी 'विशेष उल्लेख'ची सूचना दिली आहे. पण सन्माननीय सदस्य अनुपस्थित असल्याने, मी सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांना 'विशेष उल्लेखा'ची सूचना मांडण्यास परवानगी देत आहे.

(यानंतर श्री. सरफरे ....3जी 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्ले□

पृ.शी. : मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील दुर्गम भागात निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या

मु.शी. : मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील दुर्गम भागात निर्माण झालेल्या पिण्याच्या पाण्याच्या गंभीर समस्येबाबत श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यां□ दिलेली विशेष उल्ले□ची सूच□.

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत,. यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"मुरबाड (जि. ठाणे) तालुक्यात मुख्यत्वे दुर्गम भागात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. लोकसंख्येच्या मानाने निम्मे गाव पाडयांना गंभीर पाणी टंचाई भेडसावत आहे. टोकावडे गावासाठी व परिसरातील कामतपाडा, तळवली, सरळगाव, मानवली, हेदवली, करचोडे या गावात सुरु झालेली दीड कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना बंद पडल्याने दीड कि.मी वरुन पाणी आणावे लागणे, तेथील लोकांना बैलगाडीवरुन एक बॅरलसाठी 50 रुपये मोजावे लागणे, तसेच चासोळे, बाकळवाडी, भांगवाडी, केव्हारवाडी, बोरवाडी, पानरवाडी, पेजवाडी येथील नागरिकांना 3 कि.मी. वरुन कावडीने पाणी आणावे लागणे, गेल्या वर्षी माजगाव, कान्हार्ले येथे 13 लाख 50 हजार रुपये खर्च करुन बंधारा बांधण्यात आला. परंतु बंधारासुध्दा कोरडा ठाण पडल्याने नियोजनाअभावी निधी पाण्यात गेला आहे. त्यामुळे येथील नागरिकांची पाण्याची होत असलेली गैरसोय पाहता याकडे लक्ष वेधण्यासाठी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

सभापती महोदय, या तालुक्यामध्ये मुख्यत्वे दुर्गम भागात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. लोकसंख्येच्या मानाने निम्मे गाव पाडयांना गंभीर पाणी टंचाई भेडसावत आहे. वाडया पाडयांवर पुरुष व महिला केवळ हंडाभर पाणी मिळविण्यासाठी वणवण करीत आहेत. टोकावडे गावची लोकसंख्या 1200 असून या गावासाठी व परिसरातील कामतपाडा,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

तळवली, सरळगाव, मानवली, हेदवली, करचोडे या गावात सुरु झालेली दीड कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना दीड महिना चालून नंतर बंद पडल्याने येथे दीड कि.मी. वरुन पाणी आणावे लागते. बैलगाडीवरुन आणलेल्या एका बॅरलसाठी 50 रुपये मोजावे लागत आहेत. अशाच प्रकारच्या आठ लाख रुपयांच्या योजना राबविण्यात आलेल्या देशमुखपाडा, महाजन गावातील दोन विहिरी कोरडया झाल्याने एक कि.मी. अंतरावरुन पाणी आणावे लागत आहे. चासोळे, बाकळवाडी, भांगवाडी, केव्हारवाडी, बोरवाडी, पानरवाडी, भेजवाडी येथील नागरीक 3 कि.मी. वरुन कावडीने पाणी आणत आहेत. कोचरे गावी पूर्वीच्या डबक्यावर विहिर बांधण्यात आली. परंतु बांधकाम निकृष्ट केल्याने ती कोसळू लागल्याने भीतीपोटी नागरिकांनी यावर पाणी भरण्याचे सोडून दिले असून आता डबक्यातील पाणी वापरीत आहेत. येथील नद्या नाल्यावर कृषीखाते, पंचायत समिती, जिल्हा परिषद, वन विभाग यांनी 10 ते 15 बंधारे बांधले आहेत. परंतु सर्व बंधाऱ्यांमध्ये खडखडाट आहे. म्हणून या विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधतो की, आता एप्रिल महिना सुरु झाला आहे. आज या मुरबाड तालुक्याची ही दुरावस्था झाली आहे. उद्या मे व जून महिन्यामध्ये काय अवस्था होईल याची आम्हाला चिंता वाटते. याकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुरबाडच्या (जि.ठाणे) तहसीलदारांचे गैरव्यवहार

मु.शी. : मुरबाडच्या (जि.ठाणे) तहसीलदारांचे गैरव्यवहार याबाबत डॉ. अशोक मोडक,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक,वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मुरबाडच्या तहसिलदाराचे गैरव्यवहार".

सभापती महोदय, सभागृहामध्ये आज स्त्रियांवरील अन्यायाबाबत चर्चा करण्यात आली. दु:खाची आणि संतापाची गोष्ट अशी की, मुरबाड तालुक्याच्या तहसिलदार महिला असून त्यांचे नाव सौ.भोसले आहे. त्या तालुक्यामध्ये म्हसा, हसोळे या ग्रामपंचायतीमध्ये कातकरी महिला सरपंचपदी बसावी असे आरक्षण असतांना त्यांनी मनमानी केली आणि स्वत:च्या अधिकारात आरक्षण बदलले. मुरबाडला कोतवालाच्या 18 रिक्त पदांसाठी अर्ज मागविण्यात आले. त्यासाठी मुलाखत घेण्यात आली. परतु या तहसिलदार बाईने स्थानिक नागरिकांना डावलून 20 कि.मी. अंतरावरील आपल्या मर्जीतील व्यक्तींना कोतवालपदी नियुक्त केले. या बाईसाहेबांनी सर्व नियम धुडकावून तलाठयांची वेतनवाढ रोखली. हे सर्व गुण कमी पडले म्हणून की काय, देहरी ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये झालेल्या उत्खननात उपलब्ध झालेल्या गौण खनिजावर ग्रामपंचायतीचे स्वामित्व आहे असे पत्र श्रीमती भोसले यांनी दिले. भारतीय जनता पार्टीचे ठाणे विभागाचे चिटणीस श्री. लियाकत शेख यांच्या विरुध्द ग्रामपंचायतीने कारवाई करावी असे आदेश श्रीमती भोसले यांनी ग्रामपंचायतीला दिले. या तहसिलदारांची ही मनमानी वेळीच थांबविण्यात आली नाहीतर त्या बाई पूर्णपणे कायदा हातामध्ये घेतील. अशा पध्दतीने त्यांचा मनमानी कारभार सुरु राहिला तर तेथील कायद्याचे राज्य वेगाने संपुष्टात येईल. आणि म्हणून आपणामार्फत ट्रेझरी बेंचवरील सत्ताधारी पक्षाच्या लोकांना विनंती करावयाची आहे की, याची तातडीने दखल घ्यावी व चौकशी करावी. आणि किमान या सूचनेवर एक महिन्याच्या आत उत्तर मिळेल अशी व्यवस्था करावी. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कोकण विभागातील बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरणे

मु.शी. : कोकण विभागातील बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. संजय दत्त, यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"कोकण विभागातील एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पांतर्गत बालविकास अधिकाऱ्यांची 16 पदे ऑक्टोबर 2004 पासून रिक्त आहेत. आज अखेर सदरच्या रिक्त पदांची संख्या सुमारे 25 झाली आहे. म्हणजेच कोकणातील 50 टक्के बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची पदे भरलेली नाहीत. सदरची पदे ही ग्राम विकास विभागामार्फत भरण्यात येतात. परंतु या विभागामार्फत ही पदे भरण्यासंदर्भात कोणतीही ठोस उपाय योजना केलेली नाही. ही पदे न भरल्यामुळे केंद्र सरकारकडून मिळणारा निधी व्यपगत झाला आहे. तरी ही पदे ग्राम विकास विभागामार्फत तात्काळ भरणे आवश्यक असल्याने मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधू इच्छित आहे".

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : परभणी नगरपालिकेकडून ठेकेदारांची देयके अदा करण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भेदभाव होत असणे.

मु. शी. : परभणी नगरपालिकेकडून ठेकेदाराची देयके अदा करण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भेदभाव होत असणे याबाबत प्रा. फौजीया खान, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : मा□□य सदस्य प्रा. फौजीया खान यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

प्रा. फौजीया खान (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते.

"परभणी नगरपालिका ठेकेदारांची देयके अदा करण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भेदभाव करीत असून हा व्यवहार कितपत पारदर्शक आहे हे जनतेच्या लक्षात यावे या उद्देशाने मोमेंट फॉर पिस अँड जस्टीस महाराष्ट्र या संघटनेचे परभणी जिल्हा अध्यक्ष मो. फारुख कादरी यांनी माहितीच्या अधिकारात दिनांक 16.2.2006 रोजी मुख्याधिकारी, नगरपरिषद परभणी यांना अर्ज करुन दिनांक 23.8.2004 ते 15.2.2006 या कालावधीत अदा केलेल्या देयकांचा तपशील मागविला होता. ही माहिती माहितीच्या अधिकारात 30 दिवसांच्या आत देणे बंधनकारक असताना 40 दिवस उलटून गेले तरी अर्जकर्त्याला तपशील देण्यात आला नाही. ही बाब कायद्याचे उल्लंघन करणारी असून परभणी नगरपरिषदेच्या प्रशासनाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. परिणामी ठेकेदार आणि लोकांमध्ये नगरपालिकेच्या कार्यप्रणालीवर शंका घेतली जात असून त्यांच्यामध्ये चिडीची भावना निर्माण करणारी आहे. शासनाने याबाबतीत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. म्हणून मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ठाणे जिल्ह्यातील महापालिका व नगरपरिषदांच्या विकास आराखड्यात डंपींग ग्राऊंडसाठी आरक्षण निर्माण करणे व कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी खत प्रकल्प उभा करणे.

मु. शी. : ठाणे जिल्ह्यातील महापालिका व नगरपरिषदांच्या विकास आराखड्यात डंपींग ग्राऊंडसाठी आरक्षण निर्माण करणे व कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी खत प्रकल्प उभा करणे. याबाबत श्री. मुझफ्फर हुसेन, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□□य सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यां□□ ए□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री. मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

" ठाणे जिल्ह्याची वाढती लोकसंख्या व या जिल्ह्यात सहा महानगरपालिका व सात नगरपालिका अस्तित्वात आहेत. त्या ठिकाणी वाढती कचऱ्याची समस्या भेडसावत आहे. ठाणे जिल्ह्यातील मिरा भाईंदरमध्ये 7 लाख, ठाणे शहरात 18 लाख, भिवंडीत 8 लाख, उल्हासनगरमध्ये 8 लाख, नवी मुंबईत 13 लाख, कल्याण-डोंबिवलीमध्ये 10 लाख एवढी लोकसंख्या असून या सर्व शहरांमध्ये दररोज साठणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण वाढले आहे. दररोज जमा होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी डंपींग ग्राऊंडसाठी जागा उपलब्ध नाही. उपरोक्त सर्व महानगरपालिका व नवघर-माणीकपूर, नालासोपारा, विरार, जव्हार, अंबरनाथ, बदलापूर, डहाणू या सर्व नगरपालिकांच्या क्षेत्रांच्या विकास आराखड्यांमध्ये डंपींग ग्राऊंडसाठी आरक्षण नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत जागा मिळेल त्या ठिकाणी कचरा टाकल जात आहे. यामुळे दुर्गंधी व रोगराई पसरुन नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे.

तसेच सी.आर.झेड. च्या अधिनियमामुळे समुद्र किनाऱ्यालगत डंपींग ग्राऊंड निर्माण करणे शक्य होत नसून प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य ती अनुमती

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन .....

दिली जात नाही. त्याचबरोबर ठाणे जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थितीमुळे सी.आर.झेड. अधिनियम अंमलात असल्यामुळे या प्रश्नाची सोडवणूक होण्यात विविध अडचणी निर्माण होतात. यासाठी प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने विकास आराखड्यात लोकसंख्येनुसार डंपींग ग्राऊंडसाठी जागा आरक्षित ठेवणे आवश्यक आहे. याबाबत राज्य शासनाने या सर्व महापालिका व नगरपरिषदांच्या विकास आराखड्यात डंपींग ग्रऊंडसाठी आरक्षण निर्माण करावे व कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी खत प्रकल्प उभा करावा असे त्वरित आदेश शासनाने द्यावेत अशी सूचना मी या विशेष उल्लेखाव्दारे मांडत आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी एक विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे.

तालिका सभापती : आपली विशेष उल्लेखाची सूचना या ठिकाणी आलेली नाही.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात कांद्याचे घसरलेले भाव.

मु.शी.: राज्यात कांद्याचे घसरलेले भाव यासंबंधी माननीय पणन मंत्र्यांचे निवेदन.

श्री. हर्षवर्धन पाटील (पणन मंत्री) : सभापती महोदय, या सदनामध्ये कांद्याच्या प्रश्नाच्या संदर्भात बरीच चर्चा झाली आणि त्यासंदर्भात या सदनामध्ये निवेदन करावे असे आदेश आपण दिले होते. त्यानुसार मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करीत आहे.

"देशात महाराष्ट्र कांदा उत्पादनात अग्रेसर आहे. चालू वर्षी महाराष्ट्रामध्ये कांदा पिकाचे एकूण क्षेत्र 2,10,000 एकर असून उत्पादन 16.61 लाख मे.टन आहे.

लेट खरीप व रब्बी हंगामातील उत्पादन मागील वर्षापेक्षा जवळजवळ 1 लाख टनाने जादा आहे. चालू वर्षी खरीप हंगामात राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कांदा पिकाची लागवड उशिरा झाली. त्यामुळे खरीप हंगामातील उत्पादन उशिरा व कमी आले. त्यामुळे डिसेंबर, 2005 पर्यंत राज्यात 400 ते 1000 रुपये प्रति क्विंटल कांद्यास भाव मिळाला. मात्र खरिपातील चांगल्या पावसामुळे लेट खरीप व रब्बी हंगामात कांद्याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन झाल्यामुळे फेब्रुवारी, 2006 या महिन्यापासून कांद्याच्या भावात विक्रमी घसरण होऊन साधारणत: 250 ते 300 रुपयांपेक्षाही कमी भाव या राज्यातील शेतकऱ्यांना मिळू लागला.

कांद्याचे भाव फार कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेले आहेत.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फेब्रुवारी 2006 व मार्च 2006 या महिन्यातील कांद्याचे भाव फार कमी झाले असल्यामुळे या महिन्यात मुंबई बाजार समिती वगळता इतर बाजार समित्यांमध्ये विक्री झालेल्या कांद्याला शासन 50 रुपये प्रति क्विंटल अनुदान देईल.

राज्यातील प्रत्येक बाजार समितीने फेब्रुवारी व मार्च 2006 मध्ये त्यांच्या बाजार आवारात विक्री झालेल्या कायंद्यासंबंधीची सर्व माहिती तपासून झाल्यावर अनुदान देय राहील.

राज्यातील कांद्याची निर्यात वाढावी म्हणून महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळातर्फे शेतक-यांच्या सहकारी संस्थांना युरोप सोडून इतर देशात कांदा निर्यातीसाठी रुपये 10,000 प्रति 40 फुटी कंटेनर वाहतूक अनुदान तर कंट्रीक्राप्टद्वारे निर्यात होणा-या कांद्यास 100 मे.टनासाठी रुपये 25,000 तर 200 मे. टनासाठी रुपये 50,000 अनुदान देण्यात येईल.

युरोपीय देशात कांदा निर्यात वाढीसाठी सहकारी संस्था तसेच खाजगी निर्यातदार यांना रुपये 20,000 प्रति 40 फुटी कंटेनर तसेच रुपये 800 प्रति मे.टन ब्रेकबल्कद्वारे निर्यात केल्यास पणन मंडळाद्वारे अनुदान देण्यात येईल. कृषि उत्पन्न बाजार समित्यांना सुध्दा कांदा निर्यात करण्यासाठी सहकारी संस्थाप्रमाणे पणन मंडळाद्वारे अनुदान देण्यात येईल.

सभापती महोदय, कांद्याचा प्रश्न कायमचा सुटावा म्हणून दीर्घकालीन उपाययोजना म्हणून पणन मंडळाने राज्यात शेतक-यांना कांदा चाळी बांधण्यासाठी अनुदानाची योजना राबविली असून आतापर्यन्त रुपये 5.45 कोटी अनुदान देऊन जवळ जवळ 1 लाख टनाच्या साठवणुकीच्या कांदा चाळी उभारल्या आहेत. ही योजना पुढे चालू ठेऊन या योजनेसाठी पणन मंडळ निधी कमी पडू देणार नाही व राज्यात जास्तीत जास्त कांदा चाळी शेतक-यांनी उभाराव्यात यासाठी अनुदान देण्यात येईल.

बाजार समित्यांना कांदा चाळी उभारण्यासाठी रुपये 1500 प्रति मे.टन पणन मंडळामार्फत अनुदान दिले जाईल. या बाजार समित्यांनी कांदा तारण योजना राबवावी यासाठी पणन मंडळ 6टक्के व्याजाच्या दराने बाजार समित्यांना शेतक-यांनी तारण ठेवलेल्या कांद्यावर अग्रिम देण्यासाठी निधी उपलब्ध करुन देईल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. हर्षवर्धन पाटील...)

महाबीज मार्फत चांगल्या प्रतिचे कांदा बियाणे उत्पादन घेऊन कांद्याची उत्पादकता व प्रति हेक्टरी उत्पादन सुधारावे म्हणून बियाणे बदल कार्यक्रम पणन मंडळ आणि बाजार समित्यांमार्फत राबविला जाईल.

सभापती महोदय, भविष्य काळात अशा प्रकारचे प्रश्न या राज्यात वारंवार निर्माण होऊ नयेत म्हणून विभागाच्या माध्यमातून दीर्घकालीन उपाययोजना करण्याचे आम्ही ठरविलेले आहे. मुंबई शहरामध्ये 8 ते 8.50 रु. किलोने कांदा खरेदी करावा लागतो. म्हणून विक्रीची नवीन योजना आम्ही तयार केलेली आहे. शेतक-यांच्या सहकारी संस्था व सहकारी भांडारे यांच्या सहकार्याने उत्पादकांचा कांदा थेट ग्राहकास विक्रीची योजना मुंबईमध्ये राबविण्यात येईल. या थेट विक्री होणा-या कांद्यावर बाजार समितीचा सेस आकारला जाणार नाही. मुंबई शहरामध्ये कांद्याची थेट विक्री केन्द्रे निर्माण करता येतील.

सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळात रेल्वे वॅगनच्या दराबाबत काही अडचणी निर्माण झाल्या होत्या. वाहतुकीच्या दरात स्लॅब पडल्यामुळे रेल्वे वॅगनच्या दरामध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. आंतर्राज्यीय रेल्वे वॅगन वाहतुकीसाठी कांद्याचे यापूर्वीचे वर्गीकरण कायम ठेवण्यासाठी आणि वाहतूक दर कमी करण्यासाठी रेल्वे विभागाकडे पाठपुरावा करण्यात येईल.

कांद्याला 5 रुपये प्रति किलो हमी भाव द्यावा असा केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला असून त्याबाबतीत पाठपुरावा करण्यात येईल.

कृषी विभाग व पणन मंडळामार्फत कांद्याची उत्पादकता आणि गुणवत्ता वाढावी म्हणून सातत्याने विस्तार कार्य, शेतक-यांचे प्रशिक्षण कार्यक्रम जोमाने राबविण्यात येईल. तसेच कांदा निर्यातीच्या बाबतीत, कांद्याच्या चाळींच्या बाबतीत, सीड रिप्लेसमेंटच्या बाबतीत आणि प्रक्रिया उद्योगाच्या बाबतीत विभागाच्या माध्यमातून व्यापक धोरण घेण्याचे आम्ही ठरविले आहे.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ....

सभापती महोदय, कांद्याचे भाव 30 ते 50 रुपयांनी वाढलेले आहेत. 15 ते 20 एप्रिलपर्यंत हे भाव अजून वाढण्याची शक्यता आहे. दुर्देवाने जर भाव पुन्हा कोसळले तर त्याबाबतीत सुध्दा परिस्थितीनुसार शासन निर्णय घेईल. पुढील 1/2 महिन्यात अशी परिस्थिती निर्माण झाली तर राज्य शासनाच्या वतीने सुध्दा पुन्हा योग्य ती मदत करण्याचे धोरण स्वीकारले जाईल. या विभागाच्या माध्यमातून कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या बाबतीतील हा निर्णय मी जाहीर करु इच्छितो. या निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या बाबतीत शासनाची भूमिका याठिकाणी जाहीर केलेली आहे. याबाबतीत आताच मत व्यक्त करण्यापेक्षा शेतकऱ्यांना अगदीच वाऱ्यावर सोडले नाही असे म्हणता येईल. पुढील 1/2 महिन्यात येणाऱ्या परिस्थितीबाबतचे आश्वासन सुध्दा मंत्रीमहोदयांनी दिलेले आहे. मला एक गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, सदनाने आणि सभापतींनी वारंवार निदेश देऊन सुध्दा निवेदने वेळेवर होत नाहीत. आपल्या सोयीप्रमाणे आणि सभागृहाची भावना लक्षात न घेता आणि सभापतींनी दिलेले निदेश खिजगणतीत न घेता निवेदने केली जातात. लॉटरीच्या संदर्भातील निवेदन करतो असे अर्थमंत्र्यांनी आठ दिवसापूर्वी सांगितले होते. काल माननीय मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी उद्याच म्हणजे आज निवेदन करतो असे सांगितले. आता शासनाने निवेदने करावीत याबाबत आग्रह धरावा किंवा नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आज कांद्याबाबतचे निवेदन रडत-खडत का होईना पण करण्यात आले. लॉटरीबाबतचे निवेदन मात्र अद्यापपर्यंत झालेले नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी येथे जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, जवळजवळ 3-4 विषयांवर निवेदने करावीत असे निदेश आपल्या माध्यमातून शासनाकडे आलेले आहेत. मी संबंधित मंत्र्यांना याची कल्पना दिलेली आहे. वास्तविक पाहता यातील काही निवेदने आज व्हावयाला पाहिजे होती. विशेषत: लॉटरीच्या संदर्भातील निवेदन करण्याबाबत आपल्या कार्यालयातून सूचना आल्यावर मी अर्थमंत्र्यांना आज दुपारी भेटलो होतो. आज याबाबत निवेदन करता येत नसले तरी सोमवारी आपण निदेश दिल्याप्रमाणे निवेदन करण्यात येईल. तसेच अजूनही 3/4 निवेदने करावयाची आहेत ती सोमवारी करण्याबाबत संबंधित मंत्र्यांना कळविण्यात येईल.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की सभापतींनी निदेश दिल्यानंतर शासनाकडून वेळेवर निवेदने होत नाहीत. कांद्याच्या बाबतीत आता निवेदन करण्यात आले. हे निवेदन खालच्या सभागृहात आधी करण्यात आले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : याबाबतचा खुलासा काल मी माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी प्रश्न उपस्थित केला होता तेव्हा केलेला आहे. खालच्या सदनामध्ये हे निवेदन मी आताच केले आहे आणि नंतर वरच्या सभागृहामध्ये निवेदन केलेले आहे. या व्यतिरिक्त कांदा उत्पादकांच्या बाबतीत कोठेही निवेदन करण्यात आलेले नाही. हा खुलासा मी काल केला होता.

तालिका सभापती : ज्याप्रमाणे खालचे सभागृह सार्वभौम आहे त्याचप्रमाणे वरचे सभागृह सुध्दा सार्वभौम आहे. निवेदन करताना असे होऊ नये. खालच्या सभागृहात आज निवेदन केले आणि वरच्या सभागृहात उद्या केले असे होऊ नये.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, याबाबतची दक्षता शासनाकडून घेतली जाईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, कांद्याच्या संदर्भात मंत्रीमहोदयांनी निवेदन केले. कांद्याला 5 रु. हमीभाव मिळेल यासाठी शासन केंद्र शासनाकडे प्रयत्न करणार आहे. म्हणजे क्विंटलला 500 रु. हमीभाव होतो. आतापर्यंत जो कांदा खरेदी केला त्याबद्दल प्रतिक्विंटल 50 रु. अनुदान दिले जाणार आहे. निदान एक पाऊल पुढे गेल्याचे समाधान आहे. परंतु पुन्हा 1/2 महिन्यात गडबड झाली तरी शासन मदत करणार आहे असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. तेव्हा ही गडबड कोणत्या स्वरुपाची आहे ? कांद्याचे भाव कोणत्या लेव्हलपर्यंत घसरले की सरकार मदत करणार आहे ? कांद्याच्या भावाची सीमा सरकारने सांगितली पाहिजे.

तालिका सभापती : असलेले भाव कमी झाले तर काय निर्णय घेण्यात येईल याबाबत मंत्रीमहोदयांनी निवेदन केले आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, विशेषत: रेल्वेच्या संदर्भात जे या निवेदनात म्हटले आहे ते स्वागतार्ह आहे. त्याचबरोबर रस्त्यावरुन वाहतूक करण्याच्या संदर्भात सांगितले. परंतु ज्यावेळी ट्रकमधून कांद्याची वाहतूक करण्यात येते त्यावेळी फक्त 9 टन एवढाच माल नेता येतो. यापूर्वी तरी 10 ते 11 टन एवढा कांदा नेता येत होता व त्यामुळे वाहतुकीचा खर्च कमी येत होता व शेतकऱ्याला देखील परवडत होते. परंतु आता ती देखील आशा राहिलेली नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, 50 रुपयाचा जो फरक देण्यासंबंधीचा निर्णय शासनाने घेतला आहे त्याबाबत जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च या तीन महिन्यातील कांदयाचे भाव किती टक्क्यांनी उतरले, गेल्या वर्षीचे भाव किती होते याचा विचार केला तर मागील वर्षी फेब्रुवारी महिन्यात 62 रुपये मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी कमी झाले होते आणि मार्च महिन्यात 49 रुपये एवढा सरासरी भाव कमी झालेला आहे. म्हणून हा फरक ज्या ज्या शेतकऱ्यांनी कांदयाची विक्री केलेली आहे त्या विकलेल्या कांदयाला पर क्विंटलप्रमाणे देण्याचा निर्णय घेतला आहे, म्हणून हा बेस धरला आहे. ज्यावेळी अडीच रुपयाच्या खाली कांदयाचे भाव उतरतात त्यावेळी ही स्फोटक परिस्थिती निर्माण होते म्हणूनच आम्ही केंद्रशासनाकडे अशी परवानगी मागण्यासाठी प्रस्ताव पाठवून त्याचा पाठपुरावा करणार आहोत. तसेच यासाठी आम्हाला 15 दिवस निवेदन करण्यासाठी लागण्याचे कारण म्हणजे याबाबतचा अभ्यास करुन कुठल्या प्रकारचा पर्याय स्वीकारला तर काय होईल, कांदयाचे उत्पन्न वाढविण्यासाठी सीड रिप्लेसमेंट अशी अनेक कारणे आहेत. तिसरी गोष्ट म्हणजे सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार एका ट्रकमध्ये 9 टनाच्या वर माल नेता येणार नाही, ही त्यातली दुसरी अडचण निर्माण झाली आहे. यासंदर्भात विधि व न्याय विभागाचे मत मागविून यासंबंधात आपल्याला पुन्हा रिव्हीजनमध्ये जाता येईल काय ? कारण 15 टनाच्या आसपास माल नेता आला पाहिजे, शेतकऱ्यांना एवढा माल परवडत नाही, तशीच परिस्थिती आज ऊसाच्या वाहतुकीच्या संदर्भातही निर्माण झालेली आहे, यासंदर्भातही शासनाच्या स्तरावर विचार सुरु आहे. कदाचित पुढच्या दोन अडीच महिन्यात कांदयाचे भाव वाढून परिस्थिती सुधारली तर प्रश्नच येणार नाही पण पुन्हा अशी परिस्थिती निर्माण झाली तर शासन त्याचा जरुर विचार करील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या कांद्याने लोकांच्या डोळयात पाणी आणले, सरकारच्या डोळयात तसेच राजकीय नेत्यांच्याही डोळ्यात पाणी आणले.संपूर्ण देशाला लागणाऱ्या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

कांदयापेकी 50 टक्के कांदा आपल्याच राज्यात तयार होतो. तसेच एप्रिल महिन्यात येणारा कांदा साठविण्यासारखा असतो, तो खराब होत नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना हा कांदा साठविण्यासाठी मदत व्हावी म्हणून त्यासाठी गोडाऊन्स तयार करण्यासाठी शासनाच्या वतीने अनुदानाची योजना आखण्यात आली तर शेतकऱ्यांना त्याचा जास्तीत जास्त फायदा होऊन काही दिवस तरी शेतकरी आपला कांदा साठवून ठेवू शकतील व भाव चांगला आल्यानंतर तो माल त्यांना विकता येईल.

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, कांदयाच्या साठवणुकीसाठी चाळींची योजना 25 टक्के अनुदान देऊन आपण घेतलेली आहे व त्याचा फायदा शेतकरी घेत आहेत. आतापर्यंत 1.5 लाख टन कांदा साठविण्याची व्यवस्था आपण केलेली आहे.

यानंतर श्री. भारवि .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील....

ज्या दिवशी 4 ते 5 लाख टन कांद्याची व्यवस्था करू त्या दिवशी कांद्याचा भाव कसा ठरवावयाचा याचासुध्दा विचार करावा लागेल. आता आम्ही मार्केट कमिटयांनासुध्दा पुढाकार घेण्यास सांगितले आहे.

...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: ठराविक माननीय सदस्यांचे कामकाज
प्राधान्यक्रमाने घेण्याबाबत.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी एका महत्त्वाच्या विषयाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. मी जवळ जवळ 21 लक्षवेधी सूचना दिलेल्या आहेत, पण त्यातील एकही स्वीकृत करण्यात आलेली नाही. नियम 93 अन्वये सूचना देखील दिलेल्या आहेत, पण त्यावरील निवेदन अजून सभागृहामध्ये होत नाही. मी दिनांक 18,19,20 तारखेला नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्याचे निवेदन अद्यापपर्यंत शासनातर्फे आपण निदेश देऊनसुध्दा करण्यात आलेले नाही. नियम 93 अन्वये देण्यात येणारी सूचना, विशेष उल्लेख स्वीकारण्यात यावा यासाठी आम्हाला सचिवांना विनंती करावी लागते. माझ्या असे लक्षात आले आहे की, काही ठराविक सन्माननीय सदस्यांच्या लक्षवेधी सूचना, विशेष उल्लेखाच्या सूचना स्वीकारल्या जातात. एवढेच नाही तर ठराविक सन्माननीय सदस्यांचेच प्रश्न प्रश्नोत्तराच्या यादीत पहिल्या दहा क्रमांकांमध्ये असतात. हा काय प्रकार आहे ? जुहू येथील एस.आर.ए.ची योजना, मुंबईतील इमारतींचे कन्व्हेअन्स डीड होत नसल्यामुळे तेथे राहत असलेल्या लोकांचे होत असलेला छळ, प्रॉपर्टी टॅक्समध्ये झालेली वाढ हे विषय सार्वजनिक हिताचे होत नाहीत काय ? माझी एकही लक्षवेधी सूचना स्वीकारण्यात आलेली नाही.

तालिका सभापती (श्री.गुरूनाथ कुलकर्णी) : आज आपण विशेष उल्लेखाची सूचना दिली होती. परंतु, आपण विशेष उल्लेखाची जी सूचना देतात तो विषय विशेष उल्लेखाचा होत नसल्यामुळे आपली सूचना स्वीकारण्यात आलेली नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, विविध आयुधांचा वापर करून वेगवेगळे विषय मांडण्याचा मी प्रयत्न करतो. परंतु ते स्वीकृत केले जात नाहीत.

तालिका सभापती : यासंबंधी आपण माननीय सभापतींना दालनात भेटावे.

...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक 15 संबंधी</u>.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, सदर विधेयक आम्हाला मिळालेले नाही.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, संयुक्त समितीकडे सदर विधेयक विचारार्थ पाठविण्यात आले होते. या समितीवर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार हे सदस्य होते. तसे पाहिले तर सदर विधेयक हे सन्माननीनीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनीच तयार केले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या विधेयकाच्या संयुक्त समितीवर मी सदस्य होतो हे खरे आहे. पण संयुक्त समितीचा अहवाल आम्हाला अजून वाचायलासुध्दा मिळालेला नाही.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, संयुक्त समितीचा अहवाल डिसेंबर 2005 मध्ये पटलावर ठेवण्यात आला असून या अहवालाच्या प्रती सगळयांना वितरित केल्या आहेत. तसेच दिनांक 3 एप्रिल 2006 रोजी या अहवालाच्या इंग्रजी प्रती दिलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर सदर विधेयकाच्या प्रती देखील आज वितरित करण्यात आलेल्या आहेत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : या विधेयकावर आता चर्चा करावयाची असेल तर ती आता करता येईल. जर या विधेयकावर सोमवार, दिनांक 10 एप्रिल, 2006 रोजी चर्चा करावयाची असेल तर त्या दिवशी हे विधेयक घेता येईल. परंतु सोमवारी जर हे विधेयक घेण्याचे ठरले तर, विधेयक वाचण्यासाठी आम्हाला वेळ मिळाला नाही अशी आपली तक्रार राहता कामा नये.

श्री.मधुकर सरपोतदार : अशी तक्रार आमच्याकडून राहणार नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सोमवारी दुपारी 2.00 वाजता सभागृहाची बैठक असते. शिवाय इतरही चर्चा असतात. त्यामुळे सोमवारी सभागृहाची बैठक दुपारी 2.00 ऐवजी, दुपारी 1.00 वाजता घेतल्यास बरे होईल. दुपारी 1.00 वाजता विधानसभेमध्ये प्रश्नोत्तराचा तास सुरु असल्यामुळे माननीय मंत्री महोदय त्या ठिकाणी व्यस्त असतात. त्यामुळे आपल्या सभागृहात दुपारी 1.00 ते 2.00 वाजेच्या दरम्यान लक्षवेधी सूचना घेतल्या आणि त्यानंतर दुपारी 2.00 वाजता नेहमीप्रमाणे प्रश्नोत्तराचा तास घेतला तर अधिक कामकाज होऊ शकेल. नाही तर पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची बैठक बोलवावी लागेल आणि रात्री 9 किंवा 10 वाजेपर्यंत काम करीत राहावे लागेल.

तालिका सभापती : सभागृहाची बैठक उद्यापासून सलग चार दिवस होणार नाही.

श्री.दिवाकर रावते : महोदय, दुपारी 1.00 ते 2.00 वाजण्याच्या दरम्यान लक्षवेधी सूचना घेण्यात याव्यात. त्यानंतर दुपारी 2.00 वाजता नेहमीप्रमाणे प्रश्नोत्तराचा तास घ्यावा अशी मी विनंती करतो.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य आपण जे सुचवित आहात ते संयुक्तिक होणार नाही. मला वाटते सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक-15 नंतर घेता येईल. सोमवारी सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजता घेऊ व त्यामध्ये नियमित कामकाज घेऊ.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक सोमवार, दिनांक 10 एप्रिल, 2006 रोजी दुपारी 2.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून, 37 मिनिटांनी,
सोमवार, दिनांक 10 एप्रिल, 2006 च्या दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही